१८२८

म.ग्रं.सं. ठाणे

विषय : [illegible]

सं. क्र. : ७३२

REFBK-0003792

REFBK-0003792

# माझा म्हैसूरचा प्रवास

प्रेक्षणीय स्थळांच्या सोळा चित्रांच्या

चित्रपटासह.

लेखक व प्रकाशक:

[illegible] टे

REFBK-0003792

[illegible] लोईड,

त[illegible] सा इत्यादि प्रकाशन [illegible]

पुस्तकांचे कर्ते, महाड, जि. कुलाबा.

( सर्व हक्क स्वाधीन )

किंमत बारा आणे

प्रकाशकः—गोविंद चिमणाजी भाटे,
महाड, जि. कुलाबा.
मुद्रकः—दामोदर रघुनाथ मित्र,
सँडहर्स्ट रोड, गिरगांव मुंबई नं. ४.

हें प्रवासवर्णनपर पुस्तक
श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे
इचलकरंजी संस्थानचे अधिपती
यांचे सेवेशीं
त्यांची प्रवासप्रियता, स्नेहलोलुपता,
उदारता व विद्याविनयसंपन्नता
या आकर्षक गुणांबद्दल
त्यांची वारंवार आठवण काढणाऱ्या
त्यांच्या दूरस्थ नम्र मित्रानें
आदरपूर्वक अर्पण केलें आहे.

गो. चिं. भाटे.

# प्रस्तावना

म्हैसूर प्रांतांत कांहीं दिवस राहण्याचा व तेथलीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचा योगायोग कसा आला याचें सविस्तर वर्णन पहिल्या लेखांत आल्यामुळें त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. मनुष्याला अनुभव-जन्य ज्ञान मिळविण्यास, कंटकपणा व सोशिकपणा शिकण्यास व विशेषतः मनुष्याचें कूपमंडूकत्व जाण्यास प्रवासासारखा दुसरा रामबाण उपाय नाहीं. आमच्या महाराष्ट्रीयांमध्यें प्रवासप्रियता व प्रवासवर्णनें लिहिण्याची प्रवृत्ति वाढत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. माझ्या स्वतःसंबंधानें पहातांना वीस वर्षांपूर्वी मला प्रवासाचा नाद लागला व त्याचें फळ ह्मणजे 'माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास,' 'माझा अटकेपार प्रवास' व 'हिंदुस्थानचें नंदनवन' हीं तीन विस्तृत प्रवास-वर्णनपर पुस्तकें मी लिहिलीं व तीं महाराष्ट्रांत लोकप्रिय झालीं. याचें एक प्रत्यंतर ह्मणजे खटपट न करितां हीं निरनिराळ्या शाळांमधून मराठीच्या अभ्यासाकरित

नेमण्यांत आलीं व आतां या सर्व पुस्तकांची पहिली आवृत्ति खलास झाली हें होय. विस्तृत वर्णनाचें हें चवथें पुस्तक मी महाराष्ट्र वाचकांच्या सेवेशीं सादर करीत आहे. तें माझ्या पूर्वीच्या प्रवासवर्णनांप्रमाणें वाचकांना प्रिय होईल अशी आशा आहे. म्हैसूर प्रांताचें हें वर्णन संपूर्ण आहे अशांतला मुळींच भाग नाहीं. म्हैसूर प्रांत बहुरत्ना वसुंधरेची अन्वर्थक छोटेखानी आवृत्ति असल्यामुळें मी न पाहिलेलीं कितीतरी प्रेक्षणीय स्थळें अझून त्या प्रांतांत आहेत. सवड व संधि साधल्यास राहिलेला प्रांत नजरेखालीं घालण्याचा माझा विचार आहे. खरोखरीच मला तर म्हैसूर प्रांताबद्दल विलक्षण आपलेपणा वाटतो. म्हैसूर प्रांताच्या पुष्कळ खालीं मराठी राज्यरूपी वृक्षाचा एक लहानसा रोपडा शहाजीराजांनीं लावला होता व तो अगदीं अलीकडेपर्यंत जीव धरून होता. यामुळें म्हैसूर प्रांत महा–महाराष्ट्राच्या टापूपैकींच आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. शिवाय आतां तर नमुनेदार एतद्देशीय संस्थान या नात्यानें म्हैसूर प्रांताबद्दल जास्तच आपलेपणा वाटतो. तरी अशा सुंदर प्रांतांत

प्रवास करण्याची इच्छा या छोटया प्रवासवृत्तवर्णनानें वाचकांमध्यें उत्पन्न झाल्यास पुस्तक लिहिल्याचें मला श्रेय मिळालें असें मी मानीन.

महाड, जिल्हा कुलाबा
ता. १० आक्टोबर,
सन १९२८.

**गोविंद त्रिमणाजी भाटे.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | प्रांतप्रवेश. ... ... ... | १ |
| २ | बंगळूर. ... ... ... | २४ |
| ३ | म्हैसूर. ... ... ... | ८४ |
| ४ | म्हैसूरच्या आसपास. ... ... | १४३ |
| | १ श्रीरंगपट्टण. २ नांजनगूड. ... | |
| | ३ कृष्णराज सागर. ... ... | |
| ५ | म्हैसूरच्या सोन्याच्या खाणी. ... | १७७ |
| ६ | बेलूर व हॅलेबिड येथील देवालयें. ... | १८९ |
| ७ | म्हैसूरचे दोन धबधबे. ... ... | २१५ |
| | १ शिवसमुद्र. २ गिरसाप्पा ... | |
| ८ | म्हैसूर संस्थानची स्थापना व स्थित्यंतरें. | २५२ |

# माझा ह्मैसूरचा प्रवास

## -१-

## प्रांतप्रवेश.

अव्वल इंग्रजींत इंग्रजांबद्दल आमची गुणैकदृष्टि होती, नव्हे त्यांचे शास्त्रीय शोध, त्यांनीं निर्माण केलेलीं सुलभ प्रवासाचीं व इतर सुखसोईचीं साधनें, त्यांची रेखीव सुधारलेली राज्यव्यवस्था, त्यांचा चोख व कांटेतोल न्यायदानपद्धति, त्यांचें सैनिक व नाविक सामर्थ्य व त्यांचा विद्यावाङ्मयविस्तार, सारांश, पाश्चात्य सुधारणेच्या विविध स्वरूपानें आमचीं मनें इतकीं मोहून गेलीं होतीं कीं, इंग्रजांचे दोष-त्यांचा मद्यपीपणा, त्यांचा जुगाराचा नादीपणा व त्यांचा फाजील चैनीपणा-आह्मांला गुणरूप भासूं लागले होते व 'ढवळयाजवळ बांधला पवळा वाण नाहीं पण गुण लागला' या म्हणीप्रमाणें इंग्रजांच्या सहवासानें आमच्यांत त्यांचे गुण

उतरण्याऐवजीं त्यांचे दोष आमच्या अंगांत भिनत चालले. या अनिष्ट सामाजिक परिवर्तनाचा परिहार करण्याच्या बुद्धीनें इंग्रजांचे दोष दाखविण्याचा उपक्रम महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केला. इंग्रजांचे स्वहितपोषक व राष्ट्रहितपोषक गुण विष्णुशास्त्र्यांस ठाऊक नव्हते असें नाहीं. जॉनसनवरील निबंधांत त्यांनीं हे गुण प्रांजलपणें कबूलहि केले आहेत. पण त्यांचा तात्पुरता उद्देश दोषाविष्करणाचा असल्यामुळें त्यांनीं हें दोषाविष्करण व आमच्या लोकांचें गुणवर्णन अशा जोरदार व परिणामी भाषेनें केलें कीं लंबकाला हेलकावा दिला ह्मणजे जसा तो अगदीं उलट दिशेला जातो, त्याप्रमाणें जनमनाची स्थिती झाली व अव्वल इंग्रजींतील गुणैकदृष्टि नाहींशी होऊन तिची जागा दोषैकदृष्टीनें पटकावली व आह्मांला आमचे लोक सर्वगुणसंपन्न व इंग्रज सर्वदोषसंपन्न असे दिसूं लागले. शांतपणें विचार केला असतां गुणैकदृष्टि काय किंवा दोषैकदृष्टि काय दोन्ही विकृत दृष्टीच होत. खरी दृष्टि म्हणजे सारासार विचार करून सत्य शोधून काढणारी विचिकित्सक दृष्टि होय. अशा दृष्टीनें पाहिलें

ह्मणजे इंग्रजांमध्येंहि गुणदोष आहेत व आपल्यामध्येंहि गुणदोष आहेत असें कबूल करणें भाग आहे. आतां कोणत्याहि लोकांत गुणाचें पारडें थोडें तरी जड असल्यावांचून त्या लोकांची व त्यांच्या देशाची सतत भरभराट होत नाहीं हें उघड आहे. तरी आपल्या देशाची व त्यांतील लोकांची सतत उन्नति होत रहावी अशी आपली इच्छा असल्यास आपल्यांतील गुणदोषांचें नेहमीं आत्मनिरीक्षण करून गुणाचें पारडे जड होईल अशा तऱ्हेचें वर्तन प्रत्येक माणसानें करीत रहावें ह्मणजे ह्याची स्वतःची व पर्यायेंकरून देशाचीहि उन्नति झाल्यावांचून रहाणार नाहीं. असो.

अशा प्रकारची आत्मनिरीक्षणाची संधि म्हणा किंवा प्रसंग ह्मणा मला माझ्या अलीकडच्या आजारानें आणून दिला खरा. मी विचार करूं लागलों कीं, माझ्या बरोबरीच्या मंडळींपेक्षां मी मागें मागें का! शिक्षक या नात्यानें मी माझ्या पूज्य इंग्रज गुरुपेक्षां कमी नाहीं; भाषणलेखनव्यवसायांतही त्यांच्याइतकेंच प्राविण्य मी मिळविलें आहे; एकंदरींत त्यांचेंच उच्च ध्येय नजरेपुढें ठेवून मी गेल्या तीस वर्षांत

वागत आलों आहे. पण माझ्यामध्यें स्वहितपोषक असे अधिकारलालसा व हक्काबद्दल जागरूकता हे गुण नाहींत असें माझ्या ध्यानांत आलें. हे गुण जर माझ्यांत असते व प्रारब्धकर्म करीत रहाण्याची समाधानी वृत्ति नसती तर मी आज एका अखिल आर्यावर्तांत विख्यात झालेल्या, आर्थिक भरभराटीमुळें मन मानेल तसा खर्च करण्याचें सामर्थ्य असलेल्या, आंगच्या सदृढतेमुळें व चाळीस वर्षांच्या सतत वाढीमुळें आगंतुक संकटांना आणि आकस्मिक आघातांना दाद न देणाऱ्या अशा एका संस्थेचा कर्णधार असतों, तदनुषंगानें सहज मिळणाऱ्या मानाच्या व मिळकतीच्या जागांचा उपभोग घेत असतों व त्या जागांच्या जोरावर अनेकांचा आश्रयदाता होण्याचें श्रेय मला लाभलें असतें. परंतु 'प्रारब्धं न परित्यजेत्' या माझ्या म्हणीप्रमाणें मी प्राप्त कर्तव्य करीत राहिलों. तें माझें कामहि दाईच्या कामासारखें नाजूक काम! एखाद्या श्रीमंताच्या अर्भकाचें त्याच्या जन्मापासूनचें दाईपण एखाद्या बाईकडे आलें म्हणजे ती काय काय करीत नाहीं? त्या अर्भकाच्या श्रीमंतीला साजेशी

पण त्याच्या आरोग्याला व त्याच्या जोमदार वाढीला आवश्यक अशी सर्व व्यवस्था हळुहळू करीत रहाते; त्याची रात्रंदिवस काळजीपूर्वक जोपासना करते. त्या अर्भकाची हळूहळू पण जोरदारपणें वाढ होत जाते; त्याच्या बाळसेदार बांध्याचें व त्याच्या विलक्षण वाढीचें सर्व लोक कौतुक करतात. दाईचें हृदय हर्षानें भरून जातें; पण इतक्यांत अनपेक्षित कारणांनीं त्या अर्भकाची वाढ खुंटते व त्याला अशक्त-पणा येऊं लागतो. असें झालें कीं, जिकडून तिकडून काहूर उठतें; दाईच्या मनाला वेदना होतात; तरी पण प्राप्तकर्तव्य ती करीत रहाते. या दाईसारखीच सध्यां माझी स्थिति आहे. आठ वर्षांखालीं जन्मलेल्या एका संस्थेचें जन्मापासून दाईपण माझ्याकडे आलें. संस्थारूपी अर्भकास एक वर्ष झालें नाहीं तोंच एक मोठें गंडांतर त्यावर आलें होतें. पण धीरानें व धीम्मे-पणानें त्याची त्या काळांत जोपासना केल्यामुळें त्या गंडांतरांतून तें अर्भक निभावलें व मग त्याची भराभर वाढ होऊं लागली. या संस्थारूपी अर्भकाची जोपासना करतांना मी दिवस पाहिला नाहीं, रात्र पाहिली नाहीं,

सण पाहिला नाहीं, सुटी पाहिली नाहीं; अशा तऱ्हेनें गेलीं आठ वर्षें मी अविश्रांत श्रम केल्यामुळें माझ्या शरीरावर अनिष्ट परिणाम होऊन गेल्या पावसाळयाच्या सुरुवातीस मला जबर आजारानें पछाडलें व मला सक्तीची चार महिन्यांची रजा घ्यावी लागली. या विश्रांतीनंतर मी पुन्हां आपल्या कामाला लागलों आहे. या माझ्या आजाराबद्दल व त्यामुळें मिळालेल्या सक्तीच्या विश्रांतीबद्दल मला वाईट न वाटतां उलट आनंदच होत आहे. कारण या माझ्या आजारानिमित्त घेतलेल्या विश्रांतीनें माझा एका विद्यासंपन्न, दानसंपन्न, सुस्वभावसंपन्न व ऐश्वर्यसंपन्न अशा समवयस्क संस्थानिकाशीं सलगीचा स्नेह जुळला व त्यांच्या निकट सहवासाचा व बहुश्रुत संभाषणाचा लाभ घडला; त्यामुळेंच हिंदुस्थानच्या एका अत्यंत रमणीय प्रदेशांतील सुंदर शीतल निवासस्थळीं महिनाभर रहाण्यास सांपडलें व शेवटीं त्यायोगेंच मला मासिक मनोरंजनांत दर महिन्यास लेख लिहिण्याच्या बारा वर्षें सतत चालविलेल्या वाङ्मयसेवेच्या व्रताची पुनश्च सुरुवात करतां आली. तेव्हां माझ्या आजाराचा मला अपकार न वाटतां

इंग्रजी ह्मणीप्रमाणें प्रच्छन्न उपकारच वाटत आहे; आतां येवढी लांबलेली प्रस्तावना पुरी करून प्रस्तुताकडे च्चळणें बरें.

म्हैसूर हें या प्रांताचें नांव कानडी भाषेंतलें आहे. म्हैस ( महिष या संस्कृत शब्दाचा कानडी अपभ्रंश ) म्हणजे रेडा व ऊरु ह्मणजे शहर. हे दोन शब्द मिळून म्हैसूर असा शब्द झाला. रेड्याचें तोंड असलेल्या महिषासुर नांवाच्या असुरास चामुंडी किंवा महिषासुरमर्दिनी या देवीनें मारल्याचें पुराणांतरीं वर्णन आहे. त्या देवीचें देऊळ असलेली टेकडी म्हैसुर शहराजवळ आहे ( या टेकडीचें व देवीचें ग्रथान्काश सविस्तर वर्णन येईल. ) म्हैसूरच्या महाराजांच्या घराण्याची ही कुलदेवता आहे. यामुळें म्हैसूर शहराला व सर्व प्रांताला म्हैसूर असें नांव मिळालें. या प्रांताचें अशोक राजाच्या वेळचें जुनें नांव महिषमंडळ असें आहे. कर्नाटक या नांवानें संस्कृत वाङ्मयांत विख्यात असलेल्या प्रांताचा म्हैसूर हा मुख्य भाग आहे. पण या ऐतिहासिक पुराणत्वाच्या पलीकडे म्हैसूरची पूर्वपीठिका जाते. भुगर्भशास्त्राप्रमाणें म्हैसू-

रचा भूमिभाग हा पृथ्वीच्या अगदीं प्रथम घट्ट बन·
लेल्या पृष्ठभागांपैकीं एक आहे. ज्या वेळीं "पूर्वापरौ तोयनिधीऽवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदंडः" असें ज्याचें कालिदासानें अन्वर्थक वर्णन केलें आहे तो प्रचंड हिमालय पर्वत अजून समुद्राचे तळींच होता, ज्या वेळीं गंगायमुना या नद्यांचा उदयहि झाला नव्हता व त्यांच्या आजुबाजूचा प्रदेश समुद्राचे पाण्यानें व्याप्त होता, ज्या वेळीं गोदावरी व कृष्णा या नद्यांमधला काळ्या खडकाचा पठाराचा प्रदेश भूपृष्ठावर तयार झाला नव्हता; ज्या वेळीं हिंदुस्थान, आफ्रिका, दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलिया हीं सर्व खंडें जमिनीनें जोडलेलीं होतीं, त्या वेळेपासून म्हैसूर हा प्रांत पृथ्वीच्या पृष्ठभागावर स्थिर स्थितींत आहे. इतका विलक्षण जुनाट म्हैसूर हा प्रांत आहे. म्हणून हिंदुस्थानांत इतरत्र कोठें न दिसणारें विलक्षण स्वरूप या प्रांताचें दिसून येतें; असो.

म्हैसूर प्रांत हा हिंदुस्थानच्या दक्षिणेकडच्या बाजूचा किंचित् त्रिकोणाकृती असा पठाराचा प्रांत आहे. या पठाराची उंची समुद्रसपाटीपासून सामान्यतः

दोन ते तीन हजार फूट यांचे दरम्यान आहे. या त्रिकोणप्राय प्रांताची पूर्वपश्चिम लांबी २९० मैल व दक्षिणोत्तर रुंदी २३० मैल आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ सुमारें तीस हजार मैल आहे. हा प्रांत मोठ्या हिंदुस्थानची छोटेखानी आवृत्तीच आहे ह्मणाना. मात्र हिंदुस्थानच्या उत्तरेस प्रचंड हिमालय पर्वत आहे तर ह्मैसूरच्या दक्षिणेस मोठा नीलगिरी पर्वत आहे व उत्तरेस पर्वत नसून खोलगट जमिनीचा भाग आहे व त्यांतून कृष्णानदी वहात गेली आहे. मद्रास इलाख्याच्या मलबार, कोईमतूर वगैरे भागांकडून पाहिल्यास ह्मैसूर प्रांताची ठेवण कांहींशी काश्मीर प्रांतासारखी भासेल. ज्याप्रमाणें खोलगट पंजाब प्रांताकडून प्रचंड हिमालय पर्वत ओलांडून गेल्यावर काश्मीर प्रांत लागतो; त्याप्रमाणें कोईमतूर मलबारकडून प्रचंड निलगिरी पर्वत ओलांडून गेल्यावर ह्मैसूर प्रांत लागतो. दुसऱ्या एका दाखल्यानें या प्रांताच्या ठेवणीची बरोबर कल्पना देतां येईल. समजा, एखादा निसर्ग स्थितींतील पाचूचा त्रिकोणप्राय खडबडित खडा आहे व त्याला एका कोंदणांत बसविलें आहे. कोंदणानें वेष्ठित असा हा

पाचूचा खडबडित खडा जसा दिसेल तसाच ह्मैसूर प्रांत दिसतो. कारण ह्मैसूर प्रांताचा हा पाचूचा त्रिकोणप्राय खडा जणूं कांहीं पूर्व, पश्चिम व दक्षिण या सर्व बाजूंस पर्वतराजींनीं वेष्टिला आहे. जणूं कांहीं हें पर्वतांचें कोंदणच प्रांताला घातलें आहे व प्रांत खरोखरीच पाचूच्या खडबडित खड्यासारखा आहे. म्हैसूर प्रांताच्या घडणीचें व ठेवणीचें विलक्षण आश्चर्य वाटतें. आधीं सर्व प्रांतच सभोंवारच्या सर्व भागापेक्षां कितीतरी उंच आहे असें दिसून येतें. या पठारावर मधूनमधून लहान मोठीं डोंगराचीं व टेकड्यांचीं शिखरें व टोंकें आपलीं डोकीं वर काढतांना दिसतात.

प्रांताच्या या ठेवणीचें वर्णन एका भोजनप्रिय माणसानें 'ह्मैसूर प्रांत पेले, बशा, फळें, फूलदाणी (Flowerpot) वगैरे पदार्थांनीं चित्रित झालेल्या मेजवानीच्या सेजाप्रमाणें दिसतो' असें केलेलें आहे तें " औदरिकस्य अभ्यवहार्यमेव विषयः " या न्यायानें अन्वर्थक आहे. या प्रांताच्या पठाराच्या एकंदरींत किती तरी पटीनें उंच ह्मणजे सहा सात हजार फुटांच्यावर असलेल्या शिखरांनीं भूषित अशी निलगिरी

पर्वतांची रांगची रांग दक्षिणेस दृग्गोचर होते. त्या पलिकडच्या कोईमतूर या जिल्ह्याचा व मलबारच्या प्रांताचा भाग पाताळाप्रमाणें खोल दिसतो व निलगिरी पर्वताचें दोडा बेटा नांवाचें आठ हजार फूट उंच असलेलें सर्वांत उंच शिखर व खालच्या खोल प्रांतांतील पालघाट शहराच्या दक्षिणेकडील पर्वत-राजींतलें अनमलें नांवाचें दोडाबेटा शिखराइतकेंच उंच शिखर हीं दोन प्रचंड शिखरें महाद्वारावरच्या जय-विजयाप्रमाणें दिसतात. हल्लीं साऊथ इंडियन रेलवेचा लोहमार्ग या महाद्वारांतूनच जणूं कांहीं चालला आहे असा दिसतो. पालघाट पर्वत व निलगिरी पर्वत यामधली ही प्रचंड खिंड समुद्रावरून येणारे पावसाळी वारे मद्रास इलाख्यांतील सर्व भागावर पसरून त्या मुलुखाला मुबलक पावसाचा पुरवठा करण्याकरितां जणूं कांहीं मुद्दाम तयार केली आहे असा भास होतो. म्हैसूर प्रांताच्या पश्चिमेस पुन्हां कुर्ग प्रांतांतील प्रचंड पर्वत दृग्गोचर होतात; याच पर्वतांतून कावेरी नदी निघून ती म्हैसूर प्रांताच्या दक्षिण भागांतून वहात जाऊन म्हैसूर प्रांताच्या पूर्व–दक्षिण टोंकाकडील टेकड्यांच्या चिळ·

णींतून जातांना शिवसमुद्र नांवाचा सुंदर धबधबा बनवून खालच्या खोलगट प्रदेशांत प्रवेश करतांना दिसते. निम्नोन्नतिदर्शक नकाशावरून म्हैसूर प्रांताची घडण व ठेवण किती विलक्षण आहे हें स्पष्टपणें दिसून येतें.

प्रांताच्या घडणेच्या विविधतेप्रमाणें इतर पुष्कळ बाबतींतही या प्रांतांत विविधता दिसून येते. प्रथमतः हवेची बाबत घ्या. जरी हा प्रांत विषुववृत्तानजीक जातो तरी प्रांतांत मद्रास इलाख्याप्रमाणें फार उष्ण हवा नसते. सर्व प्रांतच समुद्रसपाटीपासून दोन हजार फुटांच्या वर असल्यामुळें एकंदरींत हवा समशीतोष्ण आहे, इतकेंच नव्हे तर निलगिरी व तिच्या लगतचा भाग व बंगलोरसारखा जरा जास्त उंचवट्याचा भाग येथील हवा थंड असल्यामुळें हीं स्थानें 'शीतलनिवास स्थानें' म्हणून गणलीं जातात; व हीं ठिकाणें युरोपीयन लोकांना फार प्रिय असून तेथला देखावा त्यांना स्वतःच्या युरोपांतल्या स्वदेशासारखा भासतो. सर्व प्रांतभर जिकडे तिकडे झाडी पुष्कळ असून शीतकटिबंधांत प्रायः होणारी बहुतेक [illegible] नस्पती

या प्रांतांत होतात. तसेंच पावसाच्या बाबतींत येथें विविधता आहे. आधीं या प्रांतांत वर्षांतून सातआठ महिने थोडाफार पाऊस पडतो. कारण या प्रांताला पश्चिमेकडचा जून–आक्टोबरपर्यंतचा मोठा पावसाळा मिळतो व नवंबर दिजंबरचा बंगालच्या उपसागराचा छोटा पावसाळाहि मिळतो. पण पावसाळ्याच्या पुरवठ्या-मध्येंहि विविधता पुष्कळ आहे. प्रांताच्या पश्चिमे-कडच्या भागांत अडीचशेंपासून तीनशें इंच पाऊस पडतो, तर पूर्वेकडच्या भागांत तो पंचवीस तीस इंचां-इतका कमी होतो. पण दुहेरी पावसामुळें व प्रांतांतील जमिनीच्या उंचसखलपणाचा फायदा घेऊन जागोजाग लहान मोठे तलाव बांधल्यामुळें ( असे लहानमोठे तलाव एकंदर तीस हजारांच्यावर आहेत. ह्मणजे दर चौरस मैलास एक तलाव आहे ) या प्रांतांत पाण्याचा सहसा तुटवडा पडत नाहीं. पाण्याच्या मुबलकतेमुळें सर्व प्रांतभर झाडझाडोरा पुष्कळ आहे व प्रांताचा भूमिभाग सदा हिरवागार रहातो व ह्मणूनच काश्मीर-प्रमाणें या प्रांतालाहि हिरव्याचार पाचूची उपमा चांगली शोभते.

हवापाण्याप्रमाणें जमिनी व पिकें यासंबंधींही या प्रांतांत विविधता दिसून येते. जमिनीकडे पाहिल्यास कोठें तांबड्यालाल मातीचा प्रदेश दृग्गोचर होतो तर कोठें काळ्याभोर मातीचीं शेतेंच्या शेतें दृष्टिपथांत येतात; कोठें पांढूरसर तांबडमातीची माळजमीनच जमीन दिसते तर कोठें काळसर पांढऱ्या मातीचा प्रदेश लागतो. पिकें पाहूं गेल्यास कोठें भाताचें तयार झालेलें पिंवळसर पीक दिसतें; तर कोठें हिरवेंगार व दाट उंसाचें पीक नजरेस येतें. कोठें शाळूचें सुंदर पीक दृष्टिपथांत येतें, तर कोठें उच उंच नारळी पोफ-ळीच्या झाडांची लागवड दृष्टीस पडते. कोठें डौलदार आंब्याच्या राई अवलोकनांत येतात; तर कोठें लहा-नवट शिंदीचें वन डोळ्यासमोर येतें; कोठें गवता-सारखें खुरटें वाढणारें रागी ( नाचणी ) चें पीक दिसतें तर कोठें हिरवेगार पानमळे दृष्टीस पडतात. डोंगर, टेकड्या, नद्यानाले यांनीं हा प्रांत सर्वत्र व्याप-लेला असल्यामुळें त्यांतून प्रवास करतांना विलक्षण विविधता प्रत्ययास येते. कोठें दाट छायेची डोंगरांची रांगची रांग लागते, तर कोठें उघड्या बोडक्या प्रचंड

खडकांची पंगत लागते. कोठें एखाद्या नदीचें पांढुरसर खडकाचें उथळ पण रुंद पात्र लागतें तर कोठें खोल पण अरुंद असें एखाद्या नदीचें पात्र दृग्गोचर होतें. सारांश, म्हैसूर प्रांत हा खरोखरी बहुरत्नावसुंधरेची छोटेखानी प्रतिकृति आहे असा प्रत्यय या प्रांतांत प्रथम प्रवास करणारास पदोपदीं येतो यांत शंका नाहीं. इतकें या प्रांताचें विहंगमदृष्टया केलेलें सामान्य स्वरूपवर्णन पुरें आहे. आतां प्रत्यक्ष प्रवासवर्णनाकडे वळणें बरें.

हल्लीं दक्षिण महाराष्ट्रांतील माणसास म्हैसूर प्रांतांत व त्या प्रांताची वास्तविक राजधानी बंगळूर या ठिकाणीं दोन मार्गांनीं जातां येतें. पहिला सरळ, सोपा व सोईचा मार्ग म्हणजे मद्रास सदर्नमराठा रेलवेनें, पुणें बंगळूर या मेलगाडीनें मिरजेहून थेट बंगळूरला जाणें होय. या मार्गानें मिरजेहून बंगळूर चारशें पासष्ट मैल असून प्रवासास सुमारें पंचवीस तास लागतात. या गाडीनें गेलें म्हणजे मध्यें कोठेंही गाडी बदलावी लागत नाहीं व म्हैसूर प्रांताचा दोनशें अकरा मैल लांबीचा प्रदेश आपल्या दृष्टीस पडतो.

दुसरा मार्ग म्हणजे मिरजेपासून हुबळीपर्यंत जावयाचें व तेथें गाडी बदलून गदग गुंटकलवरून जाणाऱ्या हुबळी बंगळूर गाडीनें बंगळूरास पोचावयाचें. या मार्गानें मिरजेहून बंगळूर पांचशें सात मैल, म्हणजे पहिल्या मार्गापेक्षां बेचाळीस मैलानें जास्त लांब आहे व प्रवासास चाळीस बेचाळीस तास लागतात. म्हैसूर प्रांताचा उत्तरेकडचा फक्त पन्नास मैलांचाच प्रदेश या मार्गानें गेल्यास आपल्या दृष्टीस पडतो. असो.

मी अर्थात् मिरजेहून सरळ मार्गानेंच बंगळूरास गेलों. मद्रास सदर्न मराठा रेलवेच्या पुणें बंगळूर मेलनें प्रवास करणाऱ्यास म्हैसूर प्रांताच्या दर्शनाच्या दृष्टीनें एक मोठी गैरसोय आहे. ज्याप्रमाणें ज्योतिष-शास्त्रज्ञ चंद्राचा अर्धा भागच सदोदित व तोही एकच अर्धा भाग पृथ्वीवरील माणसांना दृग्गोचर होतो असें सांगतात त्याप्रमाणें मेलनें म्हैसूर प्रांतांत जाऊन येणाऱ्या प्रवाशास म्हैसूर प्रांताचा एकच भाग जातां येतां दिसतो. पुण्याची मेल हरिहर-म्हैसूर प्रांताचें प्रवेशद्वार-या स्टेशनला सायंकाळीं सात सवा सात वाजतां पोचते व बंगळूरास सकाळीं सहा वाजतां पोचते. म्हणजे सर्व म्हैसूर

प्रांतांतून रात्रीचा गाडीचा प्रवास होतो व प्रवाशास प्रांत मुळींच दृग्गोचर होत नाहीं. असें बंगळूराहून मेलनें येतांना तीच स्थिति होते. बंगळूराहून रात्रीं मेल निघते ती सकाळीं सात सवासातला हरिहर स्टेशनला येते. ह्मणजे तिकडून परत येतांनाही म्हैसूर प्रांतांतून रात्रीचाच प्रवास होतो. तेव्हां ज्यांना म्हैसुर प्रांताचें विहंगमदृष्ट्या का होईना दर्शन घ्यावयाचें असेल, त्यांनीं मेलनें प्रवास न करितां पॅसेंजर गाडीनें दोन्ही वेळां निदान परत येतांना तरी प्रवास केला पाहिजे. मी ह्मणूनच परत येतांना पॅसेंजर गाडीनेंच प्रवास केला. पॅसेंजर गाडीनें सात आठ तास जास्त लागतात खरे, पण लोकमान्यवर्गानें जाणाऱ्या प्रवाशास या गाड्या दुहेरी फायदेशीर आहेत; एक तर गाडीभाडें कमी पडतें व शिवाय मेलगाडीपेक्षां या पॅसेंजर गाड्यांमध्यें माणसांची गर्दी कमी असते.

मागें सांगितल्याप्रमाणें मी बंगळूरास मेलनें गेलों. ह्मणूनच जातांना हरिहरपासून मला म्हैसूर प्रांताचें ओझरतें दर्शनसुद्धां घेतां आलें नाहीं, तें परत येतांना घेतलें व आतां मी जें बंगळूरपर्यंतच्या म्हैसुर प्रांताच्या

ओझरत्या दर्शनाचें वर्णन देणार आहे तें मी उलटी-कडून प्रथमतः पाहिलेल्या प्रांताचें वर्णन आहे हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें.

आह्मी ता. २९ आगष्ट १९२६ रोजीं ( मी, माझा मुलगा, माझी मानलेली मुलगी व तिची आई अशी चार मंडळी ) पहाटेस पांच वाजतां मिरज स्टेशनला मेलमध्यें बसलों. या प्रदेशाची माहिती असणाऱ्यांस ठाऊकच आहे कीं मिरजपासून घटप्रभा नदीच्या तीरावरील पलीकडच्या गोकाक स्टेशनपर्यंतचा प्रांत अत्यंत रुक्ष निर्वृक्ष ओसाड माळरानच आहे. आफ्रिका, अरेबिया किंवा हिंदुस्थान यांतील वालुकामय प्रदेशांत कोठें कोठें तुरळक हिरव्यागार बागाइतीचे लहान लहान पाचूसारखे भूमिभाग दृग्गोचर होतात. त्याचप्रमाणें या ओसाड खडकाळ प्रदेशांत ओढ्या-नाल्यांच्या लगतीस विहीरीच्या पाण्यावर होणाऱ्या बागा व मळे मधूनमधून दृष्टीस पडून मनाला आनंद देतात. बाकी जिकडे तिकडे उजाड भाग दिसतो; लहान लहान टेकड्या लागतात त्या जळल्यासारख्या उघड्या बोडक्या व काळसर व ह्मणूनच भीषण दिस-

तात. पण घटप्रभा नदी आली ह्मणजे आधीं उजव्या बाजूकडे त्या नदीवरील पुष्कळ ठेंगणें पण लांबच लांब धरण दृष्टीस पडतें. आम्ही गेलों त्या वेळीं धरणावरून सारखें पाणी वहात होतें. पावसाळ्यांतल्या या धरणाचा देखावा खरोखरी फार नयनमनोहर आहे यांत शंका नाहीं. येथून हुबळीपर्यंतचा भूमिभाग भूगर्भशास्त्रदृष्ट्याही वेगळाच आहे व त्याचा वेगळेपणा आपल्याही सहज ध्यानांत येतो. ज्याला गोकाक दगड किंवा आपल्याकडील कुरंदी दगड ह्मणतात त्या दगडाचा हा भूमिभाग आहे. हे खडक भूपृष्ठापासून सुरू होतात. हे तांबूस पांढरे व पिवळट असतात. या खडकाचीच कुरंदाचीं जातीं करतात व या भागांतल्या प्रत्येक स्टेशनवर कुरंदाच्या जात्यांच्या रांगाच्या रांगा आपल्याला पहावयास सांपडतात. येथपासून डोंगरहि तांबड्या दगडाचे आहेत असें दृष्टोत्पत्तीस येतें व ते सर्व डोंगर व सभोंवारचा प्रदेश झाडाझुडपांनीं व्याप्त असून हिरवा हिरवा गार दिसतो. यामुळें डोंगरावरच्या तांबड्या पाऊलवाटा मोठ्या मजेदार दिसतात. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं निरनिराळ्या

पिकाचीं शेतें दिसतात. बेळगांवजवळ जाऊं लागलें ह्मणजे सुंदर भाताचीं शेतें लागतात. खानापुरापासून धारवाडपर्यंत रानच रान लागतें. जिकडे पहावें तिकडे गर्द रानाखेरीज कांहीं दिसत नाहीं. धारवाड जरा उंचावर व टेकड्या टेकड्यावर वसलेलें आहे. येथून पुढें उताराचा, सपाटीचा व काळयाभोर जमिनीचा भाग लागतो तो म्हैसूर प्रांतांत शिरल्यावरही कांहीं मर्यादेपर्यंत असतो. कर्नाटकाचा ह्याच भाग अत्यंत सुपीक आहे. या भागांतच जवळ जवळ भडोच कापसा-इतका उत्तम कापूस पिकतो. जिकडे पहावें तिकडे कापसाचीं शेतें; मधूनमधून जोंधळा व इतरही पिकें दिसतात हें खरें; पण मोठें पीक कापसाचें. मुंबई इलाखा व म्हैसूर प्रांत यांची सरहद्द म्हणजे तुंगभद्रा नदी. या नदीला लहानसाच एक सुंदर पूल आहे. हा पूल ओलांडला कीं आपण म्हैसूर प्रांतांतील उत्तरेकडच्या चितलदुर्ग या जिल्ह्यांत प्रवेश करतों व लागलींच हरिहर हें गांव लागतें. हें गांव हरिहर नांवाच्या तेराव्या शतकांत बांधलेल्या देवळाकरितां प्रसिद्ध आहे. येथून दुसरेंच स्टेशन दावणगिरी ह्मणून लागतें.

हें म्हैसूर प्रांतांतलें एक मोठें व्यापाराचें ठिकाण आहे. येथें शालीसारख्या उंची व बहुमोल घोंगड्या तयार होतात. म्हैसूर प्रांतांत आपण शिरलों तरी सभोंवारचा देखावा कर्नाटकासारखाच दिसतो. अजून प्रांत सपाटच लागतो; काळ्या मातीचीं सुपीक शेतेंच अजून लागतात. फारशी झाडीही लागत नाहीं. हरिहर स्टेशनापासून सुमारें चाळीस मैलांवर चिकजजूर म्हणून लहानसें स्टेशन लागतें;येथून जिल्ह्याचें ठिकाण चितलदुर्ग येथें जाण्यास म्हैसूर सरकारची नॅरोगेज रेलवे लागते. ही रेलवे जी. आय. पी. रेलवेचा नेहमीं सहवास असणाऱ्या माणसास इतकी छोटी वाटते कीं जणूं काय खेळांतली छोटेखानी आगगाडी आहे! ग्वाल्हेरास गेल्यावरही ग्वाल्हेर स्टेट रेलवे पाहिली म्हणजे असाच विरोध ध्यानांत येतो व ती रेलवे खरोखरीच प्रारंभीं कै. माधवराव शिंदे लहान असतांना त्यांना इकडे तिकडे खेळण्याकरितां व फिरण्याकरितां बांधण्यांत आली होती व मग तोच सार्वजनिक रेलवेरस्ता करण्यांत आला. ही चिक-जजूरची छोटेखानी रेलवे पाहून मला ग्वाल्हेरच्या

रेलवेची व तिची खेळाकरितां बांधल्याच्या हकीकतीची आठवण झाली. असो. येथून आणखी चाळीस मैल प्रवास केला म्हणजे म्हैसूर प्रांताचा दुसरा जिल्हा कडूर व त्यांतलें कडूरपासून चार मैलांवर असलेलें बिरूर हें गांव लागतें. हेंही जंक्शन स्टेशन आहे. येथून म्हैसूरचा अगदीं पश्चिमेकडला अत्यंत डोंगराळ जंगली जिल्हा शिमोगा इकडे जाणारी रेलवे लागते. म्हैसूरच्या सृष्टिसौंदर्ययुक्त भागास येथून खरी सुरुवात होते म्हणाना. आतां सपाटीचा मुलूख संपतो व सर्व भाग चढउताराचा व टेकड्याटेकड्यांचा लागतो. जिकडे तिकडे झाडीच झाडी दिसूं लागते व वाटोवाट लहान मोठे तलाव लागतात व पिकेंही कर्नाटक प्रांतापेक्षां निराळीं अशीं दृष्टीस पडतात. झाडेंही निराळ्याच तऱ्हेचीं आहेत असें दिसतें. सारांश, नाटकांत ज्याप्रमाणें एकदम देखावा बदलतात तसा येथें प्रकार होतो. बिरूर सोडलें कीं लवकरच आपण म्हैसूरच्या तिसऱ्या हासन जिल्ह्यांतील अरसिकेरी या गांवीं येतो. येथून म्हैसूरला जाणारा रेल्वेचा फाटा लागतो. येथून म्हैसूरच्या दोन्ही राजधान्या म्हैसूर व बंगळूर

या सारख्याच ह्मणजे सुमारें १०० मैलांवर आहेत. अरसिकेरीहून टुमकूर हें बरोबर साठ मैल आहे. हें त्याच नांवाच्या जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून मोठें गांव आहे. टुमकूर हें जिल्ह्याच्या आग्नेय टोंकाला आहे. येथून लवकरच प्रवासी बंगळूर जिल्ह्यांत शिरतो. टमकूरपासून फारच डोंगराळ व चढता भुमिभाग लागतो. प्रचंड घरासारखे मोठमोठे दगड व खडक दिसूं लागतात. डोंगरावरही जिकडे तिकडे दगडच दगड दिसतात; या सर्व विलक्षण देखाव्यानें मनुष्य आश्चर्यचकित होतो यांत शंका नाहीं. रेल्वें-तूनच का होईना पण काय पाहूं आणि काय न पाहूं असें मनुष्यास होऊन जातें व त्यामुळें लांबचा प्रवास असूनही प्रवाशाचा वेळ हां हां ह्मणतां जातो. असो.

आह्मी मिरजेहून २९ ऑगष्टच्या पहाटेस पांच वाजतां निघालों तों दुपारीं दोन वाजतां धारवाडास आलों व दुसऱ्या दिवशीं दोन वाजतां निघून बंगळुरास तिसऱ्या दिवशीं सकाळीं साडेसहा वाजतां येऊन पोंचलों.

-२-

# बंगळूर.

बंगळूर नांवाचें स्मरण झाल्याबरोबर प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनांत मिश्र मनोविकार उद्भवल्याखेरीज रहात नाहींत; निदान बंगळूरांत शिरताक्षणीं माझ्या मनांत तरी मिश्र मनोवृत्तीनें काहूर केलें यांत शंका नाहीं. कारण माझ्या मनांत बंगळूर शब्दाबरोबर शहाजी राजांच्या कर्नाटकांतील कामगिरीचें चित्र उभें राहून एक प्रकारचा आनंद व अभिमान मनांत उत्पन्न झाला. कारण विजापूर बादशाईचे विख्यात सेनापती म्हणून शहाजी राजांना सन १६४० च्या सुमारास बंगळूर, कोलर, होसकोट, दोड बाळापुर आणि झिरा हीं ठिकाणें व त्या लगतचा प्रांत जहागीर म्हणून देण्यांत आला व शहाजी राजे लढाईवर गेलेले नसले म्हणजे यांच आपल्या जहागिरीवर रहात व शहाजी राजांना घोड्यावरून पडून सत्तराव्या वर्षी अकस्मात मृत्यु आला तो हल्लींच्या शिमोगा जिल्ह्यांतील बसवेपाटणा

या गांवींच आला. या गोष्टी मनांत आल्यानें कोणत्या महाराष्ट्रीयास आनंद व अभिमान वाटणार नाहीं. शहाजीच्या पश्चात् तंजावर व ही बंगळूराकडील जहागीर शहाजीचे दुसरे चिरंजीव व्यंकोजी राजे यांच्या ताब्यांत आली. शहाजीचे थोरले चिरंजीव शिवाजी राजे यांनीं महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन केल्यावर आपल्या वडिलार्जित जहागिरीचा वाटा मागण्याच्या मिषानें कर्नाटकावर स्वारी केली. महाराष्ट्रीयांमध्यें कलहप्रियता कमी असती व जरा जास्त धोरणीपणा त्यांनीं दाखविला असता तर महाराष्ट्र व कर्नाटक यांचा जडलेला संबंध कायम राहिला असता. जरी व्यंकोजी-शिवाजी यांच्यामध्यें तात्पुरता सलोखा झाला तरी शहाजीच्या घराण्याच्या या दोन शाखा अगदीं वेगवेगळ्या राहिल्या; इतकेंच नव्हे तर त्यांच्यामध्यें विलक्षण वैमनस्य धुमसत राहिलें. पुढें व्यंकोजीराजांना तंजावराहून बंगळूराकडील प्रांताची वहिवाट करणें महागाईचें व मुष्किलीचें वाटूं लागल्यामुळें त्यांनीं हा प्रांत तीन लाख रुपये घेऊन सन १८८७ मध्यें म्हैसूरच्या वडियार घराण्यांतील राजाला विकत दिला.

सुमारें पन्नास वर्षे महाराष्ट्रीयांच्या ताब्यांत असलेला हा प्रांत याप्रमाणें दुसऱ्यांना विकत देण्यांत किती अदूरदर्शीपणा घडला हें मनांत येऊन मनाला वाईट वाटलें. बंगळूराचा हा सर्व पूर्वेतिहास डोळयांपुढें उभा राहिल्यामुळें बंगळूरांत शिरतांना माझ्या मनांत मिश्र मनोविकार उद्भूत झाले असें मी वर म्हटलें आहे. या लेखांत या शहराची सविस्तर हकीकत व येथील प्रेक्षणीय स्थळांची माहिती देण्याचा मानस आहे. असो.

बंगळूर हा शब्द बंगळू व ऊरू या दोन कानडी शब्दांचा मिळून सामासिक शब्द झाला आहे. कानडीमध्यें बंगळू म्हणजे वांगे व ऊरू म्हणजे गांव किंवा खेडें असा अर्थ आहे. या शहराला हें नांव पडण्याबद्दल खालील आख्यायिका त्या प्रांतांत प्रचलित आहे. सन बाराव्या व तेराव्या शतकांच्या दरम्यान होसल घराण्यांतील वीर बल्लाळ नांवाचा राजा या प्रांतांत राज्य करीत होता. एके दिवशीं शिकारीस गेला असतांना राजाची व त्याच्या हुजऱ्यांची व शिकारकरी लोकांची चुकामुक झाली व राजा रात्र होईपर्यंत वणवण हिंडला व शेवटीं अत्यंत थकल्यामुळें त्याला घेरी आल्यासारखें झालें

ह्मणून तो एका एकीकडे व एकट्या असलेल्या झोपडींत शिरला. तेथें त्याला फक्त एक ह्मातारी दिसली. राजानें तिच्याजवळ कांहीं तरी खाण्यास मागितलें. तिच्याजवळ वांग्यांखेरीज कांहीं एक नव्हतें. ह्मणून तिनें असलेलीं वांगीं उकडून राजास दिलीं व राजानें तीं वांगीं खाल्लीं व आपल्या घोड्यालाही त्यांपैकीं कांहीं खाऊं घातलीं; व राजानें त्या रात्रीं त्या झोंपडींत झोंप घेतली. ही बातमी भरकन सर्वत्र पसरली व त्या झोपडीच्या खेड्याला बंगळूरू किंवा बंगळूर असें नांव मिळालें. तें हल्लीच्या बंगळूराच्या उत्तरेस आहे. हल्लीचें बंगळूर शहर मागडी व येलहंका या ठिकाणचा प्रसिद्ध राजा केंपी गौडा यानें सन १५३५ मध्यें वसविलें. तेव्हांपासून वीरबल्लाळाच्या बंगळुरास हल्लीं जुनें बंगळूर व हल्लींच्या बंगळूरास नवें बंगळूर ह्मणतात. केंपी गौडानें या शहराच्या भावि वाढीच्या बुद्धीनें व वसलेल्या शहराच्या संरक्षणाकरितां त्या वेळच्या शहराच्या बऱ्याच दूर अंतरावर पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर अशा बरोबर दिशा साधून चार 'नजर बुरुज' ( Watch towers ) बांधले. हे चारी बुरुज प्रेक्ष-

णीय आहेत व यथाक्रम त्यांचें वर्णन पुढें येईलच. पण सध्यां इतकें सांगितलें म्हणजे पुरे कीं केंपीगौडाचें शहराच्या भावी भरभराटीचें भविष्य अक्षरशः खरें ठरलें. इतकेंच नाहीं तर कैंपी गौडानें आपल्या नजर बुरुजांनीं निदर्शित केलेल्या मर्यादेच्याहि पलीकडे शहराची वाढ झाली आहे. शहराची इतकी पूर्वपीठिका पाहून त्याच्या सद्यः वर्णनाकडे वळणें बरें. दानधर्माची स्वगृहापासून सुरवात होते अशी इंग्रजींत म्हण आहे. त्याच न्यायानें स्थलवर्णनासमुद्धां स्वस्थानापासून सुरुवात करणें अयोग्य होणार नाहीं.

पहिल्या लेखांत उल्लेख केल्याप्रमाणें आम्ही चार मंडळी ता. ३१ आगष्ट १९२६ रोजीं सकाळीं सहा-साडेसहाच्या सुमारास बंगळूर स्टेशनला पोहोंचलों. हें एम्. एस्. एम्. रेलवेचे मिटरगेज शाखेचे शेवटचें स्टेशन होय. येथून मद्रासला जाणारा मुख्य लोहमार्ग जी. आय. पी. रेलवे रस्त्यासारखा ब्रॉडगेज आहे. तेथूनच एम्. एस्. एम्. च्या मीटरगेजच्या दोन शाखा दक्षिणोत्तर दिशेनें गेलेल्या आहेत. उत्तरेकडची शाखा बेलारी, गुंटकळकडून हुबळीस पुणें–बंगळूर शाखेस

जाऊन मिळते. दक्षिणेकडची शाखा म्हैसूरला जाते. तेथूनच म्हैसूर सरकारची नॅरोगेज अर्धवर्तुळाकार शाखा सोन्याच्या खाणीच्या कोलर जिल्ह्यांतून बॉवरिंग पेठ येथें एम्. एस्. एम् च्या ब्रॉडगेज लोहमार्गाला मिळाली आहे. म्हणजे बंगळूर हें एक ब्रॉड गेज, तीन मीटर गेज व एक नॅरो गेज अशा **तीन** प्रकारच्या **पांच** रस्त्यांचें जोड स्टेशन आहे. अशा मिश्र मार्गांच्या मोठ्या रहदारीला पुरें पडेसें प्रचंड असेंच हें स्टेशन आहे, असें बंगळूरस्टेशनांत प्रथमच प्रवेश करणाऱ्या प्रवाशास वाटल्यावांचून रहाणार नाहीं. धारवाडचें सरदार दादासाहेब हेबळीकर यांच्या मदतीनें म्हैसूरच्या हैदर अलीच्या कारकीर्दीपासून प्रसिद्ध असलेले पूर्णया दिवाण यांच्या वंशजाच्या राजवाड्यावजा प्रचंड बंगल्याच्या एका भागांत आमची रहाण्याची सोय झाली असल्यामुळें (या लेखमालेच्या द्वारें सरदार दादासाहेबांचे त्यांच्या मदतीबद्दल प्रसिद्धपणें आभार मानण्याची मला संधी मिळाली, यानें माझ्या मनाला फार समाधान वाटत आहे) त्या बंगल्याचे व्यवस्थापक स्टेशनवर आह्मांला न्यायला

आले होते. यामुळें सामानसुमान बिऱ्हाडीं नेण्या-संबंधीं कांहीं एक त्रास न होतां स्टेशनवरून आमच्या मकाणास आम्हीं तडक आलों.

झालें, बंगळूरांत व म्हैसूर प्रांतांत मिळून सुमारें एक महिना आह्मीं इकडे राहिलों. विश्रांतीकरितां व हवा पालटण्याकरितां मी येथें आलों असल्यामुळें व वाटेल तितकें फिरण्याची सल्लागार डाक्टराकडून मुभा मिळाल्यामुळें रोज सकाळ संध्याकाळ तीन तीन तासपर्यंत आम्हीं शहराच्या निरनिराळ्या रस्त्यांनीं व शहराच्या चारी दिशांनां फिरावयास जात असूं. सकाळीं सहा साडेसहाला उठून आह्मीं दररोज चहा व पावाचे निखाऱ्यावर भाजलेले गरम गरम दोन एक तुकडे यांनीं न्याहारी करून बाहेर पडत असूं, ते दहा-साडेदहाला परत येत असूं. येथें कपाळीं त्रिपुंड्र लाव-लेल्या कर्मठ ब्राह्मणांचे पावांचे घरगुती कारखाने आहेत व त्यांचे दुकानांत उत्तम स्वदेशीच नव्हे तर ब्राह्मणी पाव मिळतात व त्यांचाच आह्मीं रतीब लावला होता. जेवणखाण झाल्यावर दोन तीन तास आम्हीं पत्ते खेळण्यांत घालवीत [illegible]तों. [illegible] [illegible] सुमारास

सकाळच्याप्रमाणें चहापावाचा फराळ करून फिरावयास जात असूं, ते सात साडेसातच्या सुमारास परत बिऱ्हाडीं येत असूं. याप्रमाणें सतत आमचा तीन आठवडे क्रम चालला होता. सकाळ संध्याकाळ नव्या नव्या रस्त्यांनी जावयाचें, नवी नवी प्रेक्षणीय स्थळें व देखावे पहावयाचे.

**अविरहितकपोलं जल्पतोरक्रमेण ।**
**अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ॥**

रात्र सरली पण आमच्या गोष्टी सरल्या नाहींत या प्रसिद्ध भवभूतीच्या वरील सुभाषित श्लोकांत झटल्याप्रमाणें बंगळूरांतल्या आमच्या मुक्कामाची मर्यादा संपली पण तेथले प्रेक्षणीय रस्ते व देखावे सरले नाहींत. इतकें बंगळूर शहर प्रेक्षणीय आहे !

बंगळूर शहराचा विस्तार बराचसा बुद्धीबळाच्या पटासारखा चौकोनी आहे. या शहराची दक्षिणोत्तर लांबी सुमारें ५ मैल आहे. पूर्वपश्चिम रुंदीहि तितकेच मैल आहे. ह्मणजे शहराचें क्षेत्रफळ सरासरी पंचवीस चौरस मैल आहे. शहराचे दोन भाग आहेत; एक खुद्द शहर; हें हैसूर सरकारच्या ताब्यांत आहे; दुसरें

लष्कर हें ब्रिटिश सरकारच्या वतीनें रेसिडेंटाचे ताब्यांत आहे.

शहरापेक्षां लष्कर क्षेत्रफळानें किंचित् अधिक आहे. संबंध बंगळूराच्या पश्चिम बाजूनें पुणें-बंगळूर-म्हैसूर रेलवे रस्ता गेला आहे; व त्याच्या उत्तर बाजूनें पुणें-बंगळूर-मद्रास रेलवे रस्ता गेला आहे.

आम्ही ज्या दिवाण पूर्णय्यांच्या बंगल्यांत रहात होतों तो बंगला शहरच्या माळमाथा High grounds नांवाच्या भागांत होता. या भागांतील वस्ती नवी असून राजवाडेवजा सुंदर सुंदर बंगल्यांनीं व मोकळ्या मैदानांनीं व्यापलेली आहे. दिवाण पूर्णय्या यांच्या बंगल्याचें आवार सुमार दहा पंधरा एकर असेल. त्याच्या तिन्ही बाजूला रस्ते असून आवारा-सभोवार भिंतीचें कुंपण आहे. आंत अत्यंत उंच उंच असे शंभर दोनशें निरनिराळ्या वनस्पतींचे वृक्ष आहेत; विशेषतः सोनचाफ्याचीं फारच झाडें लाविलीं आहेत. बंगला पीवळसर कुरुंदी दगडाचा असून तीन मजली आहे. बंगल्याच्या अगदीं नजिक एकमजली पण प्रमाणशीर असा सुंदर दरबार दिवाणखाना आहे.

आवाराच्या अगदीं पूर्वेकडच्या टोंकास एक छोटेंसें माठीव दगडाचें व उंच शिखराचें महादेवाचें देऊळ आहे. शिखराच्या निमुळत्या मजल्यावर सर्वत्र सुंदर दगडाचीं चित्रें खोदलेलीं आहेत. बंगला दक्षिणाभिमुख असून आवाराला लागूनच पूर्वपश्चिम जाणारा असा हमरस्ता आहे व रस्त्याला लागूनच अर्धवर्तुळाकार, हिरवळ गवतानें सदोदित आच्छादलेला, व बाहेरच्या बाजूनें तीनसाडेतीन फुटांची भिंत असलेला शर्यतीचा घोडदौड रस्ता व आंतलें शर्यतीचें खुलें मैदान आहे. बंगल्याच्या सज्जावरून घोड्यांच्या शर्यती सहज पहातां येण्यासारखी या बंगल्याची जागा आहे. या बंगल्याकडून पश्चिमेकडच्या बाजूला गांवाचा भाग फार थोडा आहे व तो बराच अलीकडचा ह्मणजे रेल्वे रस्ता झाल्यापासूनचा आहे. रेल्वेरस्त्यापलीकडे रेल्वेच्या लोकांचे बंगले व कांहीं थोड्या गिरण्या आहेत. पण या बंगल्यांपासून पूर्वेकडे व दक्षिणेकडे शहराचा व लष्कराचा फारच मोठा भाग आहे. यामुळें आमच्या रोजच्या फिरतीस आम्ही पूर्वेकडून सुरुवात केली होती. ह्मणून त्या दिशेनेंच शहराची व लष्कराची माहिती व त्यांतल्या प्रेक्षणीय

इमारती व इतर स्थळें यांचें यथाक्रम वर्णन करतों.

पूर्णय्यांच्या बंगल्यावरून पूर्वपश्चिम असा एक हमरस्ता जातो म्हणून वर सांगितलें आहे. आम्हांला कोठेंहि फिरावयास जातांना या रस्त्यानें प्रथम जावें लागे. पूर्वेकडे निघालें म्हणजे आपल्या उजव्या हातास घोडदौडीची भिंत जवळ जवळ अर्धा मैल लागते. तेथपर्यंत फक्त डाव्या हातास मोठमोठीं आवारें असलेले बंगले लागतात; त्यांतल्या त्यांत वेस्ट एन्ड हॉटेल नांवाच्या युरोपीयन हॉटेलची प्रचंड इमारत मोठी प्रेक्षणीय आहे. रात्रीं परत येतांना या हॉटेलमधील विजेच्या दिव्यांचा प्रकाश तर दिवाळीच्या रोषनाई सारखा दिसतो व नव्या माणसास येथें रोजच दिवाळी आहे कीं काय असा भास होतो. हें हॉटेल टाकून जरा पुढें गेलें म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूंस बंगले दिसूं लागतात. बंगलुरांतल्या बंगल्यांचे व इमारतींचे एक दोन विशेष नवख्या माणसाच्या चटदिशीं लक्षांत येतात. ते म्हणजे, सर्व बंगले व इमारती या बाहेरून गिलावा केलेल्या व त्याला तांबडसर मातीचा

रंग दिलेल्या असतात व आवारासभोंवार भिंतीचें कुंपण असतें. सरासरी पाऊण मैल गेलें कीं, रस्त्याचा फार मोठा कुंज लागतो; ते प्रशस्त तांबडेलाल रस्ते, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंस उंच उंच दाट छायेचीं झाडें, विजेच्या दिव्यांच्या खांबांची ओळच ओळ हा देखावा सुंदर दिसतो. या कुंजापासून पांच रस्ते फुटतात; दक्षिणेकडे जाणारा रस्ता बंगळूर गांवाकडे जातो, पश्चिमेकडचा रस्ता पूर्णय्यांच्या बंगल्यावरून बंगळूर-शहर स्टेशनला जातो. उत्तरेकडचा रस्ता कँटोन्‌मेंट स्टेशनला जातो; पूर्वेकडचा रस्ता लष्करकडे जातो व दक्षिण व पूर्व यांचे मधून एक रस्ता जातो तो कबनपार्ककडे जातो. पूर्वेकडच्या रस्त्यानें गेलें ह्मणजे जवळच उजव्या बाजूस सुंदर बागबगीच्यानें वेष्टिलेला असा जुनाट बंगला लागतो. या बंगल्याचे दारावर संत्री पहारा असतो, यावरून हा बंगला मोठ्या अंमलदाराचा आहे असा तर्क होतो. बाकी बंगला बाहेरून नजरेंत न भरण्यासारखा आहे, पण हाच एथल्या ब्रिटिश रेसिडेंटाचा बंगला होय. सुमारें साठ वर्षें हिंदुस्थानांत राहिलेल्या व त्यांपैकीं बराच काल ह्मैसुरांत

घालविलेल्या कबन कमिशनर साहेबांपासून तो बंगला म्हैसुरांतील मुख्य ब्रिटिश अंमलदार रहाण्याचा बंगला आहे. यामुळें तो बंगला जुनाच व जुन्या पद्धतीचा आहे. यासमोरच्या सरळ व दोन अडीच मैलांच्या रस्त्याला कबन रस्ता म्हणतात. हा रस्ता सुतानें आंखल्याप्रमाणें कोठेंहि वांकडा तिकडा न होतां सरळ गेला आहे. हा रस्ता बंगलुरांतील सुंदर रस्त्यांपैकीं एक आहे, यांत शंका नाहीं. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनां नाना तऱ्हेचीं निरनिराळ्या रंगांच्या फुलांनीं फुललेलीं झाडें लाविलीं आहेत. रस्त्याच्या उजव्या हातास पलटणीच्या कवाइतीचें विस्तीर्ण मैदान आहे; व डाव्या बाजूस इमारती आहेत. कवाइतीच्या मैदानापलीकडे कबन रस्त्याला जवळ जवळ समांतर असलेला साउथ परेड रस्ता आहे; तोहि कबन रस्त्याप्रमाणें फारच सुंदर आहे. मात्र त्या रस्त्याच्या उजव्या बाजूला लष्करांतील मोठमोठ्या दुकानांच्या भव्य इमारती आहेत. मैदानाच्या दोन बाजूस दोन प्रशस्त व सुंदर रस्ते व त्यांच्या पलीकडे मोठमोठ्या इमारती अशा प्रकारचा देखावा क्वचित् दृष्टीस पडतो. म्हणून या रस्त्यानें जातांना बंगळूर

शहराच्या रचनेबद्दल राहून राहून आनंद व आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नाहीं. कबन रस्त्याच्या शेवटाला आलें म्हणजे जरा डावीकडे वळून थोडेंसें पुढें गेल्यावर पुनः पूर्वेकडे अलसूर नांवाचा रस्ता लागतो. अलसूर हें पूर्वींचें लहानसें खेडेंच होतें म्हणाना; आतां त्याचा बंगळूर लष्करांत अंतर्भाव झालेला आहे. येथलीं घरें एकमेकांना लागून व एकमजलीच आहेत; तरी पण रंगाच्या बाबतींत बंगळुराचा विशेष येथेंहि दृष्टीस पडतो; दोन तीन वाकडीं तिकडीं रस्त्याचीं वळणें टाकिलीं म्हणजे सोमेश्वराचें देऊळ लागतें. मद्रासकडील देवळांप्रमाणें या देवळालाहि द्वारांवर मोठें पांच सहा मजली गोपुर आहे. आवाराभोंवतीं उंच भिंत आहे, व आवारांत थोडींफार झाडें आहेत. मुख्य देवळाला लहानसा सभामंडप आहे. देऊळ बरेंच जुनें दिसतें. पुण्याच्या पर्वतीप्रमाणें मुख्य शंकराच्या देवळाभोंवतीं चार लहान लहान देवळें आहेत. म्हणजे देवांचें एकंदर पंचायतन आहे. इकडल्या देवळांमधला आणखी एक विशेष म्हणजे प्रदक्षिणेच्या वाटेवर डाव्या हातास सारख्या देवादिकांच्या मूर्तींच मूर्ती लागतात.

त्याप्रमाणें येथेंहि प्रकार दिसला. येथून परत फिरून जरा उत्तरेच्या बाजूला गेलें, म्हणजे बंगळुरांतल्या तलावांतला मुकुटमणी–अलसूरसरोवर लागतें. खरो-खरी हें सरोवर अत्यंत प्रेक्षणीय आहे. याच्या चारी बाजूनें छायाच्छादित व वृक्षराजींनीं व्याप्त असे रस्ते केलेले आहेत; तलावाच्या सभोंवार विलक्षण दाट झाडी आहे; त्या झाडीची सांवली पाण्यांत पडलेली दिसते; दाट झाडीच्या झरोक्यांतून तुरळक तुरळक इमारती दृग्गोचर होतात. या सरोवराच्या पूर्वभागाच्या सुंदर रस्त्याला लागून अलसूर खडक नांवाची लहानशी टेकडी आहे. या टेकडीच्या पाय-थ्याशीं एक लहानसें देऊळ असून त्या देवाच्या दर्शनास लोक येत असावे असें दिसलें. येथूनच टेकडीवर जाण्यास पायवाट आहे. टेकडी लहानच आहे. याच टेकडीवर केंपीगौडाच्या चार दिशांच्या नजर बुरुजांपैकीं एक बुरुज आहे. आतां ही इमारत पडकी झालेली आहे व या टेकडीच्या पायथ्याशींच हल्लीं पाणी चढविण्याचा पंप बसविल्यामुळें येथें आतां तलावांत घुसलेला असा लहानसा लोखंडी धक्का

केलेला आहे. तेथून सरोवराचा अपूर्व देखावा दिसतो; मोठका तोडका नजरबुरुज टेकडीच्या माथ्यावर आहे. तेथूनहि सर्व शहराची शोभा पहाण्यास सांपडते. येथील देखावा इतका मनोहर आहे कीं येथें उभें राहून सारखें पहात रहावें असें वाटतें. पण मनुष्याला वेळाची मर्यादा ह्मणून आहेच. अतएव नाइलाजानें तें ठिकाण सोडून परत फिरावें लागतें. अलसूर सरोवर व सोमेश्वराचें देऊळ हा बंगळूर शहराचा पूर्वेकडचा जवळजवळ शेवटच आहे. या देवळावरून जुनी मद्रासकडची सडक जाते. असो.

पुन्हां एकदां आम्ही या पूर्वेकडच्या भागांत फिरावयास गेलों, ते कबन रस्त्यानें न जातां त्याच्या उत्तरेकडच्या पण त्यालाच समांतर असलेल्या इन्फन्ट्री रस्त्यानें गेलों. हा रस्ताहि बंगळूरच्या इतर रस्त्यांप्रमाणें दुतर्फा वृक्षराजींनीं आच्छादित आहे. पण हा रस्ता पुष्कळच शांत व कमी रहदारीचा आहे. बंगळुरांत या रस्त्यानें काय किंवा लष्करांतील दुसऱ्या रस्त्यानें काय जातांना एक अपूर्व गोष्ट सहज दृष्टीस पडते; ती ह्मणजे 'पैसे देणारे पाहुणे घेतले जातील'

अशा पाट्या पुष्कळ बंगल्यांच्या फाटकांवर लटकावि-लेल्या दिसतात. बंगळूर हें ठिकाण थंड हवेकरितां प्रसिद्ध असल्यामुळें व युरोपांतील हवेप्रमाणें येथील हवापाणी असल्यामुळें मध्यम व गरीब स्थितींतील युरोपीयन पेन्शनर या ठिकाणीं स्थाईक होऊन रहातात व आपल्या तुटपुंज्या पेनशनांत भर घालण्याकरितां पैसे देणारे पाहुणे यांची आपल्या कुटुंबांत रहाण्याची व जेवणाची सोय करतात. ही पद्धति इंग्लंडमध्यें सररहा चालू आहे. त्या धर्तीवर येथेंहि हवेकरितां बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांची सोय या गरीब कुटुंबांत करतात असें या पाट्यांवरून निदर्शनास येतें. इन्फन्ट्री रस्ता हा पूर्वगामी रस्ता आहे. तो संपल्यावर आह्मी बंगळूर लष्करांतून पुष्कळ कांकडे तिकडे रस्ते ओलांडून शेवटीं उत्तरगामी व्हीलर रस्त्याला लागलों व वाटेनें वाटसरूंनां विचारीत विचारीत बंगळूर ईस्ट-आमचें त्या दिवसाच्या फिरतीचें विरामस्थान-स्टेशनला आलों. येथें शहर अगदीं संपल्यासारखें आहे. स्टेशन अगदीं लहानसर खेडेगांवी स्टेशनाप्रमाणें दिसतें. उजव्या हाताला रेल्वेच्या पलीकडे एक गिरणीसारखा

एकाकी कारखाना दिसतो. तो पेनिन्शुलर टोबॅको कंपनीच्या सिगारेट्स करण्याचा कारखाना आहे असें आह्मांस कळलें. या स्टेशनच्या उत्तरेस उंच सखल लहान झाड झाडोरा असलेली दगडाळ माळजमीन लांबपर्यंत दृग्गोचर होते. एखादा प्रवाशी एकदम या ठिकाणीं आला तर येथून थोड्याच अंतरावर सुधार‐लेल्या सर्व सोयींनीं युक्त असें मोठें, राजधानी व लष्करी शहर आहे अशी कल्पना त्याच्या स्वप्नांतसुद्धां येणार नाहीं. इतका येथला देखावा खेडवळ व साधा आहे. येथून बंगळूर स्टेशनला आगगाडीनें जाण्यास सांपडलें तर पहावें ह्मणून आह्मी स्टेशनमध्यें गाडीची चवकशी केली, पण गाडी यायला बराच अवकाश होता. इतक्यांत स्टेशनच्या आवारांत एक झटका आला. तेव्हां गाडीकरितां तिष्ठत न बसतां, आह्मी झटका करून परत घरीं येण्यास निघालों. झटकेवाल्यानें रेल्वे रस्त्याच्या बाजूबाजूच्या सडकेनें आह्मांला कॅंटोन्मेंट स्टेशनवरून जाणाऱ्या रस्त्यानें आणलें. हें स्टेशन मात्र बंगळूर लष्करास शोभण्यासारखें बरेंच मोठें व विस्तीर्ण आहे व स्टेशनसमोरचा रस्ता

तर इतका प्रशस्त आहे कीं तो पहातांक्षणीं मनुष्याचें मन थक्क होऊन जातें. हल्लीं मुंबईस परळच्या बाजूस ज्या प्रकारचे प्रशस्त रस्ते करीत आहेत त्याप्रमाणें हा प्रशस्त रस्ता आहे. डावा व उजवा असे दोन भाग रस्त्याला असून मधोमध प्रशस्त पाऊलवाट ठेवलेली आहे. शिवाय रस्त्याच्या पलीकडे मोकळीच मोकळी माळरान जमीन असल्यामुळें हा रस्ता जास्तच खुलास व उघडा वाटतो. शिवाय रस्त्याच्या उजव्या बाजूस मिलर्स तलाव नांवाचा विस्तीर्ण तलाव दृग्गोचर होतो. यामुळें या रस्त्यानें जातांना बंगलूर शहराच्या बहुविध रचनेबद्दल सानंद आश्चर्य वाटतें यांत शंका नाहीं. याप्रमाणें या एकाच दिवसाच्या आमच्या पायाच्या व झटक्याच्या फिरतींत बंगलूर लष्कराचा पूर्वोत्तर भाग आह्मीं पाहून घेतला.

म्हैसूर प्रांतांत आल्यापासून म्हैसूरच्या महाराजांचे बंगलूर व म्हैसूर या दोन्ही शहरीं असलेले सुंदर राजवाडे पहाण्याचा माझा मानस होता. बंगलूरच्या राजवाड्याचें ठिकाण बंगलूर कॅंटोन्मेंट स्टेशनच्या जरा पश्चिमेस रेल्वे रस्त्याच्या पलीकडे व त्याला खेटूनच

आहे. पण राजवाड्यासभोंवार इतका विस्तीर्ण बाग-बगीचा व मोठमोठ्या वृक्षांच्या राई आहेत कीं, हा राजवाडा दुरून मुळींच दृष्टीस पडत नाहीं. शिवाय राजवाड्याकडे जाणारा असा विशेष प्रशस्त रस्ताहि नाहीं. कँटोन्मेंट स्टेशनवरून येणाऱ्या प्रशस्त रस्त्याच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर भिलसं रस्ता लागतो. हा रस्ता थेट दक्षिणेकडे बंगळूर शहरांत जातो व तोच पुढें उत्तरेकडे टुमकूर जिल्ह्याकडून येणाऱ्या रस्त्याला मिळतो. हा रस्ताहि मोठा प्रेक्षणीय आहे हा रस्ता, टुमकूरकडे जाणारा रस्ता व दुसरा बेलारीकडे जाणारा एक मोठा लांबलचक रस्ता, या हमरस्त्यांच्या मधल्या कोंडींत राजवाड्याचें ठिकाण आहे. हें ठिकाण लांबट परंतु चिंचोळें आहे. त्याचा एकंदर घेर तीन मैलांच्यावर असावा. सर्व ठिकाणासभोंवार मोठ्या भिंतीचें कुंपण घातलेलें आहे. सर्व आवारभर इतकी झाडी आहे कीं, आह्मी राजवाड्याच्या आजूबाजूच्या रस्त्यांनीं कितीदां तरी हिंडलों तरी राजवाड्याचें दर्शन झालें नाहीं. प्रत्यक्ष राजवाड्याकडे जाणारा रस्ता या टुमकूर व बेलारी

रस्त्यांच्या मधून आहे. पण हा रस्ता राजवाड्याकडे जात असेल असें वाटण्यासारखा विशेष विस्तीर्ण किंवा विशेष रोशनाईचा नाहीं. आम्ही एके दिवशीं सहज या रस्त्यानें फिरावयास म्हणून गेलों तों रेल्वे रस्ता आडवा आला व तेथल्या रेल्वेच्या फाटका-समोरच राजवाड्याचें सुंदर फाटक व बागबगीचा, रखवालदारांची चावडी व सशस्त्र रखवालदारांचा तांडाच्या तांडा आमच्या दृष्टीस पडला व हें राज-वाड्याचें प्रवेशद्वार असें आह्मांस समजलें. येथें चवकशी करतां परवानगीखेरीज राजवाडा पहाण्यास जातां येत नाहीं व महाराजांचे प्रायव्हेट सेक्रेटरी किंवा राजवाड्याचे सुपरिंटेंडेंट यांची लेखी परवानगी असल्याखेरीज राजवाड्याच्या आवारांतसुद्धां जातां येणार नाहीं असें रखवालदारांनीं सांगितलें. ह्मणून मी राजवाडा–सुपरिंटेंडेंट या पत्त्यावर पत्र लिहिलें. त्याचें उत्तर आलें कीं महाराजांचे प्रायव्हेट सेक्रेटरी म्हैसुरास आहेत त्यांनां पत्र पाठवावें. एके दिवशीं सहज राजवाड्याच्या एका बाजूच्या रस्त्यानें फिरत असतां एक गृहस्थ भेटले. त्यांचेजवळ चवकशी करतां राजवाडा पहाण्याची

परवानगी मिळण्यास या ठिकाणीं बराच त्रास पडतो असें कळलें व येथें काय व म्हैसुरास काय आह्मांला या गोष्टीचें प्रत्यंतर पटलें. आमची सरदार दादासाहेब हेबळीकर यांचे मार्फत सेक्रेटरी-एट्मधल्या एका मोठ्या अंमलदाराची ओळख झाली होती. त्यांनीं ह्मैसूरप्रांताच्या वर्णनास आवश्यक असणारीं पुस्तकें मला दिलीं. त्यांनीं मला एकदां अंमलदारांच्या क्लबामध्यें नेऊन तेथल्या कांहीं लोकांची ओळख करून दिली. एकंदरींत त्यांनीं मला पुष्कळ मदत केली. ह्मैसुरास जातेवेळीं त्यांनीं तेथल्या म्युनिसिपल प्रेसिडेंटला परिचयपत्र दिलें व येथला व ह्मैसूरचा राजवाडा दाखविण्याची खटपट केली. पण त्यांत त्यांना यश अलें नाहीं. यावरून येथें राजवाडा पहाण्यास मिळण्यास किती प्रयास पडतात हें दिसून येईल. बंगलुरास महाराज नाहींत ह्मणून व म्हैसुरास महाराज आहेत ह्मणून आम्हांला राजवाडे पहातां आले नाहींत! सारांश काय या बाबतींत माझी फार निराशा झाली. 'बोध...चे प्रेक्षणीय मासले' अशी मी या दोन्ही राजवाड्यांबद्दल प्रशंसा ऐकली होती व म्हणूनच दोन्ही

राजवाडे पहाण्याची मला फार उत्सुकता होती. राज-वाडे पहाण्याच्या बाबतींत अनुभवास आलेल्या अडचणी-वरून एका ललितकलाप्रिय गृहस्थाच्या क्रांतिकारक मताची मला आठवण झाली. कांहीं दिवसांखालीं एका इंग्रज गृहस्थानें सौंदर्याच्या खऱ्याखुऱ्या खाणी अशा निसर्गसुंदर बायका, किंवा नृत्य-नाट्य-संगीतकला-भिज्ञ अशा कलारमणीय बायका यांनीं लग्न करून विशिष्ट पुरुषांच्या खासगी मालकीच्या मालमत्ता बनून बहुजन-समाजाला ललितकलांच्या मासल्यांच्या दर्शनास व श्रवणास मुकविणें योग्य नव्हे असें मत प्रदर्शित केलें होतें. हें मत क्रांतिकारक वाटतें खरें, पण ललितकलेची आवड असणाऱ्या माणसाच्या मनांत असा विचार येणें साहजिक आहे. म्हैसूरच्या महाराजांचे राजवाडे बांधकलेचे उत्तम मासले आहेत. तरी म्हैसूर प्रांतांत प्रवास करणाऱ्या प्रवाशास हे वाडे सहज पहातां येतील अशा प्रकारची व्यवस्था म्हैसूरसारख्या सुधारलेल्या संस्थानाच्या अधिकाऱ्यांनीं करावयास पाहिजे असें मला वाटलें. शेवटीं दुधाची तहान ताकानें भागवावी लागते या म्हणीप्रमाणे आम्हांला या दोन्ही राजवाड्यांचे

दुरून दिसणारे देखावे व त्यांचीं छायाचित्रें पाहूनच समाधान मानून घ्यावें लागलें. असो.

आमच्या मकाणाच्या पूर्वेकडच्या रस्त्यानें जाऊन दृष्टीस पडणाऱ्या भागाचें येथपर्यंत वर्णन केलें. यापुढें आम्हीं आपला मोर्चा पश्चिमेकडच्या रस्त्याकडे वळविला. आमच्या बंगल्याच्या पश्चिमेकडच्या भिंतीला लागून थेट उत्तरेकडे एक रस्ता जातो व तो पुढें बेलारी रस्त्याला मिळतो. या रस्त्याच्या उजव्या बाजूस युरोपियन लोकांचें गोल्फ खेळण्याचें फारच मोठें मैदान आहे. या सर्व मैदानावर एकहि झाड नाहीं; पण मैदान हरळी लावून हिरवें गार ठेवलेलें आहे. या हिरव्या हिरव्या गार विस्तीर्ण मैदानांत मधून मधून गवत काढून अगदीं सपाट केलेलीं व बारिक वाळू टाकून टेनिस कोर्टासारखीं राखलेलीं लहान लहान वर्तुळें दिसतात यांनाच इंग्रजींत होल्स किंवा लिंक्स म्हणतात. मैदानांत अशीं वर्तुळें नऊ किंवा अठरा असतात, व कांहीं प्रकारच्या हातांत धरावयाच्या काठ्यासारख्या काठ्यांनीं लहान चेंडू अगदीं कमी टोल्यांत या सर्व वर्तुळांतून न्यावयाचा

असा हा गोल्फ खेळ आहे. सायंकाळीं या गोल्फ मैदानावर कितीतरी युरोपीयन स्त्रीपुरुष खेळतांना दृष्टीस पडतात. या गोल्फ मैदानाच्या पूर्वेकडच्या बाजूनें बेलारी रस्ता जातो व मैदानाच्या पश्चिम बाजूनें मागल्या बंगल्याच्या पश्चिम बाजूचा रस्ता जातो. गोल्फ मैदान संपतें त्या ठिकाणीं हे दोन रस्ते मिळतात व मग लागलीच मद्रासकडे जाणारा रेलवे रस्ता ओलांडून थेट उत्तरेकडे हा रस्ता सरळ दोनतीन मैल जातो. त्याचे उजवे बाजूस राजवाड्याच्या आवा-राची भिंत सारखी लागते व आवारांतील निरनिराळीं झाडें दृष्टीस पडतात. राजवाड्याच्या आवारांत फारच मोठी अशी नारळीची बाग आहे. या समुद्रसपाटी-पासून तीन हजार फूट उंचीवर असलेल्या ठिकाणीं समुद्रकिनाऱ्यावरील कोंकण प्रांतांतील वाळवंटी जमिनीवर होणाऱ्या नारळीच्या झाडांची बाग पाहून मनुष्य वाटेल त्या वनस्पती वाटेल तेथें प्रयत्नांनीं वाढवूं शकतो याबद्दल कौतुक वाटलें. हा राजवाड्याच्या बाजूनें जाणारा रस्ता संपता संपत नाहीं. शेवटीं एकदां राजवाड्याचें आवार संपतें व पूर्वेकडून येणारा टुमकूर

रस्ता या बेलारी रस्त्याला काटकोनांत मिळतो. पुढें बेलारी रस्ता थेट उत्तरेकडे जातो व टुमकूर रस्ता थेट पश्चिमेकडे जातो. या टुमकूर रस्त्याला जरासे वळल्याबरोबर केंपीगौडाचा उत्तरेकडचा नजरबुरुज लागतो. येथूनहि सर्व बंगळूर शहराचा सुंदर देखावा दिसतो. हा सर्व भूमिभाग उघड्या मैदानाचा आहे. फौजेच्या गोळीबाराकरितां या विस्तीर्ण मैदानाचा उपयोग करतात. यामुळें येथें फारशी झाडी वाढूं दिलेली नाहीं. फक्त दोन्ही रस्त्यांना दुतर्फा झाडें मात्र लावलेलीं आहेत. या झाडांच्या रांगा लांबवर दृग्गोचर होतात. शहरांत मात्र विलक्षण झाडी आहे असें या नजरबुरुजांवरून दृष्टोत्पत्तीस येतें. बराच वेळ हा नयनमनोहर देखावा पाहून आह्मी घराकडे वळलों. पण आजची आमची सहल फारच लांबची झाल्यामुळें घरीं पोंचण्यास उशीर झाला; व घरीं आलों तों आह्मी अगदीं थकून गेलों होतों.

दुसरे दिवशीं आह्मी पुन्हा पश्चिमेकडच्या रस्त्यानेंच गेलों. याच रस्त्याला प्रसिद्ध मुत्सद्दी व्ही. पी. माधवराव यांचा बंगला आहे. जरा पुढें गेलें ह्मणजे हा रस्ता

बंगळूर गांवांतून थेट येणाऱ्या सुभेदार-छत्र-रस्त्याला मिळतो व लगेच मद्रास रेल्वेरस्ता ओलांडून जरा पुढें गेलें ह्मणजे उजव्या हातास एक रस्ता फुटतो व तो मागें उल्लेखिलेल्या बेलारी रस्त्याला जाऊन मिळतो. डाव्या हाताच्या रस्त्याला गेलें ह्मणजे 'मल्लेश्वरम्' ह्मणून बंगळूरची जी एक सुंदर नवी वस्ती सर विश्वेश्वर अय्या या दिवाणांनीं वसविली त्या नव्या वस्तीचा रस्ता लागतो. ही सर्व पेठ नवीन धर्तीच्या टुमदार बंगल्यांनीं झालेली आहे. इकडील सर्व बंगल्यांना आवाराच्या भिंती बांधण्याची रीत आहे व बंगले जरी दगडी असले तरी आंतूनबाहेरून गिलावा करून त्याला रंग देण्याची रीत आहे. रंग तांबडसर गुलाबी असा एकाच जातीचा देतात. प्रत्येक घरापुढें लहानशी बाग असावयाचीच. याप्रमाणें हीं घरें मोठीं नमुनेदार दिसतात सर्वत्र स्वच्छता व टापटीप दृष्टीस पडते. या रस्त्याचा आणखी एक विशेष ह्मणजे रस्त्याच्या दुतर्फा सारखीं सोनचाफ्याचींच झाडें लाविलीं आहेत. अशा तऱ्हेनें ही नवी वस्ती खरोखरीच प्रेक्षणीय केलेली आहे. या रस्त्याच्या शेवटाला पोचलें ह्मणजे

उजव्या बाजूस मोठा थोरला, सँकेचा तलाव लागतो. पूर्वी या तलावाचेंच पाणी गांवाच्या कांहीं भागाला देत असत. पण गांव जसजसा वाढत चालला तसतसा पाणीपुरवठ्याचा प्रश्न कठीण झाला व मग हल्लीं दहा बारा मैलांवर असलेलें पाणीपुरवठ्याकरितां प्रचंड धरण बांधण्यांत आलें. हा तलाव स्वाभाविकपणें तीन बाजूंनीं टेकड्या व उंच माळरानानें वेष्टिलेला आहे. दक्षिणेच्या बाजूस मात्र खूपच मोठा बंधारा घालावा लागलेला आहे व त्या बंधाऱ्यावरून एक सुंदर सडक राजवाड्याजवळ बेलारी रस्त्याला मिळालेली आहे. या बंधाऱ्याच्या उजव्या बाजूस सर्व माळावर इतकी दाट झाडी झाली आहे, कीं तें एक किर्र रान आहे कीं काय असा भास होतो. येथून सर्व मल्लेश्वरम्‌ची वस्ती मोठी मजेदार दिसते; तसेंच बंगळूर हें उंचसखल, पांढऱ्या तांबड्या चित्रविचित्र रंगांच्या खडकांनीं भरलेलें असें ठिकाण आहे हें या तलावाच्या बाजूनें चालतांना चांगलें निदर्शनास येतें. याच तलावाच्या कांठाला म्हैसूर संस्थानचा चंदनाच्या तेलाचा कार-खाना आहे.

या संस्थानामध्यें चंदनाचें तेल काढण्याचे दोन कारखाने आहेत. एक बंगलुरास व दुसरा म्हैसुरास; या दोन्ही कारखान्यांमध्यें दर वर्षास सुमारें पावणे दोन लक्ष पौंड वजनाचें तेल तयार होतें व त्याची किंमत सुमारें सव्वीस लक्ष रुपये येते. दोन्ही कारखान्यांचा खर्च सुमारें सात लक्ष होतो व सरकारास सुमारें एकोणीस लक्ष रुपये नफ्याच्या रूपानें उत्पन्न येतें. वर सांगितल्याप्रमाणें बंगळूर येथील कारखाना सँके तलावाच्या अगदीं कांठावरच आहे. कारखान्याच्या जवळच गेलें म्हणजे चंदनाचा सुवास सर्वत्र पसरलेला आहे असा आपल्याला अनुभव येतो; व आपल्या परिमळानें चंदन जणूं कांहीं प्रवाशाचें स्वागत करून त्याला दर्शनासाठीं येण्याकरितां निमंत्रण करीत आहे असा भास होतो. हा कारखाना पहाण्याच्या बाबतींत एकदां आमची फसगत झाली. झटक्यांतून घरांतील बायका मंडळींना घेऊन आम्ही बंगळूर येथील टाटाचें शास्त्रीय शोधघर पहाण्यास गेलों होतों; व परत येतांना संध्याकाळचा सहाचा सुमार असतांना आम्ही कारखान्याच्या आवारांत गेलों. तेथें कळलें कीं, कारखाना

सहा वाजतां बंद होतो व चार वाजल्यानंतर पहाण्यास परवानगी मिळत नाहीं. अर्थात् त्या दिवशीं आह्मांला निराश होऊन परत बिऱ्हाडीं यावें लागलें. पण बंगळूरसारख्या निसर्ग व कला या दुहेरी कारणांनीं सुंदर असलेल्या ठिकाणीं दोनदां दोनदां जावें लागण्याचा त्रास न वाटतां द्विगुणित आनंदच वाटतो व ह्मणून आम्ही पुन्हां हा कारखाना पहाण्यास दोन प्रहरींच आलों. व पुन्हा एकदां सँकेतलाव व तेथून दिसणारी शहराची अवर्णनीय शोभा पाहिली व मग कारखान्यांत गेलों. कारखान्याचें आवार कांहीं फारसें मोठें नाहीं; पण पुढें थोडीशी सुंदर बाग आहे. कारखान्याला कापडाच्या गिरणीप्रमाणें फार मोठमोठीं व निरनिराळ्या प्रकारचीं यंत्रें लागतात अशांतलाहि भाग नाहीं. चंदनाचे मोठमोठे ओंडे प्रथमतः बारिक करण्याचें एक यंत्र असतें. त्यांतून ओंड्यांच्या बारिक बारिक ढलप्या होऊन पडतात. या ढलप्यांचा पुढें अगदीं पिठासारखा भुसा करण्याचें यंत्र असतें; मग या भुसांतून वाफ खेळवून भुशाला खूब उष्णता देतात. ह्मणजे भुशांतून तेल वेगळें होतें व मग भुशावर खूब

दाब देऊन त्यांतील सर्व तेलाचा निचरा करून घेण्याचीं यंत्रें असतात. पुढें या तेलांतील अशुद्धता काढून शुद्ध, पिवळसर रंगाचें चंदन तेल तयार केलें जातें; या तेलाचे डबेच्या डबे व तेल सांठविण्याचीं पिपेंच्या पिपें भरलेलीं आम्हीं पाहिलीं. म्हैसूर संस्थानांतील चंदनाचें तेल उत्तम प्रकारचें असल्याबद्दल या तेलाची प्रख्याति असून तेल बहुतेक अमेरिकेंत पाठविलें जातें, असें आह्मांस समजलें. कारखाना पाहून झाल्यावर आह्मी बिऱ्हाडीं परत आलों.

वर उल्लेख केल्याप्रमाणें आह्मी टाटाचें शास्त्रीय शोधघर पहाण्यासहि झटक्यामधून गेलों व एकदां आह्मीं चालतच तेथपर्यंत जाऊन तेथल्या दक्षिणी विद्यार्थ्यांना भेटून आलों होतों.

टाटाचें शास्त्रीयशोधघर अगर शास्त्रीय प्रयोग-शाळा ही संस्था-बंगळूर शहराच्या वायव्य टोंकाला आहे व ती बंगळूरकडून टुमकूरकडे जाणाऱ्या हम-रस्त्यावर उजव्या बाजूस आहे. येथून बंगळूरच्या अलीकडचें स्टेशन-यशवंतपुर-मैल दीड मैलावर आहे. या संस्थेकरितां घेतलेलें ठिकाण अशा संस्थेला सर्वथा

अनुरूप असें आहे. एकतर तें शहरापासून पांच साडेपांच मैल दूर असल्यामुळें शहराच्या गजबजाटा-पासून अलिप्त आहे. शिवाय तें शहरापासून बऱ्याच उंचीवरच्या जागेवर आहे. आणखी संस्थेसभोंवार संस्थेच्या मालकीची अडीचशें तीनशें एकर जमीन आहे. अशा या विस्तीर्ण, शांत, निवांत, बाराहि महिने थंड हवेच्या ठिकाणींच शास्त्रीय प्रयोग व शोध यशस्वी रीतीनें होऊं शकतील हें जाणूनच कै. टाटांनीं हें ठिकाण आपल्या शास्त्रीय प्रयोगशाळेस निवडून काढलें असलें पाहिजे असें या आवारांत प्रवेश केल्याबरोबर प्रवाशाच्या ध्यानांत आल्याखेरीज रहात नाहीं. संस्थेची एक मोठी सुंदर व भव्य इमारत आहे. त्याचे समोरच टाटा शेटजींचा दगडी पुतळा बसविलेला आहे. इमारतींत व्याख्यानाकरितां, वाचनालयाकरितां, प्रोफेसरांकरितां, ग्रंथसंग्रहाकरितां, विद्यार्थ्यांच्या वादविवादाकरितां मोठे प्रशस्त दिवाणखाने व खोल्या आहेत; व इमारत पांढऱ्या, पिवळ्या कुरंदी दगडाची असून दुमजली आहे. सुमारें शंभर फूट उंचीचा मनोराहि इमारतीच्या मध्यभागीं आहे. चार वर्षांखालीं मी

बंगळुरास गेलों होतों तेव्हां या मनोऱ्यावर चढून गेलों होतो. तेथून दिसणारी सर्व शहराची शोभा प्रत्यक्ष पाहिल्यावांचून कळणारच नाहीं. माझ्या आजारामुळें इतक्या उंच मनोऱ्यावर जाण्याचें मना केलेलें असल्या-मुळें अर्थात् मी या खेपेस मनोऱ्यावर गेलों नाहीं. पण पूर्वदृष्ट देखाव्याची आठवण करूनच मी आपल्या मनाचें या वेळीं समाधान करून घेतलें. मुख्य इमारतीपासून थोड्या अंतरावर या संस्थेच्या तीन प्रयोगशाला आहेत. पहिली रसायनशास्त्र प्रयोगशाला, दुसरी विद्युत्शास्त्र प्रयोगशाळा व तिसरी जीवरसायन-शास्त्र प्रयोगशाला. क्रमाक्रमानें या सर्व प्रयोगशाला आह्मी पाहिल्या. संशोधनास लागणाऱ्या सर्व उपकरणांनीं व यंत्रांनीं युक्त अशा या प्रयोगशाळा आहेत. अनभिज्ञ माणसाला अशा गोष्टी साधारणतः अंधपणेंच पहाव्या लागतात. कारण यासंबंधीं विशेष माहिती त्याला नसते हीं सर्व उपकरणें व यंत्रसामुग्री पहातांना माझी अशीच स्थिति झाली. प्रयोगशाळा पाहिल्यावर आह्मी विद्या-र्थ्यांच्या वसतिगृहाकडे गेलों येथें मात्र आह्मांला समज-णाऱ्या गोष्टी होत्या. विद्यार्थ्यांच्या रहाण्याच्या खोल्या

फार प्रशस्त, हवाशीर व खूप उजेडाच्या होत्या. त्या पाहून मला फार आनंद झाला. तसेंच जेवणखाण्याची व्यवस्थाहि उत्तम तऱ्हेची आहे. येथें सर्वांनीं टेबलावर जेवण्याची व्यवस्था असुन सर्व जातींच्या, सर्व वर्णांच्या व सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांची व्यवस्था एकत्र व एकाच ठरलेल्या पद्धतीनें होते. अर्थात् मांसाहार किंवा वनस्पत्याहार ज्यास जसा पाहिजे तसा मिळण्याची व्यवस्था आहे. पण स्पर्शास्पर्श किंवा दुसरे अडचणीचे निर्बंध पाळण्यांत येत नाहींत. अशा ठिकाणीं दोन चार वर्षें राहिल्यानें मनाचा संकुचितपणा जाऊन राष्ट्रीय भावना व परस्पर सहिष्णुता हे गूण विद्यार्थ्यांमध्यें उद्भूत होतील अशा प्रकारची येथली व्यवस्था आहे असें मला दिसून आलें. बऱ्याचशा दक्षिणी विद्यार्थ्यांशीं आमचा येथें परिचय करून देण्यांत आला व सहचहा कॉफी-पान झाल्यावर आह्मीं सर्वांचे आभार मानून या संस्थेच्या उत्पादकाच्या कल्पकतेचें कौतुक करीत बिऱ्हाडीं आलों.

या संस्थेमध्यें सुमारें एकशेंवीस विद्यार्थी निरनिराळ्या तीन शाखांमध्यें शिकत व प्रयोग करीत

असतात. त्यांपैकीं सरासरी एकतृतीयांश इतक्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या शिष्यवृत्ति मिळतात; कांहीं विद्यार्थी प्रांतिक सरकारांनीं व संस्थानांनीं आपल्या खर्चानें धाडलेले असतात व अगदीं थोडे विद्यार्थी स्वतःच्या खर्चानें शिकण्यास आलेले असतात. या संस्थेचें सालीना उत्पन्न सुमारें साडेपांच लाख आहे. व खर्चेहि सरासरीनें तितकाच आहे. एकशेवीस विद्यार्थ्यांच्या सोयीच्या संशोधनसंस्थेस दरसाल साडेपांच लाख रुपये लागतात. म्हणजे दर विद्यार्थ्या-पाठीमागें दरसाल साडेचार हजार रुपये खर्च येतो. शास्त्रीयसंशोधनाचें काम किती खर्चाचें आहे याची यावरून कल्पना येईल. असो.

दिवाण पूर्णय्यांच्या बंगल्यापासून थेट पूर्वेकडच्या रस्त्यानें जाऊन दिसणाऱ्या लष्कराच्या भागापासून पहात पहात आम्ही शहराच्या वायव्य टोंकापर्यंत आलों. या बंगल्याच्या पश्चिम दिशेस रेलवे रस्ता असून रस्त्यापलीकडे शहराची वाढ अगदींच तुरळक आहे. दिवाण पूर्णय्यांच्या बंगल्याच्या पश्चिमेकडच्या रस्त्यानें जाऊन मद्रास रेलवे रस्ता ओलांडल्यावर,

पुण्याकडल्या रेलवे रस्त्याचे अलीकडे एक मोठी कापडाची गिरणी लागते व त्याचे अलीकडे थोडीफार जुनाट वस्ती लागते. यांतच सुभेदाराचें अन्नछत्र आहे.

पूर्णय्याच्या बंगल्यांतून पश्चिमेच्या रस्त्यानें जरासें गेल्यावर दक्षिण दिशेकडे रस्त्याचा एक फाटा जातो. हा फाटा थोड्याच अंतरावर मोठ्या रस्त्याला मिळून येथेंहि मागें एकदां सांगितल्याप्रमाणें पांच रस्त्यांचा एक कुंज होतो. पहिला पूर्णय्यांच्या बंगल्याकडून आलेला रस्ता; दुसरा रस्ता थेट पूर्वेकडे जातो. या रस्त्याला दिवाण शेषाद्री यांचें नांव दिलेलें आहे. हा रस्ता संस्थानच्या मुख्य तुरुंगावरून कब्बनपार्कमधल्या वाचनालयापर्यंत जातो. तिसरा रस्ता थेट दक्षिणेकडे जातो. याला सुभेदारीचा रस्ता म्हणतात. हाच रस्ता बंगळूरच्या जुन्या गांवांत जातो. सामानसुमान, भाजी-पाला आणण्यास जाण्याचा हाच आमचा नेहमींचा रस्ता, चवथा रस्ता थेट पश्चिमेकडे शहराच्या स्टेशनला जातो व पांचवा रस्ता थेट उत्तरेकडे जाऊन मल्लेश्वरच्या नव्या वस्तीकडे व पुढें टाटा शास्त्रीय प्रयोगशाळेकडे जातो.

एके दिवशीं शहराच्या ऐवजीं निव्वळ प्रांत व भूमिभाग पहाण्याच्या इराद्यानें रेलवे रस्त्यानें थेट पश्चिमेकडे गेलों. या रस्त्यानें गेलें ह्मणजे प्रथमतः धर्मवुडी नांवाचा सुंदर तलाव लागतो. हा तलाव सरासरी चौकोनी असून, याच्या चारी बाजू चांगल्या बांधलेल्या असून सभोंवार सारखे रस्ते आहेत.

पाणीपुरवठ्याच्या हल्लींच्या मोठ्या योजना होण्यापूर्वीं याच तलावांतून बंगळूर गांवाला पाणी पुरविलें जात असे. कारण हा तलाव गांवापेक्षां उंचावर आहे. या तलावाच्या दक्षिणेच्या बाजूला रस्त्यापलीकडे बरीच खोलगट अशी एक लहानशी म्युनिसिपालिटीची बाग आहे. ही बाग लहान खरी, पण फारच रमणीय आहे. येथल्या झाडांनां तलावांतलें पाणी आपोआप जमिनींतून झिरपून मिळत असल्यामुळें झाडें, वेली व हरळी यांची वाढ उत्तम होऊन बाग नेहमीं टवटवीत व हिरवीगार दिसते. ही बाग गांवाला अगदीं खेटलेली असल्यामुळें संध्याकाळीं तर येथें फारच गर्दी जमते. व सकाळीं दुपारींसुद्धां थोडीं फार माणसें या बागेंत विश्रांति घेत असतांना व सहल करीत असतांना

दिसतात. या बागेंत रोज सायंकाळीं सरकारी गवयाचें गाणें व पेटीवादन चालू असतें. या करमणुकीच्या सोयीमुळें सायंकाळीं लोक साहजिकच येथें जास्त येतात. बंगळूर शहरास प्रथमच येणारास स्टेशनच्या बाहेर आल्याबरोबर हा सुंदर तलाव दृग्गोचर होऊन बंगळूर शहराच्या शोभेचें प्रसादचिन्ह वाटतो. पश्चिमे-कडचा हा रस्ता स्टेशनशींच थांबतो; पुढें जरा दक्षिणेकडे वळल्यावर स्टेशनच्या पलीकडे जाण्यास एक लेव्हल क्रॉसींग लागतें; पण तें जरा बाजूला असल्यामुळें आम्ही स्टेशनांत शिरून रेलवेच्या लायनी ओलांडून पलीकडे गेलों. रेलवेच्या पलीकडे रेलवे नोकरांचीं झोपडीवजा लहान घरें टाकल्यावर मागडी गांवाकडे जाणारा रस्ता लागतो. मागडी हा गांव बंगळूरापासून एकोणतीस मैल आहे. ज्यानें बंगळूरचे नजरबुरुज बांधले त्या कैंपीगौडा घराण्यांचा त्याचें घराणें नामशेष होईपर्यंत, हा मागडी राजधानीचा गांव होता. हा सर्व भाग मावळांतील किंवा कोंकणांतील भागाप्रमाणें उंचसखल असा आहे. जमीन तांबड-सर व खडकाळ आहे. यामुळें हा भाग फारसा सुपीक

दिसत नाहीं. नाचणीसारखीं हलकीं पिकें होतात. या रस्त्याला दोन तीन विटांचे कारखाने आहेत. एका जमीनदाराची मोठी बागहि दिसली; बागेंत लहानसा बंगला, मोठी थोरली विहीर व पुष्कळशीं फुलझाडें दिसलीं; पण बागेची फारशी निगा ठेवलेली नाहीं असें भासलें. या रस्त्यानें बरेच लांबवर जाऊन आह्मी परत बिऱ्हाडीं आलों.

बंगळूर शहराच्या रेलवे स्टेशनच्या आवारापलीकडून पण दक्षिणेकडे ह्मैसूरकडे जाणाऱ्या रेलवे रस्त्याच्या अलीकडून एक सुंदर रस्ता जाऊन बंगळूर शहराच्या मध्यभागापासून निघून ह्मैसूर शहराला जाणाऱ्या रस्त्याला. मिळतो. या रस्त्याला उत्तरेकडून तीन समांतर असे रस्ते येऊन मिळतात. पहिला आतांच वर सांगितलेला ह्मैसूर रेलवे रस्त्यालगत जाणारा रस्ता. या रस्त्याच्या प्रारंभींच उजवीकडे मोठीथोरली बिनी मिल्स नांवाची कापसाची व लोकरीची गिरणी लागते. पुढें गेल्याबरोबर डाव्या हाताला एक मोठा तलाव लागतो व त्याच्या पलीकडच्या कांठाला, नव्हे अगदीं तलावाच्या पाण्यांत जणूं कांहीं बांधलेल्या तेलाच्या

व लोकरीच्या गिरण्या दृष्टोत्पत्तीस येतात व त्याला लागून इन्फंट्रीच्या बराकी व त्यांच्या अंमलदाराचे बंगले लागतात; दुसरा रस्ता या बराकीवरून येऊन ह्मैसूर रस्त्याला मिळतो व तिसरा आरळे पेठ नांवाच्या वंगळूर शहराच्या भर पेठेंतून येऊन ह्मैसूर रस्त्याला मिळतो. या सर्व रस्त्यांनीं चाललें ह्मणजे शहराची नीटनीटकी वस्ती व बंगळूर शहरांतील एकंदर टापटीप व स्वच्छता याबद्दल अनुकूल ग्रह मनावर होतो यांत शंका नाहीं. शहराच्या मध्य भागांतून निघालेला ह्मैसूर शहराला जाणारा रस्ता नवाच केल्यासारखा दिसत होता. तेव्हां पूर्वी रस्ता अरुंद असून त्याला दोन्ही बाजूंला पादचाऱ्यांकरितां पाऊलवाटा नसाव्यात असें वाटतें. पण हल्लीं नवा केलेला रस्ता प्रशस्त असून दोन्ही बाजूंस सुंदर अशा पाउलवाटा केल्या आहेत; व एकच तऱ्हेची कॉर्क झाडाची दुतर्फा रांग लावलेली दिसत होती.

अरळे पेठेच्या रस्त्यानें म्हैसूर रस्ता टाकून पुढें गेलें म्हणजे चामराज पेठ नांवाची नवी वसविलेली वस्ती लागते. ही वस्ती मल्लेश्वराप्रमाणेंच अगदीं नवी

असून फारच व्यवस्थेनें वसविलेली आहे. सर्व भागांत दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम असे सारखे रस्ते काढलेले असल्यामुळें सर्व वस्ती बुद्धीबळाच्या पटासारखी नकाशावरून दिसते. येथेंहि निरनिराळ्या रस्त्यांना एकेक जातीचीं निरनिराळीं झाडें लावलेलीं आहेत. उदाहरणार्थ एका रस्त्याला सर्व नारळीचींच झाडें लावलीं आहेत, तर दुसऱ्या रस्त्याला सर्व अशोकाचींच झाडें लावलीं आहेत, तर तिसऱ्या रस्त्याला तिसऱ्या तऱ्हेचीं झाडें लावलीं आहेत. ही चामराज पेठ टाकली व जरा मोकळी जागा टाकून पुढें गेलें म्हणजे लहान लहान टेकड्यांचा भूमिभाग लागतो. यालाच गवीपुर म्हणतात. येथलीं वस्ती जुनीच आहे व अशा जुन्या वस्तींतून जरा उंचवट्यावर गेलें म्हणजे गवी गंगाधरेश्वर या नांवाचें शिवालय लागतें. हें लेण्यासारखें खडकांत कोरलेलें असल्यामुळें टेकडी चढून गेल्यावर देवळाचा सभामंडप पुरुषभर खोल तळघरासारखा वाटतो. देवळाच्या सभोंवारचा प्रदक्षिणामार्ग खडकांत खोदलेला असून तो तीन साडेतीन फुट उंच व तितकाच रुंद असल्यामुळें प्रदक्षिणा घालतांना अगदीं कमरेपर्यंत

वांकून चालावें लागतें व प्रदक्षिणेच्या वाटेंत काळोख असल्यामुळें वाट दिसण्याकरितां दिवा घ्यावा लागतो. देवळाचा पुजारी ही कामगिरी अर्थात् खुशीनें करतो. या प्रदक्षिणेच्या वाटेंत सारख्या निरनिराळ्या देवदेवता खोदलेल्या किंवा स्थापलेल्या दृष्टोत्पत्तीस येतात व पुजारी प्रत्येक देवापुढें पैसा ठेवण्यास सांगण्याचें विसरत नाहीं. पण भाविक भक्तसुद्धां इतक्या देवदेवतांची वेगळी वेगळी संभावना करीत असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. आह्मीं अर्थात् अशी वेगवेगळी संभावना न करितां सामुदायिक पद्धतीनें मुख्य गंगाधरेश्वर देवाला चवलीपावलीची निष्क्रयद्वारा पूजा करून पुंजाऱ्याची अप्रत्यक्ष रीतीनें संभावना केली. या देवळाचे आवारांत शंकराचा त्रिशूल, त्याचें छत्र व त्याचा डमरू हीं आश्चर्य करण्यासारख्या मोठ्या प्रमाणावर खडकांत खोदलेलीं आहेत., हीं सर्व शंकराचीं चिन्हें पंधरावीस फुट लांबीरुंदीचीं आहेत.

सभामंडपाच्या वर खडकाची सपाटच्या सपाट मोठी थोरली गच्ची असून त्याच्या सर्व बाजूंना भिंती आहेत. या भिंतींतील एका दरवाजांतून जरा पलीकडे

गेलें ह्मणजे खडकांत खोदलेला एक तलाव लागतो. या तलावाच्या कांठावरून बंगळुराच्या आसपासच्या दक्षिणपश्चिम भागाकडील वीस पंचवीस मैलांचा प्रदेश एकसमयावच्छेदेंकरून दृष्टीस पडून सर्व प्रदेशाची विलक्षण ठेवण व वृक्ष वेलींची विपुलता पाहून मन सुप्रसन्न होतें. याच टेकडीवर केंपीगौडाचा पश्चिमेकडचा नजरबुरुज आहे. हा आतां बहुतेक पडून गेला आहे पण येथून किती दूरवरचा प्रदेश नजरेस येतो हें प्रत्यक्ष पाहून केंपीगौडाच्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचें व लष्करी दृष्टीचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. असो.

पूर्णय्यांच्या बंगल्याकडून दक्षिण दिशेकडे जाणारा रस्ता ह्मणजे बंगळूर गांवांत जाणारा हमरस्ता होय. या रस्त्यानें आम्हांला दर दोन दिवसांनीं भाजीपाला व सामानसुमान वगैरे लागणाऱ्या वस्तु आणण्याकरितां जावें लागत असे. हा रस्ता गांवांतल्या वस्तीमधून जुन्या गांवाच्या दक्षिण बाजूस पण गांवाला लागूनच बांधलेल्या प्रचंड मार्केटाकडे जातो. हें मार्केट खरोखरीच फार विस्तीर्ण आहे व आणखी एका बाजूस तें

वाढविण्याचें काम चालूच होतें. मार्केटाच्या समोर पुष्कळ खुली जागा असून रस्तेहि फारच रुंद ठेवलेले आहेत. या रस्त्याच्या पलीकडेच व्हिक्टोरिया हॉस्पिटल आहे. याचेंहि आवार विस्तीर्ण असून त्यांत सुंदर फुलझाडें व विपुल छायेचे वृक्ष लावलेले आहेत. हॉस्पिटलच्या डाव्या बाजूस मेडिकल स्कूल व त्याचें विद्यार्थीगृह आहे. या हॉस्पिटलचे डाव्या बाजूस व हॉस्पिटलच्या मागच्या बाजूस लेडी हार्डिंग हॉस्पिटल आहे. याप्रमाणें गांव टाकल्याबरोबर विस्तीर्ण मैदानांत बऱ्याच सार्वजनिक संस्था एके ठिकाणीं बांधल्या गेल्या आहेत. मेडिकल स्कूलच्या इमारतीवरून पुढें गेलें म्हणजे बंगळूरच्या जुन्या किल्ल्याच्या तटाचा अवशेष व दिल्ली दरवाजा दिसतो. आता किल्ला, त्याचे तट व त्यांतील इमारती वगैरे सर्व भाग पाडूनच त्यांत नवी वस्ती वसविली आहे. दिल्लीदरवाज्याचा वरचा भाग अजून शाबूत आहे. दगडी पायऱ्यांचा जिना चढून गेलें ह्मणजे गच्चीसारख्या खुल्या भागाची लांबच लांब पट्टी शिल्लक आहे. तेथून सर्व शहर दृष्टीस पडतें व शहराच्या दाट वस्तीची चांगली कल्पना येते. येथून

पुढें नवी वस्ती लागते व फलांग दोन फलांग मोकळें मैदान टाकल्यानंतर बसवनगुडी ह्मणून बंगळूरचें सर्वांत सुंदर अशा नव्या वस्तीचें ठिकाण लागतें. हें एक नवें शहरच आहे ह्मणाना. याची रचनाहि फार सुंदर आहे. या नव्या शहराच्या मधोमध मोठें मोकळें चौकोनी मैदान राखून ठेवलेलें आहे व या मैदानाच्या चारी बाजूंस दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम अशा बंगल्यांच्या रस्त्यांच्या रांगा केल्या आहेत. म्हणजे सर्व नवें शहर मिळून पुन्हां मोठा थोरला एक चौकच बनतो. या चौकांत सर्वत्र समांतर असे उभे आडवे रस्ते जातात, इतकेंच नाहीं तर चौकाच्या चारी कोनाचे काटकोन कापून तिरके चार रस्ते मधल्या मोकळ्या मैदानाच्या कोनाला आणून मिळविले आहेत. येथली सर्व वस्ती श्रीमंत सुखवस्तु मधल्या वर्गांतील आहे. येथें ह्मैसूर सरकारचे वरिष्ठ वर्गाचे अंमलदार, वरच्या वर्गाचे वकील, डॉक्टर वगैरे सुशिक्षित धंदेवाले यांचे बंगले आहेत. चांगले रुंद रस्ते, दोन्ही बाजूस पाउलवाटा व निरनिराळ्या जातींच्या, पण एका रस्त्याला एकाच जातीच्या लावलेल्या वृक्षराजी अशी ही नवी वस्ती आहे. ज्याप्रमाणें

शहराच्या उत्तरेस 'माळमाथा' ह्मणून फारच श्रीमंत एतद्देशीय व युरोपीयन लोकांनी वस्ती केलेली आहे, तशाच तऱ्हेची ही मध्यम वर्गाकरितां बसवनगुडीची वस्ती आहे. बंगळूर शहर प्रथम पहाणारास ही नवी वस्ती फारच सुंदर, टापटिपीची व व्यवस्थित दिसते. या बसवनगुडींतील सर्व दक्षिणोत्तर रस्ते शेवटीं एका पूर्वपश्चिम जाणाऱ्या रस्त्याला मिळतात. या रस्त्याला लागून एक लहानसा टेकडीवजा उंचवट्याचा भाग लागतो. या टेकडीवजा भागाच्या माथ्यावरच बंगळूरां-तलें प्रसिद्ध बसवेश्वर देऊळ आहे. थोड्याशा पायऱ्या चढून गेलें ह्मणजे एक लहानसें शंकराचें देऊळ लागतें व जरा आणखी चढल्यावर टेकडीवरचा पठार लागतो. हा सर्व फरसबंदी केलेला भाग आहे व मुख्य दरवाज्या-समोरचा फरशीचा एकच दगड पंधरा फूट लांब व बारा फूट रुंद असेल. येथें असे मोठमोठे दगड सांपडतात व या दगडांच्या तुळया व खांब केलेले आहेत. देवळाचा दरवाजा मोठा भव्य असून पुष्कळच उंच आहे व त्यावर जाण्यास बाजूसच दगडी पायऱ्यांचा जिना आहे. दरवाजांतून आंत गेलें म्हणजे थोडी फरसबंदी मोकळी

जागा आहे व मग देवळाचा लहानसा सभामंडप लागतो. देवाची मूर्ति म्हणजे नंदीची मूर्ति होय. ही एकाच प्रचंड खडकाची खोदलेली मूर्ति आहे. दक्षिणेकडील देवळांचा व मूर्तींचा विशेष ह्मणजे त्यांचा सुंदरपणा नव्हे तर त्यांचा भव्यपणा होय. या मूर्ति फारच मोठ्या आकाराच्या असतात. तशीच ही नंदीची मूर्ति आहे. देवळासभोंवतीं खुली प्रदक्षिणेची फरसबंदी वाट आहे. पण या देवळापेक्षांहि अर्वाचीन प्रवाशास आश्चर्यकारक व आनंदकारक वाटणारी गोष्ट ह्मणजे या टेकडीवर देवळापासून थोड्याच अंतरावर असलेला एक प्रचंड खडक होय. या खडकावर चढण्यास खडकांत कठड्या-सहित पायऱ्या बांधून काढल्या आहेत व खडका-सभोंवतींसुद्धां कठडा आहे. हा खडक आधींच टेकडीवर आहे व त्यांतून तो एकटाच पंधरावीस फूट उंच आहे. ह्यामुळें तो केंपीगौडाच्या नजरबुरुजाप्रमाणें एक स्वाभाविक नजरबुरुज आहे. येथून बंगळुराचा-शहर व लष्कर-सर्व देखावा एकसमयावच्छेदें करून दिसतो; शहराच्या विस्तीर्णतेची, शहराच्या नव्या जुन्या वस्तीची, शहराच्या पश्चिमबाजूकडेच काहूं

दिलेल्या वाफेनें व विजेनें चालणाऱ्या गिरण्या व कारखाने, शहरांतील हिंदू देवळें व ख्रिश्चन प्रार्थनामंदिरें यांचीं उंचउंच शिखरें व सर्व शहरभर पसरलेल्या उंचउंच वृक्षराजींची व झाडीची फारच आश्चर्यकारक शोभा दिसते. येथें कितीवेळ पहात उभें राहिलें तरी येथून हलावेसें वाटत नाहीं. इतका येथून दिसणारा देखावा आनंददायक आहे. पण अधिक वेगाच्या मनुष्याला परत फिरावेंच लागतें. परत येतांना आह्मी दुसऱ्या एका रस्त्यानें येऊन आद्य शंकराचार्यांचें नवीन मंदिर पाहून—ही इमारत नवीन असून प्रेक्षणीय आहे—बिऱ्हाडीं आलों.

पूर्णैय्यांच्या बंगल्याच्या पश्चिम व दक्षिणेकडील बाजूच्या रस्त्यानें जाऊन दिसणाऱ्या शहरांतील प्रेक्षणीय स्थळांची माहिती दिली. मागें सांगितलेंच आहे कीं, या बंगल्याचे पूर्वेकडच्या रस्त्यानें घोडदौड मैदानाच्या पलीकडे गेलें, ह्मणजे एक पांच रस्त्यांचा कुंज लागतो. त्यापैकीं पूर्वेकडचा व दक्षिणेकडचा रस्ता यांचे मधोमध एक लहानसा रस्ता काढलेला आहे. या रस्त्याला रेसिडेन्सी पार्क रस्ता म्हणतात. कारण या

रस्त्याच्या डाव्या बाजूला लागूनच रेसिडेंट साहेबाच्या बंगल्याच्या मागच्या आवाराचें कुंपण लागतें. हा रस्ता लहानसाच असून नवाच केलेला असावा. कारण याच्या दुतर्फा लावलेलीं झाडें अजून लहान असून फार उंच वाढलेलीं नाहींत. हा रस्ता संपला कीं समोरच म्हैसूर सरकारची सेक्रेटरिएटची प्रचंड इमारत दिसते. इमारत दुमजली असून सुमारें चार साडेचारशें फुट लांब असेल. याचे मधोमध व इमारतीच्या शेवटच्या दोन टोंकांना अशीं तीन पोर्चें आहेत. सर्व इमारतीला तांबडा रंग दिलेला आहे; दोन्ही मजल्यांचा त्या लांबलचक सारख्या कमानीच कमानी, समोरच सारखा जाणारा तांबडा रस्ता व त्याचे पलीकडे छोटी बाग या सर्व गोष्टी मनांत भरण्यासारख्या आहेत. या इमारती सभोंवार खूपच मोकळी जागा असल्यामुळें ही इमारत फारच उठून दिसते. ही इमारत कबनपार्कमध्यें असून पार्कच्या मधोमध पण जरा पश्चिमच्या कडेला आहे. या इमारतीच्या पूर्वेकडच्या बाजूला जास्त विस्तीर्ण अशी बाग असून रस्त्याखेरीज सर्व जागा हिरव्यागार गवतानें आच्छादली आहे. यामुळें सर्व विस्तीर्ण मैदानावर

हिरवा गालीचाच पसरलेला आहे कीं काय, असा भास होतो. या खुल्या गालीचा पसरलेल्या मैदानाला सुंदर वेलींचें कुंपण केलें आहे; व वेली अशा तऱ्हेनें कापल्या आहेत कीं, त्या किल्ल्याच्या मधून मधून जास्त उंच असलेल्या बुरुजासहित तटा-प्रमाणें जणूं कांहीं दिसाव्या ! या भव्य इमारतीसमो-रच कबनसाहेबांचा घोड्यावर बसलेला धातूचा पुतळा आहे. कबनसाहेब लष्करी पोषाखांत दाखविलेले आहेत. पाणीदार डोळे, सडपातळ बांधा, उतारवय पण धीरो-दात्त मुद्रा असा हा पुतळा मनांत भरण्यासारखा आहे खरा. कबनसाहेबांची हकीगत या लेखमालेच्या शेव-टच्या ऐतिहासिक लेखांत देण्याचें मनांत आहे. पण या साहेबांच्या कारकीर्दीचीं स्मारकें या शहरांत पुष्क-ळच आहेत. कबनपार्क, कबनहॉटेल, कबनरोड, कबनपेठ अशा नांवाचीं स्मारकें बंगळुरांत प्रवाशांच्या दृष्टीस पडतात. या पुतळ्याच्या समोरूनच एक प्रचंड वृक्षांनीं शोभित केलेला प्रशस्त रस्ता गेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस बसावयास बाकें ठेवलेलीं आहेत. हा रस्ता संपल्याबरोबर पुन्हां फुलझाडांची लहानशी बाग

लागते; त्यामध्यें कारंजें असून पाण्याच्या लहान लहान पुष्करण्या करून त्यांत कमळें लावलेलीं आहेत. या बागेच्या उजव्या हातास टेनीस खेळण्यास पांचसहा कोर्टें असून खेळाडूंस बसावयास बैठी अशी लहानशी इमारत आहे. या बागेच्या मधोमध बंगळूरची पदार्थसंग्रहालयाची सुंदर इमारत आहे. ही इमारत दुमजली असून तांबड्या रंगाची आहे व इमारत बरोबर चौकोनी असून त्याला पूर्वी दक्षिणोत्तर दोन खुलीं पोर्चें असावीं. पण हल्लीं दोन्ही पोर्चें बाजूस भिंती बांधून पदार्थ ठेवण्याकरितां इमारतींत सामील करून घेतल्यामुळें इमारतीच्या मागून व बाजूनें जाऊन मग पूर्वाभिमुख प्रवेशद्वारानें इमारतींत शिरावें लागतें. हल्लीं बहुतेक मोठमोठ्या ब्रिटिश किंवा संस्थानी राजधान्यांच्या शहरीं ज्या प्रकारें निरनिराळ्या प्रेक्षणीय पदार्थांनीं भरलेलीं अशीं पदार्थसंग्रहालयें झालीं आहेत, तशाच तऱ्हेचें हरतऱ्हेच्या हरहुन्नरी व दुर्मिळ वस्तूंनीं सुशोभित केलेलें येथलें पदार्थसंग्रहालय आहे. एका दिवसाची सर्व दुपार आम्ही हें पदार्थसंग्रहालय पहाण्यांत घालविली. या इमारतीच्या पूर्वेकडे क्वीन्स रस्ता

दक्षिणोत्तर जातो. त्याचे एका टोंकास व्हिक्टोरीया राणीचा संगमरवरी पुतळा व दुसऱ्या टोकास एडवर्ड बादशहाचा संगमरवरी पुतळा बसविलेला आहे. दोन्ही पुतळे प्रेक्षणीय आहेत. हे दोन्ही पुतळे टाकून जरा उत्तरेस गेल्यावर आणखी एक धातूचा पुतळा तीन रस्त्यांच्या मधल्या तिकोनी जागेंत नवाच बसविला आहे. हा विशिष्ट माणसाचा नसून गेल्या जगड्व्याळ लढाईंतील सामान्य शिपायांचा लढाईचें विजयस्मारक ह्मणून बसविला आहे. कबनपार्क हें मैदान खरोखरीच फार विस्तीर्ण आहे व त्याचें एकंदर आवार दीडशें दोनशें एकरांचें असेल. सर्व आवारांत बऱ्याच अंतरावर मोठमोठे वृक्ष लावलेले आहेत. ‘मधून मधून दाट झाडें लावून लहानशी गर्द वृक्षराई करून सदा सर्वकाळ सावली राहील अशा लताकुंजासारख्या बसण्यास व विश्रांति घेण्यास बाकें ठेवून जागा केल्या आहेत. हें आवार उत्तरेच्या बाजूस चढतें असून दक्षिणेकडे उतरत उतरत गेलें आहे. एवढ्या प्रचंड आवारभर हिरवीगार हरळी लावली असून मधून मधून तांबड्या

खडीच्या वाटा ठेवलेल्या आहेत; व सर्व आवारांत बऱ्याच सार्वजनिक इमारती आहेत; मुख्य सेक्रेटरिएटच्या इमारतीच्या दक्षिणेस सुंदर बॅन्डस्टॅंड आहे. येथें दर आठवड्यास महाराजांचा देशी वाद्यांचा बॅंड सायंकाळीं चालू असतो व अशा दिवशीं पार्कमध्यें लोकांची पुष्कळ गर्दी जमते. एके दिवशीं आह्मी बॅंडवादन ऐकण्यास गेलों होतों. गायनवादन ऐकत असतां व जाणाऱ्या येणाऱ्या मंडळीकडे पाहतां येथें अनवाणी चालण्याचा किती सररहा प्रघात आहे हें पाहून येथल्या लोकांच्या साध्या रहाणीचें किंवा पर्यायानें गरिबीचें ह्मणा आश्चर्य वाटलें. नेकटाय व कोट घातलेला मनुष्य असूनहि तो अनवाणी चालत असतांना पाहून जुन्यानव्या चालीच्या विलक्षण मिश्रणाकडे पाहून हसूं आलें. असो.

या बॅन्डस्टॅंडच्या पलीकडे येथलें सार्वजनिक वाचनालय आहे. वाचनालयाची इमारत मोठी असून त्यांत एक मोठा सार्वजनिक हॉल आहे. इमारतीच्या मागच्या बाजूस व उंच जोत्याच्या भागांत तळघरासारख्या खोल्या काढल्या असून तेथें चहा, कॉफी, फराळ वगैरे विक-

ण्याचें एक हिंदु दुकान ठेवलेलें आहे. येथून बऱ्याच दूर अंतरावर बड्या अंमलदारांचा क्लब आहे. येथेंहि आम्ही एकदां गेलों होतों. श्रीमंत क्लबाला साजेशा सर्व सोयी व करमणुकीचीं व व्यायामाचीं साधनें येथें आहेत. असो.

बंगळूरमधील प्रेक्षणीय स्थलांचा मुकुटमणी ह्मणजे येथली लालबाग होय. ही बाग बसवनगुडी या सुंदर नव्या वस्तीच्या अगदीं शेजारी असून त्याच्या पूर्वेस आहे. ही बाग आम्ही एकंदर दोनतीन वेळां पाहिली. आमच्या रहात्या बंगल्यापासून ती बरीच दूर असल्यामुळें नेहमींच्या फिरतीमध्यें ती बाग पहाण्यासारखी नव्हती. यामुळें इच्छा असतांनासुद्धां आह्मांस तिकडे जास्त वेळां जातां आलें नाहीं. या बागेकडे जाणारा रस्ताहि एक हमरस्त्यापैकीं असून त्या रस्त्याच्या बाजूंस बऱ्याच सार्वजनिक इमारती असल्यामुळें एक बाग पहाण्याकरितां जात असतांना अनायासें पुष्कळ प्रेक्षणीय स्थळांचें दर्शन घडतें. असो.

आह्मी एके दिवशीं ( अगदीं दोनप्रहरींच ) झटक्यांतून लालबाग पहाण्यास निघालों. पूर्णय्यांच्या बंगल्याहून दक्षिणेकडे जो रस्ता जातो त्यानें जाऊन

घोडदौडच्या दक्षिणेकडील भिंतीला लागून शेशाद्री नांवाच्या पूर्वपश्चिम जाणाऱ्या रस्त्याला मिळालों. या रस्त्यानें गेलें ह्मणजे या रस्त्याच्या टोकाशीं उजव्या हाताला या संस्थानच्या मुख्य तुरुंगाची इमारत लागते. तुरुंगाचें आवार बरेंच मोठें असून सभोंवार उंच भिंत आहे. तुरुंगावरून जाणारा हा रस्ता तुरुंग टाकल्याबरोबर बंगळूर कँटोनूमेंट स्टेशनवरून थेट गांवाकडे येणाऱ्या हमरस्त्याला मिळतो. त्या रस्त्याला वळल्यावर तुरुंगा-समोर येथल्या ऑब्झर्व्हेटरीची इमारत लागते. या इमारतीच्या प्रवेशद्वाराच्या बाजूला मोठा थोरला फळा असून त्यावर रोजच्यारोज शहराच्या आरोग्याबद्दल व हवामानाबद्दल माहिती दिलेली असते. यामुळें वाटेनें चालणाऱ्या माणसाला पाऊस, उष्णता वगैरेबद्दल सहज माहिती मिळते.ही पद्धति पाहून प्रत्येक म्युनिसिपालि-टीनें आपल्या ऑफीससमोर असा फळा ठेवून शहराची रोजची माहिती देण्याची पद्धत पाडल्यास शहरवासी-यांस अनायासें माहिती मिळून शहराच्या व्यवस्थेबद्दल जास्त आस्था वाटेल असें माझ्या मनांत आलें. येथून जरा पुढें गेलें म्हणजे सेंट्रल कॉलेजच्या इमारती डाव्या

बाजूला व त्यासमोरच उजव्या बाजूला मुलांच्या वसतीगृहांच्या इमारती लागतात. याच रस्त्यानें जरा पुढें गेलें ह्मणजे पांच रस्त्यांचा कुंज लागतो. पहिला कँटोन्मेंट स्टेशनकडून आह्मी आलों तो रस्ता. हा बंगळूर गांवांतून बसवनगुडीकडे जातो. दुसरा रस्ता बंगळूर स्टेशनकडून येऊन पूर्वेकडे टिपुसुलतानशीं झालेल्या इंग्रजांच्या शेवटल्या लढाईच्या विजय-स्तंभाकडे जातो. असे हे चार रस्ते होतात; पांचवा पोष्टऑफीस व सेक्रेटॅरीएट यावरून येऊन गांवाच्या रस्त्याला मिळतो. या कुंजाच्या गांवाकडच्या बाजूला ह्मैसूर बँकेची मोठी इमारत दृष्टीस पडते. गांवचा रस्ता टाकून पूर्वेकडच्या रस्त्याला वळलें ह्मणजे, उजव्या बाजूस एंजिनीयरिंग कॉलेजची इमारत लागते. हा विजयस्तंभाकडे जाणारा रस्ता अगदीं सरळ असून प्रशस्त आहे व दोन्ही बाजूंस फारच गर्द छायेचीं झाडें लावलीं आहेत. यामुळें हा रस्ता फार सुंदर दिसतो. इतकेंच नाहीं तर, भर-दोनप्रहरींसुद्धां येथें थंड वाटतें, व उन्हाळा किंवा उन्हाची तिरीप भासत नाहीं. या रस्त्याच्या प्रारंभींच

उजव्या बाजूस डिस्ट्रिक्ट कचेऱ्या व म्युनिसिपल कचेऱ्या आहेत; व जरा पुढें गेल्यावर त्याच बाजूला मार्थी हॉस्पिटलच्या इमारती आहेत. हें हॉस्पिटलहि बरेंच मोठें दिसतें. विजयस्तंभाशीं आलें ह्मणजे पुन्हा रस्त्याचा कुंज लागतो. कवनपार्कच्या पूर्वेकडून संपंगे तलावावरून एक रस्ता येऊन तो बंगळूर गांवाच्या पूर्व-भागावरून बसवनगुडीकडे जातो. या रस्त्यानें किंचित् जाऊन आपल्याला पुन्हा पूर्वेकडे वळावें लागतें. ह्मणजे लालबागचा रस्ता लागतो व मग तो रस्ता थेट लालबागेच्या प्रवेशद्वाराशीं जातो. ही बाग फार विस्तीर्ण व फार प्राचीन आहे.

म्हैसूरचें राज्य बळकावणारा हैदरअल्ली यानें प्रथमतः ही बाग तयार केली. टिपुसुलतानाच्या कारकीर्दींत तिची आणखी वाढ करण्यांत आली व पुन्हा हल्लींच्या राजघराण्याच्या कारकीर्दींतहि तिची सारखी वाढ होत आहे. तिचें आवार सुमारें दीडशें एकर आहे. ही बाग दक्षिणोत्तर लांबचौकोनी आहे. हिचा दरमहा चार हजारांचा खर्च आहे. हल्लीं या बागेचा सार्वजनिक हवा खाण्याचें व करमणुकीचें साधन ह्मणून, बी बीयाणीं

फुलझाडें व दुर्मिळ वनस्पतींचीं रोपें तयार करण्याची व विक्रीची बाग ह्मणून दुहेरी उपयोग करण्यांत येतो. येथें जगांतील निरनिराळ्या भागांतील दुर्मिळ वनस्पतींच्या जाती नमुन्याकरितां नेहमीं आणल्या जाऊन त्यांची लागवड केली जाते; येथें वनस्पतींच्या उपयोगांचे प्रयोग केले जातात; मेडिकल कॉलेजांतील व वनस्पतीशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना वनस्पतींची प्रत्यक्ष माहिती मिळण्याची येथें सोय आहे; हिंदुस्थानांतील वनस्पतिशास्त्रविषयक संस्थांकडून निरनिराळे वनस्पतींचे नमुने आणविले जातात व त्यांच्याकडे पाठविले जातात; पब्लिक वर्क्स खात्याला येथून गर्द छायेचीं झाडें रस्त्यावर लावण्यास पुरवलीं जातात. येथें दर वर्षास फुलांचें प्रदर्शन भरविलें जातें. या बागेवर जरी अर्धालाख रुपये खर्च होत असले, तरी त्यापासून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशी पुष्कळशी उपयुक्त कामगिरी करून घेण्यांत येते. शिवाय शहराचा एक अद्वितीय अलंकार व फुरसतीच्या वेळीं सृष्टींतील नानाविध दुर्मिळ व सुंदर फुलांची व वेलींची, फुलझाडांची व प्रचंड वृक्षांची शोभा पाहून मनाची करमणूक व निरपेक्ष

आनंद अनुभवण्याची सार्वजनिक बाग ह्मणून उपयोग आहे तो निराळाच! येवढ्या अवाढव्य व नानावृक्ष-लतांनीं भूषित अशा बागेचें सविस्तर वर्णन देणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे. मी उत्तरहिंदुस्थानांतील व काश्मिरांतील पुष्कळ बागा पाहिल्या आहेत. त्यासर्वां-पेक्षां ही लालबाग जास्त मनोहर व आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं. बागेंत कोठें कोठें जावें व काय काय पहावें असें होऊन मनुष्य प्रथमतः अगदीं गोंधळून जातो; बागेंत जिकडेतिकडे स्वच्छता, नीटनेटकेपणा व डोळ्याचें पारणें फिटावें अशा तऱ्हेच्या विविध फुलझाडांचे ताटवे दृग्गोचर होतात. या बागेंत पुष्कळ पुष्करंण्या आहेत; त्यांत निरनिराळ्या प्रंकारच्या कमलवेली व पाणवेली लावलेल्या आहेत; येथें लताकुंज व लतामंडप जागोजाग आहेत. कोठें मोठमोठ्या दाट छायेच्या वृक्षांचा पुंजका असून तेथें विश्रांति घेण्या-करितां साधीं बाकें ठेविलीं आहेत. एकाच जातीच्या झाडांचे व फुलझाडांचे ताटवेच्या ताटवे केलेले आहेत. येथें वृक्षवेलींना वळवून आश्चर्यकारक आकार दिलेले आहेत; घाणेरीसारख्या झुडपांच्या वेगवेगळ्या रंगाचे

किती तरी प्रकार असून त्यांना फुलांच्या हातांत घ्याव-याच्या गोट्यांचा आकार दिलेला आहे. कुंपणीच्या वेलींची तर नाना तऱ्हेची रचना केलेली आहे. कोठें त्यांना खुर्च्याकोचांचा आकार दिलेला आहे. कोठें वाटोळ्या तिकोनी मेजासारखा आकार दिलेला आहे; एक-दोन ठिकाणींतर झोंपड्यासारखा त्यांना आकार दिलेला आहे; सारांश या बाबतींत विलक्षण कल्पकता दाख-विलेली आहे. बागेच्या मधोमध एक लांबच लांब रस्ता आहे. त्याच्या मध्यभागीं घोड्यावर झूल असून त्यावर बसलेल्या एका राजपुरुषाचा पुतळा आहे. हा पुतळा कोणाचा आहे हें समजण्याला त्यावर कुठेंहि शिला-लेख नाहीं हें आश्चर्य आहे. पुतळ्याच्या एकंदर राजवैभवावरून, तो, हल्लींच्या महाराजांचे वडील चाम-राज महाराज यांचा असावा असा आह्मी तर्क केला. या पुतळ्यासमोरच बरेंच दूर व उंचावरचा रस्ता चढून गेल्यावर एक बिलोरी प्रचंड मंडप लागतो. हा प्रदर्शनमंडप ह्मणून बांधण्यांत आलेला आहे. पांच हजारांच्यावर माणसें मावतील इतका हा मोठा आहे. बागेच्या उजव्या बाजूस एक मोठा तलाव आहे. या

तलावाच्याच पाण्याचा बागेकरितां उपयोग करतात व ह्मणून येवढ्या प्रचंड बागेस पाण्याचा पुरवठा पुरेसा होतो. प्रदर्शनमंडपाच्या मागें टेकडीवजा उंच माळ आहे. या माळावरच केंपीगौडाचा दक्षिणेकडील नजर-बुरूज आहे; पूर्वीच्या सर्व बुरुजांप्रमाणें या बुरुजावरून सर्व शहराचा विस्तार, त्या शहरांतील झाडझाडोऱ्यांची विपुलता व गर्दपणा दृग्गोचर होतो. इतकेंच नाही तर लालबागेची प्रचंडता व विविधता याची आश्चर्य-कारक कल्पना येते. याप्रमाणें दोन चार तास बाग पाहून आह्मी आपल्या बिऱ्हाडीं परत आलों.

झालें. आमचा बंगळूरचा निवास संपत आला व आतां आपण हें शहर सोडून जाणार ह्मणून मनाला हुरहुर लागली. हें शहर किती सुंदर व हवाशीर आहे याचें प्रत्यंतर ह्मणजेच सोडतांना मनाची हुरहुर व पुन्हा कधीं तरी हें शहर पहाण्यास मिळेल काय असा मनापुढें येणारा आशाळभूत प्रश्न होय. अशा प्रकारच्या मनःस्थितींत शेवटचा आठवडा आह्मी बंगळूर शहरीं घालवून मग ह्मैसूर प्रांतांतील इतर प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास प्रयाण केलें.

## -३-

# म्हैसूर

पूर्वकाळीं दिल्लीआग्रा व पुणेंसातारा या शहरांच्या जोड्या एकमेकांपासून बऱ्याच अंतरावर असतांनासुद्धां जोड राजधान्यासारख्या समजल्या जात असत व त्यांचा उल्लेख एकदम होत असे. माझ्या उत्तर हिंदुस्थानच्या अनेक वेळच्या प्रवासांत उत्तरहिंदुस्थानी माणसाला माझें ठिकाण पुणें सांगितलें, कीं त्यानें सातारापुणें का असें विचारावें असा मला नेहमीं अनुभव येत असे; आपल्या इकडल्या प्रांतांतील लोकांना दिल्लीआग्रा हीं अगदीं नजीक वाटत ह्मणूनच शिवाजीची व औरंगझेबाची भेट दिल्लीस झाली कीं आग्यास झाली असा अर्वाचीन इतिहासकारास मोठा कोड्याचा प्रश्न वाटे; पण वास्तविक दिल्ली व आग्रा यांमध्यें सव्वाशें मैलांचें अंतर आहे. तसेंच सातारापुणें यांमध्येंही सत्तर पंचाहत्तर मैलांचें अंतर आहे. तीच स्थिति बंगळूरम्हैसूरची आहे. हीं शहरें हल्लींच्या

म्हैसूर संस्थानची जोड राजधानी आहेत, तरीपण या दोन शहरांत ऐशीनव्वद मैलांचें अंतर असून त्यांमध्यें कितीतरी नदीनाले, दऱ्याखोरीं, रानेंवनें, घाटखिंडी असून पूर्वकाळीं चालत किंवा घोड्यावरून एका शहरापासून दुसऱ्या शहरास पोहोंचण्यास चार दिवस लागत असत. हल्लीं बंगळूरम्हैसूर हा रेलवे रस्ता म्हैसूर संस्थानच्या खर्चानें केला असून त्याची लांबी ८७ मैल आहे व बंगळुराहून म्हैसुरास पोहोंचण्यास चार तास लागतात. आगगाडीही देश पहाण्याच्या दृष्टीनें फार सोयीची आहे. बंगळुराहून सकाळीं साडेआठला गाडी निघून म्हैसूरला साडेबारा वाजतां पोहोंचते. म्हैसूर हें शहर बंगळूर शहराच्या नैऋत्येस-दक्षिण व पश्चिम या दिशांच्या दरम्यान-आहे व बंगळूर-कडून म्हैसूरकडे उतरता भाग असून पांच सातशें फुटांचा उतार आहे. बंगळूर स्टेशनपासून कनगेरी व बिडाडी हीं दोन स्टेशनें सुमारें नऊ नऊ दहा दहा मैलांच्या अंतरावर आहेत. येथपर्यंत बंगळूरचा पठाराचा प्रांत आहे म्हणाना. सभोंवार निरनिराळीं पिकें व खुरटा झाडझाडोरा लागतो. क्षितिजावर फारशा

डोंगरटेकड्या दृग्गोचर होत नाहींत. पण बिडाडी स्टेशन टाकलें कीं सर्व देखावा बदलून जातो. रेलवे रस्त्याच्या दोन्ही बाजूंस डोंगरटेकड्यांची ओळच ओळ लागते; दाट, गर्द, व उंच झाडांचें रान लागूं लागतें; व आपण एका लांबच लांब दरींतून चाललों आहों कीं काय असा भास होतो. दोन्ही बाजूंच्या टेकड्यांचा खालचा भाग दाट रानानें आच्छादिलेला दिसतो, तर त्या टेकड्यांच्या माथ्यावर विलक्षण आकाराचे प्रचंड खडक व मोठमोठे दगड दृग्गोचर होतात व आपल्या प्रांतांत डोंगरांची सरळ व एक पातळीची रांगचरांग दिसते तशी या टेकड्यांची स्थिती नाहीं. या रांगेमध्यें उंचसखलपणा विलक्षण आहे ! मध्येंच एक मोठा मुळकाच्या मुळका उभा रहातो तर पुढें लागलीच टेकडी अगदीं जमिनीला लागून संपल्यासारखी दिसते. शिवाय या खडकांचे आकार व रचना आश्चर्यकारक वाटते. एखादा खडक हातापायांच्या व उघड्या डोक्याच्या माणसासारखा दुरून दिसतो तर एखादा खडक एखाद्या हिंस्र व्याघ्रसिंहासारखा जबडा पसरून बसल्यासारखा दिसतो. सारांश सायंकाळच्यावेळीं पश्चिमेकडे येणाऱ्या

ढगांचें जसें विलक्षण आकार व रूप असतें व आपण मनांत कल्पना आणावी तसा आकार व रूप त्या ढगांत आपल्याला दिसूं लागतें तशीच मनाची स्थिती या भागांतून जातांना मनुष्याची होते. प्रांताच्या उंच-सखलतेमुळें वाटोवाट लहान मोठे तलाव व पाण्याचीं डबकीं दृष्टीस पडतात. तसेंच निरनिराळया तऱ्हेचीं पिकेंही मधून मधून दृग्गोचर होतात. बंगळूरपासून सुमारें वीस मैलांवर क्लोजपेठ नांवाचें स्टेशन लागतें. सर बॅरी क्लोज या नांवाच्या म्हैसूरच्या रेसिडेंटाचें नाव या गांवाला दिलेलें आहे. याचें जुनें नांव रामगिरी होतें. येथपर्यंत सर्व जंगली व डोंगराळ मुलुख आहे. पण क्लोजपेठ स्टेशन टाकल्याबरोबर टेकड्यांची रांग कमी होते व दूर जाते आणि सपाट सुपीक बागाईत जमीन लागते. लवकरच अर्कावती नदीवरील पूल लागतो. ही नदी उत्तरेकडून निघून थेट दक्षिणेकडे जाऊन कावेरी नदीला मिळते; या नदीच्या खोऱ्यापासून श्रीरंगपट्टण या कावेरींतील बेटाच्या पलीकडेपर्यंत सुमारें पन्नास मैलांचा प्रांत हा म्हैसूर प्रांतांतील अत्यंत सुपीक भाग आहे यांत शंका नाहीं. हा सर्व भाग

सपाट व सखल आहे. या पन्नास मैलांच्या टापूंत चार दक्षिणवाहिन्या नद्या वहात जाऊन पूर्ववाहिनी कावेरीस मिळतात. यामुळें या भागांत पाणी विपुल असून पाऊसही पुष्कळ पडतो. शिवाय नद्यांचे लहान मोठे कालवेही काढलेले आहेत. यामुळें क्लोजपेठ सोडल्यापासून आपण एखाद्या बागेंतून चाललों आहों कीं काय असा भास होतो. या भागांत कोठें कोंकणासारख्या नारळीपोफळीच्या बागाचबागा लागतात; तर कोठें कलमी आंब्याच्या राया लागतात; कोठें पानवेलींचे मळेच मळे लागतात; तर कोठें उसाचे मळेचमळे लागतात. मधून मधून हिरवींगार भाताचीं खाचरेंही दृष्टीस पडतात; कोठें केळीच्या बागा लागतात; तर कोठें रेशमाच्या किड्यांना घालावयाच्या लहान लहान तुतीच्या झाडांची लागवड लागते; सारांश या भागांत निरनिराळ्या पिकांची व फळझाडांची विलक्षण विविधता दिसून येते व आगगाडीचा हा प्रवास पहातां पहातां सरून जातो. असो.

क्लोजपेठच्या पुढचें स्टेशन चनपाटणा म्हणून सात मैलांवरच लागतें. क्लोजपेठला आमच्या आगगाडींत

मुसलमानच मुसलमान घुसले. चनपाटणा येथें एका मुसलमान फकिराचा उरसव आहे व तिकडे सर्व लोक चालले आहेत असें कळलें. क्लोजपेठ व चनपाटणा या दोन्ही गांवीं मुसलमानांची एकंदर लोकसंख्येच्या एक तृतीयांशावर लोकसंख्या आहे असें मागाहून कळलें. चनपाटणा स्टेशनवर सावंतवाडी किंवा गोकाक येथें होणाऱ्या निरनिराळया लाखेच्या रंगाचीं लांकडी खेळणीं, सोंगट्या बुद्धिबळें व मुलींचीं बोळकीं वगैरेसारखें सामान विकावयास येतें. सामानाच्या व रंगाच्या सुबकपणावरून व मालाच्या माफक किंमतीवरून या ठिकाणीं हा धंदा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होत असावा असें अनुमान निघतें व शोधाअंतीं तें खरेंही ठरतें. येथें हे लांकडी खेळण्यांचे पुष्कळ कारखाने आहेत. अर्थात् हे कारखाने घरगुती स्वरूपाचेच आहेत. या भागांत रेशमाचे किडे पाळून त्यांपासून कच्चें रेशीम बनविण्याचें काम पुष्कळ गांवांत चालतें. चनपाटणा स्टेशनच्या पुढचें स्टेशन मालूर चारपांच मैलांवरच आहे. हें गांव व स्टेशन कण्व नांवाच्या नदीच्या तीरावर आहे. रेलवे पूल टाकल्यावर लागलीच

स्टेशन लागतें. हें गांव अगदीं लहान आहे. येथून पांच मैलांवर शिमशा नांवाच्या नदीचा सात कमानींचा सुंदर पूल लागतो. ही अर्कावतीपेक्षां मोठी नदी असून या नदीचे पुष्कळ कालवे काढलेले आहेत. याच नदीला कण्व नदी येऊन मिळते. अर्कावती व शिमशा या दोन्ही नद्या जवळ जवळ समांतर वाहून शिवसमुद्र या कावेरींतील बेटाच्या खालीं कावेरीस मिळतात. शिमशानदीचा पूल टाकला कीं लागलेंच माडूर हें स्टेशन लागतें. हें स्टेशन बंगलूर व म्हैसूर यांच्या जवळ जवळ मध्यावर आहे. येथून शिवसमुद्र या बेटावरील कावेरीच्या धबधब्यांना व तेथल्या अर्वाचीन वीज उत्पन्न करण्याच्या सरकारी कारखान्याला वाट जाते. त्यांचें वर्णन पुढें येईलच. बंगलूर म्हैसूर या सुमारें नव्वद मैलांच्या प्रांताचा हा भाग मध्य असून तो दोन्हीकडून खोल आहे. येथें शेतशेतीची जमीन फार आहे. जिकडे पहावें तिकडे हिरवीं हिरवीं गार भातशेतें दृष्टीस पडतात, व हा भाग उत्तर कोंकणांतल्या भागासारखा भासतो. या कोंकणांत जन्म झालेल्या व बालवय गेलेल्या मला हा देखावा पाहून

फार आनंद झाला व माझें बालपण जणूं कांहीं माझ्यापुढें उभें राहिल्यासारखें वाटलें. शेतांतून सारखें पाणी तुंबलें असून मधून मधून कालवेही वहात होते. पाण्याची या भागांत विलक्षण विपुलता दिसली. हा असा सपाटीचा व भातशेतीचा मुलुख सारखा दहाबारा मैल लागतो. व मग मांड्य नांवाचें स्टेशन लागतें. येथून जमिनीचा देखावा बदलतो. आतां सपाट, सखल जमीन जाऊन उंचसखल माळजमीन व झाडझाडोऱ्याचा भाग लागतो; जमीन फार दगडाळ आहे असें दिसून येतें. मांड्य स्टेशनपासून फ्रेंचरॉक्स या स्टेशनपर्यंत असाच खड-काळ भूमिभाग आहे. फ्रेंचरॉक्स हें अन्वर्थक नांव आहे. येथें तर पांढरे पांढरे खडकच खडक जिकडे-तिकडे दिसतात. या ठिकाणीं हैदर व टिपु यांच्या पदरच्या फ्रेंच शिपायांची छावणी होती ह्मणून या ठिकाणाला फ्रेंचरॉक्स असें नांव पडलें. हें स्टेशन टाकून जरा पुढें गेलें ह्मणजे खडकाळ व उंचसखल भूमिभाग जाऊन श्रीरंगपट्टण तालुका लागतो. माड्डूर तालुक्याप्रमाणें हा फार सपाट, सुपीक व विपुल पाण्याचा भाग आहे. जिकडेतिकडे पिकेंच पिकें

दिसतात. झाडीही पुष्कळ आहे, कालवेही वाटोवाट लागतात. प्रथमतः लोकपावनी नांवाच्या नदीचा लहानसा पूल लागतो. ही नदी श्रीरंगपट्टण बेटाच्या कावेरीच्या उत्तरेच्या प्रवाहाला जाऊन मिळते. श्रीरंग-पट्टण हें बेट तीन मैल लांब असून एक मैल रुंद आहे. येथें कावेरीचे तीन प्रवाह झालेले आहेत. पहिल्या प्रवाहास उत्तर कावेरी, दुसऱ्या प्रवाहास दक्षिण कावेरी, व तिसऱ्या प्रवाहास पश्चिमवाहिनी अशीं नांवें आहेत. रेलवे रस्त्याला यामुळें जवळ जवळ तीन पूल केलेले आहेत. रेलवे लाईन बेटाच्या अगदीं पश्चिमेकडच्या टोकाकडून म्हैसूरला जाते. ह्मणजे बंगळूरकडून रेलवे-मधून बसून चाललें असतां बहुतेक सगळें बेट आपल्या डाव्या हाताला रहातें. उजव्या हाताकडे बेटाचा फार थोडा भाग रहातो. या ठिकाणचें सविस्तर वर्णन यथाक्रम येणारच आहे. श्रीरंगपट्टण हें स्टेशन उत्तरकावेरीचा पूल ओलांडल्यावर लागलीच लागतें. येथून श्रीरंगाच्या देवळाचें आवार फार जवळ आहे. कावेरीचा पश्चिमवाहिनी हा फाटा फार पवित्र समजतात. येथेंच नदीला पुष्कळ घाट आहेत व

ह्मैसूरच्या महाराजांचा स्नानाचा घाट येथेंच आहे. श्रीरंगपट्टण स्टेशनपासून म्हैसूर स्टेशन नऊ मैलच आहे. मागें सांगितल्याप्रमाणें आम्ही बंगळुराहून सकाळीं साडेआठ वाजतां निघालों ते बरोबर साडे-बारा वाजतां ह्मणजे चार तासांनीं म्हैसूर स्टेशनला पोंचलों. बंगळूर ते म्हैसूर हा सुमारें नव्वद मैलांचा भूमिभाग इतका प्रेक्षणीय आहे कीं, प्रवासाचे चार तास केव्हां व कसे जातात हें समजूनसुद्धां येत नाहीं. हा सर्व भूमिभाग प्रेक्षणीय असून त्यांत नाटकांतल्या-प्रमाणें सारखे देखावे बदलत असतात, यामुळें प्रवासाचा केव्हांही कंटाळा येत नाहीं व प्रवास मोठा आनंदांत होतो.

बंगळूर व म्हैसूर या दोन्ही ठिकाणीं दिवाण विश्वेश्वर-आय्या यांच्या प्रोत्साहनानें मुंबईच्या सरदारगृहाप्रमाणें किंवा त्याचेपेक्षांही जास्त सोईस्कर अशीं हिंदू पद्धतीचीं ' मॉडर्न हिंदू हॉटेल ' नांवाचीं जेवण्याची व राहण्याची सोय करणारीं गृहें काढण्यांत आलीं आहेत. बंगळूरचें हॉटेल स्टेशनपासून जरा दूर असून त्याची इमारत जुनाट आहे. पण म्हैसूरचें हॉटेल स्टेशनच्या अगदीं नजीक असून गृहाची इमारत फारच सुंदर आहे. ऐसपैस

जागा असून तें ठिकाण उंचवट्याच्या जागेवर असल्या-मुळें इमारत व जागा मनांत भरण्यासारखी आहे. आम्ही या हॉटेलांत राहण्याचा बेत केला होता व आमची चार माणसांची सोईच्या एक किंवा दोन खोल्यांत रहाण्याची व चार दिवस जेवणाखाण्याची व्यवस्था करण्याबद्दल मॅनेजरास आगाऊ पत्र लिहिलें होतें. म्हणून स्टेशनवर हॉटेलचा माणूस येऊन आमचें सामान आणण्याची व्यवस्था ठीक होऊन आह्मी हॉटेलांत आलों. आह्मांला दोन उत्तम सामानानें सजविलेल्या खोल्या देण्यांत आल्या व लागलीच चहा व फराळाचें पाठविण्यांत आलें. चार पांच तासांच्या प्रवासानंतर व भर दोन प्रहर झाला असतांना अशा वेळच्या चहाफराळाचा यथेच्छ समाचार कोण घेणार नाहीं ? अर्थात् आह्मी आलेल्या फराळाचा व चहाचा मनसोक्त समाचार घेतला हें सांगावयास नकोच ! नंतर सावकाशपणें स्नान, भोजन करून थोडी विश्रांति घेतली.

ही इमारत अगदीं नवीच असून उंचावर असल्यामुळें येथून सर्व शहराचा व विशेषतः चामुंडी टेकडीचा देखावा उत्तम दिसतो. इतकी उत्तम जागा,

इमारत व सामानसुमान या हॉटेलास कशी मिळाली याचें आह्मी आश्चर्य करीत होतो. पण शहर पहाण्याची व्यवस्था करण्याकरितां मॅनेजराशीं बोलतांना या कोड्याचा उलगडा झाला. या हॉटेलची इमारत सरकारी असून खोल्यांतील टेबलें खुर्च्या इत्यादि सर्व सामान-सुमानही सरकारी आहे. म्हैसूर संस्थानची जी लोक-प्रतिनिधि सभा आहे त्याच्या सभासदांना म्हैसुरांत असतांना रहाण्याजेवण्याकरितां ही इमारत बांधली आहे. हिंदु लोकांप्रमाणें दुसऱ्या धर्मांच्या व युरोपीयन पद्धतीनें रहाणाऱ्या प्रतिनिधींकरितां अशीच सुंदर इमारत या इमारतीच्या समोरच बांधली आहे. पण प्रतिनिधी वर्षांतून एक दोन आठवडेंच रहा-वयास येत असल्यामुळें ही इमारत फुकट मॉडर्न हिंदु हॉटेलच्या मालकास बारमहा हॉटेलकरितां दिली आहे. प्रतिनिधी सभा चालू असतांना सर्व प्रतिनिधींची ठरलेल्या दरानें रहाण्याजेवणाची व्यवस्था करण्याचें काम या हॉटेलच्या मालकास दिलेलें आहे. त्या थोड्या दिवसांकरितां मालकास इतर प्रवाशांकरितां एखादी जवळची जागा भाड्यानें घ्यावी लागते.

पण बाकी वर्षभर सर्व प्रशस्त इमारत हॉटेलास फुकट उपयोगास मिळते. ही हकीकत ऐकून मला व्यवस्था करणाऱ्या दिवाण विश्वेश्वर आय्या यांच्या योजकतेचें कौतुक वाटलें. या योजनेनें संस्थानास चालू खर्च कांहीं न पडतां प्रतिनिधींची उत्तम तऱ्हेची सोय करतां आली व बाकीच्या वर्षभर म्हैसुरांत येणाऱ्या प्रवाशांची उत्तम सोय झाली. अशा या दुहेरी उपयोगाच्या योजनेमुळें खरोखरींच म्हैसुरास चार आठ दिवस येऊन रहाणें फार सोईचें व सुखाचें झालेलें आहे. असो.

म्हैसूर शहराचा विस्तार बंगळुराच्या इतका मोठा नाहीं. तरी या शहरानें व्यापलेली जागा सुमारें दहा चौरस मैल आहे. म्हैसूर हें शहर बशीच्या आकाराचें आहे. ह्मणजे या शहराच्या चारी बाजूंस टेकड्यावजा उंचवट्याचा पठार असून दक्षिणेस दोन मैलांवर समुद्रसपाटीपासुन सुमारें पसतीसशें फुट उंच असलेली प्रचंड चामुंडी नांवाची टेकडी आहे. यामुळें शहर साधारण खोलगट असून दरींत असल्याप्रमाणें आहे व ह्मणूनच शहराच्या मध्यभागीं व आसपास पुष्कळ

सुंदर सुंदर तलाव करतां आले आहेत. गांवाच्या मध्यभागीं असलेल्या तलावाच्या कांठावर किल्ला असून त्यांतच म्हैसूरच्या महाराजांचा हिंदु बांधकलेचा उत्तम मासला असा प्रचंड राजवाडा आहे म्हैसूर शहराच्या पश्चिम बाजूनें बंगळूर-म्हैसूर रेलवेरस्ता असून म्हैसूरचें मुख्य स्टेशन वायव्य कोपऱ्यांत आहे. पुढें हा रस्ता नांजनगुडपर्यंत नेलेला आहे. आह्मी म्हैसूर प्रांतांत होतो त्याच सुमारास हा रस्ता आणखी चामराजनगरपर्यंत चालू करण्यांत आला व तसाच हा रेलवेरस्ता थेट निलगिरीपर्यंत नेण्याचा महाराजांचा विचार आहे. यायोगें मुंबईप्रांतांतील किंवा म्हैसूर प्रांतांतील लोकांस सध्यां निलगिरीस जाण्यास जो द्राविडी प्राणायाम करावा लागतो तो करावा न लागतां दीडदोनशें मैलांचा हिसकाही वाचणार आहे. म्हैसूरच्या मुख्य स्टेशनखेरीज हल्लीं म्हैसूर-चामराजनगर रेलवेशाखेवर आणखी दोन स्टेशनें वाढत्या वस्तीकरितां उघडण्यांत आलीं आहेत. हल्लीं म्हैसूर शहराची वस्ती एका लाखाजवळ असून म्युनिसिपल कारभाराकरितां शहराचे आठ भाग

केलेले आहेत. गेल्या वीस पंचवीस वर्षांत या शहराची इतकी सुधारणा झाली आहे कीं, जुन्या काळीं शहर पाहिलेल्या माणसास हल्लींचें सुंदर व वाढतें शहर तेंच असें ओळखण्याची अडचण पडेल, व भवभूतीच्या खालील श्लोकाची आठवण होईल.

पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां ।
विपर्यासं यातो घनविरलभावः क्षितिरुहां ।
बहोर्दृष्टं कालादपरमिव मन्ये वनमिदं ।
निवेशः शैलानां तदिदमिति बुद्धिं द्रढयति ॥

चामुंडी टेकडी व किल्ल्याचे तट वगैरे स्थाइक खुणांवरूनच या शहराची जुनी ओळख पटेल. इतकें शहराचें सामान्य स्वरूप पुरें आहे. आम्ही येथें चार दिवसच राहिलों व घाईघाईनेंच शहरांतील आस-पासचीं प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. त्यांच्या यथाक्रम वर्णनास आतां लागूं या.

ही लेखमाला चालू असतांनाच म्हैसूर प्रांतांतील पहिल्या प्रवासांत न पाहिलेलीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्याकरितां मी गेल्या नाताळांत पुन्हां एकदां

म्हैसूर प्रांतांत प्रवास करून आलों व ज्याप्रमाणें गवई पद्याची पुढची ओळ म्हणण्यापूर्वी मागच्या ओळींतील एक दोन शब्द गाऊन पुढची ओळ गाऊं लागतो किंवा माळी फुलांची माळ गुंफतांना पुढचें फूल गुंफण्यापूर्वी मागच्या फुलावर टाका घालून पुढचें फूल गुंफतों म्हणजे गवयाच्या गाण्याची किंवा माळयाच्या माळेची सांखळी जुळून गाण्यांत किंवा माळेंत तुटकपणा न राहतां सर्व गाणें किंवा माळ एकजीव व एकरूप होते त्याप्रमाणें माझे दोन्ही प्रवास एकरूप व एकजीव व्हावे म्हणून या दुसऱ्या प्रवासांत मी म्हैसूर व श्रीरंगपट्टण हीं जुनी जोड राजधानीचीं शहरें पुनः एकदां पाहिली व 'क्षणे क्षणेयन्नवतां विधत्ते तदेव रूपं रमणीयतायाः।' या सुभाषितांत प्रथित केलेल्या सौंदर्याच्या स्वरूपाची आम्हांला प्रत्यक्ष प्रतीति आली. शिवाय पुष्कळ नव्या जुन्या गोष्टीच पण सावकाश व नव्या तऱ्हेनें पहाण्यास सांपडल्यामुळें आमचा आनंदहि द्विगुणित झाला व विशेषतः आमच्या पहिल्या प्रवासांत म्हैसूरच्या महाराजांचा हिंदू पद्धतीचा उत्तम मासला असा म्हैसूरचा राजवाडा पहाण्यास मिळाला नव्हता ती

अतृप्त तृष्णाहि या दुसऱ्या खेपेस तृप्त झाल्यानें प्रवासानंदांत जास्तच भर पडली. तरी आतां शहराच्या विशिष्ट वर्णनास लागूया.

ह्मैसूर शहराचा विशेष ह्मणजे तेथली रस्तेरचना व विजेची रोषनाई हें होय यांत शंका नाहीं. या शहराची पूर्वपश्चिम बाजू थोडी लहानच आहे. कारण शहराच्या या दोन्ही टोंकास डोडाकेरी व कुकरनळी असे दोन मोठे तलाव आहेत. यामुळें इकडे वस्ती वाढण्यास वाव कमी आहे. शहराची दक्षिणोत्तर बाजू जास्त लांब आहे व हल्लीं शहर याच दोन्ही दिशांस झपाट्यानें वाढत आहे. विशेषतः दक्षिणेकडच्या बाजूंस ही वाढ जास्त होत आहे व ह्मणूनच ह्मैसूर–चामराज नगर या दक्षिण दिशेला जाणाऱ्या रेलवे रस्त्यावर चामराज नगर व दक्षिण ह्मैसूर अशीं दोन नवीं स्टेशनें दोन दोन मैलांच्या अंतरावर नुकतींच उघडण्यांत आलीं आहेत व ह्मणून बंगरूळ शहराप्रमाणेंच ह्मैसूर शहरालासुद्धां आतां तीन शहरांतील स्थानिक स्टेशनें झालीं आहेत. शहराच्या दक्षिणोत्तर जास्त लांबीमुळें पूर्वपश्चिम जाणारे मोठमोठे सहा रस्ते आहेत तर

दक्षिणोत्तर जाणारे तीनच मोठमोठे रस्ते आहेत. हे निरनिराळ्या दिशेस जाणारे रस्ते ज्या ठिकाणीं मिळतात त्या ठिकाणीं प्रशस्त व सुंदर चौक बनले आहेत व त्यांचे सभोंवार चंद्रासारखे वाटोळे किंवा पेल्यासारखे डौलदार दुध्या रंगाचे विजेचे दिवे लावलेले आहेत व रात्रीच्या वेळीं या रस्त्यांची विशेषतः चौकांची अद्वितीय शोभा दिसते यांत शंका नाहीं. आतां शहरांतील प्रेक्षणीय स्थळाचें वर्णन या चौकाच्या व रस्त्याच्या अनुरोधानें करणेंच सोईचें आहे.

म्हैसूर स्टेशन टाकल्याबरोबर असा पहिला प्रशस्त चौक लागतो व म्हैसूरांत प्रथम प्रवेश करणाऱ्या प्रवाशाचें मन वेधतो व आपण एका मोठ्या महाराजांच्या राजधानीस आलों याची मनोमय साक्ष पटते. हा चौक पूर्व पश्चिम जाणाऱ्या व दक्षिणोत्तर जाणाऱ्या दोन सुंदर रस्त्यांनीं झाला आहे. पूर्वपश्चिम जाणाऱ्या रस्त्याला रेलवे स्टेशन रोड ह्मणतात व दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्याला व्हाइसरॉय रोड ह्मणतात. हे दोन्हीं रस्ते सरळ सुतासारखे काढलेले असून दोन्ही दिशांस शहराच्या पूर्व व दक्षिण टोंकापर्यंत व पलीकडेसुद्धां—

गेलेले आहेत. आम्ही म्हैसूरची प्राणीसंग्रहाची बाग पहावयास गेलों ते या रेलवे स्टेशनरोड रस्त्यानें गेलों. येथें झटका—एका घोड्याचा छकडा—हें वाहन पुष्कळ स्वस्त आहे. सहा आण्यांत आम्हां चार जणांना झटकेवाल्यानें बागेंत नेऊन सोडलें. या रस्त्याच्या दोन्ही बाजूस प्रशस्त पायवाटा ठेवल्या असून समोरासमोर असे विजेच्या दिव्यांचे खांब सारख्या रांगेनें दिसतात, दोन्ही बाजूंस नवीं झाडेंहि लावलेलीं आहेत. पण तीं अजून लहानच आहेत. या रस्त्यानें गेलें ह्मणजे दुसरा चौक 'सयाजीरोड'नांवाच्या दक्षिणोत्तर जाणाऱ्या नव्या सुंदर रस्त्यानें बनतो. या चौकाच्या उजव्या बाजूस व सयाजी रोडवर समोरासमोर दोन भव्य इमारती लागतात. उजव्या हातची अलीकडची इमारत 'कृष्णराज हॉस्पिटल'ची होय व पलिकडची इमारत 'टेक्नीकल इंस्टिटयुट'ची होय. हॉस्पिटलची इमारत पांढरसर पिवळट रंगाच्या दगडाची असून इमारत फारच मोठी व सुंदर आहे. इमारतीसभोवार खुली जागा पुष्कळ असल्यामुळें इमारत फार उठावांत दिसते. समोरची टेक्नीकल

इन्स्टिटयुटची इमारत विटांची असून बाहेरून गिलावा करून तिला तांबडसर रंग दिला आहे. ही इमारतहि फार मोठी व सुंदर आहे. दोन्ही इमारतींचे रंग निरनिराळे; दोन्ही इमारतींची रचना पद्धति निरनिराळी; दोन्ही इमारती सभोवारच्या जागेची व्यवस्था निरनिराळी; शेवटीं दोन्ही इमारतीचा सार्वजनिक उपयोग निरनिराळा; अशा या बऱ्याच बाबतींत सारखेपणा व बऱ्याच बाबतींत वेगळेपणा असलेल्या दोन सार्वजनिक इमारतींचा संवादविसंवादात्मक देखावा आश्चर्यकारक वाटला यांत शंका नाहीं. या इमारती टाकून पुढें गेलें ह्मणजे शहरांतील खासगी इमारती लागतात; पण त्या निटनेटक्या स्वच्छ व बदामी रंगाच्या असून सर्व इमारती भोवतीं रस्त्यांनां लागून सुबक भिंतीचें कंपाउंड असल्यामुळें शहरांतील वस्तीचा मनावर अनुकूल परिणाम होतो. ही वस्ती टाकल्यावर ह्मैसूरच्या रेसिडेंटाच्या 'गव्हर्मेंट हाऊस' नांवाच्या बंगल्याचा कोपऱ्यावरील 'एलजिन'गेटासमोर तिसरा मोठा चौक लागतो. या चौकाच्या आसपास मोकळी जागाच फार आहे. या मोकळ्या जागेमुळें हा चौक फार खुला वाटतो व

आपण शहराच्या गर्दीच्या वस्तीच्या बाहेर आल्याप्रमाणें वाटतें. येथून दक्षिणेकडे 'हार्डिंग सर्कल' म्हणून जो सहा रस्त्याचा षट्चौक लागतो तिकडे रस्ता जातो. हा चौक टाकून बंगल्याच्या भिंतीच्या बाजूनें जरा पुढें गेलें म्हणजे बंगल्यासमोरचा चवथा प्रचंड चौक लागतो. हा चौक चारी चौकांमधला सर्वांत सुंदर चौक आहे असें प्रत्ययास येतें. चौकासमोरच रेसिडेंटाचा बैठाच पण फार सुबक असा बंगला आहे. त्याच्या दक्षिणेकडे जो रस्ता जातो तो पुन्हः हार्डिंग सर्कलला मिळतो. येथें आम्हीं झटक्यांतून उतरून समोरून बंगल्याचा चित्ताकर्षक देखावा पाहिला. व मग दक्षिणेकडच्या रस्त्याला वळून हार्डिंग सर्कलच्या चौकाशीं आलों. येथें सहा रस्ते एकत्र आलेले आहेत. आह्मीं आलों तो उत्तरेकडून आलेला रस्ता बंगल्याकडून आलेला रस्ता होय. तोच दक्षिणेकडे डोडाकेरी तलावाच्या बांधानें जाऊन पुढें निलगिरीकडे जातो. थेट पूर्वेकडे जाणारा रस्ता 'वसंतमहाला'कडे जातो व पश्चिमेकडे जाणारा रस्ता शहराच्या मधोमध जाऊन येलवाड गांवाकडे जातो. पूर्व व दक्षिण या

दोन दिशांमधून एक रस्ता जातो तो प्राणिसंग्रहालय बागेकडे जातो. त्या रस्त्यानें आम्ही गेलों व लवकरच बागेच्या प्रवेशद्वाराशीं जाऊन झटक्याचे भाड्याचे पैसे चुकते केले. आम्हीं गेलों तो तीन वाजावयास वीस पंचवीस मिनिटें होतीं व दरवाजा बरोबर तीन वाजतां उघडतो असें कळलें. ह्मणून या अवकाशांत आम्ही तलावाच्या बाजूनें थोडे फिरून तलावाची शोभा पाहिली. हा तलाव नागपूरच्या तलावाइतका मोठा असेल. तलावाच्या पश्चिमेच्या व उत्तरेकडच्या बाजूस गावांची वस्ती आहे व पूर्व व दक्षिण भागास बागाच बागा आहेत. हा तलाव म्हैसूरचा एक विशिष्ट अलंकार आहे असें वाटल्यावाचून रहात नाहीं. तीन वाजल्यावरोबर आम्ही प्राणीसंग्रहालयाच्या बागेंत प्रवेश केला. येथें प्रत्येक माणशीं एक आणा टाकला ह्मणजे आंत शिरावयाचें चक्र आपोआप उघडतें व मनुष्य आंत शिरतो. म्हैसूरची ही बाग व बंगळूरची लालबाग या दोन्ही बागांत पूर्वीं प्राणी व वनस्पती असत. पण अलीकडे बंगळूरची लालबाग फक्त वनस्पतींचें संग्रहालय व वर्धनालय ह्मणून ठेवण्यांत आली आहे व

यामुळें त्या बागेंत दुर्मिळ अशीं झाडें व वनस्पति फारच आहेत व म्हणून ती बाग या दृष्टीनें अद्वितीय वाटते. म्हैसूरची बाग आतां प्राणिसंग्रहालय म्हणून ठेवण्यांत आली आहे. यामुळें बाग या दृष्टीनें ती मनांत भरण्यासारखी नाहीं. पण अजून प्राणिसंग्रहाच्या दृष्टीनेंहि ती परिपूर्ण झाली नाहीं. बागेचें आवार वाढवून त्यांत आणखी प्राणी ठेवण्याची व्यवस्था करण्यांत येत आहेत. बाकी आहेत ते प्राणी कांहीं कमी नाहींत. सर्व बाग फिरण्यास आम्हांला दोन अडीच तास लागले, व निरनिराळे प्राणी पाहून मनाची करमणूक झाली. येथें मोठमोठ्या वाघवाघिणींच्या व सिंहसिंहिणींच्या किती तरी जोड्या आहेत; काळे, पिवळे व बर्फमय प्रदेशांत रहाणारे पांढरे आस्वल आहेत. उंटासारखे जिराफ, घोड्यासारखे पण पांढऱ्या काळ्या पट्ट्याचे झीब्रे, पोटाच्या पिशवींत पिलें ठेवणारे व पुढच्या पंगू पायामुळें दोन पायांवर उडत उडत चालणारे कांगारू, मनुष्यासारखे व मनुष्याच्या उंचीएवढे शहामृग वगैरे दुर्दर्शन पशू आहेत. वानरें तर किती तऱ्हेचीं आहेत याची गणतीच

नाहीं; ताम्रमुखी, ताम्रकच्छपी, कृष्णमुखी, कृष्णकच्छपी श्वेतमुखी, श्वेतकच्छपी, पिवळ्या रंगाचीं, बहुरंग केसाची, नाकावर निरनिराळ्या रंगाच्या नामाप्रमाणें रेघा असलेली अशा नाना जातीचीं नाना रंगाचीं व नाना आकाराचीं वानरें आहेत. तसेच पोपटहि विविध रंगाचे आहेत. येथें आह्मीं तांबड्या लाल मखमाली रंगाचे, पिवळ्या पितांबरी रंगाचे, हिरव्याजरद रंगाचे, पोपटी रंगाचे, निळ्या जांभळ्या रंगाचे, पांढऱ्या रंगाचे व एकसमयावच्छेदें करून बहुरंगी रंगाचे असे नानाविध जातीचे पोपट पाहिले. सारांश हें प्राणीसंग्रहालय जरी अजून पूर्णतेस आलें नाहीं तरी त्यांत बहुविध पशुपक्षी यांचा संग्रह केलेला आहे, यांत शंका नाहीं. साडेपांच वाजतां हें संग्रहालय बंद होतें. येथें एक रुपयाला प्राण्याच्या चित्रांचें एक पुस्तक मिळतें. तें विकत घेतल्यानें या प्राणीसंग्रहालयाची स्मृति कायम रहाण्यास मदत होते. परत जातानां आह्मीं चालत घरीं गेलों. यामुळें दुसरे रस्ते पहाण्यास सांपडले; व विशेषतः रात्रीची विजेची रस्त्यांची रोषनाई पहाण्यास सांपडली.

आह्मीं प्राणिसंग्रहाच्या दाराबाहेर येऊन उत्तरेस जाणाऱ्या रस्त्याला लागलों. हा रस्ता संग्रहालयाच्या भिंतीच्या समांतरच गेलेला आहे. रस्ता व भिंत यामध्यें पूर्वीं पायवाट असावी पण हल्लीं ती पायवाट झाडांनीं फुलझाडांनीं निरनिराळ्या रंगाच्या पानझाडांनीं व हिरव्यागार हरळींनीं शोभिवंत केली आहे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस लहान लहान बंगलेवजा व अगदीं साधींच घरें आहेत. हा रस्ता थोडासा चालून गेल्यावर आह्मीं उजव्या बाजूस थेट पूर्वेकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलों. हा रस्ता राजरस्ता ह्मणून शोभण्यासारखा आहे. आधीं रस्ता फार प्रशस्त आहे; त्याचे दोन्ही बाजूस सुंदर सुंदर राजवाडे लागतात. डाव्या हाताच्या राजवाड्याचें कुंपण तांबडसर जांभळी फुलें येणाऱ्या वेलीचें केलेलें आहे. हें कुंपण इतकें नीट कापलेलें आहे कीं ही वेल अशी कशी साच्यांत ठेवल्यासारखी वाढते असा अचंबा वाटतो. दुरून कुंपणाचा वरचा माथा तांबड्या मखमलीनें मढविलेला आहे कीं काय असा भास होई; तसेंच कुंपणाची बाजूहि तशीच मढविलेली; सर्व फुलेंच आहेत असें वाटे, पण जसजसें

कुंपणाजवळ यावें तसतशा वेली हिरव्या पानांनीं व तांबड्या जांभळ्या फुलांनीं भरलेल्या आहेत असें दृष्टो· त्पत्तीस येई. ज्याप्रमाणें अंजिरी रंगाचा कपडा एकीकडून तांबडा तर एकीकडून काळसर दिसावा तशा तऱ्हेचाच दृष्टिभ्रम या कुंपणानें होतो व यामुळें या कुंपणाचें आश्चर्य वाटतें. याप्रमाणें आश्चर्यचकित अंतःकरणानें या पूर्वेचे रस्त्याच्या शेवटापर्यंत आम्हीं गेलों व दुसऱ्या रस्त्यानें परत फिरलों तों त्यांबाजूसहि हीच कुंपणाची मजा दिसत होती. ही सर्व मजा पहात पहात व आजूबाजूचे राज· वाडे पहात पहात आह्मीं सावकाशपणें चाललों होतों. हल्लीचे म्हैसूरचे दिवाण मिरझा यांचें या रस्त्याला नांव दिलें आहे. हा रस्ता अतिसुंदर, अतिसरळ आहे. या रस्त्यानें परत फिरलें ह्मणजे 'निषातबाग' ह्मणून एक बागेचा भाग मिरझा रस्त्याच्या डाव्या हाताला व एक भाग उजव्या हाताला लागतो. ' निषातबाग ' हें नांव काश्मिरांतील या नांवांच्या बागेवरून दिलें आहे. या बागेचा सर्व देखावा खरोखर मनोहर आहे. या बागेतील एका बाकांवर आह्मी कांहीं वेळ बसलों, व संध्याकाळ झाल्याबरोबर एकदम जिकडे तिकडे

विजेच्या दिव्यांचा शीतळ पण शुभ्र प्रकाश पडला व आम्ही हार्डिंग सर्कलमध्यें आलों. या सर्कलमध्यें सहा रस्ते येऊन मिळतात; प्रत्येक रस्त्याच्या तोंडाला दोन दोन सुंदर खांब उभारले असून त्यावर एक एक विजेचा दिवा आहे; याप्रमाणें बारा चंद्राप्रमाणें बारा दिवे एकदम लागतात; वर्तुळाच्या मध्यभागीं कुंज्याचें वर्तुळ असून त्यासभोंवतीहि तसेच विजेचे दिवे लावलेले आहेत. यामुळें या हार्डिंग वर्तुळाची रात्रीच्या वेळीं अद्वितीय शोभा दिसते. या वर्तुळाचे ठिकाणीं सारखे पहात उभे रहावें असें वाटतें. इतकें हें ठिकाण रमणीय आहे. येथून थेट पश्चिमेला गेलें ह्मणजे एक चौक लागतो. तो हार्डिंगसरकलपेक्षांहि जास्त रमणीय दिसतो; कारण त्या सर्कलसभोंवार बागेखेरीज कांहींएक दिसत नाहीं. पण या चौकांत प्रथमतः चामराज महाराजाचा संगमरवरी भव्य पुतळा संगमरवरी चवुतऱ्यावर व संगमरवरी व सोन्याच्या मुलाम्यानें शिखर मढविलेल्या मेघडंबरीखालीं ठेवलेला दृष्टीस पडतो व या राजवैभवशाली स्मारकानें मनुष्य आश्चर्यचकित झाल्याखेरीज रहात नाहीं. या चौकाच्या दक्षिणेच्या रस्त्यासमोर

महाराजांच्या राजवाड्याचें भव्य प्रवेशद्वार दिसतें. उत्तरेच्या रस्त्यासमोर उंच असा घड्याळाचा मनोरा दिसतो व पश्चिमेच्या बाजूस शहरांतील मोठमोठ्या इमारती व इलजिन चौक व कारंजें दिसतें. याप्रमाणें या चौकांतून म्हैसूर राजधानीचें बहुविध वैभव एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर होतें. हा चौक टाकून पुढें गेलें म्हणजे एलजिन चौक व कारंजें येथें आपण येतों. येथें समोरच 'लॅान्सडाऊन बझार' नांवाच्या इमारतीची प्रचंड रांगच रांग लागते व दक्षिणोत्तर जाणारा सयाजीरोड व त्याच्या दोन्ही बाजूंकडील बाजाराचा भाग दृष्टीस पडतो. येथून जरा बाजूला गेलें म्हणजे येलवाड रस्ता लागतो. हा थेट पश्चिमेकडे जाऊन व्हाईसरॉय रोडला मिळून तेथें एक चौक होतो. या चौकानजीक मॉडर्न हिंदु हॉटेल आहे. चारपांच तास याप्रमाणें शहरांतील बरींच प्रेक्षणीय स्थळें पाहून आम्हीं हॉटेलांत येऊन बराच वेळ पाहिलेल्या देखाव्यावर बोलत बसलों, व रात्रीचें भोजन झाल्यावर निद्रादेवीची आराधना केली. इतक्या तासाच्या तपश्चर्येनंतर ती तावडतोब आमच्यावर प्रसन्न झाली हें सांगण्याचें कारण नाहीं. असो.

नाताळांत जेव्हां आह्मी म्हैसूरला गेलों तेव्हां आम्हांला कळलें कीं महाराज उटीला गेले असून त्यांचे हुजुर सेक्रेटरी गांवांतच आहेत. ह्मणून मी हुजूर सेक्रेटरींना राजवाड्याच्या कचेरीच्या भव्य इमारतींत जाऊन भेटलों व हुजूर सेक्रेटरींनीं राजवाडा पहाण्याचा परवाना दिला; पण असें सांगितलें कीं विजार, लांब कोट व विशेषतः कमरबंद असा पोशाख राजवाड्यांत जाण्यास आवश्यक आहे. ही एक मोठी अडचण आली खरी; तरी पण कांहीं तरी करून राजवाडा तर पाहून घेऊं असें मी मनाशीं ठरविलें. प्रथमतः मॉडर्न हिंदू हॉटेलच्या मालकानें पोशाखाची तजवीज करतों असें सांगितलें. पण दुसरे दिवशीं दोनप्रहरीं—तीन वाजतां वाड्यांत जाण्याचा परवाना होता—लांब कोट व कंबरबंध ( कमरेभोंवतीं हरदासाप्रमाणें बांधावयाचें उपरणें ) एवढ्या पोशाखावरच तेथल्या नेहेमींच्या राजवाड्यांत जाणाऱ्या येणाऱ्या माणसाबरोबर आह्मांला राजवाडा पहाण्यास पाठविण्याची तजवीज मालकानें केली. मात्र चिरीमिरीदाखल त्या माणसास दोन रुपये द्यावयास सांगितलें. असो.

म्हैसूरच्या महाराजाचा राजवाडा डोड्डाकेरी तलावाच्या पश्चिम काठाला किल्ल्यांत आहे. म्हैसूरचा किल्ला हा भुईकोट किल्ला असून तो साधारणतः चौकोनी असून चौकोनाची एक एक बाजू सुमारें तेराशें फुट लांबीची आहे. उत्तर, दक्षिण व पश्चिम अशा तीन दिशेला भव्य प्रवेशद्वारें आहेत. पूर्वी पूर्वेकडे सबंध तट होता पण अलीकडे पूर्वेसहि तट पाडून राजवाड्यासमोर सुरेख रस्ता केला आहे. कारण राजवाडा पूर्वाभिमुख आहे. या बाजूसहि मोठें प्रवेशद्वार करण्याचा विचार आहे. किल्ल्याची दक्षिणोत्तर प्रवेशद्वारें समोरासमोर असून त्यांना जोडणारा रस्ता राजवाड्यासमोरून जातो. उत्तरेकडचा रस्ता चामराज महाराजांच्या पुतळ्याच्या चौकावरून सरळ जाऊन 'रेलवेस्टेशन रोड' या मोठ्या रस्त्याला जाऊन मिळतो, व दक्षिण द्वारांतून जाणारा रस्ता तलावाच्या रस्त्याला मिळून पुढें तो निलगिरीकडे जातो. हा रस्ता हमरस्त्यासारखाच वापरला जातो व किल्ल्याच्या दक्षिणद्वारानजीक लक्ष्मीनारायण, हनुमान इत्यादि देवांचीं देवालयें असल्यामुळें संध्याकाळीं तर या रस्त्याला फार गर्दी

असते. एका दृष्टीनें राजवाडा पहाण्यास परवानगीची पंचाईत आहे खरी तरी या दोन द्वारामधला रस्ता सररहा राजरस्त्यासारखा उपयोगांत येत असल्यामुळें राजवाड्याचें दुरून दर्शन घेण्यास व बाह्य देखावा पहाण्यास पूर्ण मुभा आहे असें दिसून आलें. दक्षिण-द्वाराला दोन मोठ्या वाटा व दोन पायवाटा अशा एकंदर चार वाटा आहेत. यावर अर्थात् उंच भव्य कमानी आहेत. मोठ्या दोन वाटांच्या दोन्ही बाजूच्या रुंद भिंतीवर तैल रंगांत चार मोठीं चित्रें आहेत. दोन चित्रें बंगळूर म्हैसूर येथील राजवाड्यांचींच आहेत. या चित्रावरूनहि राजवाड्याची उत्तम कल्पना मनांत येते. तिसऱ्या भिंतीवर गिरसाप्पा किंवा म्हैसूरी लोकांतील प्रचलित नांव जोग-धबधब्याचें सुंदर चित्र काढलेलें आहे. आम्हीं हे धबधबे पाहून लागलीच म्हैसुरास आल्यामुळें त्या धबधब्याच्या देखाव्याचें स्मृतिचित्र आमच्या मनः-चक्षूंपुढें स्पष्ट व ठळक असल्यामुळें या भिंतीवरील धबधब्याची हुबेहुब प्रतिकृति पाहून आम्हाला चित्र-काराच्या कुशलतेचें कौतुक वाटलें. भिंतीवरील चवथें

चित्र कोठचा देखावा हें आह्मांस समजलें नाहीं. पण वरील तिन्ही स्थानिक चित्रांवरुन तें चित्र कावेरीच्या काठच्या किंवा म्हैसूरांतील वनविपुल भागांतील एखाद्या ठिकाणचें चित्र असावें असा आह्मीं तर्क केला. राजवाडा पूर्वाभिमुख असल्यामुळें राजवाड्याचा मुख्य दरवाजा पूर्वेकडे आहे. पण प्रेक्षकांनां दक्षिणेकडच्या दरवाज्यानें राजवाड्यांत जावें लागतें. दरवाज्यावर बूट, जोडे, काठ्या, छत्र्या ठेवून कमरेला उपरणें गुंडाळून आम्हांला आंत सोडण्यांत आलें. जिना चढून वर गेलें ह्मणजे अंबाविलास नांवाच्या दिवाणखान्यांत मनुष्य येतो. हाच महाराजांचा खासगी भेटी देण्याचा दिवाणखाना आहे. दिवाणखाना फारसा मोठा नाहीं, पण त्यावरील नक्षीकाम अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं. येथेंच जुन्या वाड्यांचा चांदीचा दरवाजा आहे. यावर दशवतारांची सुंदर चित्रें खोदलेलीं आहेत; येथेंच चंदनाचा दरवाजा आहे. त्यावरहि हस्तीदंताचें नक्षीकाम अप्रतिम केलेलें आहे. सर्व भिंतींनां व खांबांनां नाना छटांचे व नाना लहरींचे तैलरंग दिलेले आहेत व भिंतीवर रविवर्म्याचया खुद्द हातची गंगा-

वतरणादि प्रसिद्ध चित्रें काढलीं आहेत. दिवाणखा-न्याचे जुन्या पद्धतीप्रमाणें खांबाच्या दोन रांगांनीं तीन भाग झालेले आहेत. मधला भाग अर्थात् रुंद आहे, तोच खुद्द दिवाणखाना. दोन बाजूचे भाग कमी रुंद आहेत. त्यावर लाकडी नक्षीचें छत आहे. त्याला मात्र कोणताहि रंग किंवा व्हार्निश दिलेलें नाहीं. मूळचा लाकडाचा रंग ठेवलेला आहे. पण सर्व छताचें नक्षीकाम फारच नाजुक व बहारदारीचें आहे. दिवाण-खान्याच्या मधल्या भागाचें छत पुष्कळच उंच आहे व त्या छताला उत्तम उत्तम प्रकारचे तैलरंग दिले असून कमळासारखी नक्षी काढली आहे. सर्व खांबांना भिंतींना* व चित्रासभोंवारच्या चौकटीस सोनेरी मुलाम्याच्या पिवळ्या चकाकीचा रंग दिला आहे. त्यामुळें सर्व दिवाणखाना जणू कांहीं सोन्यानें मढ-विल्यासारखा दिसतो. या दिवाणखान्यांतून वाहेर गेल्यावर जाण्याच्या मार्गासारखा भाग टाकून मनुष्य दसरा दरबार दिवाणखान्यांत येतो. हा दिवाणखाना मात्र फारच प्रशस्त व भव्य आहे. हा पूर्वाभिमुख आहे. यापुढें मोठें मैदान असून येथेंच दसऱ्याच्या

केलेल्या व छताचें जागीं सर्व रंगित चित्रांनीं भरलेल्या मोठमोठ्या कांचांनीं आच्छादलेल्या स्थानीं नेण्यांत आलें. हें राजवाड्यातील विवाहगृह असून राजकुमार व राजकुमारी यांचे विवाह या गृहांत लावतात असें आह्मांला सांगण्यांत आलें. हें गृह पाहून आह्मांला दिवाण पूर्णय्या यांच्या राज वाड्यावजा बंगल्यांतील असल्या गृहाचें स्मरण झालें व ज्याप्रमाणें आपल्या इकडल्या घरामध्यें देवघर असतें त्याप्रमाणें इकडील प्रांतांतील घरामध्यें लग्नघर ह्मणून एखादा भाग ठेवण्याची चाल असावी असा मी तर्क केला. राजवाड्याचा येवढाच भाग नेहमीं दाखविण्यांत येतो; महाराजांचें प्रसिद्ध सिंहासन दसऱ्याच्या सणाखेरीज बाहेर काढीत नसल्यामुळें तें इतर वेळीं पहाण्यास सांपडावयाचें नाहीं असें कळलें. तेव्हां पुढें केव्हांतरी दसऱ्याच्या दरबारास हजर रहाण्याचा योग येवो अशी आशा मनांतल्या मनांत करून आनंद व आश्चर्य अशा मिश्र मनोविकारांनीं उंचबळलेल्या मनानें आह्मीं राजवाड्याचा निरोप घेतला. व या राजवाड्याच्या उत्तरेच्या प्रवेशद्वारा-

समोरच असलेल्या जगन्मोहन महाल नांवाच्या तीन मजली उंच राजवाड्याकडे गेलों. येथेंच म्हैसूरचें पदार्थसंग्रहालय आहे. पूर्वी हें संग्रहालय पहाण्यासहि परवाना लागे. पण हल्लीं दोन आणे दरमाणशी फी दिली म्हणजे आंत प्रवेश होतो. व्हरांड्यांत एक अंमलदारवजा कारकून ठेवला आहे. तो दोन आण्याची पावती देतो व हीच पावती आतां परवानावजा आहे. हल्लींची जगन्मोहनमहालाच्या बाबतींत केलेली सोयीची व्यवस्था पाहून महाराजांचा राजवाडा पहाण्याच्या बाबतींत अशा तऱ्हेचीच-फी पाहिजे तर जरा जास्त ठेवावी-व्यवस्था झाल्यास व कमरबंध बांधल्याखेरीज राजवाड्यांत प्रवेश करावयाचा नाहीं हा जुन्या पुराण्या व आतां नामशेष झालेल्या पोशखाच्या पद्धतीचा निर्बंध काढून टाकल्यास म्हैसूर शहर पहाण्यास जाणाऱ्या प्रवाशांची केवढी सोय होईल असें माझ्या मनांत आल्या वाचून राहिलें नाहीं. या महालासमोरच महालाला लागूनच नाटकें किंवा सिनेमा करण्यास सोयीचा असा लांबलचक सभामंडप उभारण्यांत आला आहे. यायोगें या महालाची शोभा कांहींशी कमी झाली आहे. असो.

जगन्मोहन महाल हा तीनघई तीन दालनी तीन मजली असा राजवाडा असून त्यांत एकंदर लहानमोठीं अशीं सुमारें सतराअठरा दालनें असून तीं सर्व नाना-ठिकाणच्या व नानातऱ्हेच्या कलाकुसरीच्या प्रेक्षणीय पदार्थांनीं भरगच्च भरलेलीं आहेत. शिवाय राज-वाड्याच्या सर्व भिंतीवर प्रसिद्ध चित्रकारांच्या हातून तैल रंगाचीं सुंदर सुंदर चित्रें काढविलीं आहेत, व भिंतीचा मोकळा भाग मोठमोठ्या सोनेरी चवकटीच्या तसबिरांनीं सुशोभित केलेला आहे. मुख्य इमारतीखेरीज राजवाड्याच्या मागच्या मोकळ्या जागेपलीकडे सोप्या-वजा एकमजली लांबच लांब दालनें आहेत. त्याला ' इंडियन गॅलरी ' असें नांव देऊन त्यांमध्यें जुन्या चित्रकलेचे मासले म्हणून पुष्कळच पाणरंगाचीं तैल-रंगाचीं व काचेवर काढलेलीं चित्रें रांगेनें भिंतीला लट-कावून ठेवलेलीं आहेत. तैल रंगांतील चित्रामध्यें व तस-बिरांमध्यें मागचे महाराज चामराज बहादूर व हल्लींचे महाराज कृष्णराज बहादूर यांच्या निरनिराळ्या वयां-तील, त्यांच्या आयुष्यांतील निरनिराळ्या समारंभाच्या प्रसंगांवरील व शिकारीसारख्या व्यवसायावरील किती-

तरी चित्रें व तसबिरा आहेत. म्हैसूरच्या रेसिडेंटांच्या व इंग्रजी मुत्सद्यांच्या व इंग्रजांच्या टिपुसुलतानशीं झालेल्या लढायांच्या मोठमोठ्या तसबिरा भिंतीवर टांगलेल्या आहेत. सारांश चित्रकलेच्या दृष्टीनेंसुद्धा हें पदार्थसंग्रहालय प्रेक्षणीय आहे. इतर प्रेक्षणीय पदार्थं तर किती आहेत याची गणतीच नाहीं. शिसवा, चंदन, शिंगे हस्तिदंत, गार संगमरवर, सोनेरुपें इत्यादि स्वाभाविक सुंदर, दुर्मिळ व मोलवान् जातीच्या द्रव्यानीं बनविलेल्या नाना आकाराचे नाना तऱ्हेचे नाना नक्षीकामाचे शेकडोशें प्रेक्षणीय पदार्थ या संग्रहालयांत व्यवस्थेनें मांडून ठेवलेले आहेत. पण एकदोन तासांत सगळें संग्रहालय पहाणाऱ्या आमच्यासारख्या प्रवाशांनां प्रेक्षणीय पदार्थसुद्धा सिनेमांतील भराभर फिरविल्या जाणाऱ्या चित्रांप्रमाणें पटापट् नजरेखालीं घालून पुढें पुढें पाऊल टाकावें लागतें. तरी पण या संग्रहांतल्या कांहीं वस्तू विशेष तऱ्हेनें लक्ष वेधतात व पहाणाराला थोडावेळ तरी तेथें थबकवितात यांत शंका नाहीं. अशा तऱ्हेच्या प्रेक्षणीय पदार्थांपैकीं येथलें एक प्रचंड घड्याळ होय. या घड्याळांत

सैन्यांतील लिलिपुटीयन शिपायांची कवाईत सेनापतीला सलाम वगैरे सर्व हालचाली हुबेहुब होतील अशी यंत्ररचना केली असून प्रत्येक अर्ध्या तासाला या सैन्याच्या या हालचाली दिसाव्या व सैन्याचा बँड ऐकू यावा अशी आश्चर्यकारक योजना केलेली आहे. यामुळें या घड्याळाशीं आल्यावर येथें थांबल्याशिवाय रहावत नाहीं, व शिपायांच्या आणि बँडवाल्यांच्या अगदीं बारिक सारिक चाललेल्या गतिचेष्टा पाहून, बँडचें मधून गायन वादन ऐकून घड्याळाच्या कर्त्याच्या कल्पकतेचें कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. या संग्रहालयांतील दुसरी लक्ष वेधणारी वस्तु ह्मणजे कावेरी नदीच्या उगमापासून त्या नदीवरील 'शिव-समुद्र' नावाच्या धबधब्याच्या खालपर्यंतच्या प्रांताचा निम्नोनत्तिदर्शक नकाशा होय. या नकाशावरून म्हैसूर प्रांताची विलक्षण घडण, निलगिरी पर्वताची आश्चर्य-कारक उंची वगैरे देखावा विमानांतून एकसमयावच्छेदें-करून आपण पहात आहों कीं काय असा भास होतो.

याप्रमाणें प्रेक्षणीय पदार्थ पहातां पहातां पांच वाजले व पहारेवाल्यानें आह्मांस निघण्याची खूण केली.

आम्हीं प्रमुदित मनानें संग्रहालयाबाहेर आलों व चालत चालत व शहराची शोभा पहात बिऱ्हाडीं पोंचलों.

येथपर्यंतच्या वर्णनावरून म्हैसूर हें किती शोभिवंत शहर आहे याची थोडीशी कल्पना वाचकांस आलीच असेल. परंतु म्हैसूरचें जणूं कांहीं नाकच अशी चामुंडी टेकडी व त्यावरील देवळें व बंगले यांचें वर्णन केल्या-खेरीज म्हैसूर शहराचें वर्णन पुरें होणार नाहीं तरी आतां या टेकडीच्या वर्णनास लागूंया.

चामुंडी टेकडीला 'टेकडी' हें क्षुल्लक नांव मिळा-लेलें आहे खरें, परंतु पुण्याच्या शेजारची पर्वतीची टेकडी किंवा जरा दूरची चतुःशृंगीची टेकडी, औंधगांव जवळची यमाईची टेकडी अशा शेंदोनशें पायऱ्यांच्या क्षुद्र टेंकड्याप्रमाणें ही चामुंडी टेकडी नाहीं; तर ती काश्मीरची राजधानी श्रीनगर या शहरानजिकच्या शंकर पर्वतासारखा एकाकी पण फार उंच असा पर्वत आहे. खरोखरींच सृष्टीसौंदर्याच्या दृष्टीनें म्हैसूर शहराचा व श्रीनगरचा देखावा यांत पुष्कळ साम्य आहे. शंकरपर्वताइतकी चामुंडी टेकडी शहराच्या पृष्ठभागा-

पासून एक हजार फुट उंच आहे. शंकरपर्वताच्या पायथ्याशीं पण गांवाला लागूनच लालतलाव आहे. त्याप्रमाणेंच चामुंडी टेकडीच्या पायथ्याशीं पण गांवाला लागूनच देवराज अगर डोडातलाव आहे. शंकरपर्वत उघडा बोडका, निर्वृक्ष, खडकाळ, रुक्ष ह्मणूनच भीषण असा आहे. त्याप्रमाणें चामुंडीटेकडीहि आहे. शंकर-पर्वताच्या माथ्यावर शंकराचें देऊळ आहे तर चामुंडी टेकडीवर महाबळेश्वर नांवाचें शंकराचें देऊळ असून शिवाय चामुंडा देवीचें देऊळ आहे. पण मानवीकृतीनीं चामुंडी टेकडी सुंदर व शोभायमान करण्यांत आल्या-मुळें शंकरपर्वतापेक्षांहि ही टेकडी जास्त प्रेक्षणीय झाली आहे व होत आहे.

चामुंडी टेकडीवर असलेली चामुंडादेवी ही महा-राजांची आवडती कुटुंबदेवता असल्यामुळें या टेकडी-वर व या देवीच्या देवळावर महाराजांची फार भक्ति आहे. यामुळें मुळची ही टेकडी जरी अगदीं रुक्ष, निर्जल, निर्वृक्ष खडकाची व दगडाची बनलेली असली तरी आतां त्या टेकडीवर सहज जातां येण्या-करितां मोठा मोटारीचा सुलभ चढावाचा सुंदर सहा सात

मैलाचा रस्ता लाखो रुपये खर्च करून करण्यांत आला आहे. जुनी दगडी हजार पायऱ्यांची वाट आहेच. शिवाय घोड्यावरून जाण्यासारखे मध्यम चढावाचे पाऊलरस्ते केलेच आहेत. आणखी टेकडीला वळसा घालून एक जास्त सुंदर रस्ता आंखण्यांत आला आहे. टेकडीवर पंपानें पाणी चढवून जागोजागीं झाडें झुडपें लावून टेकडीची रुक्षता कमी करण्यांत येत आहे. टेकडीवर चढतांना मध्येंमध्यें विश्रांति घेण्याकरितां व शहराची शोभा पहाण्याकरितां सपाट बागांनीं सुशोभित केलेलीं अशीं विश्रांतिस्थानें निर्माण करण्यांत आलीं आहेत; थोडीशी टेकडी चढल्यावर सांपडलेल्या सपाट जागेवर एक लहानसा विश्रांतिबंगलाहि बांधण्यांत आला आहे. सारांश ज्या टेकडीवर जाणें पूर्वकाळीं त्रासदायक व कंटाळवाणें वाटलें असतें, ज्या टेकडीकडे ऐहिक दृष्टीनें कोणी ढुंकूनहि पाहिलें नसतें त्याच टेकडीचें भाग्य उदयास येऊन ती टेकडी मुंबईच्या मलबार टेकडीप्रमाणें बागच बाग बनून लोकांची सहज सहल करावयाची व विश्रांति घ्यावयाची जागा बनली आहे व बनत आहे. तरी ज्या एका विशेषा-

मुळें ती टेकडी म्हैसूर शहराचाअद्वितीय अलंकार बनली आहे तो विशेष अर्वाचीन शास्त्रीय योजने-मुळें अस्तित्वांत आला आहे. माथ्यावरील देवळावर व त्यावरील शिखरांवर विजेचे दिवे लावण्यांत आलेले आहेत, इतकेंच नव्हे तर शहराच्या पूर्व भागांकडून सहासात मैलाच्या टेकडीच्या बेतावेतानें चढणाऱ्या चढणीकडून वाकणानें गेलेल्या सर्व सडकेवर विजेचे दिवे रांगेनें पायथ्यापासून माथ्यापर्यंत लावलेले आहेत. शिवाय टेकडीच्या पश्चिमेकडून जी जुनी सडक गेली आहे, त्या सर्व सडकेवरहि असेच दिवे लावलेले आहेत. शेवटीं जी जुनी शिडीसारखी दगडी पाय-ऱ्यांची पाऊलवाट आहे, ती सर्व वाटहि विजेच्या दिव्यांनीं प्रकाशित केली आहे. आणि हे हजारो विजेचे दिवे संध्याकाळ झाल्याबरोबर एकसमयावच्छेदें करून लागले म्हणजे म्हैसूर शहरांतून या टेकडीची जी अपूर्व शोभा दिसते त्याची प्रतीति प्रत्यक्ष पाहि-ल्यावांचून कधीं पटावयाची नाहीं. असो.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें चामुंडी टेकडीवर जाण्याचे दोनतीन रस्ते आहेत. गावांतून मोठ्या सडकेनें देवीचें

देऊळ सुमारें सात मैल आहे. ज्यांना देवीचें देऊळ थोडक्या वेळांत व बिनत्रासानें पाहून यावयाचें आहे त्यांना मोटारीनें टेकडीवर जाऊन येण्याची सोय आहे. पण ही जरा जास्त खर्चाची बाब आहे. टेकडीवरून जाऊन परत येण्यास मोटारभाडें दहा ते बारा रुपये पडतें. अशा जाण्यायेण्यानें टेकडीवरून निरनिराळ्या ठिकाणाहून शहराची शोभा पहाण्यास फारसा वेळ मिळत नाहीं. मोटारच्या शीघ्रगतीप्रमाणें प्रवाशाचें देवदर्शन व सृष्टीसौंदर्यदर्शन शीघ्रगती व म्हणून घाईघाईचें व टाकभाज्याचें होतें. ज्यांना म्हैसूरच्या या प्रेक्षणीय स्थळाचें सावकाश, सर्वाङ्गीण, व समाधानकारक दर्शन घ्यावयाचें असेल त्यांना दगडी पायऱ्याच्या पाऊल वाटेनें जाणें सोईस्कर आहे. पण असें करण्यास पांचसात तासाची सवड पाहिजे इतकेंच नाहींतर जाऊन येऊन सहा मैल सपाटीवरून चालण्याचा सराव पाहिजे व हजार पायऱ्यांची सोपानपरंपरा चढून जाण्याची पायाची व शरीराची शक्ति पाहिजे. पण या तऱ्हेनें हें स्थळ पहाण्यास पैचाहि खर्च नाहीं; देवदेवीपुढें

काय पैसा अडका ठेवाल तेवढाच दानधर्माकरितां खर्च ! या खूब खर्ची व बीन खर्ची देवदर्शनाच्या मधला एक मार्ग आहे तो म्हणजे टेकडीच्या दगडी पायऱ्यापर्यंत—व गाडीरस्ता थेट पायऱ्यापर्यंत आहे—घोड्याचा झटका करून जाणें व परत येतांना सर्व वाट पायीं येणें किंवा शहरांतील झटक्याच्या अड्डयाशीं पुन्हां झटका करून बिऱ्हाडीं येणें हा होय. याला रुपया सवा रुपयापेक्षां जास्त खर्च येत नाहीं व सर्व जा ये पायीं करण्यापेक्षां तास सवा तास कमी वेळ लागतो.

मी पहिल्या खेपेस मोटारीनें चांमुडी टेकडीवर गेलो. मागें सांगितल्याप्रमाणें चामुंडी टेकडी शहराच्या नैऋत्येस—दक्षिण व पश्चिम या दिशांच्या मधल्या टोंकास—असून मोटार रस्ता उत्तरेकडच्या उताराकडून वर चढत चढत गेला आहे. कांहीं वेळ चढल्यावर प्रथमतः एक विश्रांतिगृह लागलें. हा लहानसा उत्तम शृंगारलेला व बऱ्याच चांगल्या तसबिरांनीं व फोटोंनीं सुशोभित केलेला असा टुमदार बंगला आहे. याचे समोरार थोडीशी सपाट जागा

करून तेथें छोटीशी बाग केली आहे. येथून शहराचा सुंदर देखावा दिसतो. जरा पुढें गेल्यावर उजव्या हाताला एक ब्रायडल पाथ लागतो व मोटार रस्ता डाव्या बाजूनें जातो. यामुळें शहर नजरेआड जातें व आपल्याला टेकडीच्या पूर्वेकडील व दक्षिणेकडील उंचसखल भाग दृग्गोचर होतो. अर्ध्यापेक्षां अधिक चढल्यावर ज्या ठिकाणीं ब्रायडलपाथ या मोटर रस्त्याला येऊन मिळतो, तेथून पुन्हां एकदां शहराचा जास्त उंचावरून व म्हणून जास्त लांबपर्यंत देखावा दिसतो. या टेकडीवर जिकडे तिकडे प्रचंड दगडच दगड आहेत, पण मधून मधून आतां झाडें लावण्यात येत आहेत. तसेंच मध्यें मध्यें ओबडधोबड अशा चौकोनी सपाट पाटीसारख्या दगडावर कानडींत शिलालेख दृष्टीस पडले. हे शिलालेख जुने नसून अर्वाचीन आहेत असें कळलें. हल्लींच्या महाराजांची ही टेकडी फार आवडती आहे असें मागें सांगितलें आहे. महाराज म्हैसूरात असले म्हणजे या टेकडीवर वारंवार येतात व मधून मधून चालत जातात. शहराचा व आसपासचा देखावा पहातांना त्यांना कांहीं कल्पना सुचल्या

म्हणजे ते कविता करतात व मग त्या कविता या असल्या दगडाच्या पाटीवर कोरतात. अशा महाराजांच्या कवितांचे ते शिलालेख आहेत असें मला समजलें व ही हकीगत ऐकून मला महाराजांच्या अभिरुचीचें व काव्यस्फूर्तीचें कौतुक वाटलें. येथून पुढें शहर मुळींच दिसत नाहीं. कारण चामुंडीचें देऊळ शंभर एक फुट खालीं आहे व शहराच्या बाजूच्या टेकडीच्या माथ्यावर महाराजांचा बंगला आहे व तो बंगला चामुंडीच्या देवळाच्या पठारापेक्षां शंभर फुट उंच आहे. टेकडीवर आलें म्हणजे बरीच सपाटी आहे. या टेकडीवर दोन देवळें आहेत; एक महाबळेश्वर नांवाचें महादेवाचें देवालय आहे. हें देवालय दहाव्या अकराव्या शतकांतलें असून होसळ घराण्याच्या विष्णुवर्धन नांवाच्या राजानें सन अकराशें अठ्ठावीसमध्यें त्याला कायमची देणगी दिल्याचा दाखला आहे. दुसरें देवालय चामुंडादेवी किंवा महिषासुरमर्दिनी या देवीचें आहे. पूर्वीं येथें नरमेध होत असत असें म्हणतात पण ते हैदरअल्लीच्या कारकीर्दीपासून सक्तीनें बंद करण्यांत आले. तिसरे कृष्णराज वाडीयर महाराज यांनीं अठराशें

सत्तावीसांत या देवालयाचा जीर्णोद्धार केला व हल्लींचें सुंदर शिखर बांधलें. जुन्या बांधकलेचे मासले या दृष्टीनें हीं दोन्हीं देवालयें प्रेक्षणीय आहेत. हीं देवालयें पाहून झाल्यावर आह्मीं महाराजांच्या बंगल्याकडे गेलों. बंगला लहानसाच आहे पण महाराजांसारख्या वैभवशाळी राजाला शोभेसा आहे. हा बंगला आह्मांला सावकाश व समग्र पाहण्यास सांपडला. येथल्या बिछायती, येथल्या टेबलेंखुर्च्या सारांश सर्वच सामान फार सुबक व बहुमोल आहे. येथें उत्तम उत्तम देखाव्यांच्या तसबिरा आहेत व विशेष प्रेक्षणीय म्हणजे येथें मोठें थोरलें फोटोचें आल्बम् आहे त्यांत म्हैसूर प्रांतांतील प्रेक्षणीय स्थळांचे फोटो, महाराजांचे व त्यांच्या नातेवाईकांचे फोटो, त्यांच्या शिकारीचें व निरनिराळया दरबारचे फोटो असे नानातऱ्हेचे फोटो आहेत. हें आल्बम म्हणजे एक सचित्र व छोटेखानी म्हैसूरच आहे ह्मणाना. दुसरा एक या बंगल्यांतला विशेष ह्मणजे येथें एक दुर्बिण ठेविली आहे त्यामधून शहराचा फारच स्पष्ट देखावा दिसतो. बाकी नुसत्या डोळयांनीं सुद्धां येथून दिसणारा शह-

शाचा देखावा अद्वितीय आहे यांत शंका नाहीं. कितीवेळ पाहिलें तरी मनाची तृप्ति होत नाहीं. पण नाइलाजानें आपल्याला परतावें लागतें. सर्व बंगल्याच्या देवडीवाल्यास आम्हीं खुषीनें दोन रुपयाची दक्षिणा दिली व आम्हीं पुन्हां मोटारींत बसलों तो या बंगल्या खालींच पण तीनशें फुट खोल असलेल्या प्रचंड नंदीच्या मूर्तीकडे गेलों. त्या नंदीकडे जाण्यास निराळा मोटारीचा रस्ता केलेला आहे. मोटारीच्या रस्त्यानें हा नंदी बाजूला आहे असा भास होतो खरा, पण पूर्वींच्या दगडी पायऱ्यांच्या सोपान परंपरेच्या सातशे पायऱ्या चढून गेल्याबरोबर तो लागतो व या नंदीचे दर्शन घेऊन मनुष्याला महादेवाचें व देवीचें दर्शन होत असे. पण नव्या मोटारीच्या रस्त्यानें मात्र आधीं महादेवाचें दर्शन व मग नंदीचें दर्शन असा उलटा प्रकार होतो. या नंदीची मूर्ति एकसंध अशा तेथल्या प्रचंड खडकामधून कोरून काढलेली आहे. ती सोळा फुटांच्यावर उंच आहे. तरीसुद्धां नंदी बसलेला असा काढलेला आहे. यावरून ही मूर्ति केवढी मोठी आहे याची

कल्पना होईल. इतकी मोठी मूर्ति असतांनासुद्धा त्याचे सर्व अवयव व एकंदर बैठक प्रमाणशीर व हुबेहुब आहेत. नंदीच्या अंगावर दागिने व घंटांची माळ कोरलेली आहे. सर्व दक्षिण हिंदुस्थानांत इतकी प्रचंड पण प्रमाणबद्ध—मूर्तिकलेचा उत्तम मासला—अशी दुसरी मूर्ति नाहीं असें म्हणतात. ही मूर्ति पाहून आपल्या देशांत एकाकाळीं मूर्तिकला किती कळसास पोंचली होती हें मनांत आल्याखेरीज रहात नाहीं व व अभिमान, आनंद व आश्चर्य या मनोवृत्ति जागृत होऊन पूर्वकाळची उच्च संस्कृति व पुढल्या काळची खोल अवनति यांचा विलक्षण विरोध मनांत येऊन खेदाची छटा मनःफलकावर उठते. अशा मिश्रमनोवृत्तीनें आम्ही ती नंदीची मूर्ति किती वेळ पहात होतो. पण नंदीचें व तेथून दिसणाऱ्या शहराचें शेवटचें दर्शन घेऊन आम्ही मोटारींत पाय ठेवला व बिऱ्हाडीं परत आलों.

मोटारींतून होणारें या टेकडीचें व तेथील देवालयाचें दर्शन दिवसाच होत असल्यामुळें रात्रींच्या दिव्याच्या रोषनाईची शोभा पहाण्यास सांपडत नाहीं. म्हणून गेल्या नाताळांत जेव्हां मी म्हैसूरचें पुनर्दर्शन

घेतलें तेव्हां आह्मी मुद्दाम सायंकाळीं सहा वाजता मोठ्या हिंदू हॉटेलमधून निघालों व पायींच चामुंडीच्या टेकडीचें दर्शन घेण्याचें ठरविलें. यामुळें दर्शन बिन-खर्चानें होऊन शिवाय रात्रींची विजेची अपूर्व रोषनाई पाहण्यास सांपडली. आम्हीं थेट दक्षिणेकडे जाणाऱ्या प्रशस्त 'व्हॉईसरॉय रोड' नांवाच्या रस्त्यानें चाललों. या रस्त्याच्या दोन्हीं बाजूंस सारख्या सुंदर सुंदर इमारती लागतात. हॉटेल टाकल्याबरोबर उजव्या हातास युरोपीयन पद्धतीनें रहाणाऱ्या लोकांकरितां बांधलेली हॉटेलची इमारत लागते. ती टाकल्याबरोबर थेट गांवांतून येणारा 'येलवाल' रस्ता या रस्त्याला मिळून तेथें एक सुंदर चौक होतो व या चौकाच्या उजव्या हातास 'रेल्वे ऑफीसेसची' पांढरी शुभ्र इमारत लागते तर त्याचे समोरच 'वाणीविलास' हॉस्पिटलची इमारत लागते. म्हैसूरांत काय किंवा बंगळूरांत काय किंवा म्हैसूर प्रांतांतील दुसऱ्या भागांत काय आह्मी 'वाणी-विलास' हें नांव कितीतरी गोष्टींना दिलेलें पाहिलें होतें. वाणीविलास छापखाना, वाणीविलास कन्या-शाळा, वाणीविलास पाणीपुरवठाकामें, वाणीविलास

ग्रंथमाला वगैरे कितीतरी नांवें आम्हीं पाहिलीं होतीं व वाचली होतीं व वाणीविलास हें नांव इतकें या प्रांतांत प्रिय कां याचें मला पुष्कळ दिवस गूढ होतें. पण तें गूढ म्हैसूर गॅझीटीयरच्या वाचनानें शेवटीं उकललें. वाणीविलास हें नांव हल्लींच्या महाराजांच्या मातोश्रीचें आहे व मातृनिष्ठ प्रेमानें प्रेरित होऊन महाराजांनीं कितीतरी कामांना, संस्थांना व इमारतींना वाणीविलास हें नांव दिलें आहे. या माहितीनें या नांवाबद्दलचें गूढ उकललें इतकेंच नाहीं तर महाराजांच्या मातृभक्तीबद्दल त्यांचे मनांतल्या मनांत आम्हीं धन्यवाद गाइले. जरा पुढें गेलें म्हणजे पुन्हां समोरासमोर दोन इमारती लागतात. उजवीकडची कॉलेजिएट हायस्कूलची इमारत होय व डावीकडची युरोपीयन पाहुण्यांकरितां बांधलेली नवी इमारत होय. यापुढें मात्र दोन्ही बाजूंस मोकळी जागाच लागतें व नंतर एक लहान चौक लागतो. उजव्याबाजूच्या रस्त्याला म्हैसूर वाचनालय व महाराजांचें कॉलेज वगैरे इमारती लागतात. नाताळमुळें अर्थात् या संस्था चालू नव्हत्या पण जातांजातां इमारती तरी दुरून पहाव्या

म्हणून आम्हीं त्या रस्त्याला वळलों. वाचनालयाची इमारत पाहून माझ्या मनांत अशी कल्पना आली कीं के, रावबहादूर पारसनीसांनीं सातान्यास सरकारकडून जी ऐतिहासिक संग्रहालयाची इमारत बांधविली तिची रूपरेखा व नकाशा या वाचनालयावरून रावबहादूरांना सुचला असावा. इतकें या दोन इमारतींत चटदिशीं डोळयांत भरण्यासारखें साम्य आहे. हें वाचनालय अर्थात् बंद होतें. तेथून जवळच महाराजा कॉलेजची लांबच लांब इमारत लागते; तिचें मागें विश्वविद्यालयाचा पदवीदान दिवाणखाना व इतर इमारती आहेत. कॉलेजच्या पुढच्या बाजूस एक नवी इमारत चालू होती ती विद्यार्थी वसतीगृहाकरितां आहे असें कळलें. या इमारती नेहमींच्या साच्याच्या आहेत. म्हणून त्या पाहण्यांत आम्हीं फार वेळ न मोडतां पुन: व्हॉईसरॉय रोडवर आलों व लवकरच थेट पूर्वपश्चिम जाणारा चामराज रस्ता या रस्त्याला जेथें मिळतो त्या मोठ्या भव्य चौकाशीं आलों. हा चौकहि फार सुंदर आहे. येथून चामराज रस्ता सुतासारखा सरळ थेट तलाव-

पर्यंत गेला आहे व या चौकाचें ठिकाण बरेंच उंचवट्यावर असून चामराज रस्ता सारखा सरळ पण सखल सखल होत गेला आहे. आह्मीं या चौकाशीं आलों तों सायंकाळ झाली व चंद्रासारखे शुभ्र चांदणेंवजा प्रकाश देणारे विजेचे दिवे एकदम लागले. दोन्ही बाजूंला विजेच्या दिव्यांची नजर न पुरेल इतक्या लांबपर्यंत पोंचणारी ओळच ओळ व रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या प्रशस्त पाऊलवाट्वा हा देखावा अवर्णनीय आहे यांत शंका नाहीं. पण हा चामराज रस्ता सरतां सरत नाहीं. हा रस्ता शेवटीं देवराज तलावाच्या पूर्वबाजूनें दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्याला मिळतो. आतां आह्मीं या रस्त्यानें दक्षिणेकडे वळलो. या तुलावाचा रात्रीचा देखावा फार रमणीय असतो. तळ्याभोंवतीं जिकडेतिकडे दिव्यांचा लकलकाट दिसतो व या हजारों दिव्यांची हजारों प्रतिबिंबें पुन्हा पाण्यांत दिसतात. ज्याप्रमाणें विजापुरच्या गोल घुमटाच्या प्रतिध्वनी करणाऱ्या गॅलरीमध्यें आवाजाची अनेकावृत्ति होते त्याप्रमाणें या तलावांत दिव्यांचें होतें. तलावाचा रस्ताही बराच

लावणीचा आहे. तो संपत संपत आला म्हणजे उजवी-कडे एक रस्ता जातो तो थेट निलगिरीला जातो व डाव्या बाजूचा रस्ता सखल सखल होत शांत व शून्य अशा भागांतून चामुंडी टेकडीच्या पायथ्याशीं जातो. पायऱ्याजवळ येण्यास आह्मांस तास सवा तास लागला. तेव्हां हा सपाटीचा रस्ताच तब्बल तीन मैलांच्यावर आहे यांत शंका नाहीं. आह्मीं दगडी पायऱ्या लागल्या-बरोबर जरा विश्रांति घेतली व मग पायऱ्या चढूं लागलों. पायऱ्या हजार आहेत व त्या चढण्यास कमींत-कमी तास दीड तास लागतो असें आह्मांस देवालया-कडून परतणाऱ्या मंडळीनें सांगितलें. तेव्हां आमच्या मंडळीचा सर्व टेकडी चढून जाऊन देवळें पहाण्याचा बेत डळमळूं लागला. साधारण त्रास न होतां जितकें जाववेल तितकेंच जाऊन परत फिरण्याचा आह्मीं विचार केला. पण आतां आह्मीं जसजसें वर चढूं लागतो तसतशी शहराच्या विजेच्या रोषनाईची अवर्णनीय शोभा दिसूं लागली. जसजसें उंच उंच चढावें तसतसे असंख्य दिवे दूर दूर दिसूं लागले. याप्रमाणें आह्मीं सुमारें चारशें पायऱ्या चढलों व मग आमच्या चार

मंडळीपैकीं ज्या आह्मी दोघांनीं पूर्वीं देवळाचें दर्शन घेतलें होतें ते खालीं विश्रांतीसाठीं बसलों. दुसरे दोघेजण वर चढूं लागले. त्यांची बराच वेळ वाट पहून आह्मीं पुन्हा वर चढूं लागलों तों ते दोघेजण नंदीपर्यंत ह्मणजे सातशें पायऱ्या चढून नंदीचें दर्शन घेऊन परत फिरले व आह्मांस पांचशें पायऱ्यांशीं भेटले. तेथून आह्मीं आणखी कांहीं वेळ त्या असंख्य दिव्यांची मजा पहात क्षणभर उभे राहिलों. ज्याप्रमाणें रात्रीच्या वेळीं आकाशामध्यें अगणित तारका दिसतात; कांहींचा प्रकाश फारच मोठा असतो; कांहीं मध्यम प्रकाशाच्या असतात, कांहीं अगदीं बारीक बारीक लुकलुकतात व कांहींतर फारच अंधुकपणें दृग्गोचर होतात; तसेंच कांहीं ठिकाणीं तारकांचा पुंजकाच पुंजका दिसतो तर कांहीं ठिकाणीं तारका फारच विरळ विरळ दिसतात, तर एखादा आकाशाचा भाग जवळ जवळ अंधकारमय असतो. ही जशी आकाशांतील तारकांची विविधता दिसते तशीच थेट शहरांतील दिव्यांची विविधता दिसत होती. कांहीं दिवे फारच प्रकाशाचे नाटत, कांहीं

कांहीं ठिकाणीं दिव्यांचा पुंजकाचापुंजकाच झाला आहे असें दिसे; तर कांहीं ठिकाणीं दिवे फारच विरळ विरळ भासत व कांहीं शहराचा भाग तर अंधकारांत गडप झालेला दिसे. हा विलक्षण देखावा पहातांना असा भास होतो कीं जणूं कांहीं सर्व आकाश आपल्या तारकांसह आपल्या जागेवरून एकाएकीं सुटून या ठिकाणीं येऊन पडलें आहे. अशी ती अननुभूत शोभा पहात आह्मीं किती वेळ तरी या उंच ठिकाणावर बसलों व मग उशीर झाला म्हणून भराभर उतरत चाललों. तोंच वाटोवाट कोल्हेकुई ऐकूं येऊं लागली. शेवटीं दमत थकत पण गांवांतील झटक्याच्या अड्या-जवळ आलो व तेथून चार आणे भाडें देऊन झट-क्यांतून बिऱ्हाडीं आलों. झालें येथें माझें झसूरपुराण संपलें.

०

-४-

# म्हैसूरच्या आसपास

म्हैसूरच्या आसपास पहाण्यासारखीं तीन ठिकाणें आहेत; निदान आम्हीं तरी तेवढींच पाहिलीं. पहिलें प्रेक्षणीय स्थळ श्रीरंगपट्टण हें म्हैसूरपासून नऊ मैलांवर असून म्हैसूरच्या थेट उत्तरेस आहे. दुसरें प्रेक्षणीय स्थळ–कनंबडी गांवाजवळील "कृष्णराजसागर" तलाव व त्याचा बंधारा–हें म्हैसूरपासून तेरा मैल असून म्हैसूरच्या वायव्य दिशेला आहे; तिसरें प्रेक्षणीय स्थळ–नांजनगुड गांवातील नांजुगुडेश्वराचें देवालय–हें म्हैसूरपासून सोळा मैल असून म्हैसूरच्या थेट दक्षिणेस आहे. या तिन्ही ठिकाणांस जाण्यास उत्तम सडका असून स्वतंत्र मोटार केल्यास एका दिवसांत हीं सर्व ठिकाणें पाहून होतात. पण असें करण्यास सुमारें चाळीस रुपये खर्च येतो. हीं सर्व स्थळें यापेक्षां पुष्कळच कमी खर्चानें पहातां येतात, पण त्याला तीन दिवस मोडावे लागतात. पण प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचा पहिला प्रकार

टाकमाऱ्याचा, धांदलीचा व गडबडीचा होतो; तर दुसऱ्या तऱ्हेनें सर्व स्थळें सावकाश, सोयीनें व समाधानानें पाहतां येतात. कारण या तिन्ही दिशांनीं हल्लीं रेलवे रस्ते झालेले आहेत, व सकाळीं साडेसहा ते साडेसात यांचे दरम्यान तिन्ही बाजूस आगगाड्या असून दोनप्रहरीं म्हैसूरला परत येण्यास आगगाड्या आहेत. यामुळें मोठ्या मौजेनें हीं सर्व स्थळें पाहून होतात व खर्च तर दरमाणशीं जाऊन येऊन एक रुपयाच्या वर होत नाहीं. असो.

श्रीरंगपट्टण प्रत्यक्ष पहाण्याचा सुयोग प्रत्येक सुशिक्षितास लाभत नसला तरी त्याला श्रीरंगपट्टण या अभेद्य गणलेल्या किल्ल्याचें नांव लहानपणापासून ठाऊकच असतें. कारण हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत व विशेषत: ब्रिटिश रियासतीच्या इतिहासांत कंपनीचीं म्हैसूरचा वाघ टिपुसुलतान याच्याशीं झालेलीं युद्धें त्यांतल्यात्यांत श्रीरंगपट्टण किल्ल्याचे वेढे व किल्ला काबीज करतांना झालेल्या लढाया, अत्यंत निकराच्या, अत्यंत आणीबाणीच्या व ज्यांच्या निकालांवर कंपनीचा सोक्षमोक्ष अवलंबून होता अशा तऱ्हेच्या

महत्त्वाचे प्रसंग होते व म्हणूनच या वेढ्यांचीं व लढा-यांचीं सविस्तर रसभरित वर्णनें हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत दिलेली वाचावयास सांपडतात. पण लहान-पणीं वाचलेल्या इतिहासांवरून श्रीरंगपट्टणच्या भूगोल-विषयक स्थितीची यथार्थ कल्पना मनांत ठसत नाहीं. प्रत्यक्ष दर्शनानें मात्र त्याची यथार्थ कल्पना तेव्हांच मनांत भरते. श्रीरंगपट्टण हें कावेरी नदीच्या दुभंग-लेल्या प्रवाहानें बनलेलें एक बेट आहे. कावेरी नदीमध्यें निरनिराळ्या ठिकाणीं नदीच्या दुभंगलेल्या प्रवाहांत अशीं तीन मोठीं बेटें झालेलीं आहेत; पहिलें श्रीरंग-पट्टणचें बेट; दुसरें शिवसमुद्र—येथें हल्लीं विजेचा प्रचंड कारखाना आहे—नावाचें बेट व तिसरें त्रिचनापल्ली-जवळील श्रीरंग बेट. या तिन्ही बेटांवर श्रीरंगनाथाची देवालयें आहेत. हीं तिन्हीं ठिकाणें फार पवित्र क्षेत्रें समजलीं जातात. श्रीरंगपट्टण या बेटाला या देवळा-वरून नांव मिळालेलें आहे. गंगवंशातील राजांच्या कारकीर्दींत सन ८९४ मध्यें तिरुमलया नांवाच्या गृहस्थानें जंगलानें व्याप्त असलेल्या या बेटावर रंगनाथ व तिरुमल देव या नांवाचीं दोन देवळें बांधलीं व या

बेटाला श्रीरंगपट्टण असें नांव दिलें. सन १११७ मध्यें रामानुजाचार्यांला आपल्या वैष्णवमताच्या अभिमानार्ह द्रविड देशांतून निघून म्हैसूर प्रांतांत होयल वंशांतील राजाच्या आश्रयास येऊन रहावें लागलें. बिटीदेव नांवाचा होसल वंशांतील राजा जैनधर्म टाकून रामानुजाचार्यांच्या वैष्णव पंथाचा अनुयायी झाला व त्यानें श्रीरंगपट्टणच्या दोन्ही बाजूचीं आठ गावें रामानुजाचार्यांनां व वैष्णवपंथाला इनाम दिलीं व या गांवांची व्यवस्था करण्याकरितां अम्मलदार नेमण्यांत आला. या घराण्यांतील तिमण्णा नांवाच्या अंमलदारानें विजयानगरच्या राजाकडून या भागाची सुभेदारी मिळविली व सन १४५४ मध्यें श्रीरंगपट्टण या बेटावर एक किल्ला बांधला. हाच प्रसिद्ध श्रीरंगपट्टणचा किल्ला होय. पण या किल्ल्यामुळें हा सुभेदार स्वतंत्र राजाच बनला व म्हणून सन १४९५ मध्यें विजयानगरच्या राजानें सुभेदारावर स्वारी करून तो आपल्या प्रत्यक्ष ताब्यांत घेतला व श्रीरंगरायल हा हुद्दा देऊन तो किल्ला व आसपासचा मुलुख याचा बंदोबस्त आपल्या प्रत्यक्ष नोकराकडून करविला. परंतु कालेंकरून विजयानगरचें

साम्राज्य नष्टप्राय झाल्यावर श्रीरंगरायल हा हुद्देदार पुन्हां स्वतंत्र झाला व या वंशांतील तिरुमल रायलु यानें सन १६२० मध्यें आपल्या वृद्धापकाळीं अनन्यगतिक होऊन श्रीरंगपट्टण हें ठिकाण म्हैसूरच्या वर्धमानवैभव वाडीयार घराण्यांतील राजाच्या स्वाधीन केलें. तेव्हांपासून हें ठिकाण म्हैसूर प्रांताची राजधानी बनलें व टिपुसुलतानच्या कारकीर्दींत तर या तीन मैल लांब व एक मैल रुंद अशा लहान आकाराच्या बेटांत दीडलाख वस्ती होती. श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यावर मराठ्यांनीं तीनचार वेळ हल्ला करून हैदरअलीकडून खंडणी मिळविली आहे. शेवटीं १७९९ मध्यें श्रीरंगपट्टण इंग्रजांनीं हल्ला करून घेतलें व पुढें हल्लींच्या हिंदु राज्याचें पुनरुज्जीवन केल्यावर हा किल्ला त्या राजघराण्याच्या स्वाधीन केला. या पुनरुज्जीवित राज्याची म्हैसूर ही राजधानी झाल्यापासून श्रीरंगपट्टणाचें महत्त्व कमी झालें व तेथली वस्ती मोडली व आतां तें बारा पंधरा हजार वस्तीचें तालुक्याचें ठिकाण झालें आहे. या प्रसिद्ध ठिकाणाची इतकी पूर्वपीठिका सांगून आतां त्याच्या सद्यःस्थितीच्या वर्णनास लागतों.

श्रीरंगपट्टण हें म्हैसूर बंगळूर रेलवे रस्त्यावर आहे. मागें उल्लेख केल्याप्रमाणें आह्मीं सकाळीं सव्वासात वाजतां म्हैसूर स्टेशनवर येऊन आगगाडींत बसलों व लागलीच गाडीची शीळ होऊन गाडी सुरू झाली. स्टेशनकडून मैल दीड मैल चढतांच रस्ता असल्यामुळें गाडी सावकाश चालली; पण पुढें श्रीरंगपट्टणकडे उतार असल्यामुळें गाडी जोरानें जाऊं लागली व सभोंवार सुपिक-कांहीं शेतांतून नुकतींच पिकें काढून घेतलीं होतीं व कांहीं शेतांत अजुन पिकें होतींच-प्रदेश दिसूं लागला. म्हैसूरपासून नऊ मैलावर कावेरीच्या पहिल्या पश्चिमवाहिनी नांवाच्या फाट्यावर 'पश्चिमवाहिनी' नांवाचें लहानसें स्टेशन लागतें. हा नदीचा प्रवाह फार पवित्र समजला गेला आहे. येथें नदीच्या प्रवाहाला घाटच घाट आहेत. महाराजांच्या स्नानाचा घाट येथेंच आहे. पण हे घाट स्टेशनांतून किंवा नदीच्या पुलावरून दिसत नाहींत. कारण रेल्वे रस्ता व पूल बेटाच्या अगदीं पश्चिम टोंकाला आहेत पण हे घाट सडकेनें श्रीरंगपट्टणाला गेलें ह्मणजे सहज दृष्टीस पडतात. पश्चिमवाहिनी स्टेशन टाकलें व नदीच्या

प्रवाहावरील दोन पूल टाकले कीं श्रीरंगपट्टण स्टेशन येतें. आम्हीं म्हैसूर सोडल्यापासून अर्ध्या तासांत म्हणजे आठ वाजतां श्रीरंगपट्टण स्टेशनला आलों. श्रीरंगपट्टण स्टेशन हें बेटाच्या अगदीं पश्चिमच्या टोंकाला असल्यामुळें नदीच्या दोन्ही प्रवाहावरील पूल व त्यामधला अर्धवर्तुळाकृति किल्ल्याचा तट हे स्टेशनमधून एकसमयावच्छेदेंकरून दिसतात. या किल्ल्याची पुर्वींची जगप्रसिद्ध दुर्भेद्यता व हल्लींची त्याची पाडापाड व मोडतोड होऊन झालेली दुर्दशा या दोन स्थितीमधला विलक्षण विरोध मनांत येऊन खालील सुभाषिताची आठवण झाली.

सा रम्या नगरी महान्स नृपतिः
सामंतचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषद्
ताश्चन्द्रबिंबाननाः ।
उन्मत्तः सच राजपुत्रनिवहस्ते
बंदिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशादगात्स्मृति-
पथं कालाय तस्मै नमः ॥

श्रीरंगपट्टणचें रेलवेस्टेशन नक्षीदार सुंदर सुरूच्या लाकडी खांबानीं सुशोभित केलेलें आहे. जणु कांहीं या शहराच्या राजधानीपणाच्या गतवैभवाची प्रेक्षकास आठवण देण्याकरितांच हे सुरूचे सुंदर खांब वाटेवरच उभे केलेले आहेत. स्टेशनसमोरूनच गावांत जाणारा रस्ता आहे. श्रीरंगाचें देऊळ स्टेशनचें आवार टाकल्याबरोबरच लागतें. तेव्हां बाकी दूरच्या प्रेक्षणीय इमारती पाहून परत आल्यावर देऊळ पहावें असें ठरवून आम्हीं तडक रस्त्यानें चालू लागलों. श्रीरंगपट्टण शहर नीटनेटकें व स्वच्छ दिसलें. वाटोवाट उडुपी ब्राह्मणांचीं कॉफीगृहें लागलीं. किल्ल्याच्या पूर्वेकडच्या तटानजीक एक मोठी मशीद आहे. तिला दोन उंच मनोरे बांधलेले आहेत. आम्हीं ही मशीद पाहिली व मनोऱ्याच्या वरच्या मजल्यावर गेलों व माथ्यावरील आच्छादित ग्यालरींत गेलों. तेथून सभोवारचा दहावीस मैलांचा प्रदेश दृग्गोचर होतो. येथून दिसणारा देखावा मनोहर आहे. ही मशीद टाकल्याबरोबर किल्ल्याचा प्रचंड दरवाजा लागतो. या ठिकाणीं किल्ल्याला तीन तट व तीन खंदक होते असें

दिसून येतें. आतां खंदक बुजविलेले आहेत. पण तट अजून शाबूत आहेत. किल्ल्याच्या शेवटच्या दरवाजांतून बाहेर आलें ह्मणजे दक्षिणोत्तर जाणारा एक रस्ता लागतो. हाच रस्ता म्हैसूरकडून किल्याच्या बाहेरून येऊन उत्तरेकडे फ्रेंच रॉक्स या गांवाकडे जातो. किल्ल्यांतून आलेल्या रस्त्यानें सरळ पुढें गेलें ह्मणजे श्रीरंगपट्टणांतील सर्वांत सुंदर प्रेक्षणीय इमारत दर्यादौलत हिच्या बागेचें प्रवेशद्वार लागतें. दारांत शिरल्याबरोबर दोन माडासारखीं विलक्षण झाडें मनुष्याचें लक्ष वेधतात. या झाडाचीं पानें केळी किंवा चवेणी यासारखी बरीच लांबरुंद असून त्यांचे देठ पंख्यासारखे वाढतात. अर्थात् सर्व झाड प्रचंड पंख्या-सारखें दिसतें व जणूं कांहीं बागेंत प्रवेश करणाऱ्या प्रवाशांचा श्रमपरिहार करण्याकरितां हे निसर्गकृत पंखे वारा घालण्यास तयार आहेत, असा भास होतो. आह्मी समोर इमारतीकडे न जातां आधीं डाव्या बाजूच्या भिंतीच्या जवळच्या पाऊलवाटेनें बाग पहात पहात उत्तरेकडे गेलों. फुलबाग संपल्यावर मोठी आंबराई लागते. त्यांतून बागेच्या कडेकडेनें चालत आह्मी

कावेरीच्या उत्तरप्रवाहाच्या किनाऱ्याशीं आलों. येथें नदीवर लहानसाच पण सुंदर घाट बांधलेला आहे. येथें नदीचा प्रवाह शांत व संथपणें वहात असतो. मागें सांगितलेल्या म्हैसूरकडून फ्रेंचरॉक्सकडे जाणाऱ्या सडकेचा नदीवरील वेलस्ली पूल या घाटावरून उत्तम दिसतो. येथला देखावा अत्यंत रमणीय आहे. टिपूसुलतानचा दर्यादौलत हा महाल, आवडता महाल कां होता हें या घाटावरून चांगलें निदर्शनास येतें. येथें थोडा वेळ थांबून आह्मी बागेच्या टोंकापर्यंत जाऊन मग दर्यादौलत महालाच्या समोर आलों. या इमारतीच्या समोरचा रस्ता प्रशस्त असून तो फारच स्वच्छ असल्यामुळें व रस्त्याच्या दोन्ही बाजूस निरनिराळया तऱ्हेचीं फुलझाडें, वेली व सुंदर-सुंदर पानांची क्रोटन झाडें असल्यामुळें इमारतीचा पुढचा भाग फारच चित्ताकर्षक झाला आहे. येथें वेलींनां विलक्षण रूपें दिलेलीं दृष्टीस पडून आश्चर्य वाटतें. दर्यादौलतीसमोर दोन हुबेहुब हत्तीच्या रूपाच्या वेलींचीं झुडपें तयार केलीं आहेत. तसेंच बशी व त्यावर उलटा ठेवलेला कप अशा आकाराच्या, झोपडीच्या आकाराच्या, घुमटाच्या

आकाराच्या, पुष्पगुच्छाच्या आकाराच्या अशा नाना आकाराच्या वेलींचे कुंज या बागेंत आहेत. असो.

दर्यादौलत हा टिपुसुलतानचा आवडता वसंत-महाल होता. ही इमारत बरोबर चौकोनी असून त्याच्या चौफेर प्रशस्त खुला सोपा आहे. भिंतीवरील चित्र उन्हानें पावसानें खराब होऊं नयेत म्हणून या सोप्याला वरच्या पटईपासून खाली सात आठ फूट जागा सोडून लाकडी झडी बांधल्या आहेत. यामुळें बाहेरून या इमारतीची शोभा किंचित कमी झाली आहे. ही इमारत दुमजली असून दुसऱ्या मजल्याचा कांहीं भाग इमारतीच्या पुढच्या भागास पण मधोमध जरासा मागें हटविला आहे. यामुळें इमारतीच्या आंत गेल्यावर येथें इमारत त्रिकोनी दिसते. वरच्या मजल्याच्या मधोमधच्या ग्यालरींत बसून सुलतान टिपू लोकांस दर्शन देत असत. या दर्यादौलत इमारतीच्या आंतबाहेरील भिंती दुसऱ्या मजल्यावरील आंत बाहेरच्या भिंती या सर्वांवर तैल रंगाची, पाणरंगाची लढाईच्या, शिकारीच्या, मिरवणुकीच्या, खासगी भेटीच्या सार्वजनिक भेटीच्या, नाच रंगाच्या अशा

नानाविध प्रसंगाचीं हैदरअली, टिपु सुलतान व इतर ऐतिहासिक किंवा काल्पनिक राजे रजवाडे व सरदार यांचीं चित्रें काढलेलीं आहेत. व त्याचे बाजूला वेल-बुट्यादि तऱ्हतऱ्हेची नक्षी रंगविली आहे. सारांश या दर्यादौलतीच्या भिंतीवर तिळभर मोकळी जागा सोडलेली नाहीं. ही जुन्या चित्रकारांनीं काढलेलीं चित्रें आहेत. बुजलेला, पुसलेला किंवा बिघडलेला भाग पुनः रंग देऊन जशाच्या तसा ठेवण्यांत आलेला आहे. पण त्यांत अर्वाचीन चित्रकलेची भेसळ केलेली नाहीं. यामुळें दर्यादौलत ही इमारत व त्यांतील चित्रकाम हें जुन्या मुसलमानी व हिंदू चित्रकलेचें निदर्शक आहे; व या दृष्टीनें ती प्रेक्षणीय आहे यांत शंका नाहीं. तळमजला पाहून झाल्यावर आह्मी दुसरा मजला पहाण्याकरितां जिन्याकडे गेलों. पण जिन्याला कुलुप होतें. रखवालदाराला चिरीमिरीचें आमिष देऊन आम्हीं जिन्याचें कुलूप उघडवून घेतलें व वर गेलों. बरोबर तळमजल्या-इतकींच दालनें वर आहेत. मात्र मधल्या दिवाण-खान्यांत श्रीरंगपट्टणचा नकाशा, दर्यादौलतीचा नकाशा

वगैरे नकाशे व कांहीं तसबिरा भिंतीवर टांगलेल्या होत्या. खालच्या पटईप्रमाणें दुसऱ्या मजल्याच्या छतावरहि सर्वत्र चित्रकाम व वेलबुट्यादि नक्षीकाम होतें. सर्व इमारत पाहून झाल्यावर आम्हीं आश्चर्यचकित मनानें व टिपुसुलतानचा वैभवरवि क्षितिजावर तळपत असतांना या ठिकाणाची शोभा हल्लींपेक्षां कितीतरी जास्त असेल याची मनामध्यें कल्पना करीत करीत आह्मीं आवाराबाहेर आलों. प्रवेशद्वारासमोरच्या रस्त्याला लागल्यावर डाव्या हाताला हैदर व टिपूच्या कबरस्थानाकडे रस्ता जातो तिकडे वळलों. याच रस्त्याला श्रीरंगपट्टणच्या-तालुका कचेरी, इंग्लिश स्कूल व दवाखाना-अर्वाचीन इमारती लागतात. नंतर हा रस्ता पूर्वेकडे वळतो व पुढें त्याच्या दोन शाखा होतात. डाव्या हाताचा रस्ता गंजम गांवच्या उत्तर भागांतून जातो तर उजव्या हातचा रस्ता दक्षिणभागाकडून जातो. आह्मीं या उजव्या बाजूच्या रस्त्यानें गेलों. गांवांत पूर्व पश्चिम जाणारे हे दोनच रस्ते आहेत; व पुनः गाव संपल्यावर ते एकत्र मिळून श्रीरंगपट्टण बेटाच्या पूर्वटोंकाला घाट आहे तेथें हा रस्ता जाऊन

थांबतो. दक्षिणोत्तर मात्र सहा सात रस्ते आहेत. गंजम गावांत लहान लहान पण नीटनेटकीं घरें आहेत व गांवाला उघडे पण दगडानीं बांधलेलें गटार दिसलें. एकंदरींत गांव स्वच्छ व टुमदार दिसलें. गांवाच्या शेवटीं पोलीस चौकी लागली. तेथें कबरस्थानचा रस्ता हाच काय अशी विचारपूस करून आह्मी तडक पुढें चाललों. गंजम गांव हे बेटांतील पठारावर आहे. यामुळें पुढला रस्ता खोलपट जाऊं लागला. आणि आतां आह्मीं सारखे दीडदोन तास चालत असल्यामुळें व ऊन होऊं लागल्यामुळें वाट लांबचलांब वाटूं लागली व कबरस्थानाचा मागमूसहि लागेना. यामुळें आह्मीं वाट तर चुकलों नाहीं असें वाटूं लागलें. इतक्यांत दोन इसम परत येतांना दिसले. त्यांनां विचारतां दोन फर्लांगांत कबरस्थान येईल असें त्यांनीं सांगितल्यावरून आमच्या जीवांत जीव आला व आह्मी जरा जोरानें चालूं लागलों व लवकरच कबरस्थानाच्या आवारांत आलों. मुसलमानी पद्धतीप्रमाणें या कबरस्थानासभोंवार सुंदर बाग असून प्रवेशद्वारासमोरून कबरीपर्यंत सुंदर रस्ता केलेला आहे. ही कबर

चौकोनी असून मधोमध तिला घुमट असून कोप-ऱ्यावर मनोरे आहेत व इमारतीसभोंवार खुला सोपा असून त्याचे खांब काळ्या दगडाचे आहेत. इमारत लहानशीच पण फार सुंदर आहे यांत शंका नाहीं. कबरीमध्यें टिपुसुलतान, हैदरअल्ली व टिपूची आई अशा तिघांच्या कबरी आडव्या एकामागें एक अशा आहेत. कबरीवर भरजरीचीं आच्छादनें टाकलेलीं आहेत. कबरीच्या भिंतींना लाखेचा रंग दिलेला आहे. कबरीचे दरवाजे हस्तीदंती नक्षीचे काम केलेले लांकडी आहेत ते फारच सुरेख आहेत; पण या इमारतीच्या सोप्याचे बाहेरच्या काळ्या दगडाचें घोटीव काम तर विशेष व पाहाण्यासारखें आहे. दगड फारच गुळगुळीत व इतका घोटीव आहे कीं आरशाप्रमाणें या खांबावर पहाणाराचें काळसर पण स्पष्ट प्रतिबिंब दृष्टीस पडतें. या इमारतीच्या आवाराबाहेर टिपुसुलता-नचा राजवाडा व लालबाग होती. राजवाड्याचें आतां जोत्याखेरीज कांहीं एक राहिलें नाहीं व बागहि फळ-झाडांचीच आहे असें कळलें. शिवाय आतां साडे-दहा झाले होते. आम्हीं आतां बेटाच्या पूर्व

टोंकाजवळ आलों होतों. आम्हाला पश्चिम टोकाला जावयाचें होतें व श्रीरंगाचें देऊळ पहावयाचें होतें, ह्मणून आह्मीं लालबाग पाहण्याचा मोह आवरून थेट आलेल्या वाटेनें परत आलों. सुमारें एका तासानें श्रीरंगपट्टण गांवाचें पश्चिम टोंकास आलों. तेथें उडुपी ब्राह्मणाचें कॉफीगृहांत फराळ केला. तीन सवा तीन तास एकसारखा चालण्याचा व्यायाम केला असल्यामुळें मिळालेला फराळ व कॉफी आह्मास फारच रुचकर लागली यांत नवल नाहीं. फराळ व कॉफी घेऊनें आह्मीं ताजेतवाने झालों व श्रीरंगाचें देवालय पाहण्यास निघालों. वाटेनें जातांना टिपु-सुलताननें एका फ्रेंच इंजीनीयराकडून नमुन्यादाखल करवून घेतलेली विटांची कमान पाहिली. ही कमान फारशी उंच नाहीं. कमानीच्या किल्लीच्या मध्यभागीं फार तर आठ नऊ फूटच उंच असेल. पण ही कमान शंभर फूटांच्या वर लांब आहे. ही कमान वरून जातांना हलते असें ह्मणतात व वर चालून पाहून व पुष्कळ वेळ जोरानें चालतांना ही हालण्याचा अनुभव किंवा भासहि आह्मांस झाला नाहीं. ही कमान

पाहून झाल्यावर या बेटांतील शेवटचें प्रेक्षणीय स्थळ श्रीरंगाचें देवालय तें पहाण्यास गेलों. तें रस्त्याच्या जरा बाजूला आहे. आतां या देवळासमोरून नवाच एक प्रशस्त रस्ता काढून त्याच्या दोन्ही बाजूस झाडें लावण्यांत आलीं आहेत.

हें देवालय द्रविडपद्धतीचें आहे. देवळाचें आवार मोठें असून त्या सभोंवतीं बरीच उंच अशी सारखी तटवजा भिंत आहे व त्या भिंतीला तांबड्या पांढऱ्या पट्यापट्याचा रंग दिलेला आहे. प्रवेशद्वारावर प्रचंड असें गोपुर आहे. पुढें मोकळी जागा असून नंतर लांबच लांब पुष्कळ खांबांचा सभामंडप आहे. व नंतर मुख्य देवघर आहे. येथें शेषशायी विष्णूची प्रचंड मूर्ति आहे. सर्पाच्या वेटोळयानें झालेल्या शय्येवर विष्णूची आडवी निद्राध्यानाची मूर्ति आहे व सर्पाची फणा उभारलेली असून ती विष्णूच्या मस्तकाचें जणूं कांहीं आच्छादन व संरक्षण करीत आहे. मूर्ति मोठी असल्यामुळें भव्य दिसते. या मुख्य देवालयाच्या चारी बाजूस आणखी लहान लहान चार देवळें आहेत. पुण्याच्या पर्वतीच्या पंचायतन देवळाप्रमाणें येथली

देवळें आहेत, व या पांची देवालयांच्या सभोंवार मोठी प्रदक्षिणेची वाट आहे व त्या प्रदक्षिणेच्या भिंतीमध्यें आणखी किती तरी देवांच्या मूर्ति आहेत. देवळांमध्यें मूर्तीची गर्दीच गर्दी हा दक्षिणेतील सर्व देवळांचा विशेष आहे असें माझ्या ध्यानांत आलें. रंगनाथाचें हें देऊळ खोदकलेच्या दृष्टीनें किंवा मूर्तिकलेच्या दृष्टीनें दक्षिणेंतील मध्यम दर्जाच्या देवळांपैकीं आहे; पण एकंदर आवाराचा विस्तार पाहून इकडल्या देवळाबद्दल अनुकूल ग्रह झाल्याखेरीज रहात नाहीं. त्याप्रमाणें या देवळाच्या दर्शनानेंहि आह्मांला आनंद वाटला व देऊळ पाहून आम्ही बाराच्या सुमारास स्टेशनवर परत आलों. आगगाडीला थोडा उशीरच झाला आहे असें कळलें ह्मणून स्टेशनांतील बाकावर चार साडेचार तासांच्या श्रमाचा विश्रांतीनें आह्मांला परिहार करतां आला व आगगाडी आल्याबरोबर आह्मीं तींतून लवकरच म्हैसूरास येऊन स्वस्थपणें जेवणखाण केलें. असो.

मागें सांगितल्याप्रमाणें श्रीरंगपट्टण ह्मैसूरच्या उत्तरेस आहे तर नांजनगुड हें गांव ह्मैसूरच्या

दक्षिणेस आहे. या गांवापासूनच म्हैसूरकडून आलेल्या रस्त्याच्या दोन शाखा होतात. एक शाखा हसनूर घाटानें त्रिचनापल्लीकडे जाते व दुसरी निलगिरी पर्वतावरील उटकमंडकडे जाते. हल्लीं म्हैसूरपासून चामराजनगरपर्यंत अडतीस मैलांचा आगगाडीचा रस्ता झाला आहे व हा आगगाडीचा रस्ता हसनूर घाटानें मेटापुलम स्टेशनला—निलगिरी रेल्वेवरील एक स्टेशन—मिळविण्याचा म्हैसूरच्या महाराजांचा विचार आहे. या आगगाडीच्या रस्त्यानें मुंबई प्रांतांतील लोकांस निलगिरी पुष्कळ जवळ होणार आहे. म्हैसूर चामराज नगरची आगगाडी सकाळीं सात वाजतां निघते. आम्हीं चहा फराळ करून गाडींत येऊन बसलों व गाडी चालू झाली. म्हैसूर स्टेशनपासून दोन मैलांवर चामराजपुर हें स्टेशन लागतें. म्हैसूरची दक्षिणेकडे जी नवी वस्ती झाली आहे त्या भागाकरितां हें स्टेशन आहे. या स्टेशनपर्यंत आपण शहरांतूनच चाललों आहोंत असें दिसतें. डाव्या बाजूस चामुंडी टेकडीच्या निरनिराळ्या बाजू दिसत असतात. हें स्टेशन टाकल्यावर आणखी दोन मैल

गेल्यावर 'म्हैसूर साऊथ' नांवाचें स्टेशन लागतें. इकडील वस्ती तुरळक तुरळक वाटते. उजव्या बाजूला मुळींच वस्ती नाहीं. डाव्या बाजूस सरकारी लांकडाचें आवार व रेल्वे वर्कशॉपचें आवार लागतें. म्हैसूर शहराची नवी वाढ येथें संपते. चामुंडी टेकडी ही मागें रहाते व सर्वत्र साधारण सपाटीचा भाग लागतो. फार उंच नाहींत अशी लहान नाचणीचीं शेतें लागतात व मधून मधून आखूड झाडांचें खुरटें रान लागतें. हा भाग फारसा सुपीक नसावा असें भासतें. म्हैसूर साऊथ स्टेशनपासून सहा मैलांवर कडकोळ स्टेशन लागतें. येथून जास्त सुपीक प्रांत लागतो व पाण्याचें पाट लागूं लागतात. यावरून आपण एका नदीच्या किनाऱ्याकडे चाललों आहोंत असें वाटतें. तोंच कबनी नदीचा सुंदर पूल लागतो व नदीच्या दोन्ही बाजूचे कालवे दृग्गोचर होतात. नदी ओलांडून मैल दीड मैल गेलों नाहीं तोंच नांजनगुड स्टेशन ( म्हैसूरपासून पंधरा मैलांवर ) येतें आणखी एका मैलावर 'नांजनगुड शहर' नांवाचें स्टेशन लागतें. येथें आम्हीं सव्वाआठ वाजतां आलों. परत जायला गाडी साडे

वारा वाजतां होती. तेव्हां आम्हांला शहर व देऊळ पहाण्यास पुष्कळच वेळ होता. म्हणून आम्हीं चालतच शहराकडे निघालों. स्टेशनपासून सरळ रस्ता आहे. नांजनगुडेश्वराचें देवालय शहराच्या अगदीं शेवटींच आहे असें आम्हांस समजल्यामुळें आम्हीं मुख्य रस्त्यानें थेट गेलों. हें शहर लांबच लांब बसलेलें आहे असें दिसलें. सर्व सार्वजनिक इमारती, शहराचा बाजार, सार्वजनिक वाचनालय हीं सर्व या मुख्य रस्त्यालाच असल्यामुळें जातां जातां सहज दृष्टीस पडतात. शहराच्या अगदीं टोंकालाच नांजनगुडेश्वराचें देऊळ आहे. या देवालयाशेजारींच पण समोरच कबनी व गुंडल या दोन नद्यांचा संगम झालेला आहे. व संगमावर लहानसा घाट आहे. देखावा बरा आहे.

'नांजनगुडेश्वर' हें शंकराचें देवालय असून समुद्र-मंथनातून चौदा रत्नांपैकीं निघालेल्या विषाची बाधा लोकांस होऊं नये म्हणून तें विष शंकरानें लोककल्याणार्थ प्राशन केलें या पराक्रमावरून नांजनगुडेश्वर असें शिवाचें नांव पडलें व त्या नांवानें हें देवालय प्रसिद्ध आहे. माघमासीं या देवाची मोठी रथमिरवणूक

गेल्यावर 'म्हैसूर साऊथ' नांवाचें स्टेशन लागतें. इकडील वस्ती तुरळक तुरळक वाटते. उजव्या बाजूला मुळींच वस्ती नाहीं. डाव्या बाजूस सरकारी लांकडाचें आवार व रेल्वे वर्कशॉपचें आवार लागतें. म्हैसूर शहराची नवी वाढ येथें संपते. चामुंडी टेकडी ही मागें रहाते व सर्वत्र साधारण सपाटीचा भाग लागतो. फार उंच नाहींत अशी लहान नाचणीचीं शेतें लागतात व मधून मधून आखूड झाडांचें खुरटें रान लागतें. हा भाग फारसा सुपीक नसावा असें भासतें. म्हैसूर साऊथ स्टेशनपासून सहा मैलांवर कडकोळ स्टेशन लागतें. येथून जास्त सुपीक प्रांत लागतो व पाण्याचें पाट लागूं लागतात. यावरून आपण एका नदीच्या किनाऱ्याकडे चाललों आहोंत असें वाटतें. तोंच कबनी नदीचा सुंदर पूल लागतो व नदीच्या दोन्ही बाजूचे कालवे दृग्गोचर होतात. नदी ओलांडून मैल दीड मैल गेलों नाहीं तोंच नांजनगुड स्टेशन ( म्हैसूरपासून पंधरा मैलांवर ) येतें आणखी एका मैलावर 'नांजन-गुड शहर' नांवाचें स्टेशन लागतें. येथें आम्ही सव्वाआठ वाजतां आलों. परत जायला गाडी साडे

वारा वाजतां होती. तेव्हां आम्हांला शहर व देऊळ पहाण्यास पुष्कळच वेळ होता. म्हणून आम्हीं चालतच शहराकडे निघालों. स्टेशनपासून सरळ रस्ता आहे. नांजनगुडेश्वराचें देवालय शहराच्या अगदीं शेवटींच आहे असें आम्हांस समजल्यामुळें आम्हीं मुख्य रस्त्यानें थेट गेलों. हें शहर लांबच लांब बसलेलें आहे असें दिसलें. सर्व सार्वजनिक इमारती, शहराचा बाजार, सार्वजनिक वाचनालय हीं सर्व या मुख्य रस्त्यालाच असल्यामुळें जातां जातां सहज दृष्टीस पडतात. शहराच्या अगदीं टोंकालाच नांजनगुडेश्वराचें देऊळ आहे. या देवालयाशेजारींच पण समोरच कबनी व गुंडल या दोन नद्यांचा संगम झालेला आहे. व संगमावर लहानसा घाट आहे. देखावा बरा आहे.

'नांजनगुडेश्वर' हें शंकराचें देवालय असून समुद्र-मंथनांतून चौदा रत्नांपैकीं निघालेल्या विषाची बाधा लोकांस होऊं नये म्हणून तें विष शंकरानें लोककल्याणार्थ प्राशन केलें या पराक्रमावरून नांजनगुडेश्वर असें शिवाचें नांव पडलें व त्या नांवानें हें देवालय प्रसिद्ध आहे. माघमासीं या देवाची मोठी रथमिरवणूक

निघते व त्यावेळीं हजारो यात्रेकरू जमतात. या ठिकाणीं लहानसें देवालय फार पुरातन काळापासून होतें. पण हल्लींचें मोठें देऊळ हें दिवाण पूर्णय्याचे कारकीर्दींतील आहे. या देवळाला म्हैसूर संस्थानकडून वार्षिक वीस हजार रुपयाचें उत्पन्न आहे. शिवाय येथें देवालयाच्या दर्शनास येणाऱ्याकडून माणशी एक पैसा कर घेतात. भाषेचें ज्ञान मुळींच नसल्यामुळें व अशा तऱ्हेचा पूर्वानुभव नसल्यामुळें आमची एक सांगण्या- सारखी मौज झाली. देवळाच्या दाराशीं गेलों तों तेथें एक जमाखर्चाची वही व पैशाची पेटी घेऊन बसलेला माणूस दिसला. त्यानें येथें दर माणशी एक पैसा कर आहे असें सांगितलें. त्याबरोबर आम्हीं आमचे कात- ड्याचें पाकीट काढून पैसा देऊं लागलों, तोंच तो पाकीटच तेथें ठेवण्यास खुणाऊं लागला. आम्हांला भय पडलें की परत जातांना आमचें पाकीट परत न मिळाल्यास काय करा. म्हणून आम्हीं तसें करण्यास कांकू करूं लागलों. तेव्हां त्यानें कसेंतरी आम्हांला समजावून सांगितलें कीं या देवळांत कातड्याचें किंवा चामड्याचें पाकीट किंवा कातड्याची कांहीं एक वस्तू

नेण्याची मनाई आहे. तेव्हां तुम्हीं आपले सर्व पैसे पाकिटांतून काढून खिशांत तरी ठेवा किंवा सर्व पाकीट तरी येथें ठेवा व परत जातांना घेऊन जा. सर्व पैसे काढून द्यावयाचे म्हणजे बरोबर किती पैसे आमच्याजवळ आहेत हें दुसऱ्यास दाखवावयाचें व देवळांत कोणी पैसे हिसकावून घेतले तर काय करा अशी शंका आली. बरें, सर्व पाकीट माणसाजवळ ठेवावें तर त्यातले कांहीं पैसे काढून घेतले जाण्याची किंवा सर्वच पाकीट जाण्याची भीति; अशा चमत्कारिक पेचांत आम्हीं सांपडलों. हिंदुस्थानांत बहुतेक सर्व तीर्थें मी पाहिलीं आहेत; कोठेंहि असला नियम नाहीं अशी मी त्या माणसाची समजूत घालूं लागलों. पण तो काय आम्हाला परवानगी देतो. शेवटीं पाकिटांतलें सर्व पैसे, नोटा वगैरे खिशांत घालून मोकळीं कातड्याचीं पाकिटें आम्हीं त्या माणसाच्या स्वाधीन केलीं व देवळाच्या देवडींतून आंत गेलों.

हें देवालय तीनशें पंचायशी फुट लांब व एकशें साठ फूट रुंद आहे व त्याला एकशें सत्तेचाळीस खांब आहेत. कोल्हापुरच्या अंबाबाईच्या देवळासारखी

या देवळाची घडण आहे. मुख्य मूर्ति शिवलिंगाची आहे; पण देवळाच्या प्रदक्षिणामार्गावर शिवभक्तांच्या व दुसऱ्या देवांच्या मूर्तीच मूर्ती आहेत. कांहीं कांहीं मूर्तीचें खोदकाम वाखाणण्यासारखें आहे. देवळाच्या प्रचंडतेमुळें देऊळ भव्य दिसतें. देवळाच्या बाहेरच्या भिंतीचा वरचा कठडा चुनाविटांचा केलेला असून चुन्याच्या गिलाव्यामध्यें सारख्या निरनिराळ्या देवांच्या व देवतांच्या व साधुसंतांच्या मूर्ति केलेल्या आहेत. या फार रेखीव असून सुंदर आहेत. यामुळें हें देऊळ कितीवेळ पहात बसलें तरी पहाणें संपत नाहीं. एकाच देवळावर मूर्तिकलेचे शेकडोशें मासले आहेत. या देवळाचें गोपूर महाराज कृष्णराज वाडीयार यांनीं १८४५ मध्यें बांधलें. बराच वेळ त्याप्रमाणें सर्व देऊळ आंतून बाहेरून पाहिल्यावर पाकिटें परत घेऊन आम्हीं परतलों व वाटेनें थोडीशी कॉफीगृहांत पोटपुजा करून स्टेशनवर आलों. तेथें जवळ जवळ एक तास आम्हांला थांबावें लागलें. शेवटीं एकदांची गाडी आली व आम्हीं तास दीडतासानें स्वस्थानीं येऊन पोंचलों.

म्हैसूरच्या आसपासचें तिसरें प्रेक्षणीय स्थळ ह्मणजे 'कृष्णराज सागर' नांवाचें कृत्रिम सरोवर व त्याचा प्रचंड बंधारा हें होय. म्हैसूर शहराच्या वायव्य दिशेस हें सरोवर असून त्यालाहि दोन मार्गानें जातां येतें. एक मोटारमार्ग व दुसरा रेल्वे रस्ता. मोटारनें गेल्यास कृष्णराज सागर सरोवर व त्याचा बंधारा म्हैसूर शहरापासून तेरा मैल पडतो व तें स्थळ पाहून येण्यास मोटारभाडें बारातेरा रुपये पडतें व दोनतीन तासांत काम भागतें. पण हें सरोवर पहाण्यासहि कमी खर्चाचा रेलवे रस्ता आहे व जायला यायला सोईच्या गाड्या आहेत. म्हैसूर–आरसिकेरी हा म्हैसूर संस्थानच्या मालकीचा मीटरगेज रेल्वे रस्ता आहे. या आगगाडीच्या रस्त्यावर म्हैसूर स्टेशनपासून सात आठ मैलांवर पहिलेंच बेलगोला नांवाचें स्टेशन लागतें व कृष्णसागराचा बंधारा या स्टेशनपासून फक्त दोन मैल आहे. या दोन मैलांमध्यें सुद्धां सारख्या मोटारगाड्या चालू असतात व दर माणशीं दोन आण्यांनीं बंधाऱ्यापर्यंत त्या गाड्या प्रवाशांनां घेऊन जातात. म्हैसूरहून आरसीकेरीला जाणारी आगगाडी

सकाळीं सात साडेसातला निघते व आरसीकेरीहून म्हैसूरकडे येणारी गाडी बेलगोला स्टेशनला बारा साडे-बाराच्या सुमारास येते. ह्मणजे कृष्णराजसागर व त्याचा बंधारा पाहण्यास चांगले चारपांच तास सांपडतात व दर माणशीं सातआठ आण्याच्या वर खर्च येत नाहीं. असो.

कृष्णराजसागर सरोवर व त्याचा बंधारा हें अर्वाचीन काळच्या बांधकलेचें एक प्रचंड काम आहे. हिंदु-स्थानांतीलच नव्हे तर जगांतील प्रचंड पाटबंधाऱ्याच्या कामामध्यें त्याची गणना होण्यासारखी आहे. कारण हा बंधारा पावसाळ्यांतील पुराचें पाणी वाहून जाण्या-करितां बांधलेल्या वेस्ट वीअरसकट सुमारें पावणे दोन मैल लांब आहे; या बंधाऱ्याची उंची नदीच्या तळापासून एकशेंतीस फुट आहे; हा बंधारा नदीच्या तळाशीं सुमारें एकशेंपंधरा फुट रुंद असून वर फक्त चवदा फुट रुंद आहे; व या बंधाऱ्यास सुमारें तीन कोट रुपये खर्च आला आहे; इतकें हें प्रचंड काम आहे. हा बंधारा कावेरी नदीस कन्नंबडी गांवानजीक घात-लेला आहे, ह्मणून या पाटबंधाऱ्याच्या कामाला

सामान्य लोकांत कन्नंबडी तलाव हें नांव चालू आहे. या ठिकाणीं कावेरी नदी पूर्ववाहिनी आहे व तिला उत्तरेकडून दक्षिणवाहिनी हेमवती नदी व दक्षिणे-कडून उत्तरवाहिनी लक्ष्मणतीर्थ नदी अशा दोन नद्या मिळालेल्या आहेत. सारांश हा बंधारा कावेरी-नदी-वर बांधला आहे असें म्हणण्यापेक्षां हा नद्यांच्या त्रिवेणी संगमावर बांधला आहे असें म्हणणें जास्त अन्वर्थक आहे व म्हणूनच या तलावाला कृष्णराज-सागर हें नांव शोभतें. कारण तीन नद्यांच्या पात्र सभो-वारचा सर्व भूमिभाग हा जलसंचयांत सांपडल्यामुळें हें सरोवर म्हणजे अन्वर्थक रीतीनें सागरच बनला आहे यांत शंका नाहीं. या तलावाच्या पाण्यानें व्याप-लेल्या जागेचें क्षेत्रफळ चार हजार मैल आहे! कन्नंबडी गांवाजवळ नदीच्या दोन्ही बाजूस अगदीं पात्राला भिडलेले असे टेकड्यावजा उंचवट्याचे पठार आलेले आहेत. यामुळें येथें नदीची रुंदी तळांत केवळ नऊशे फूटच आहे. शिवाय पात्रापासून वीस फुट खोलीवर पाणी न झिरपण्यासारखा खडकाचा थर आहे. तेव्हां बांध-कामाच्या दृष्टीनें हें ठिकाण तज्ञांनीं पसंत केलें होतें.

या बंधाऱ्याची योजना बऱ्याच वर्षांपासून चालू होती. पण जास्त खर्चाची म्हणून ती योजना मागें पडत असे. १९१३ सालीं सर विश्वेश्वर अय्या हे म्हैसूर संस्थानचे मुख्य एंजिनीयर असतांना त्यांनीं या योजनेची सविस्तर रूपरेखा, खर्चाचा अंदाज व त्याची तरतूद व या बंधाऱ्याचा किफाइतदारपणा वगैरेबद्दलचा उत्तम रिपोर्ट केला व म्हैसूर दरबारनें ही योजना मुक्रर करून ती लागलीच हातीं घेतली; व पंधरा वर्षांनीं आतां हा बंधारा पुरा होऊन त्याचें 'कृष्णराज सागर' म्हणून नामकरण करण्यांत आलें आहे. आतां तें म्हैसूरला प्रवास करणाऱ्या प्रत्येक प्रवाशाला अवश्यमेव प्रेक्षणीय असें स्थळ बनलें आहे. असो.

आम्हीं वेळेच्या अभावीं हा तलाव पहाण्यास मोटारीनें गेलों. मोटारीचा रस्ता तडक एकसारखा नाहीं. प्रथमतः उत्तरेकडे श्रीरंगपट्टणच्या रस्त्यानें पांचसहा मैल जावें लागतें; तो रस्ता टाकून पश्चिमेकडे हनसूर गांवाला जाणाऱ्या रस्त्यानें आणखी पांचसहा मैल जावें लागतें व मग पुनः उत्तरेकडे कन्नंबडी गांवच्या रस्त्यानें दोन अडीच मैल जावें लागतें. पण म्हैसूरहून

निघणारा रस्ता सखल भागांतून वरवर चढत जात असल्यामुळें एवढें प्रचंड सरोवर पण तें चढावाच्या माथ्यावर आल्याखेरीज मुळींच दिसत नाहीं. एकदां माथ्यावर आल्यावर मात्र हें समुद्रासारखें सरोवर पाहून मन आश्चर्यचकित होऊन जातें. तो क्षितिजा-पर्यंत पोंचलेला प्रचंड जलसमूह, ती भोंवळ येण्या-सारखी उंचच उंच व लांबचलांब पिवळसर पांढऱ्या तांबड्या दगडाची तटवजा भिंत, ती विजेच्या तारेच्या उंच उंच खांबांची ओळच ओळ, त्या बंधाऱ्याखालच्या नदीच्या दोहींकडील बाजूच्या लहानमोठ्या इमारती बंगले व झोपड्या, ते इतस्ततः पडलेले हजारो लहान-मोठे दगड, त्या बांधकामाचा मालमसाला नेणाऱ्या हातगाड्या इकडेतिकडे पडलेली यंत्रसामुग्री, सारांश इतक्या विविध प्रकारच्या गोष्टी बंधाऱ्याजवळ गेलें ह्मणजे एकसमयावच्छेदेंकरून दृष्टीस पडतात. आतां काय पाहूं व काय न पाहूं असें होऊन मनु-ष्याचें मन गोंधळून जातें. आमच्या मनाची तीच स्थिति झाली. पण बंधारा व सरोवर तज्ज्ञ माणसांच्या साहाय्यानें पाहण्याच्या हेतूनें आह्मीं प्रथमतः या

कामावरील मुख्य एंजिनीयरच्या कचेरींत गेलों. एंजिनीयरसाहेब हिंदी गृहस्थच होते. त्यांनीं आमचें स्वागत करून सर्व माहिती पुरवून बंधाऱ्याचे दोन फोटोहि आह्मांला नजर केले याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानले. त्यांनीं या प्रचंड बंधाऱ्याचे नकाशे व फोटो दाखविले. तेथें आम्हीं ह्मैसूरच्या जगन्मोहन महालांतल्यासारखा कावेरी नदीच्या खोऱ्याचा निम्नोनतिदर्शक नकाशा पाहिला. व त्यायोगें ह्मैसूर प्रांताच्या विलक्षण घडणीचें चक्षुर्वै सत्यं अशा स्वरूपाचें पुनर्दर्शन होऊन आह्मीं आनंदाश्चर्यांत तल्लीन झालों. पण वरच्या सर्व गोष्टींपेक्षां जास्त आश्चर्यकारक असा शिलालेख आम्हीं या कचेरींत पाहिला ही शिला ह्मणजे अशी तशी नसून ती टिपुसुलताननें कावेरीवर सुरु केलेल्या बंधाऱ्याची कोनशिलाच होय ! टिपुसुलतानाची कारकीर्द अल्पकालीन होती व ती बहुतेक धामधूम व लढाया यांतच गेली. पण अशा धामधुमीच्या कारकीर्दींत टिपूसुलताननें कावेरी नदीवर कन्नंबडी गांवानजीक याच ठिकाणीं मोठा बंधारा बांधावयाचा बेत करून या

बंधाऱ्याच्या योगानें होणाऱ्या पाटाचें पाणी आपल्या राज्यांतील शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या तीन षोडशांष साऱ्याच्या सवलतीनें वंशपरंपरा देण्याचें आश्वासन या कोनशिलालेखांत देऊन टाकलें. हा शिलालेख सन १७७४ मधला आहे व तो कानडी लिपींत आहे. त्याचें इंग्रजी भाषांतर एंजिनीअरसाहेबांनीं मला दाखविलें व त्याची एक नक्कलहि या लेखमालेच्या उपयोगाकरितां दिली. टिपूसुलतान हा अत्यंत धर्मवेडा व जुलमी राजा होता असें आम्हीं लहानपणीं इतिहासांत वाचलें होतें, पण या शिलालेखावरून टिपू सुलतानचें लोकोपयोगी कामें करण्याकडे लक्ष होतें असें दिसून आलें व म्हणून त्याच्यामध्यें राजाला साजेसें कांहीं तरी गुण होते व इतिहासांतील विधानें एकतर्फी पुराव्यावर केलेलीं असलीं पाहिजेत असें माझ्या ध्यानांत आलें. तसेंच अर्वाचीन एंजिनीयरिंग शास्त्रीय ज्ञानानें जी जागा बंधाऱ्यास योग्य ठरली तीच जागा टिपूसुलतान व त्याचे सल्लागार यांनीहि पूर्वी पसंत केलेली होती हें पाहून त्या काळच्या लोकांच्या अनुभवजन्य ज्ञानाचें व कल्पकतेचें कौतुक वाटल्याखेरीज राहिलें नाहीं.

नंतर आह्मी बंधारा पहात पहात व पाणी सोडण्याच्या दरवाज्याची योजना पहात पहात बहुतेक पलीकडच्या तीरापर्यंत गेलों. या बंधाऱ्यावरून जातांना या सरोवराची अपूर्व शोभा दिसते यांत शंका नाहीं. एकीकडे तो मोठमोठ्या लाटा मारणारा व अमर्याद भासणारा प्रचंड जलसंचय व दुसरीकडे भोंवळ येण्याइतकें नदीचें खोल पात्र व भिंतीच्या मोऱ्यामधून पांढऱ्या सफेत तुषारकणांनीं युक्त व प्रचंड जोरानें वाहणारा पाण्याचा प्रचंड प्रवाह! दूरवर दिसणारे श्रीरंगपट्टण शहरांतील मुशीदीचे मनोरे, त्याच्या पलीकडे व उत्तरेस दिसणारीं डोंगराचीं उंच उंच शिखरें हा सर्व देखावा नयनमनोहर नाहीं असें कोण ह्मणेल? प्रत्यक्ष बंधाराहि फारच सुंदर बांधलेला आहे. बराच भाग चालून आल्यावर खालीं उतरण्यास पायऱ्या केलेल्या आहेत. शिवाय या बंधाऱ्याचा हा एक विशेष आहे कीं, याला वरच्या बारा फुटाला कारबेलस करून ग्यालरीसारखा भाग भिंतीच्यापुढें आणला आहे. याच भिंतींत एके ठिकाणीं सुंदर कमानींनीं युक्त असा एक कोनडा करून त्यांत कावेरी नदीची

मूर्ति बसविली आहे. सारांश हा बंधारा निव्वळ उपयुक्त काम एवढीच दृष्टि ठेवून बांधलेला नाहीं, तर एका संपन्न देशी संस्थानांतील एक अपूर्व बांधकलाकृति या दृष्टीनें या बंधाऱ्याचें काम केलेलें आहे असें हा बंधारा पाहतांना दृष्टोत्पत्तीस आल्याखेरीज रहात नाहीं. याप्रमाणें आमचे बंधारा बघण्याचें काम संपलें. पण एंजीनीयरसाहेबांच्या सौजन्यामुळें समुद्रपर्यटणाचीहि मौज आह्मांस अनुभवण्यास मिळाली. बंधारा पहात असतांना तलावाच्या बाजूला आह्मीं एक लहान आगीन होडी पाहिली होती. या होडींतून तलाव पहाण्याची व्यवस्था आहे काय अशी मी चौकशी केली व डेक्कन कॉलेजांत असतांना मला होडी वल्हविण्याचा नाद होता असें मी ह्मटलें. एंजिनीअरसाहेब ह्मणाले "जरी सामान्य प्रवाशाकरितां अशी व्यवस्था नाहीं, तरी आपल्याला सरोवरांत सहल करून आणण्यास होडीवाल्यास सांगतों." आह्मीं एंजीनियरसाहेबांचे पुन: एकदां अन्तःकरणपूर्वक आभार मानिले व बंधाऱ्यावरून परत येतांना आगीनहोडी डांबून ठेवलेल्या ठिकाणीं आह्मीं आलों व लागलीच होडींत बसलों.

व होडी लगेच चालू झाली. येथून सरोवराची निराळीच शोभा दिसूं लागली! पाण्याला लाटाहि बऱ्याच मारीत होत्या! याप्रमाणें अर्धा एक तास सहल करून आह्मीं परत किनाऱ्यावर येऊन एंजिनियर साहेबांचा निरोप घेतला व स्वस्थानीं परत आलों.

# म्हैसूरच्या सोन्याच्या खाणी

ज्याप्रमाणें प्रथम पुणें पहाणारा प्रवासी पुण्याची पर्वती पाहिल्याखेरीज रहात नाहीं, ज्याप्रमाणें जुन्नर पाहणारा शिवनेरी किल्ला पाहतोच पाहतो, ज्याप्रमाणें महाबळेश्वरला गेलेला गृहस्थ प्रतापगड पाहून येतो; ज्याप्रमाणें चिपळूणाला गेलेला इसम परशराम पाहिल्यावांचून परतत नाहीं किंवा ज्याप्रमाणें लष्कर ग्वाल्हेरला गेलेला माणूस ग्वाल्हेरचा किल्ला पाहिल्याखेरीज रहात नाहीं त्याचप्रमाणें म्हैसूर प्रांताच्या प्रवासास गेलेला प्रवासी म्हैसूरच्या सोन्याच्या खाणी पाहिल्याखेरीज रहात नाहीं. त्याप्रमाणें घाईघाईनें कां होईना पण एकदां आम्हीं सोन्याच्या खाणी पाहून आलों.

हिंदुस्थानांत पूर्वी सर्वत्र सोनें सांपडत असें म्हणून धात्वर्थानें हिंदुस्थानाला सुवर्णभूमि म्हणत किंवा धनधान्य समृद्धीचा देश येवढ्या अलंकारिक अर्थानें हें नांव हिंदुस्थानाला पडलें हा एक शोध करण्यासारखा

प्रश्न आहे. अर्वाचीन काळीं तरी म्हैसूरच्या सोन्याच्या खाणींनीं हिंदुस्थानचें सुवर्णभूमि हें नांव अन्वर्थक केलें आहे, यांत शंका नाहीं. म्हैसूर प्रांतांत तरी फार प्राचीन काळापासून सोनें काढण्याची कला ठाऊक असून म्हैसूर प्रांताच्या कांहीं भागांत जुन्या खाणींचे खोल खड्डे युरोपियन प्रवाशांनां सांपडले व म्हणून त्या प्रांतांकडे सोनेंशोधकांचें लक्ष लागून त्यांनीं कोलार जिल्ह्यांत मुबलक सोन्याचा मुलुख शोधून काढला व म्हैसूर दरबारच्या परवानगीनें प्रयोगाकरितां खोल विहिरी खणून सोन्याचे खनिज दगड वर आणून त्यांतून किफायतशीर प्रमाणांत सोनें निघतें असें शाबीत केलें व दरबारकडून कांहीं करारानें जमिनी भाड्यानें घेऊन सोनें तयार करण्याकरितां मोठ्या भांडवलाच्या कंपन्या काढल्या. अर्थात् या सर्व कंपन्या युरोपीयन लोकांच्या आहेत व सोन्याच्या खड्यांमधून शुद्ध सोनें तयार करण्याचें कसब असलेले तज्ज्ञ मजूर युरोपीयनच आहेत. हे सोनें तयार करण्याचे कारखाने अगर सोन्याच्या खाणीचे कारखाने १८८२ सालापासून चालू आहेत. कोलर जिल्ह्यांत सध्यां पांच

कंपन्या हें काम करतात. सोन्याच्या खाणीचा धंदा हा केवढा किफायतशीर धंदा आहे व ही म्हैसूर दरबारला अप्रत्यक्ष रीतीनें किती उत्पन्नाची बाब आहे हें खालील माहितीवरून दिसून येईल.

पांच कंपन्या मिळून सरासरी दोन कोटी रुपयांचें भांडवल या कारखान्यांत गुंतलें आहे व त्यावर सुमारें दर शेकडा अठरावीस टक्केपर्यंत दरसाल नफा होत आहे. म्हणजे सुमारें छत्तीस लक्ष रुपये दरसाल या कंपन्यांचा नफा आहे. या सर्व खाणीमधून दरसाल सरासरीनें दहा लक्ष तोळे सोनें निघतें व त्याची किंमत दोन कोट रुपये येते. या सोन्याच्या खाणीवरील स्वामित्वाबद्दल म्हैसूर दरबारला सरासरीनें पंधरा लक्ष रुपये उत्पन्न होतात. या खाणीचे कारखाने सुरू झाल्यापासून आजतागाईत एकंदर सुमारें चार कोट तोळे सोनें निघालें व त्याची किंमत सरासरीनें ऐंशी कोट रुपये झाली. केवढ्या प्रचंड उत्पन्नाच्या या खाणी आहेत हें वरील आकड्यांवरून दिसून येईल. या खाणीबद्दल इतकी आकडेमोड व इतकें पूर्ववृत्त पुरें आहे. चला आतां प्रत्यक्ष प्रवासास निघूं.

म्हैसूरच्या सोन्याच्या खाणी म्हैसूर संस्थानचा अगदीं पूर्वेंकडचा जिल्हा कोलार यामध्यें आहेत व बंगळूराहून मद्रासला एम्. एस. एम्. रेलवेचा ब्रॉड गेज रस्ता गेला आहे त्या रेल्वे रस्त्यानें बावरिंग स्टेशनला जाऊन तेथून म्हैसूर दरबारनें कोलर सोन्याच्या खाणीकरितां दहा मैलाची रेल्वे केली आहे त्या रेल्वेनें खाणीकडे जातां येतें.

बंगरूळ स्टेशनला दोनप्रहरीं गाडींत जाऊन आम्हीं बसलों. थोड्याच वेळांत गाडी सुरू झाली. कँटोन्मेंट स्टेशन व बंगळूरईस्ट हीं शहरातलीं स्टेशनें टाकलीं कीं साधारण सपाटीचा व भुरक्या रानाचा मुलुख लागतो. तीनच्यार मैलांवर कृष्णराजनगर नांवाचें स्टेशन लागतें. यापुढें सपाटी जाऊन डोंगराळ मुलुख लागतो. डोंगरावर मोठमोठ्या घरासारखे प्रचंड दगड दृष्टीस पडूं लागतात व मुलुख अगदींच नापीक व खडकाळ दिसतो. पुढें व्हाईट फील्ड नावाचें स्टेशन लागतें. येथें जरा देखावा व भूमिभाग बरा आहे व घरेंहि नीट नेटकीं दिसतात. येथें नेटीव्ह ख्रिस्त्यांची वस्ती बरीच आहे. बंगळूर व बावरिंगपेठ यांचे दरम्यान

मालूर ह्मणून एक मोठें गांव व स्टेशन लागतें. तेथपासून बावरिंगपेठपर्यंतचा भूमिभाग तर खडकाळ भीषण जळका दिसतो. ज्याप्रमाणें एखादा कंजूष माणूस आपली संपत्ती घरांतील अडगळीच्या अंधाऱ्या व ओंगळ अशा खोलींत ठेवतो किंवा ज्याप्रमाणें सत्यनारायणाच्या कथेंतील व्यापारी आपलें सोनें नाणें खालीं ठेवून सर्व गलबत पाचोळ्यांनीं पानांनीं, व पत्रावळींनीं भरून टाकतो त्याप्रमाणें सृष्टिदेवीनें ह्या सोन्याच्या खाणीचा वरचा भूमिभाग मुद्दाम असा उजाड व जळका ठेवला आहे कीं काय असें वाटतें. इतकें या भागाचें स्वरूप भिकार, भीषण व ओबडधोबड आहे. तसेंच बंगलूर सोडल्यापासून बावरिंगपेठ येईपर्यंत सर्व भाग व रेलवेंतून दिसणारीं गांवें व घरेंहि साधीं, खेडवळ व जुनीपुराणीं दिसतात व बावरिंग पेठेपासून दहा बारा मैलांचा मुलुख म्हणजे अर्वाचीन सर्व सुधारणेच्या सुखसोयी व सुखसाधनें यांनीं गजबजलेलीं पाश्चात्य धर्तीचीं गांवेंच गांवें आहेत याची या प्रांतांत प्रथम प्रवास करणारास कल्पनाहि होत नाहीं. पण बावरिंग स्टेशन आलें कीं सिनेमां-

तल्या देखाव्याच्या बदलाप्रमाणें सर्व गजबजलेली नवी सृष्टि दिसूं लागते. जिकडे तिकडे विजेच्या तारांचें जाळें दिसूं लागतें. सुंदर बागबगीच्यांनीं अलंकृत असे बंगलेच बंगले दिसूं लागतात. व रस्ते माणसांनीं फुललेले दिसतात. बावरिंग पेठ येथें गाडी बदलावी लागते. लागलीच दुसरी गाडी चालू होते व आतां मुंबईतल्याप्रमाणें मैलामैलावर स्टेशनें लागतात. सोन्याच्या खाणीच्या नावांचीच स्टेशनें आहेत. हल्लीं पांच कंपन्या चालू आहेत. मायसोर गोल्ड मायनींग कंपनी, चँपीयन रीफ गोल्ड माईन्स कंपनी, उरगांव गोल्ड मायनिंग कंपनी, नंदीदुर्ग माईन्स कंपनी व बालाघाट गोल्ड माइन्स कंपनी. रेलवेचें शेवटचें स्टेशन मरीकुपम ह्मणून आहे. आह्मीं प्रथम तेथें गेलों व ज्या एंजीनीयरला आह्मीं बंगलुराहून पत्र आणलें होतें ते ऊरगांव स्टेशनला आहेत असें कळलें ह्मणून चालत परत ऊरगांवला आलों. चालत येण्यांत या नव्या वस्तीची कल्पना आली. चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं जो मुलुख उजाड, जळाऊ, खडकाळ निर्वृक्ष व निर्मनुष्य होता तोच आतां सर्व सुधारलेल्या

देशातल्याप्रमाणें भरगच्च वस्तीचा मुलुख व्हावा ही किती आश्चर्याची गोष्ट आहे ! ज्याप्रमाणें ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, अमेरिका देशांत सोन्याच्या खाणी सांपडल्या-बरोबर त्या मुलुखांत लोकांच्या झुंडीच्या झुंडी जाऊन तेथें दाट लोकवस्ती झाली तसाच कांहींसा या कोलर जिल्ह्यांत प्रकार झाला आहे. या सर्व भागांतून चाल-तांना एक विलक्षण देखावा नजरेस येतो व तो म्हणजे मोठमोठ्या काळ्या मातीच्या टेकड्या होत. प्रथमतः याचा अचंबा वाटतो व या कशाच्या व कशा-करितां आहेत हें कळत नाहीं. शोधाअंतीं आह्मांला कळलें कीं ज्या खनिज दगडांतून सोनें शोधून काढतात त्या राहिलेल्या दगडाच्या पिठाचे हे ढीग आहेत. या ढिगांतूनहि स्वल्प प्रमाणांत सोन्याचे कण आहेत. पण तें काढण्याचें काम किफाईतशीर नाहीं. तरीपण खाणींतलें सोनें संपल्यावर या ढिगांतूनहि पुन्हां थोडेंफार सोनें काढण्यास सांपडावे ह्मणून ही 'सोन-माती' ढीग करून ठेविली आहे. तसेंच दुसरी अपूर्व गोष्ट ह्मणजे उंचउंच लोखंडी खांब व त्याला मोठमोठे साखळदंड पुलीवर बसविलेले दिसतात व शोधाअंतीं

हींच खोल खाणीची मुखें किंवा विवरें होत असें कळलें. या विवरांत जाण्यायेण्याकरितां मालाची व सामानाची नेआण करण्याकरितां विजेचे पाळणे केलेले आहेत, व एकदम एक पाळणा खाली जावा व एक पाळणा वर यावा अशी योजना केलेली आहे. हल्लीं कोलार सोन्याच्या खाणी चार पांच हजार फुट खोल गेलेल्या आहेत. मी नुकताच हृदयाच्या एका तात्कालिक पण भयंकर विकारांतून बरा झालेला असल्यामुळें जमीनीमध्यें एक मैल खोल विवरांत मला जाण्याची मनाई केलेली होती. ह्मणून मला विवरांत जावयाचें नव्हतें. व आह्मीं गेलों ती वेळहि पाहणारांना आंत सोडण्याची नव्हती. तेव्हां आह्मीं या विवरांचीं मनानें कल्पना केली व दुधाची तहान ताकानें भागवून घ्यावी म्हणतात त्याप्रमाणें या विवरांच्या नकाशांच्या दर्शनानें खाणींतली अन्तःस्थिति कशी असते याची माहिती करून घेतली. कोलर जिल्ह्यांत सोन्याच्या दगडांचा जो थर आहे तो तिरपा तिरपा गेलेला आहे. यामुळें खाण आंत तिरपीतिरपी गेलेली असते. ह्मणजे आंत उतरा-

वयाच्या विवराचें तोंड जेथें असतें त्यापासून कितीतरी दूर अंतरावर आंत खणण्याचें काम चाललेलें असतें. ज्याप्रमाणें पूर्वकाळीं सुरक्षिततेकरितां लांबवर भुयारें खणीत असत, तशा तऱ्हेची रचना या खाणी-मध्यें असते. सर्व आंतल्या वाटभर विजेचे दिवे आहेत; जेथें कामकरी खणण्याची व सुरुंग पाडण्याची कामें करतात तेथेंहि विजेच्या दिव्यांचा चकचकाट असतो. खालच्या माणसांनां हवेच्या कमतरपणामुळें गुदमरल्यासारखें होऊं नये म्हणून सर्व खाणींतील अन्तर्भागांत वरून शुद्ध हवा खालीं पाठविण्याची व्यवस्था केलेली असते. प्रथमतः सुरुंगांनीं खडक फोडले जातात व मग मजूरलोक मोठमोठ्या खडकाचे तुकडे करून तो माल ट्रॉलीमधून वर पाठवितात; हें मजुराचें खाणींतील काम रात्रंदिवस सारखें चोवीस तास चाललेलें असतें. अर्थात् कामगाराचे तीन संच असतात. प्रत्येक मनुष्य खाणींत आठ तासच काम करूं शकतो. एंजीनीयर साहेबांनीं इतकी थोडी माहिती सांगून मग ते आह्मांला सोनें तयार करण्याच्या कारखान्यांत घेऊन गेले. तेथें पहिलें दाखविण्यांत आलेलें काम

ह्मणजे सोनदगडाचे रस्त्याच्या खडीएवढाले लहान लहान तुकडे करणें हें होय. मग या तुकड्यांतून सोनें नसलेले तुकडे वेचून वेगळे करतात. दगडाच्या रंगावरून व सूक्ष्म तऱ्हेनें पाहिल्यावर दिसणाऱ्या सोन्याच्या अत्यंत सूक्ष्म कणांच्या चकाकीवरून सोन्याचे व बिन सोन्याचे दगड मजूरांनां संवईनें तात्काळ ओळखतां येतात व हे मजूर भराभर बिनसोन्याचे दगड वेचून काढतात. मग ही सोनदगडी खडी पाण्यांत टाकून ती कुटतात. दगडाची वस्त्रगाळइतकी बारिक पुड होते व ती पाण्यांत मिसळलेली असते. हें वस्त्रगाळपुडमिश्रित पाणी एका उतरत्या टिनाच्या पट्ट्यावरून एकसारखें सोडलेलें असतें व तें वहात असतें. त्या पट्ट्यावर पारा पसरलेला असतो. पाणी पट्ट्यावरून सारखें वाहू लागलें ह्मणजे सोन्याचे कण पाऱ्याला चिकटतात व त्याचा जड असा लगदा तयार होतो. पट्ट्यावरून हा लगदा काढून घेतात व मग तो लगदा भट्टीमध्यें घालून त्याला खूर उष्णता देतात ह्मणजे पाऱ्याची वाफ होऊन शुद्ध सोन्याचें भूस खालीं राहतें हें भूस मग दुसऱ्या एका भट्टींत घालून तें

वितळतात व हा सोन्याचा रस साचांत ओतला ह्मणजे सोन्याच्या कांबी तयार होतात. पान्याच्या पत्र्यावरून वहात जाणाऱ्या पाण्यांत सोन्याचा अंश राहिलेला असतो. ह्मणून हें पाणी एका हौदांत जमवितात व सोन्याशीं संयोग होणारें एक आसिड त्या पाण्यांत टाकून त्याचें एक रासायनिक द्रव्य बनतें. तें वेगळें करून मग पुनः तें द्रव्य भट्टींत घालून सोनें निराळें करतात व पहिल्याप्रमाणेंच त्याच्या लगडी करतात. याप्रमाणें सोनें तयार करण्याच्या दोन्हीं पद्धती एंजिनीयर साहेबांनीं आह्मांस दाखविल्या. कोलरखाणीमध्यें तयार झालेलें सर्व सोनें थेट लंडनला पाठविण्यांत येतें असें एंजीनीयरसाहेबांनीं सांगितलें. ह्या देशांत तयार झालेलें सोनें येथेंच कां विकलें जाऊं नये याचें आश्चर्य करीत व एकंदर खाणींतून सोन्याचा दगड काढून त्याचे शुद्ध सोनें करण्याच्या कृति किती अवघड व खर्चाच्या आहेत याचेंहि आश्चर्य करीत एंजीनीयरसाहेबांचे आभार मानून आह्मीं कारखान्याचे बाहेर आलों व लगेच स्टेशनवर येऊन पुढच्या गाडीनें बंगलुरास स्वस्थानीं

आलों व सोन्याच्या खाणी वरून कां होईना पण एकदां पाहिल्या, यांतच आमच्या मनाचें आह्मीं समाधान केलें व तो दिवस मग विश्रांतींत घालविला. झालें, आमचें सोनपुराण संपलें.

# बेलूर व हलेबिड येथील देवळें

ज्याप्रमाणें म्हैसूर प्रांत हा निसर्गसौंदर्याच्या गोष्टीकरितां प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणें किंबहुना थोड्या जास्त प्रमाणांत मनुष्यकृत ललितकलाकृतिकरितांहि प्रसिद्ध आहे हें आतांपर्यंतच्या वर्णनावरून वाचकांच्या ध्यानीं आल्यावांचून राहिलें नसेल. पण विशेषतः बांधकला व मूर्तिकला या दोहोंसंबंधीं तर प्रांताची फारच ख्याति आहे, हें बंगरूळ व म्हैसूर व त्यांच्या आसपासच्या भागाच्या वर्णनामध्यें दोन चार देवळांचीं वर्णनें आलीं आहेत त्यावरून कळून आलेंच असेल. या लेखांत सर्व म्हैसूर प्रांताच्याच—नव्हे तर सर्व हिंदुस्थानच्या हिंदू देवळांच्या मालिकेंत मेरुमण्या-प्रमाणें शोभणाऱ्या—देवळांचीं वर्णनें देण्याचा विचार आहे. म्हैसूर प्रांतांत बुद्धकालीन बांधकामाचे मासले आहेत पण ते पहिल्या प्रतींत पडण्यासारखे नाहींत. पण हिंदुकाळचीं देवळें मात्र अप्रतिम आहेत.

म्हैसूर प्रांतांत हिंदु देवळाच्या द्रविड पद्धति व चालुक्यपद्धति--अशा दोन पद्धति आहेत. द्रविड पद्धतीचीं देवळें म्हणजे श्रीरंगपट्टणचें श्रीरंगाचें देऊळ, चामुंडी टेकडीवरील महिषासुरमर्दिनी देवीचें देऊळ अलसूर सरोवरावरील महादेवाचें देऊळ वगैरे मासले. हीं देवळें कलेच्या दृष्टीनें दुय्यम दर्जाचीं आहेत, पण म्हैसूर प्रांतांतील चालुक्यपद्धतीचीं देवळें मात्र पहिल्या प्रतीचीं आहेत. या पद्धतीचीं तीन ठिकाणचीं देवळें प्रख्यात आहे; त्यापैकीं दोन ठिकाणें बेलूर व दुसरें हळेबिड किंवा द्वारसमुद्र; या ठिकाणच्या प्रसिद्ध देवळाचें दर्शन आह्मीं घेऊं शकलों. तरी आतां अधिक प्रस्ताव न करितां या ठिकाणाच्या व तेथील देवळाच्या वर्णनास लागूं.

बेलूर व हळेबिड हीं ठिकाणें बारातेरा मैलाच्या अंतरावर असून म्हैसूर--आरसिकेरी या संस्थानी रेलवे रस्त्यावरील हसन स्टेशनपासून बेलूर २४।२५ मैल असून तेथून बेलूरला मोटारी मिळतात. असें समजल्यामुळें आह्मीं देशी परत येतांना हीं ठिकाणें पाहिलीं. आह्मीं सकाळीं साडेसातच्या गाडीनें निघालों. तों

प्रथम बेलगोला हें स्टेशन लागलें येथून कृष्णराज सागराचा प्रचंड जलसंचय दिसतो. नंतर एक दोन स्टेशनें टाकल्यावर लक्ष्मणतीर्थ नांवाच्या नदीवरील पूल लागतो. या नदीला पूर आल्यासारखा भास होतो पण असें पाणी तेथें बाराहि महिने असतें. कारण कृष्णराज तलावाची फूग या नदीला मारते. हा पूल टाकल्यावर कांहीं अंतरावर यडटोर नांवाचें स्टेशन लागतें. हें जरा मोठें गांव आहे. स्टेशनवर चहाची व्यवस्था उत्तम आहे. हें गांव-स्टेशन-टाकल्याबरोबर कावेरी नदीवरील पूल लागतो. येथेंहि नदीचें पात्र पाण्यानें तुडुंब भरलेलें दिसतें; कारण याच नदीला कृष्णराजसागराचा बंधारा खालीं बांधलेला आहे व पाण्याची फूग इतक्या दूरवर आलेली आहे. येथून दोनचार स्टेशनें टाकल्यावर होळे नरसीपुर म्हणून एक मोठें गांव व स्टेशन लागतें व येडाटोरप्रमाणेच हें स्टेशन टाकलें की हेमवती नदीचा पूल लागतो. हीहि नदी पाण्यानें तुडुंब भरलेली दिसते. म्हैसूरपासून येथपर्यंत याप्रमाणें तीन नद्यांचीं पाण्यानें तुडुंब भरलेलीं पात्रें लागतात व जिकडेतिकडे पाटाचें पाणी व

बागाइती शेती दृष्टीस पडते. व ह्मणून प्रांत रुक्ष न भासतां हिरवा हिरवा गार व पिकांनीं, बागांनीं व फळझाडांनीं व्याप्त असा सर्व भूमिभाग दृग्गोचर होतो, व या प्रांताला या नैसर्गिक नद्यांनीं व मनुष्यकृत कालव्यांनीं किती संपन्नता आणिली आहे हें पाहून सानंद आश्चर्य वाटतें.

हेमवती नदी टाकल्यावर मात्र कमी पाण्याचा डोंगराळ व कांहींसा रुक्ष असा भूमिभाग लागतो. आह्मीं हसन स्टेशनला सुमारें अकरा वाजतां आलों व अर्ध्या पाऊण तासांनीं बेलूरला जाणाऱ्या मोटारी निघाल्या, त्या थोड्याच वेळांत हसन गांवांत आल्या व तेथें आह्मांस एका खाणावळींत जेवावयास वेळ मिळाला व तेथें अर्धा तास थांबून आह्मीं थेट बेलूरकडे जाण्यास निघालों.

हसन तालुक्यामध्यें उंचसखल भूमिभाग कमी आहे. साधारण कमी सुपीक जमीन असावी असा भास झाला. झाड झाडोराहि म्हैसूरच्या इतर भागा-पेक्षां कमी आहे. म्हैसूर दरबारचा मोटारीच्या वाहा-तुकीबद्दलचा बंदोबस्त फार चांगला दिसला. प्रत्येक

दहावारा मैलांवर पोलीस नाकें असून प्रत्येक मोटा-रीची तपासणी होऊन हाकणाराची सही घेतली जाते. आम्ही दोन अडीचचे सुमारास बेलूर गांवीं आलों व तेथल्या एका घरवजा धर्मशाळेंत उतरलों.

आम्हीं धर्मशाळेंत उतरल्याबरोबर आधीं थोडीशी पोटपूजा केली व मग दुसऱ्या उद्योगास लागलों. देव-ळाचें आवार आम्हीं उतरलों होतों त्या रस्त्याला लागू-नच होतें. तेव्हां देऊळ पहाण्यास पुष्कळ वेळ होता. पण आम्हांला पुढें हलेबिड पाहण्यास जावयाचें होतें व तेथून बनावर किंवा आरसिकेरी या स्टेशनपर्यंत मोटारनें जावयाचें होतें. हसनहून सकाळीं हलेबिड-वरून मोटार जाते पण ती हलेबिड येथें पंधरा मिनिटें अर्धातासापेक्षां जास्त थांवत नाहीं असें कळलें. इतक्या अवधींत तेथलीं प्रसिद्ध देवळें पाहून होणें शक्य दिसलें नाहीं, तेव्हां आम्ही रात्रींच बैलगाडीनें हलेबिडला जाऊन वस्ती करावयाची व उजडत सर्व देवळें पाहून मोटार आल्याबरोबर पुढें प्रयाण करावयाचें असा बेत ठरविला व तेथल्या मोटार एजंटला रात्रीं आठ साडे-

आठच्या सुमारास बैलगाडी आणण्यास सांगून आह्मी शहरदर्शनाच्या व देवदर्शनाच्या नादीं लागलों.

ज्याप्रमाणें जुन्या काळीं म्हैसूर व श्रीरंगपट्टण या वाडीयार राजांच्या जोड राजधान्या होत्या त्याचप्रमाणें बेलूर व हलेबिड या होसल राजघराण्याच्या जोड राजधान्या होत्या ह्मणाना. हलेबिडचें पूर्वींचें नांव द्वारसमुद्र असें होतें. ही होसल राजांची जुनी राजधानी होती; बेलूर ही नंतरची राजधानी. दोन्ही राजधान्यांत दहाअकरा मैलांचेंच अंतर आहे. बेलूर हल्लीं तालु-क्याचें ठिकाण आहे. यामुळें येथें वस्ती बरीच असून पूर्वीच्या राजधानीचे अवशेष, व खाणाखुणा पुष्कळ आहेत. पण हलेबिड मात्र अगदीं खेडें झालें आहे. व तेथल्या देवळाखेरीज राजधानीचे अवशेष नामशेष झाले आहेत. कारण ही राजधानी मुसलमान विजे-त्यांनीं लुटून फार उध्वस्त करून टाकली; इतकी अवस्था बेलूरची झाली नाहीं, ह्मणून तें शहर थोडें फार शाबूत राहिलें.

होसल राजघराण्यानें एकंदर सुमारें साडेतीनशें वर्षे राज्य केलें व त्यांत अकरा राजे झाले. या

घराण्याचा मूळ पुरुष शशकपुरचा राहणारा होता. त्या गांवाजवळच्या रानांत असलेल्या वासंतिका नांवाच्या कुलदेवतेच्या देवळांत पूजा अर्चा करीत असतांना रानांतून एक वाघ त्याच्या अंगावर चालून आला. पुजाऱ्यानें लोखंडाची एक बारिक शलाकी ( काठी ) त्याच्या हातीं देऊन कानडींत 'वाघाला मार' असें ह्मटलें व त्यानें इतक्या जोरानें ती काठी वाघाला मारली कीं तो वाघ तात्काळ मेला. तेंव्हांपासून या घराण्याला 'होशल', असें नांव पडलें व या राजघराण्याच्या निशाणावर वाघ मारणाऱ्या पुरुषाचें चित्र फडकूं लागलें. अशा व्याघ्रघ्न पुरुषाच्या मूर्ति या घराण्यांतील राजांनीं बांधलेल्या देवळावर अजून दृष्टीस पडतात. या घराण्यांतला सर्वांत बलिष्ठ व वैभवशाली राजा ह्मणजे बेट्टी देव होय. हा ११०४ मध्यें राज्यावर आला व त्यानें सदतीस वर्षें राज्य केलें. प्रथमतः तो जैनधर्मी होता, पण पुढें तो रामानुजाचार्यांचा शिष्य झाला व त्यानें वैष्णवपंथ स्वीकारला आणि 'विष्णुवर्धन' नांव धारण केलें. या गोष्टीचें स्मारक ह्मणून त्यानें बेलूरचे प्रसिद्ध व शिल्पकलेचा मुकुटमणि असें केश.व

देऊळ अंकराशें सतरामध्यें बांधून ' विजय नारायण ' नांवानें मूर्तीची स्थापना केली व मोठा थोरला शिलालेख कोरून ठेवला. इतकी या देवळाची पूर्वपीठिका बस्स आहे. आतां प्रत्यक्ष देवळाकडे वळूं या.

केशवदेवालयाचें आवार चारशें चवेचाळीस फूट लांब व ३९६ फूट रुंद आहे. सर्व आवारासभोंवतीं मोठी थोरली तटासारखी भिंत आहे. मुख्य देवालयाच्या तीन्ही बाजूस दुसरीं लहान मोठीं आणखी तीनचार देवळें आहेत व पुष्कळ सभामंडप आहेत. मुख्य देवालय पूर्वाभिमुख असून आवाराच्या भिंतीला दोन महाद्वारें आहेत व त्यांपैकीं उत्तर बाजूच्या महाद्वारावर उंच उंच गोपुर आहे. दुसऱ्या महाद्वाराला हत्ती दरवाजा ह्मणतात. केशव किंवा विजयनारायण हें मुख्य देवालय एकंदर १७८ फूट लांब व १५६ फूट रुंद आहे व त्याचें जोतें तीन फूट उंचीचें आहे. देऊळ नेहमी सारखें चौकोनी नाहीं तर बहुकोनी आहे. नेहमीप्रमाणें देवळाचे एकापुढें एक तीन भाग आहेत. देवाची मूर्ति असलेला गाभारा किंवा गर्भगृह, मध्यगृह किंवा सुखनाशी व तिसरा मुख्य मंडप किंवा नवरंग हे

ते तीन भाग होत. मुख्य मंडपास पूर्व, उत्तर व दक्षिण अशा तीन बाजूस दरवाजे आहेत; तसेंच गाभाऱ्याच्या भिंतीस बाहेरून उत्तर, दक्षिण व पश्चिम या तीन बाजूस कोनाडेवजा जागा सोडून दुमजली बांधकाम केलेलें आहे.

याप्रमाणें या देवालयाचा आकार साधा सहज समजण्यासारखा नाहीं, तर त्याला कितीतरी कानेकोपरे असल्यामुळें आकलन करण्यास कठीण आहे. ह्मणून सर्व देवालयाभोंवतीं सावकाश व बारकाईनें पहात पहात प्रदक्षिणा केल्याखेरीज देवालयाच्या आकाराची बरोबर कल्पनाच येत नाहीं. या देवालयाच्या आकाराचा नकाशा पाहिला ह्मणजे त्यांत देवालयाच्या जोत्याला एकंदर साठसत्तराच्यावर कोने कोंपरे आहेत असें दिसून आल्याखेरीज रहात नाहीं. जोत्यापासून शिखरापर्यंत सरळ सुतांत साध्या माठीव दगडाच्या भिंती आहेत असेंहि नाहीं. त्यामध्यें दर थरागणीक कंगोरे ठेवलेले आहेत व देवळाच्या बाहेरच्या सर्व बाजूच्या भिंतीवर दगडांत खोदलेल्या मूर्ति, वेलबुट्या, नक्षीकाम किती आहे

याची गणतीच नाहीं. कोणच्याहि दगडावरील तीळभर जागाहि खोदकामाखेरीज मोकळी टाकलेली नाहीं. सारांश हें देवालय बांधकला व खोदकला या दोन्ही ललितकलाकृतींचा एक संयुक्त मासला आहे. यांतल्या बांधकलेचा जास्त गौरव करावा कीं, खोदकलेचा जास्त गौरव करावा यासंबंधीं मनाचा निश्चय होत नाहीं. कारण दोन्ही कलांची पराकाष्ठा या ठिकाणीं एकवटली आहे असें दिसून येतें. तेव्हां या देवळाचें सविस्तर वर्णन कितीहि शब्दसंपत्ती खर्च केली तरी होऊं शकणार नाहीं. चक्षुर्वैसत्यं या न्यायानें 'जा आणि पहा' येवढेंच वाचकांनां सांगणें भाग आहे. पण मासल्याकरितां व भाताची परीक्षा शितावरून करतात या न्यायानें देवदर्शन घेण्याकरितां जातां जातां काय काय दृष्टीस पडतें तें पाहूं या, ह्मणजे झालें.

मागें सांगितल्याप्रमाणें आपण सात मजली उंचच उंच गोपुरयुक्त महाद्वारांतून आंत गेल्यावरोबर देवळाचें प्रचंड आवार व त्यांतल्या निरनिराळ्या इमारती एकसमयावच्छेदेंकरून दृग्गोचर होतात. द्वारासमोर एक उंच सुंदर दीपस्तंभ दृष्टीस पडतो. तो ओलांडून

पुढें गेलें ह्मणजे अठ्ठावीस खांबांचा सोंगट्याच्या पटा-सारखा, कोणत्याहि बाजूनें आंत शिरलें तरी सहासहा खांबांच्या रांगानीं युक्त असा सभामंडप लागतो. हा मंडप भव्य व खांबाच्या युक्तीच्या रचनेमुळें चमत्कृतिजनक भासतो. या मंडपाखालून पुढें गेलें ह्मणजे केशव देवळाचा पुढचा भाग एकदम दृष्टिसमोर येऊन मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोटें घालतो. समोर नक्षीकामानें व निरनिराळ्या मूर्तींनीं युक्त असा दरवाजा दिसतो व आंत खोल खोल ह्मणूनच अंधुक अंधुक पण विस्तीर्ण असा देवळाचा अन्तर्भाग दृग्गोचर होतो. दाराच्या पायऱ्यांपलीकडे पण त्याला लागूनच दोन शिखरांनीं शोभायमान झालेल्या लहान पण सुबक देवळ्या दृष्टीस पडतात. या देवळ्यांची जोतीं जणूं कांहीं हत्तींनीं उचलून धरलीं आहेत असा भास होतो. कारण हुबेहुब कोरलेल्या हत्तींची रांगच रांग दोन्ही देवळ्यांचें जोत्याच्या खालीं दिसून येते. या दोन्ही देवळ्यांवर द्वारपालाच्या सुंदर मूर्ति कोरलेल्या दिसतात; येथें होशल राजघराण्याचे निशाणावरील वाघमाऱ्या पुरुषांचीं चित्रें खोदलेलीं दृष्टीस पडतात; व इतर किती

तरी तऱ्हेचें नक्षीचें खोदकाम केलेलें दिसतें. देवड्या-वरून दाराकडे दृष्टी फेकली ह्मणजे काय पाहूं व काय नं पाहूं असें होऊन मनुष्य आश्चर्यमूढ होतो. हा दरवाजा दगडी असून दगडी खांबाच्या चौकटींत बसवलेला आहे. खांबाच्या प्रारंभीं दोन शस्त्रधारी राजदरबारी सालंकार पोशाख केलेले द्वारपाल खोदलेले आहेत; त्याच्या अलीकडे व दरवाज्याच्या चवकटीस लागून रति व मन्मथ या दोन पुराणप्रसिद्ध सुंदर जोडप्याच्या हुबेहुब मूर्ति कोरल्या आहेत. या दोन्ही मूर्तिभोंवतीं सुंदर व वेलाफुलांनीं युक्त अशा महिरपि कोरलेल्या आहेत. मूर्तींचीं घडण खरोखरीच आल्हाददायक आहे. दरवाजाच्या चवकटीवर बारीक नक्षीचें खोदकाम केलेलें आहे. त्याच्या पलीकडे व द्वारपालांच्या मूर्तांच्या वरच्या भागावर व दरवाजाच्या फळकटीवर सर्वत्र काश्मिरी गालीच्यावर नक्षी विणतात त्या तऱ्हेची नक्षी कोरली असून दरवाजाच्या वर पण बाजूस मकर ध्वजाच्या मूर्ति असून नरसिंहावताराचें ( नारसिंहाला सोळा हात दाखविले आहेत ) चित्र खोदलेलें आहे. या दरवाज्यांतून आंत गेलें ह्मणजे मनुष्य नवरंगामध्यें

प्रवेश करतो. हा नवरंग किंवा मुख्य मंडपहि सोंग-ट्यांच्या पटासारखा असून त्याच्या तिन्ही दारांतून आंत प्रवेश केला ह्मणजे दोन्ही बाजूंस दहा दहा खांबांची ओळच ओळ लागते. प्रत्येक खांब वेगवेगळ्या आकाराचा असून शिवाय एक एक खांब ह्मणजे चित्र-कला व इतर कलाकुसरीचें खोदकाम यांचा एक असाधा-रण मासलाच आहे असें वाटल्यावांचून रहात नाहीं. विशेषतः ज्या चार मधल्या मुख्य खांबांवर नवरंगाचें घुमटवजा शिखर बांधलेलें आहे—व ज्या घुमटाच्या दगडी छतावर कमलाकार नक्षीकामांत. ब्रह्मा, विष्णु महेश या तीन देवांचीं सुंदर चित्रें खोदलेलीं आहेत, ते खांब तर अप्रतिम असून त्याच्या गलथ्यावर तिरप्या वसलेल्या एकसंधीं दगडांवर कोरलेल्या चार स्त्रीमूर्ति मूर्तिकलेचे नयनमनोहर मासले आहेत यांत शंका नाहीं. या नवरंगांत शिरून त्यांतील कलाकुसरीच्या कामाकडे व विशेषतः त्या चार स्त्रीमूर्तीकडे पाहून माझ्या मनांत खालील विटाळ्याचें काव्य उद्भूत झालें.

**शिल्पेषु मंदिरं रम्यं रम्यं तत्र विजयालयम् ।**
**तत्रापि च नवरङ्गः तत्र मूर्तिचतुष्टयम् ॥**

तरी तऱ्हेचें नक्षीचें खोदकाम केलेलें दिसतें. देवळ्या-वरून दाराकडे दृष्टी फेकली ह्मणजे काय पाहूं व काय नी पाहूं असें होऊन मनुष्य आश्चर्यमूढ होतो. हा दरवाजा दगडी असून दगडी खांबाच्या चौकटींत बसवलेला आहे. खांबाच्या प्रारंभीं दोन शस्त्रधारी राजदरबारी सालंकार पोशाख केलेले द्वारपाल खोदलेले आहेत; त्याच्या अलीकडे व दरवाज्याच्या चवकटीस लागून रति व मन्मथ या दोन पुराणप्रसिद्ध सुंदर जोडप्याच्या हुबेहुब मूर्ति कोरल्या आहेत. या दोन्ही मूर्तिभोंवतीं सुंदर व वेलाफुलांनीं युक्त अशा महिरपि कोरलेल्या आहेत. मूर्तींचीं घडण खरोखरीच आल्हाददायक आहे. दरवाजाच्या चवकटीवर बारीक नक्षीचें खोदकाम केलेलें आहे. त्याच्या पलीकडे व द्वारपालांच्या मूर्तींच्या वरच्या भागावर व दरवाजाच्या फळकटीवर सर्वत्र काश्मिरी गालीच्यावर नक्षी विणतात त्या तऱ्हेची नक्षी कोरली असून दरवाजाच्या वर पण बाजूस मकर ध्वजाच्या मूर्ति असून नारसिंहावताराचें ( नारसिंहाला सोळा हात दाखविले आहेत ) चित्र खोदलेलें आहे. या दरवाज्यांतून आंत गेलें ह्मणजे मनुष्य नवरंगामध्यें

प्रवेश करतो. हा नवरंग किंवा मुख्य मंडपहि सोंगट्यांच्या पटासारखा असून त्याच्या तिन्ही दारांतून आंत प्रवेश केला ह्मणजे दोन्ही बाजूंस दहा दहा खांबांची ओळच ओळ लागते. प्रत्येक खांब वेगवेगळ्या आकाराचा असून शिवाय एक एक खांब ह्मणजे चित्रकला व इतर कलाकुसरीचें खोदकाम यांचा एक असाधारण मासलाच आहे असें वाटल्यावांचून रहात नाहीं. विशेषतः ज्या चार मधल्या मुख्य खांबांवर नवरंगाचें घुमटवजा शिखर बांधलेलें आहे—व ज्या घुमटाच्या दगडी छतांवर कमलाकार नक्षीकामांत ब्रह्मा, विष्णु महेश या तीन देवांचीं सुंदर चित्रें खोदलेलीं आहेत, ते खांब तर अप्रतिम असून त्याच्या गळथ्यावर तिरप्या बसलेल्या एकसंधीं दगडांवर कोरलेल्या चार स्त्रीमूर्ति मूर्तिकलेचे नयनमनोहर मासले आहेत यांत शंका नाहीं. या नवरंगांत शिरून त्यांतील कलाकुसरीच्या कामाकडे व विशेषतः त्या चार स्त्रीमूर्तीकडे पाहून माझ्या मनांत खालील विटाळ्याचें काव्य उद्भूत झालें.

**शिल्पेषु मंदिरं रम्यं रम्यं तत्र विजयालयम् ।**
**तत्रापि च नवरङ्गः तत्र मूर्तिचतुष्टयम् ॥**

खरोखरीच हिंदुबांधकलेंत देवालयें रम्य आहेत ! त्यांत हें केशव देवालय जास्त रम्य आहे ! यामध्यें हा नवरंग विशेषच रम्य आहे ! त्यातल्यात्यांत या चार स्त्री मूर्ति तर रम्यतम आहेत, यांत शंका नाहीं !

या चार स्त्रीमूर्तिपैकीं पहिली आकृति एका सुंदर व सुभग अलंकारांनीं मंडित अशा स्त्रीची आहे. या बाईनें आपल्या हातावर पोपट घेतला आहे. एकंदर चित्र इतकें उत्तम साधलें आहे कीं त्याकडे सारखें पहात रहावेसें वाटतें. या बाईच्या हातांतील एकसंधी दगडांतून पोखरून काढलेलें कंकण हाताभोवतीं फिरते. कलाविदाचें किती विलक्षण कौशल्य हें ! दुसऱ्या खांबावरील चित्र नाचणाऱ्या सरस्वतीचें आहे. या सरस्वतीच्या डोक्यांतील बिंदीबिजवराहि इकडे तिकडे सरकतो ! तिसऱ्या-खांबावरील बाई आपल्या केशांची लांबच लांब वेणी नीट करीत आहे असें दाखविलें आहे. या चित्रांत स्त्रीच्या कानांत एक लोंबता दागिना कोरलेला आहे. चवथ्या खांबावरील चित्र नर्तकीचें असून ती नखशिखांत दागदागिन्यांनीं अलंकृत असून तिच्या पायांतील नूपूर हुबेहुब कोरलेले आहेत.

या नवरंगांतून पुढें गेलें ह्मणजे देवळाचें मध्यगृह लागतें. यांतहि चार खांब आहेत; पण ते मागाहून वरचें वजन सावरून धरण्याकरितां बसविलेले आहेत, व त्यामुळें त्यांत कलाकौशल्याचें काम मध्यम दर्जाचेंच आहे. मात्र मुख्य गाभाऱ्याचा दरवाजा पुन्हा अप्रतिम कारागिरीनें शोभायमान केलेला आहे. आधीं दोन्ही बाजूस दोन भव्य द्वारपालांच्या मूर्ति कोरल्या आहेत. दरवाजाच्या चवकटीच्या वरच्या अंगास विलक्षण नक्षीकाम केलेलें असून पिसारायुक्त ध्वजाच्या प्रभावळींत लक्ष्मीनारायणाच्या लहानशा सुबक मूर्ति कोरलेल्या आहेत. हा दरवाजाहि वाखाणण्यासारखा आहे. दरवाजा उघडला कीं, सिंहासनावर अधिष्ठित अशी विजयनारायणाची–या देवाचें शिलालेखांतील नांव–सुंदर मूर्ति मनुष्याचें मन वेधते. ही मूर्ति सहा फूट उंचीची आहे. तिला चार हात आहेत; वरच्या दोन हातांत शंखचक्र आहेत व खालच्या दोन हातांत कमल व गदा आहे. देवाच्या दोन्ही बाजूस लक्ष्मी व सरस्वतीच्या मूर्ति आहेत. जयनारायणाच्या मूर्तीच्या डोक्यासभोंवतीं प्रभावळ असून त्यावर दशावताराचीं चित्रें कोरलेलीं आहेत.

याप्रमाणें या देवळाच्या आवारांत प्रवेश केल्या-पासून गाभाऱ्यापर्यंत जाऊन देवदर्शन घेईपर्यंत प्रत्येक दृग्गोचर होणारी गोष्ट आश्चर्यकारक आहे यांत शंका नाहीं. वरें, देवळांतून बाहेर येऊन देवळासभोंवतीं प्रदक्षिणा घालूं लागलें ह्मणजे देवळांत शिरल्यावर जी मनाची स्थिति होते तीच कायम राहते, नव्हे मन जास्तच आश्चर्यचकित होतें. कारण देवळाच्या बाहे-रच्या भिंती व त्यामधल्या एकसंधी दगडी खिडक्या या सर्वांवर सारखीं चित्रेंच चित्रें कोरलेलीं आहेत. रामायण महाभारतांतील व होसल राजांच्या कारकी-र्दींतील प्रसंग यांचे निदर्शक असे चित्रपट सर्वत्र पसरलेले आहेत. तसेंच देवळाच्या वरच्या गळथ्याला टेकून तिरप्या अशा सुमारें चाळीस निरनिराळ्या स्वरूपाच्या स्त्रियांच्या मूर्ति घडवून बसविलेल्या आहेत. पुष्कळ मूर्तींवर कारागिरांची नांवें कोरलेलीं आहेत; तसेंच जागोजागीं शिलालेख कोरलेले आहेत. सारांश हे केशवाचें देवालय ह्मणजे ह्मैसूर प्रांताचाच काय पण सर्व हिंदुस्थानचा एक अद्वितीय अलंकार आहे असें पदोपदीं वाटल्याखेरीज रहात नाहीं.

या देवळाच्या सविस्तर वर्णनानंतर या केशव देवळाच्या आवारांतील दुसऱ्या लहानलहान देवळांचें वर्णन देण्याची अवश्यकता नाहीं; व प्रवासीसुद्धां प्रदक्षणेच्या वाटेवर असलेल्या देवळाकडे नुसती नजर टाकून पुढें जातो. त्याप्रमाणें आह्मीसुद्धां या इतर देवळाकडे पाहिल्यासारखें करून आवारांतून बाहेर पडलों.

येथें खाणावळ वगैरे कांहींएक नसल्यामुळें रात्रीं आह्मांला एका कॉफीगृहांत मिळणाऱ्या फराळावरच गुजराणा करावा लागला. रात्रीं नऊसाडेनवाला आम्हीं बैलगाडींत बसलों तों तीन साडेतीन तासांनीं हलेबिड गांवीं येऊन पोहोंचलों व तेथल्या धर्मशाळेंत पथाऱ्या टाकून सकाळपर्यंत झोंपलों.

सकाळीं उठून पहातों तों हलेबिड हें अगदींच खेडेंगांव दिसलें. येथें कॉफीगृह किंवा एखादें चांगलें दुकानहि नाहीं. जें शहर एका काळीं प्रख्यात असें राजधानीचें शहर होतें, जेथील हिंदु देवळें हिंदु बांधकलेच्या उत्तम कृतींत गणल्या गेलेल्यांपैकीं, ज्या राजधानीची अपार संपत्तीकरितां प्रसिद्धी, अशा शहराची सध्यांची दैन्यावस्था पाहून कालचक्राच्या

फेऱ्यांत रावाचा रंक होतो व नंदनवनाचें वन होतें ह्मणतात त्याचा प्रत्यक्ष प्रत्यय मला या खेड्याची सद्यः स्थिति पाहून आला. आमची मोटार लवकरच येण्याचा संभव होता ह्मणून नित्यविधि आटोपून उपाशीच आह्मी देवदर्शनार्थ निघालों. आह्मी सांगितलेल्या वाटेनें चाललों. जिकडे तिकडे ओसाड रानवट भाग दिसत होता. वस्तीचा कांहींएक मागमूस नाहीं. तेव्हां आह्मीं वाट चुकलों कीं काय अशी आह्मांला शंका आली. पण इतक्यांत पडकी इमारत व त्याच्या मोडक्या-तोडक्या आवाराला अर्वाचीन लोखंडी गजाचें फाटक लागलें. तेव्हां हेंच तें हलेबिडचें देवालय असें माझ्या ध्यानांत आलें व आम्हीं फाटक उघडून आवाराच्या आंत शिरलों.

या देवालयाचें नांव होसलेश्वर देऊळ असें आहे. हें शंकराचें देऊळ आहे. हें देऊळ होसल घराण्यांतील विनयादित्य राजाच्या कारकीर्दींत ( सन १०४७ ते सन ११०० ) बांधलेलें आहे व तें अपुरें राहिलें. कारण देवळावर शिखरें किंवा गोपुरें नाहींत; अर्थात तीं होण्याच्या पूर्वींच होसल राजावर मुसलमानाच्य

स्वाऱ्या येऊन तें काम अर्धवटच राहिलें, पण इतकें अर्धवट आहे तरी झालेलें काम इतकें अप्रतिम आहे कीं हें अपुरें देऊळ बेलुरच्या संपूर्ण व शाबूत देवळा-पेक्षां कांकणभर जास्तच सुंदर आहे असें दोन्ही देवळें पहाणारास म्हटल्यावाचून रहावत नाहीं.

हें देऊळ दुहेरी आहे म्हणजे याचे मधोमध दोन तुकडे केल्यास त्याची दोन एकसारखीं देवळें होतील. बेलूरच्या देवळाप्रमाणें या देवळाचे मुख्य मंडप, मध्य-गृह व गाभारा असे तीन भाग असून शिवाय पुढें नंदीकरितां एक नंदीगृह आहे. हें दुहेरी देऊळ पूर्व-पश्चिम १२२ फूट व दक्षिणोत्तर १६६ फूट आहे. याचे जोतें पांचसहा फूट उंच आहे व देवळाची वरच्या गलथ्यापर्यंत पंचवीस फूट उंची आहे. या देवळाच्या बाहेरच्या भिंती बेलूर देवळाप्रमाणेंच सर्व मूर्तिकलेच्या प्रेक्षणीय मासल्यांनीं शोभायमान झालेल्या आहे. मोठ-मोठ्या दगडांचे वेगवेगळे थर गलथ्यापर्यंत बांधीत नेले आहेत. अशा मोठमोठ्या दगडांनीं सर्व देऊळ बांधून झाल्यावर मग त्या दगडावर खोदकाम केलेलें असावें, कारण कांहीं कांहीं ठिकाणीं मोकळी जागा राहिली आहे.

ज्योत्यापासून वरवर पहात गेलें ह्मणजे प्रत्येक थरावर निरनिराळ्या प्रकारचीं चित्रें व नक्षीकाम खोदलेलें दृष्टीस पडतें व कारागिरांच्या कौशल्याचें, बारीक काम करण्यांत त्यांच्या नजरेचें व कितीहि दिवस लागोत पण धिम्मेपणानें काम शेवटास नेण्याच्या चिकाटीचें क्षणोक्षणीं नवल व कौतुक वाटल्याखेरीज रहात नाहीं. पहिल्या थरावर हत्तीची रांग काढलेली आहे. या हत्तीवर त्यांची अलंकारादिक वस्त्राभरणें कोरलीं असून महातादि स्वारहि कोरले आहेत. ही हत्तींची रांग एकंदर ७१० फूट लांब असून त्यांत सुमारें दोन हजार हत्ती खोदले आहेत.. या थरावरचे दगडावर होसल घराण्याच्या निशाणावरील वाघमाऱ्यांची रांग कोरली आहे. वरच्या थरांत निरनिराळ्या आकाराचें बारीक नक्षीकाम केलें आहे. त्याचे वरचे थरांत घोडेस्वारांची रांग असून त्याचे वरचें थरांत पुनः नक्षीकाम केलें आहे. यांच्या वरचें काम तर याहिपेक्षां विस्मयकारक आहे. आधीं एका मोठ्या थरामध्यें रामायणांतील प्रारंभापासून शेवटपर्यंतच्या सर्व कथाभागांचा चित्रपटच

सर्व देवळाभोंवतीं कोरला आहे. शिवाय शिवपार्वतीचीं चवदा वेळां चित्रें खोदलीं आहेत. विष्णूच्या नऊ अवतारांचीं चित्रें जागोजाग कोरलीं आहेत; व हिंदु-पुराणांतील इतर सर्व प्रमुख देव यांचीं पौराणिक वर्णनाप्रमाणें चित्रें खोदलीं आहेत. त्याचप्रमाणें गंधर्व अप्सरा, नाचणाऱ्या बाया यांची नानाविध पोषाखांत, नानाविध आकारांत व स्वरूपांत चित्रेंच चित्रें कोरलीं आहेत. इतकीं अगणित चित्रें कोरणारांच्या धिम्मेपणाची व कुशलतेची तारिफ करावी तेवढी थोडीच आहे. बेलूरच्या देवळाप्रमाणें या देवळाच्या जाळीदार दगडी खिडक्या प्रेक्षणीय आहेत. याप्रमाणें देवळाचा बाह्य देखावा नजरेखालीं घालून आम्हीं प्रत्यक्ष देवळांत प्रवेश केला. प्रथमच नंदीगृह लागतें. नंदीची मूर्ति भव्य व हुबेहुब आहे. या गृहांतील खांब तर इतके गुळगुळीत आहेत कीं, हे खांब चरकावर घालून त्याला लाकडाप्रमाणें गुळगुळीत केलें आहे कीं काय असा भास होतो. या दगडी खांबांत एकमेकांचें प्रतिबिंब पडतें इतके हे खांब घोटीव आहेत. हा दगडहि इतका टिकाऊ आहे कीं सहाशें वर्षें वारा-

पाऊस, ऊन थंडी वगैरे उष्ण कटीबंधांतील नाशक हवेला न जुमानतां हे दगड नव्यासारखे दिसतात व त्यावरील बारिक नक्षीकाम खोदल्या वेळेसारखें रेखीव व स्पष्ट दिसतें. या नंदीगृहांतून मुख्य मंडपांत गेलें म्हणजे खांबाची रचना व त्यावरील नक्षीकाम दृग्गोचर होतें. बेलूरच्या देवळाप्रमाणें काय पाहूं नी काय न पाहूं असें मनुष्याला होऊन जातें! पण बेलूरइतकें हें देऊळ सुस्थितींत दिसत नाहीं. कोठें चित्रांचीं नाकें तोंडें तोडलेलीं तर कोठें त्यांचे कांहीं भाग छिन्नविछिन्न झालेले दृष्टीस पडतात. पण विशेष दुःखाची गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते ती ही कीं या देवळांत शंकराची पिंडी मुळींच दिसत नाहीं. यासंबंधानें बेलूर व हलेबिड यामध्यें फारच फरक आहे. बेलूरच्या देवळांत देव अधिष्ठित आहेत. त्याची रोज पूजाअर्चा होते. त्यांचा धार्षिक उत्सव होतो. देवाला उत्पन्न असल्यामुळें देवळाची दुरुस्ती होते; यामुळें बेलूरचें देऊळ चालू देवालय वाटतें. पण हलेबिड येथील देऊळ उध्वस्त देवालय आहे असें दृष्टीस पडतें. सारांश हलेबिडचें होसलेश्वराचें देऊळ ह्मणजे हिंदू

बांधकलेचा जुना मोडकातोडका अवशेष असून जुने अवशेष, कलाकृति या दृष्टीनें त्याकडे पाहवें लागतें. इतक्या सुंदर देवळाची देवालयावस्था जाऊन त्याला दैन्यावस्था अलेली पाहून मनाला वाईट वाटतें व ह्मणून हें देऊळ पाहतांच मिश्र मनोविकार मनांत उद्भूत झाल्यावांचून रहात नाहींत. देवळाच्या आवारांत कितीतरी मोडक्या तोडक्या मूर्ति व घडलेले दगड पडले आहेत ! हें देवालय जर पूर्णपणें तयार झालें असतें व जर त्याची झाली तशी नासधूस झाली नसती तर, हें जोड देवालय बेलूरच्या देवालयापेक्षांहि जास्त शोभिवंत व मनांत भरण्यासारखें झालें असतें. पण आहे त्या स्थितींतहि हें देऊळ पाहून मनुष्य आश्चर्यचकित होतो व आपल्या पूर्वजांच्या कलाकौशल्याबद्दल कौतुक व अभिमान वाटल्याखेरीज रहांत नाहीं. अशा तऱ्हेचे विचारांचे व विकारांचें काहूर मनांत चालू असतां आम्हीं देवालयाच्या फाटकाबाहेर पडलों. येथून थोड्या अंतरावर हलेबिडचें दुसरें देवालय आहे. हेंहि शिवाचेंच आहे. हें देवालय होसलेश्वर देवळाच्या नंतरचें असून ते वीर बल्लाळ व त्याची धाकटी राणी अभिनव केतल

पाऊस, ऊन थंडी वगैरे उष्ण कटीबंधांतील नाशक हवेला न जुमानतां हे दगड नव्यासारखे दिसतात व त्यावरील बारिक नक्षीकाम खोदल्या वेळेसारखें रेखीव व स्पष्ट दिसतें. या नंदीगृहांतून मुख्य मंडपांत गेलें म्हणजे खांबाची रचना व त्यावरील नक्षीकाम दृग्गोचर होतें. बेलूरच्या देवळाप्रमाणें काय पाहूं नी काय न पाहूं असें मनुष्याला होऊन जातें! पण बेलूरइतकें हें देऊळ सुस्थितींत दिसत नाहीं. कोठें चित्रांचीं नाकें तोंडें तोडलेलीं तर कोठें त्यांचे कांहीं भाग छिन्नविछिन्न झालेले दृष्टीस पडतात. पण विशेष दुःखाची गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते ती ही कीं या देवळांत शंकराची पिंडी मुळींच दिसत नाहीं. यासंबंधानें बेलूर व हलेबिड यामध्यें फारच फरक आहे. बेलूरच्या देवळांत देव अधिष्ठित आहेत. त्याची रोज पूजाअर्चा होते. त्यांचा धार्षिक उत्सव होतो. देवाला उत्पन्न असल्यामुळें देवळाची दुरुस्ती होते; यामुळें बेलूरचें देऊळ चालू देवालय वाटतें. पण हलेबिड येथील देऊळ उध्वस्त देवालय आहे असें दृष्टीस पडतें. सारांश हलेबिडचें होसलेश्वराचें देऊळ म्हणजे हिंदू

बांधकलेचा जुना मोडकातोडका अवशेष असून जुने अवशेष, कलाकृति या दृष्टीनें त्याकडे पाहवें लागतें. इतक्या सुंदर देवळाची देवालयावस्था जाऊन त्याला दैन्यावस्था अलेली पाहून मनाला वाईट वाटतें व ह्मणून हें देऊळ पाहतांच मिश्र मनोविकार मनांत उद्भूत झाल्यावांचून रहात नाहींत. देवळाच्या आवारांत कितीतरी मोडक्या तोडक्या मूर्ति व घडलेले दगड पडले आहेत ! हें देवालय जर पूर्णपणें तयार झालें असतें व जर त्याची झाली तशी नासधूस झाली नसती तर, हें जोड देवालय बेलूरच्या देवालयापेक्षांहि जास्त शोभिवंत व मनांत भरण्यासारखें झालें असतें. पण आहे त्या स्थितींतहि हें देऊळ पाहून मनुष्य आश्चर्यचकित होतो व आपल्या पूर्वजांच्या कलाकौशल्याबद्दल कौतुक व अभिमान वाटल्याखेरीज रहांत नाहीं. अशा तऱ्हेचे विचारांचे व विकारांचें काहूर मनांत चालू असतां आम्हीं देवालयाच्या फाटकाबाहेर पडलों. येथून थोड्या अंतरावर हलेबिडचें दुसरें देवालय आहे. हेंहि शिवाचेंच आहे. हें देवालय होसलेश्वर देवळाच्या नंतरचें असून ते वीर बल्लाळ व त्याची धाकटी राणी अभिनव केतल

देवी यांनीं सन १२१९ च्या सुमारास बांधलें. हें होसलेश्वरापेक्षां जास्त लहान आहे. पण काळानें व मुसलमानांच्या स्वाऱ्यांनीं या देवळाची जास्त खराबी झालेली आहे. हें देवालय षोडषकोनी आहे व याचें शिखर बारिक निमुळतें होत गेलें आहे. होसलेश्वर देवळाप्रमाणेंच या देवळावरहि जिकडे तिकडे आंतल्या भिंतीवर, बाहेरच्या भिंतीवर, छतावर, व खांबावर चित्रेंच चित्रें कोरलेलीं आहेत. निरनिराळ्या पौराणिक देवतांच्या पौराणिक कथांच्या, गंधर्व अप्सरा, पशूपक्षी, यक्षकिन्नर यांच्या मूर्तींच मूर्ति आणि चित्रपटच चित्रपट कोरलेले आहेत. यांपैकीं बऱ्याच आतां छिन्नविछिन्न झाल्या आहेत. कांहीं जागेवरून पडून गेल्या आहेत, कांहीं भंग पावल्या आहेत. यामुळें सध्यांच्या स्थितींत हें "देवालय मनांत भरण्याजोगें नाहीं हें खरें" आहे. तरी पण देवळाचे राहिलेले अवशेषच त्याचें गतवैभव, त्याचें गतसौंदर्य व त्याचा ललितकलाविषयक अप्रतिमपणा याचें स्मरण करून दिल्याविना रहात नाहींत. सतत शांततेच्या अभावीं, राज्याच्या सारख्या होणाऱ्या उलथापालथींनीं व

धर्माच्या असहिष्णुतेमुळें हिंदू ललितकलाकृतीचा किती लोप व ऱ्हास झालेला असला पाहिजे असा दुःखद विचार हलेबिडचीं देवळें पाहतांना वारंवार मनांत येतो. हें देवालय पाहून झाल्यावर आम्हीं जरा दूर असलेल्या जैन जातीच्या या गावांतील वस्त्या पहावयास गेलों. येथें पूर्वीं पुष्कळच वस्त्या होत्या. पण त्यांपैकीं आतां फक्त तीन अवशिष्ट राहिल्या आहेत. आदिनाथेश्वर, शांतीश्वर व पार्श्वनाथेश्वर या नावांच्या वस्त्या साध्या आहेत. यांत कलाकुसरीचें काम मुळींच नाहीं; किंवा मूर्ती किंवा चित्रें खोदलेलीं नाहींत. तरी पण सुबक, प्रमाणबद्ध इमारती या नात्यानें या इमारतीहि प्रेक्षणीय आहेत यांत शंका नाहीं.

आम्हीं सकाळपासून दोन अडीच तास याप्रमाणें प्रेक्षणीय स्थळें पाहण्यांत घालवून धर्मशाळेंत परत आलों व मोटारीची वाट पहात बसलों. मागें सांगितल्याप्रमाणें येथें फराळाची किंवा चहाकॉफीची दुकानें नसल्यामुळें आम्हांला सकाळपासून थंडा फराळच होता. मोटार एकदाची येऊन त्यांतून दोन तासांनीं आरसीकेरी या स्टेशनला एक दीडच्या

सुमारास पोंहोचेपर्यंत थंड्या फराळावर ह्मणजे उपासावर आह्माला निर्वाह करावा लागला. आरसीकेरीस आल्यावर मात्र स्टेशनवरील खानावळींत आम्हांला सारभात मिळाला व सबंध एक वेळच्या उपासमारीनंतर तो आम्हांस गोड लागला यांत नवल नाहीं. पण येवढें खरें कीं, हीं देवळें पहावयास येणाऱ्या प्रवाशांनीं कांहींतरी स्वतःजवळ फराळाची सामुग्री आणण्यावाचून राहूं नये असा इशारा देणें भाग आहे.

-७-

# म्हैसूरचे दोन धबधबे

निसर्गदेवीची एखाद्या प्रांतावर मेहेरनजर झाली म्हणजे ती आपल्या अपार रत्नभांडारांतून त्या प्रांतावर देणग्यांचा जणूं कांहीं वर्षाव करते. म्हैसूर प्रांताचीच गोष्ट घ्याना. निसर्गदेवीनें त्या प्रांताला नानाविध हवा पाणी व नानाविध सुंदर देखावे दिले आहेत, इतकेंच नाहीं तर सोन्यासारखी दुर्मिळ व बहुमोल धातु आणि लोखंडासारखी कमी मोलाची पण अनंत उपयोगाची लोखंडाची धातु अशी खनिज संपत्ति दिली आहे. वनस्पति व प्राणि यासंबंधानेंहि प्रांत तितकाच संपन्न केला आहे. दुर्मिळ प्रचंड हत्तींपासून तों क्षुद्र पण अति उपयोगी रेशमी किड्यांपर्यंत सर्व जातीचे प्राणी या प्रांताला लाभले आहेत. सुवासिक व म्हणूनच मौल्यवान् चंदनापासून तों नेहमीं लागणाऱ्या जळाऊ लाकडाच्या सहज उगवणाऱ्या कॅझरिना झाडापर्यंत नानाविध वनस्पतिसंपत्ति प्रांताला नजर केली आहे. पण निसर्गदेवीचा वरदहस्त इतक्यावरच थांबला

नाहीं. तिनें पाटबंधाऱ्याच्या द्वारें विपुल धनधान्य उत्पन्न करणाऱ्या लहान मोठ्या नद्या प्रांतामध्यें आणून सोडल्या आहेत व त्या नद्याकरवीं सर्व जगांतहि दुर्मिळ अशा तऱ्हेचे धबधब्याचे नयनमनोहर सृष्टिचमत्कार करविले आहेत. म्हैसूर प्रांतांतील प्रसिद्ध धबधब्यांचें वर्णन या लेखांत देण्याचा विचार आहे.

एकाच प्रांतांत जगप्रसिद्ध असे दोन धबधबे असावे व त्या दोन्ही धबधब्यांपासून प्रांताच्या संपत्तींत भर पडण्यासारखी सोय असावी हें म्हैसूर प्रांताचें व म्हैसूर संस्थानचें केवढें भाग्य! यापैकीं पहिला धबधबा 'शिव समुद्र' हा होय व दुसरा धबधबा 'गिरसप्पा' हा होय. पहिला कावेरी नदीवर असून तो या प्रांतांच्या आग्नेय दिशेस आहे, तर दुसरा शरावती नदीवर असून प्रांताच्या वायव्य दिशेस आहे. कावेरी नदी कूर्गप्रांतांत कावेरीतल नांवाच्या पश्चिम घाटांतील एका उंच ठिकाणाहून निघून प्रथमतः पूर्वेकडे वहात जाते व सिद्धपुर या गांवीं ती उत्तरवाहिनी होऊन कूर्ग व म्हैसूर प्रांतांची शीव बनून म्हैसूर प्रांताच्या हस्सन जिल्ह्यांतील कननूर गांवापर्यंत उत्तरेकडे वहात जाते व

मग सर्व प्रांतभर आग्नेय दिशेकडे वहात ताल-कड गांवापर्यंत जाते; येथून ती ह्मैसूर व मद्रास यांची शीव बनून शिवसमुद्र बेटापर्यंत उत्तर दिशेनें वाहत जाते. ह्या बेटाचें ठिकाणींच चारशे फुट खोल अशी उडी घेऊन शिवसमुद्र नांवाचा प्रसिद्ध धबधबा निर्माण करते. मग मद्रास प्रांतांत वहात जाऊन शेवटीं बंगा-लच्या उपसागरास मिळते. या नदीला जुने बारा पाट-बंधारे आहेत व त्यांनीं हजारो एकर जमीन भिजून प्रांताला सुबत्ता आली आहे. कावेरी नदी फार पवित्र मानलेली असून तिला दक्षिणगंगा ह्मणतात. ह्मैसूर प्रांतांत कावेरीचा प्रवाह चार पांचशे मैलांच्या लांबीचा आहे.

दुसरा धबधबा शरावती नदीवर आहे. कावेरी-पेक्षां ही नदी लैहान आहे. ही शिमोगा जिल्ह्याच्या पश्चिम भागांत तीर्थहळ्ळी तालुक्यांतील नोनबारनजिक अंबुतीर्थ या ठिकाणाहून निघून उत्तरेकडे वहात जाते व जोग गावाजवळ सह्याद्रीपर्वतावरून उडी घेते व गिरसप्पा धबधबा निर्माण करून उत्तर कानडा जिल्ह्यांत वहात जाऊन होनावर येथें आरबी समुद्रास मिळते.

या नदीवरहि पुष्कळ जुने पाटबंधारे असून त्यायोगें शेतकीस पाणी पुरविलें जातें.

आह्मीं प्रथमतः शिवसमुद्र हा धबधबा पाहिला व मग गिरसप्पा पाहिला. पहिला पहाण्यास बंगळुराहून निघालों; व दुसरा पाहण्यास बिरूर स्टेशनहून निघालों. तरी प्रथमतः शिवसमुद्र धबधब्याच्या वर्णनास लागूं.

आह्मीं बंगळूराहून सकाळच्या गाडीनें निघालों. शिवसमुद्र येथला धबधबा व वीज उत्पन्न करण्याचा कारखाना पाहण्याकरितां व तेथें एक दिवस राहाव-याची सोय होण्याकरितां आम्हीं बंगळूराहून एका मोठ्या अंमलदाराचें वीजेच्या कारखान्याच्या मुख्य एंजिनीयरास शिफारसपत्र घेतलें होतें. ह्मैसूर शहराचें वर्णन करतांना बंगळूर ते मद्दूर–शिवसमुद्र धबध-ब्याच्या मार्गाचें स्टेशन–पर्यंतच्या भूमिभागाचें वर्णन मागें केलें आहे तेव्हां त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. पण सुंदर वस्तूचा किंवा प्रदेशाचा हा विशेष आहे कीं तो पुनः पुनः पाहिला तरी कंटाळ-वाणा होत नाहीं; नव्हे पुनः पुनः पाहतांना त्या प्रदे-

शाच्या सौंदर्याच्या अननुभूत स्वरूपाचा आस्वाद घेण्यास सवड सांपडते. मागें सांगितल्याप्रमाणें बंगळूर ते मद्दूर हा रेलवे रस्ता सुमारें पंचेचाळीस मैल आहे. पुढें म्हैसूर पस्तीस मैल उरतें. या पंचेचाळीस मैलाच्या प्रदेशापैकीं क्लोजपेठपर्यंतचा तीस मैलांचा प्रदेश हा बंगळूरच्या पठारापैकीं असून तेथपर्यंत नद्या किंवा पाण्याचे पाट सारखे लागत नाहींत. पण पुढल्या पंधरा मैलांत अर्कावती, कण्व व शिमशा अशा तीन नद्या लागोपाठ लागतात व सर्व प्रांतभर जिकडेतिकडे पाण्याची विपुलता व बागाईती शेती दृग्गोचर होते; व मनाला सारखा आनंद होतो. सुमारें दहा साडेदहा वाजतां आम्हीं मद्दूर स्टेशनला पोंचलों. तेथल्या स्टेशनवर हिंदू हॉटेलांत उपमा ( तिखटमिठाचा सांजा ) व इटंली ( सांदणासारखें एक तांदुळाचें पक्वान्न ) व कॉफी यावर यथेष्ट ताव मारून आम्हीं मोटारींत बसलों, तों बहुतेक बाराचा सुमार झाला. येथून शिवसमुद्र पस्तीस मैल आहे. दोनचार मैल बंगळूर म्हैसूर या मुख्य रस्त्यानें मोटार जाते व मग थेट दक्षिणेकडे शिवसमुद्राला जाणारा फाटा फुटतो.

हा भूमिभाग साधारणतः रुक्ष वाटतो. सुमारें निम्मे घाट चालल्यावर मळवली नांवाचें तालुक्याचें ठिकाण लागतें. येथें मोठा थोरला एक तलाव लागतो व तलावाला खेटूनच रस्ता जातो. मळवली हें गांव म्हैसूर शहराच्या थेट पूर्वेस आहे व म्हैसूरकडून या गांवीं एक रस्ता येऊन मिळतो व हा रस्ताहि बंगळूरास जातो. पण हा रेल्वे रस्त्याच्या जवळून जात नाहीं. तर कंकनहळ्ळी गांवावरून बंगळुरास जातो. ह्मणजे म्हैसूरहून दोन रस्ते निरनिराळया गांवावरून पण सामान्यतः एकमेकांनां समांतर असे जातात. यावरून या प्रांतांतील प्रवाससाधनांच्या विपुलतेची चांगली कल्पना आह्मांला आली. मळवली टाकली ह्मणजे जास्त डोंगराळ व उंचसखल असा मार्ग लागतो व दक्षिणेस व पूर्वेस नीळसर रंगाच्या डोंगरांची रांग दिसूं लागते. हीच नीलगिरी पर्वताची—म्हैसूर प्रांताची दक्षिण दिशेची सीमा होय. आतां रानहि दाट व निबिड लागूं लागतें. याप्रमाणें क्षणोक्षणीं बदलणारी सृष्टिशोभा पहात पहात आह्मीं शिवसमुद्र येथें दोन अडीचच्या सुमारास येऊन पोंचलों. जेथें तीस पसतीस वर्षांपूर्वी हिंस्र

पशुपक्षांनीं गजबजलेलें व ह्मणून मनुष्यप्राणी सहसा न फिरकणारें निबिड रान होतें, त्या ठिकाणीं मनुष्यांनीं गजबजलेलें व विजेच्या दिव्यांनीं अलंकृत केलेलें अर्वाचीन तऱ्हेच्या बंगल्यांनीं व कारखान्याच्या मोठमोठ्या इमारतींनीं व्यापलेलें लहानसें टुमदार गांव पाहून मनाला विलक्षण आश्चर्य वाटलें व मानव सामर्थ्याचें कौतुक वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. आम्हीं बंगळुराहून एक मोठ्या अंमलदाराचें पत्र घेऊन आल्यामुळें आह्माला सरकारी रहदारी बंगल्यांतील उत्तम तऱ्हेनें शृंगारलेली खोली रहावयास मिळाली. तेथें आम्हीं चहा मागविला व उत्तम तऱ्हेचा चहा व बिस्किटें पुष्कळ दिवसांनीं खावयास मिळाल्यामुळें आम्हीं त्याचा यथेच्छ समाचार घेतला व मग पोशाख बदलून मुख्य एंजिनीयर साहेबाकडे गेलों व त्यांनां आणलेलें शिफारसपत्र दिलें. हे युरोपीयन गृहस्थ होते. ते बाहेर आले व त्यांनीं आह्मांस आपला शिपाई आपल्या मदतगार एंजिनीयराकडे घेऊन जाण्यास दिला व ते विजेचा कारखाना दाखवितील असें सांगितलें. आम्हीं एंजिनीयर साहेबांचा निरोप घेऊन दुय्यम एंजिनी-

यरच्या बंगल्यांत गेलों. हे गृहस्थ इंडियन् होते व ते मुंबईच्या विजेच्या ट्रामवे कंपनींत कांहीं वर्षें असल्यामुळें दक्षिणी लोकांशीं त्यांचा बराच स्नेहसंबंध होता, व विशेषतः मुंबईच्या डॉ. भाजेकर कुटुंबाशीं त्यांचा विशेष घरोबा होता. यामुळें आह्मांलाहि एंजिनीयर साहेबाविषयीं आपलेपणाची भावना आली व त्यांनीं प्रथमतः विजेचा कारखाना पाहून मग सावकाश सायंकाळीं शिवसमुद्र धबधबा पाहण्यास जावें अशी सल्ला दिली व त्यांचे घरीं कॉफी घेऊन आम्ही लागलीच कारखाना पाहण्यास निघालों.

कावेरी नदीचा पुण्याच्या पर्वतीशेजारून जाणाऱ्या पाटायेवढा मोठा पाट रहदारी बंगल्याशेजारून वहात होता. त्याच्यावर जागोजाग पलीकडे जाण्यास पूल केले होते. हा पाट चारी बाजूंनीं बांधलेल्या बऱ्याच लांबरुंद अशा हौदांत आणून सोडला होता व या हौदांतून निरनिराळ्या पाण्याच्या बारा नळांनां पाणी पुरविलें जात होतें. या हौदाला लागूनच विजेच्या कारखान्याचा एक भाग होता. तेथें एंजिनीयरसाहेब आह्मांस घेऊन गेले. व निरनिराळ्या ठिकाणीं वीजेचा

प्रवाह धाडण्याची व्यवस्था कशी केली जाते हें त्यांनीं आह्मास समजून सांगितलें. या ठिकाणीं आह्मांला सर शेषाद्रि आय्यर ह्मैसूर संस्थानचे एक प्रख्यात दिवाण यांचे तैलचित्र दाखविण्यांत आलें व एंजिनीयर साहेब मोठ्या अभिमानानें ह्मणाले "आजचा हा लाखो रुपयांचा संस्थानला उत्पन्न देणारा व संस्थानच्या औद्योगिक प्रगतीला प्रत्यक्ष रीतीनें व अप्रत्यक्ष रीतीनें मदत करणारा प्रचंड कारखाना तुम्हीं पाहतां आहांत, या योजनेचें जनकत्व कल्पक व धोरणी शेषाद्रि आय्यर दिवाणांकडे आहे. त्यांनींच त्या हजारो वर्षें वहात असलेल्या धवधव्याला अर्वाचीन शास्त्रीय यंत्राला जुंपून वीज उत्पन्न करण्याची कल्पना काढली. तेव्हां त्यांनां लोक हंसले; पण त्यांनीं धीरानें आपली योजना अल्प प्रमाणावर का होईना अंमलांत आणली. त्यांनीं प्रथमतः एका नळावर एक वीज उत्पन्न करण्याचें यंत्र ( टरबाईन ) आणवून पांच हजार हॉर्सपावर शक्ति निर्माण करण्याचा कारखाना काढला. त्याच लहानशा कारखान्याला सध्यांचें प्रचंड व अवाढव्य स्वरूप आलें आहे. सध्यां येथें दहा नळावर दहा टरबाईन्स

चालू आहेत व पन्नास हजार हॉर्स पावर शक्ति निर्माण होत आहे. आणखी दोन नळ घालण्याचें काम चालू आहे व तें पुरें झालें ह्मणजे साठ हजारांवर हॉर्स पावर शक्ति या धबधब्याच्या पाण्यावर निर्माण होऊं लागेल. ही हकीकत ऐकून आह्मीं आश्चर्यानें थक्क झालों व शेषाद्रि आय्यर या दिवाणांच्या कल्पकतेबद्दल, त्यांच्या धोरणीपणाबद्दल व त्यांच्या संस्थानच्या प्रगतीपर कारभाराबद्दल आह्मांला कौतुक वाटलें व शेषाद्रि आय्यर यांचेबद्दल आदरबुद्धि उत्पन्न झाली व आमच्या मोठमोठ्या संस्थानांत आमच्या लोकांच्या कर्तबगारीला अजून थोडाफार वाव आहे असें मनांत येऊन म्हैसूर संस्थानच्या कारभाराबद्दल अनुकूल ग्रह झाला. पण लागलीच आमच्या कित्येक संस्थानांत किती अंदाधुंदी आहे, युरोपीयनांची वरणी लावण्याची कशी घातुक पद्धति चालू आहे व किती तरी संस्थानिकांनां आपल्या चैनीपलीकडे कांहींएक दिसत नाहीं या गोष्टी मनांत येऊन म्हैसूरच्या महाराजाप्रमाणें आमच्या इतर संस्थानिकांचे कधीं डोळे उघडणार व त्यांच्या संस्थानांत प्रगतीपर कारभार

सुरू होणार असे निराशेचे व दुःखाचे विचार मनांत आले, पण या विरोधी विचारांनां दाबून व शेषाद्रि आय्यरबद्दल प्रशंसापर उद्गार काढीत आह्मी कारखान्याच्या इमारतीमधून बाहेर पडलों व वीज उत्पन्न करणाऱ्या डोंगराच्या तळाशीं असलेल्या कारखान्याकडे जाण्याकरितां विजेच्या पाळण्याशीं आलों. येथें आलें ह्मणजे खरोखरीच भीति वाटते. समोरच भीषण डोंगरांची ओळ दिसते व आह्मी उभे होतों तो डोंगर व समोरचा डोंगर यामध्यें एक खोल चिळण आहे. तिचें तळाशीं 'बिजली घर' आहें. तें चारशें फूट खोल आहे व तेथें विजेच्या पाळण्यानें जाण्यायेण्याची सोय आहे. एका भल्या थोरल्या लोखंडाच्या दोरखंडावर एकावर एक अशीं चढतीं तीन बाकें मावतील येवढे प्लॅटफॉर्म अडकविलेले आहेत व विजेनें त्यांनां गति दिली ह्मणजे एक प्लॅटफॉर्म सरकन् खालीं जातो व एक वर येत जातो. हा सर्व शिडीसारखा मार्ग फरसबंद आहे व त्यावर रूळ टाकून त्यांतून हे प्लॅटफार्म सरकन् जातात. खालीं जातांनां सूं सूं असा आवाज निघतो. या बाकावरून खालीं

जातांना खरोखरीं फार भय वाटतें. जर का दोरखंड तुटला तर कपाळमोक्ष व्हावयाचा असें क्षणोक्षणीं वाटतें. पण लवकरच मनुष्य खालीं जमिनीवर उतरतो व एकदाचे जमिनीला पाय लागले ह्मणून समाधान वाटतें, तोंच सभोंवारचे उंच उंच डोंगर पाहून आपण पाताळांत आल्याप्रमाणें वाटतें. वीज उत्पन्न करण्याच्या कारखान्याची इमारत तीन मजली आहे. अगदीं खालच्या मजल्यावर टरबाईन्स ठेवलेलीं असतात. तेथें प्रत्येक नळानें आलेलें पाणी अगदीं बारिक बारिक धारांनीं खूप जोरानें त्या टरबाईन्सवर सोडलें जातें. या वाहिधारांनां इतका जोर असतो ह्मणतात कीं, त्यानें बोट कापून निघेल. पण हीं सर्व यंत्रें पत्र्यानें झांकलीं असल्यामुळें आपल्या दृष्टीस कांहींच पडत नाहीं. टरबाईनच्यायोगानें जी गति उत्पन्न होते त्या गतीनें डायनामो सुरू होतात व त्या योगानें विजेचा प्रवाह सुरू होतो. हें सर्व काम तळमजल्यांत होतें. वरच्या मजल्यांत मग वीजेच्या प्रवाहाची कमी अधिक शक्ति करण्याची व वीज निरनिराळ्या ठिकाणीं पाठविण्याची निरनिराळ्या प्रकारचीं यंत्रें आहेत. अश-

जनांनां हे विजेचे कारखाने ह्मणजे गौडबंगाल किंवा जादूगिरीच वाटते असें मी स्वानुभवावरून सांगतों. कारण विद्युद्शास्त्राचा विशेष अभ्यास केल्याशिवाय यंत्रें व त्यासंबंधींचे पारिभाषिक शब्द याचा खरा अर्थबोध होत नाहीं, हें मला कबूल केलें पाहिजे. एंजिनीयरसाहेब आपल्याकडून सविस्तर हकीकत सांगत होते व आम्हीं समजलें आहे असें दाखवीत होतों येवढें मात्र खरें. याप्रमाणें कारखान्याचें सर्व मजले पाहून झाल्यावर आम्हीं पुनः तळमजल्यावर येऊन इमारतीच्या पुढील व्हरांडयांत आलों. येथें मात्र आम्हांला प्रत्यक्ष दिसणारा अवर्णनीय देखावा नजरेखालीं घालून आश्चर्य व आनंद अनुभवण्यास सांपडला. सर्व बाराहि नळांचें पाणी व नदीचें पाणी चिंचोळ्या अशा चिळणीतून विलक्षण जोरानें वहात जात होतें. पाण्याच्या जोराच्या वेगानें सर्व पाणी फेंसाळ झालेलें होतें. समोरत्र हिरवीगार उंच डोंगराची ओळ दिसत होती. कावेरीनदी अशा दोन तीन मैलांच्या बिकट चिळणीतून वहात जाऊन मग म्हैसूर हद्द टाकून तळकोंकणासारख्या मद्रास इलाख्यांतील सालेम जिल्ह्याच्या सखल व सपाट प्रदेशांत

वहात जाते. या विलक्षण देखाव्याची शोभा व भीति-प्रद भव्यता पहात आम्हीं त्या व्हरांड्यांत कितीवेळ तरी उभे होतो! नंतर एंजिनीयर साहेबाबरोबर पुन्हां त्या विकट साखळदंडाच्या मार्गानें वर आलों. एंजिनीयर साहेबांनीं येथें आमचा निरोप घेतला व धवधवा दाखविण्याकरितां आपला एक मनुष्य आमच्या बरोबर दिला. त्या मनुष्याला घेऊन आम्हीं आमच्या रहदारी बंगल्यांत आलों. तेथें अर्धापाऊण तास विश्रांति घेऊन मग धवधव्याकडे जाण्यास निघालों.

श्रीरंगपट्टणप्रमाणें शिवसमुद्र हेंहि एक कावेरी नदीमधील बेट आहे व त्याच्या दोन्ही प्रवाहांनीं डोंगराखालीं खोल उड्या टाकल्यामुळें गगनचक्की व बारचक्की नांवाचे दोन धवधवे बनले आहेत. गगनचक्की हाच धवधवा हल्लीं विजेच्या कारखान्याच्या वस्तीजवळ आहे व बहुतेक प्रवाशी येवढाच धवधवा पाहतात. आम्हींहि तसेंच केलें.

हा धवधवा पाहण्याचें ठिकाण आमच्या बंगल्या-पासून तीनचार फर्लांगावर असेल. तेथें एक झोपडी-वजा लहान खोपट आहे. तेथून धवधवा उत्तम तऱ्हेनें

पाहतां येतो. नदीचा फांटाच्या फांटा प्रचंड खडकाच्या भिंतींवरून खालीं दोन अडीचशें फूट उडी घेतांना दिसतो. पाण्याच्या दोनतीन धारा झाल्यासारख्या आहेत. पाणी जेथें पडतें तेथें मोठी एक विहीरच झाली आहे व त्यांतून उकळणाऱ्या पाण्याप्रमाणें वर फेंस व बुडबुडे सारखे येत असतात. झोपडीच्या जरा खालीं उतरलें ह्मणजे धवधब्याच्या फेंसमय व तुषार-मय पाण्याच्या ढगांतून कांहीं तुषार आपल्या अंगाला स्पर्श करतात. पाहण्याचें ठिकाण बरेंच दूर व उंच असतां पाण्याच्या प्रवाहाच्या पडण्याचा वेग इतका मोठा व जोराचा आहे कीं, तुषाराचा वर्षाव त्या ठिकाणा-पर्यंत पोंचतो. धवधब्याच्या प्रवाहाचे पाण्याला जणूं कांहीं लहरी मारतां आहेत असा भास होतो. सभोंवार जिकडे तिकडे भुरटें हिरवळ, रान व काळसर खडक दिसतात व मध्येंच हा शुभ्र पाण्याचा पाढऱ्या पाट निळ्या आकाशांतील आकाशगंगेप्रमाणें भासतो. खरोखरीच हा धवधबा फार भव्य व रमणीय आहे यांत शंका नाहीं. कर्नाटक प्रांतांतील पाव-साळ्यांतल्या गोकाकच्या धवधब्या–गोकाक स्टेशन-

नजिक बंधाऱ्यावरून पडणारें पाणी धवधवा नव्हे– पेक्षां शिवसमुद्र हा धवधवा रुंदीला कमी आहे; पण त्या धवधब्याच्या दुप्पट तिप्पट खोल आहे. गोकाकचा धवधवा घटप्रभा नदीच्या सर्व प्रवाहाचा झाला आहे. यामुळें आकारानें तो मोठा आहे. सर्व नदीच्या नदी ऐंशी फुटाची उडी घेतांना तेथें दिसते. शिवसमुद्र येथील धवधवा निरनिराळ्या धारांचा झालेला आहे. पण त्या धारा फार खोलवर जातात. गोवेप्रांतांतील कॅसलरॉक स्टेशननजिकचा 'दुधसागर' हा धवधवा शिवसमुद्रापेक्षां जास्त उंचीवरून पडतो खरा. पण तो फार लहान आहे. पावसाळ्यांत खंडाळ्याच्या घाटांत ज्या प्रकारच्या पाण्याच्या धारा खोल दरींत वहात जातात तशा तऱ्हेचा दुधसागर छोटेखानी धवधवा दिसतो. शिवाय दुधसागर हा धवधवा मनुष्य खालून पाहतो. कारण येथें डोंगर फारच उंच आहे व तेथें जातां येत नाहीं. दुधसागर येथला देखावा सृष्टि-सौंदर्याच्या दृष्टीनें जास्त चित्ताकर्षक आहे. पण शिव-समुद्र हा धवधवाच जास्त चित्ताकर्षक आहे यांत शंका नाहीं. आह्मांला पुढें कांहींएक पहावयाचें राहिलें

नव्हतें ह्मणून हा धबधबा आह्मीं अगदीं काळोख पडेतो-पर्यंत पहात राहिलों होतों. नंतर नाइलाज ह्मणून परत रहदारी बंगल्यांत आलों. रात्रीं एका हिंदू खाणावळींत जेवण केलें. आदल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें आमचा मोटारवाला सकाळींच बंगल्याशीं आला व त्यानें आह्मांला बंगळूरपर्यंतचा सर्व सुमारें ऐंशी मैलाचा प्रवास मोटारीनें करण्याची सल्ला दिली. कारण मद्दूरहून त्याच्या कंपनीचीच मोटार लागलीच निघावयाची होती. शिवाय मोटारचें भाडेंहि आगगाडीच्या भाड्या-पेक्षां फारसें जास्त नव्हतें. तेव्हां आह्मी मोठ्या खुशीनें मोटारवाल्याचें ह्मणणें कबूल केलें. शिवाय म्हैसूर प्रांतांतला ऐंशी मैलाचा प्रदेश आपल्या नजरेखालून जाईल हा आह्मांला या प्रवासाचा अधिक फायदाच वाटला. असो.

दीड तासांतच आह्मीं मद्दूरला पोंचलों व लागलीच बंगळूरच्या मोटारींत बसलों. रस्ता उत्तम असल्या-मुळें इकडल्या मोटारी तासीं वीस मैल सहज प्रवास करतात. म्हैसूरचा हा भाग बऱ्याच दाट वस्तीचा असावा असें वाटलें. कारण मैल दोन मैलाच्या अंतरानें

गांवें लागत. प्रत्येक गांवाच्या आधीं त्या गांवची पाटी स्टेशनच्या पाट्याप्रमाणें दृष्टीस पडे. तसेंच नदीचा पूल आला कीं नदीच्या नांवाची तशीच पाटी दृष्टीस पडे. येथें मैलाचे खांबहि छातीभर उंच आहेत. यामुळें मोटारींतून जलद जातांनासुद्धां मैलाचे आंकडे स्पष्ट दिसतात. या रस्त्यानें प्रवास करतांना म्हैसूर संस्थानच्या पब्लिक वर्क्स खात्याबद्दल अनुकूल ग्रह झाल्यावांचून रहात नाहीं. इकडील रस्तेहि चांगले आहेत व प्रवाशांनां मार्गदर्शक अशा सोयी केलेल्या आहेत. या भागांतून प्रवास करतांना मोटारीचा प्रसारहि इकडे पुष्कळ आहे असें दृष्टोत्पत्तीस येतें. आम्हीं मद्दूरहून निघालों तोंच दुसरी एक मोटार बंगळूरास* जाणारी निघाली व आमची मोटार व ही मोटार यांच्यामध्यें वाटेवरचे प्रवाशी मिळविण्याची मोठी चढाओढ दिसली. वाटो-वाट व जवळ जवळ गांवें लागतात असें नुकतेंच सांगि-तलें व अशा प्रत्येक गांवीं पुढच्या गांवीं जाणारे मधले प्रवाशी भेटत. आमची मोटार एका गांवीं माणसें घेण्यास थांबली कीं दुसरी मोटार तेथें न थांबता आमच्या पुढें आघाडी मारी व पुढच्या गांवचे लोक ती मिळवी.

मग आमची मोटार जलदी करून त्या मोटारीच्या पुढें जाऊन पुढल्या गांवची गिऱ्हाइकी मिळवी. याप्रमाणें बंगळूरला पोहोंचेपर्यंत या दोन मोटारींची चढाओढ चालली होती. यामुळें आम्हीं दोन तासांतच बंगळूरला येऊन पोचलों. याप्रमाणें शिवसमुद्र धबधब्याची आमची सफर मोठ्या मजेनें व आनंदानें पार पडली. आतां गिरसप्पाच्या धबधब्याच्या वर्णनास लागणें बरें.

या लेखमालेंत उल्लेख केल्याप्रमाणें म्हैसूरच्या आमच्या नाताळांतील सफरीमध्यें आम्हीं प्रथमतः गिरसप्पा धबधबा पाहिला. आम्हीं सांगलीहून सकाळच्या दहाच्या गाडीनें निघून दुसऱ्या दिवशीं दहा अकाराच्या सुमारास बिरूर स्टेशनला आलों. येथून शिमोगापर्यंत रेलवे फांटा आहे. बिरूर येथें स्टेशनच्या खाणावळींत सारभात-या प्रांताचें नेहमीचें अन्न-खाऊन आम्हीं गाडींत येऊन बसलों. पण गाडी दोहोंच्या सुमारास एकदाची सुटली व आम्हीं मार्गस्थ झालों. बिरूर हें म्हैसूरच्या कडूर जिल्ह्यांतील ठिकाण आहे. पुढलें स्टेशन तारिकेरी हेंहि या जिल्ह्यांत आहे व तें येण्या-पूर्वीं लहान लहान दोन पूल लागतात. पण ते नका-

शावरून एकाच नदीवर आहेत असें कळून येतें. या स्टेशनवर वांवूच्या काठ्यांचे ढीगचेढीग, काठ्यांनीं भरलेल्या वाघिणीच्या वाघिणी दिसतात व शिमोगा जिल्हा जंगलाकरितां प्रसिद्ध आहे त्याचें पूर्वचिन्हच येथें दृष्टीस पडतें. तारिकेरी टाकून पुढें गेलें ह्मणजे सपाटीचा मुलुख संपून डोंगराळ व दाट जंगलाचा मुलुख लागतो व शिमोगा जिल्ह्यांत शिरल्याचें प्रत्यंतर येतें. थोड्याच वेळांत भद्रावती स्टेशन लागतें. येथें माणसांची खूप गर्दी दिसते. येथून जवळ म्हैसूर संस्थानचा नवाच काढलेला लोखंडाचा कारखाना आहे. तो पाहण्यासारखा आहे असे गाडींतल्या मंडळींनीं सांगितलें व एका गृहस्थानें तर आह्मांस तेथें उतरण्याचा आग्रह केला. पण ठरल्याप्रमाणें आह्मांला शिमोगाला गेलें पाहिजे परत येतांना साधल्यास व सवड झाल्यास येथें उतरूं असें, सांगून त्या गृहस्थाची समजूत घातली. येथें भद्रा नदीवर सुंदर पूल आहे. येथील भद्रा नदी व पुढें बारातेरा मैलावर असलेली तुंगा नदी या दोन नद्या मिळून तुंगभद्रा नदी झाली आहे. या दोन्ही नद्या उत्तरवाहिन्या असून कुडली–भद्रावती व शिमोगा

या गांवाच्या उत्तरेस मधोमध असलेलें एक मठस्थान-येथें त्यांचा संगम होऊन ही संयुक्त तुंगभद्रा नदी तशीच उत्तरवाहिनी वहात राहून तिला हरिहर येथें हरिद्रा नांवाची तिसरी नदी मिळून पुढें उत्तरेस वहात जाऊन शेवटीं कृष्णेला मिळते. म्हैसूर प्रांताच्या बऱ्याच भागाला ही नदी प्रांतसीमाच आहे. भद्रावती स्टेशनला गाडी बराच वेळ थांबते. पण शेवटीं एक-दांची गाडी चालू झाली व आतां लवकरच शिमोग्याला पोंचणार ह्मणून मनाला आनंद वाटला. येथूनहि पुष्कळ जंगली मुलुख लागतो. सुमारें सहा वाजतां आह्मीं शिमोगा स्टेशनवर आलों. बत्तीसपस्तीस मैल आगगाडीच्या प्रवासाला तब्बल चार तास लागलेले पाहून आमच्या एम्.एस्.एम्. रेलवेनें, तिचें थट्टेचें नांव अत्यंत सावकाश वेगाची 'गाडी ( Most slow motion Railway ), खरोखरच अन्वर्थक करून दाखविलें असें आह्मांला वाटलें. स्टेशनवर मोटारी 'उभ्या होत्या. दुसऱ्या दिवशीं सकाळींच गिरसप्पा धबधब्याला जाणाऱ्या मोटारीचा म्यानेजर आह्मांला सुदैवानें भेटला व मग दुसऱ्या दिवशीं त्याच्याच मोटारीनें जाण्याचें

ठरवून त्याच्या मोटारींत वसून आम्हीं शिमोगा गावांत मॉडर्न हिंदू हॉटेल नांवाच्या नव्या धर्तीच्या खाणावळींत आलों, तों माझे पुण्याचे कॉन्ट्रॅक्टर स्नेही रा. गोखले जणुं कांहीं आमचें स्वागत करण्याकरितां टुमदार इमारतीच्या खुल्या व्हरांड्यांत उभे होते. पर प्रातांत आपल्या प्रांतांतला व आपली भाषा बोलणारा अनोळखी गृहस्थ भेटला तरी आनंद होतो, मग तर माझे निकट स्नेही भेटल्यामुळें मला किती आनंद झाला असेल हें सांगणें नकोच. "तुह्मीं इकडे कोणीकडे" ह्मणून मी गोखल्यांनां उत्सुकतेनें प्रश्न केला. तेव्हां ते ह्मणाले मी व माझे एक भागीदार यांनीं एक एंजिनीयरिंग कामाचें कंत्राट घेतलें होतें तें आतां पुरें झालें आहे. व सध्यां त्याच्याहीपेक्षां एका मोठ्या कामाचें आम्ही टेंडर दिलें आहे व त्यासंबंधीचा निकाल या आठवड्यांत व्हावयाचा आहे ह्मणून मी येथें आलों आहे. हें ऐकून मी त्यांचें त्यांच्या साहसाबद्दल अभिनंदन केलें. खरोखरी मुंबई इलाख्यांत परप्रांताचे कॉंट्रॅक्टर येऊन मोठमोठीं कामें करून पैसे मिळवितात तर आपल्या लोकांनीं परप्रांतीं जाऊन तेथें कामें करून

पैसे कां आणूं नये. ‘साहसे श्री प्रतिवसति’ असें ह्मणतात तें खोटें नाहीं. याप्रमाणें माझे मनांत विचार आले. इतक्यांत म्यानेजर साहेबांनीं आमची खोली आह्मांस दाखवून दोशी–आंबोळी व कॉफीच्या कपाचें ताट आणून पुढें ठेवलें व आम्हीं गोष्टी बोलत बोलत कॉफीपान केलें. गोखल्यांनीं आमचे बरोबर दुसऱ्या दिवशीं गिरसप्पाच्या धबधब्याला यावयाचें कबूल केलें व त्याप्रमाणें त्यांनीं तिकीटहि विकत घेतलें. पण त्यांनां सकाळींच एंजिनीयरकडून भेटण्याबद्दल निरोप आल्या-मुळें त्यांनां व आह्मांला थोडें वाईट वाटलें खरें. पण तुह्मांला कंत्राट मिळून येथें मोठें एक काम तुमचे हातून यशस्वी रीतीनें तडीस जावो अशी आशा प्रदर्शित करून आह्मीं सकाळीं साडेसात वाजतां शिमोग्याहून गिरस-प्प्याला जायला मोटारींत पाय ठेवला. असो.

मागें एकदां सांगितलें आहे कीं, हा जिल्हा एकंदर जंगली आहे. त्याचा अनुभव पदोपदीं येतो. शिमोगा गांव बरेच मोठें आहे. तें टाकल्यावर दोन्ही बाजूस दाट झाडी व मध्यें पांढरा पांढरा रस्ता असा सारखा देखावा दिसतो. मध्यें मध्यें भातशेत जमीन लागते.

सरकारी राखीव जंगल जागोजाग ठेवलें आहे व त्या जंगलाला निरनिराळ्या गांवांवरून नांवें दिलेलीं आहेत. अशा पाट्या वाटोवाट लागत. यामुळें जाणाऱ्या येणाऱ्याला संस्थानच्या कारभाराची टापटीप, व्यवस्थितपणा व परक्या प्रवाशाला सहज जातां जातां माहिती देण्याची दक्षता दिसून येतें. शिमोगापासून अकरा मैलावर आयनूर नांवाचें गांव लागतें. येथून हरिहरकडे जाणारा रस्ता उजव्या हातास लागतो. आणखी चार मैलांनीं कुमशी म्हणून जरा मोठें गांव लागतें. येथून अनंतपुर अकरा मैल आहे. शिमोग्यापासून अनंतपुर पंचवीस मैल आहे. आपण पश्चिम दिशेला जात असतो व सर्व रस्ता उंचसखल टेकड्यांच्या रांगामधून चालला आहे व सर्व नद्या नाल्याचा ओघ आपल्या उजव्या बाजूस म्हणजे उत्तरेस आहे असें दृष्टीस पडतें. म्हणजे या भूमिभागाचा उतार दक्षिणकडून उत्तरेकडे गेला आहे. दोन उंचवट पठाराचा भाग हा सर्व जंगलानें व रानानें व्याप्त असावयाचा व या दोन पठारामध्यें सखल व सपाट भातशेत जमीन लागावयाची असा सारखा देखावा दिसतो. शिवाय

दुसरी एक विशेष गोष्ट ध्यानांत येते ती ही कीं, अशा प्रत्येक दोन उंच पठाराचें मधल्या सखल जागेच्या डाव्या बाजूस तलाव हा असावयाच व तो रस्ता कर-तांना आपोआप साधलेला दिसे. ह्मणजे या सखल भागांतून रस्ता येतांना तीनचार फुट तरी भराव टाकलेला असावयाचा व साहजिकपणें भूमिभागाचा उतार दक्षिणेकडून उत्तरेकडे असल्यामुळें रस्त्याच्या डाव्याहातास तलाव व उजव्या हातास त्या तलावाखालीं भिजणारी जमीन लागे; ह्मणजे म्हैसूर संस्थानचें पब्लिक वर्क्स खातें व शेतकी व पाटबंधारा हीं खातीं यांचें काम एकमेकांनां पोषक होईल अशा तऱ्हेनें चाललेलें असावें असा अंदाज परस्थांनांसुद्धां सहज करतां येतो. हा भूमिभाग कांहींसा कोंकणांतल्या कुलावा जिल्ह्यांतील भागाप्रमाणेंच आहे. आमच्या मुंबईसरकारच्या पब्लिक वर्क्स खात्यानें याप्रमाणें जर नागोठण्यापासून दक्षिणोत्तर जाणारा पोलादपूरपर्यंतचा पन्नास साठ मैलाचा रस्ता या पद्धतीनें बांधला असता तर असे कितीतरी तलाव या कोंकण प्रातांत आपोआप बांधतां आले असते व हल्लींची त्या भागांतील चार महिन्यांची पाण्याची

हाकाटी पार नाहींशी झाली असती असें माझ्या मनांत त्यावेळीं आलें पण असल्या पश्चात् बुद्धीचा किंवा एका खासगी व्यक्तीच्या कल्पनेचा उपयोग काय? त्याला मूर्त स्वरूप येणार कसें असेंहि त्याबरोबर माझ्या मनांत आलें. असो.

अनंतपूर टाकल्यावर समोरच भला मोठा डोंगर लागतो व या डोंगरावर जंगल खूप व विलक्षण दाट आहे व येथून पांढरवट जमीन जाऊन तांबडी जमीन व डोंगर लागतात. येथें घाटासारखाच रस्ता झाला आहे व फिर रानातून जातांना एक प्रकारची भीति वाटते, इतकें हें जंगल उंच, दाट, निबिड आहे. या डोंगराच्या माथ्यावर आल्यावर कृष्णा बेसिन व अरेबियन सी बेसीन अशा दोन भल्या मोठ्या अक्षरच्या पाट्या आमच्या दृष्टीस पडल्या. कोठें शेकडो मैलांवर कृष्णा-नदी व कोठल्याकोठें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्या पलीकडचा अरबी समुद्र! असें मनांत येऊन या पाट्या कोड्याप्रमाणें प्रथमतः वाटल्या. पण बिऱ्हाडीं आल्यावर व म्हैसूर गॅझीटीयर पाहिल्यावर या पाट्यांचा पूर्ण खुलासा झाला. अनंतपुराजवळचा भाग २१०० फुट

उंच आहे. पश्चिमेकडलें सागरगांव व टलेगुप्पें हीं गांवें सुमारें १९०० फुट आहेत; तर पूर्वेकडचें शिमोगा पुनः तितकेंच १९०० फुट आहे. ह्मणजे अनंतपूरजवळचा हा डोंगर माथा हा दोन बाजूच्या पाणलोटीचा माथा आहे. या डोंगराच्या पलीकडच्या भूमिभागाचें पाणी कोणत्याहि दिशेनें वहात गेलें तरी तें शरावती नदी व इतर नद्या यांच्या द्वारें शेवटीं अरबी समुद्राला मिळतें व या डोंगरांच्या अलीकडच्या सर्व भूमिभागाचें पाणी तुंगभद्रा व इतर नद्या यामधून शेवटीं कृष्णानदीला जाऊन मिळतें. असा या पाट्यांचा स्पष्ट अर्थ कळून आह्मांला म्हैसूर दरबारच्या पब्लिक वर्क्स खात्याच्या, परकीय प्रवाशांनां पाट्यांच्या द्वारें प्रांताबद्दल व त्यांच्या साधारण घडणीबद्दल माहिती देण्याच्या, योजनेबद्दल कौतुक वाटलें. हा डोंगर टाकल्यावर पुनः साधारण सपाटीचा भूमिभाग लागला व बारा वाजण्याचे सुमारास आम्ही सागर या मोठ्या गांवीं आलों. येथें दोनतास आमचा मुक्काम झाला. कारण येथें शिरशीहून मोटार येऊन ती पुढें गिरसप्पाकडे जावयाची असते. वाट पहातां पहातां शेवटीं एकदाची

तिकडली मोटार आली व आम्हीं मोटारींत जाऊन बसलों व लागलीच मोटार सुरू झाली. आपण आतां सह्याद्रीच्या पर्वतराजीकडे जात असल्यामुळें जिकडे तिकडे डोंगर व गर्द रान या खेरीज कांहीं एक दृष्टीस पडत नाहीं. सागरपासून अकरा मैलांवर टेलगुप्पे ह्मणून गांव लागतें. हें संस्थानचें गांव ब्रिटिश मुलुखाच्या हद्दीवर आहे. एथून उजव्या बाजूचा रस्ता ब्रिटीश मुलुखांतून घाटाखालीं अठरा मैलांवर असलेल्या गिर-सप्पा गांवाला जातो व धबधबा पाहण्याकरितां ब्रिटिश रहदारीच्या बंगल्यांत रहावें लागतें, पण धबधब्याचा सुंदर देखावा म्हैसूर रहदारी बंगल्याकडून चांगला दिसत असल्यामुळें व सागर येथें भेटलेल्या व आमच्या मोटारींतच आलेल्या फॉरेस्ट अंमलदारानें आमची रहदारी बंगल्याच्या आवारांतील तंबूत रात्रभर सोय करण्याचें कबूल केल्यामुळें आम्हीं म्हैसूर बंगल्याकडे डाव्याबाजूच्या रस्त्यानें निघालों. येथून शरावती नदीचें तीर सारें नऊ मैल आहे, पण हा एक मोठ्या निबिड जंगलानें व्यापलेला घाटच आहे ह्मणाना. येथले वृक्ष मात्र साठ साठ, सत्तर सत्तर

फूट उंच आहेत. या डोंगरांच्या बाजूला वाऱ्याचा उपद्रव अगदीं कमी असल्यामुळें व पाऊस मुबलक असल्यामुळें व जांभा दगडाची तांबडी व वृक्षवाढीस फार अनुकूल अशी जमीन असल्यामुळें येथें जंगल अपूर्व आहे यांत शंका नाहीं. म्हैसूरच्या प्रसिद्ध जंगलांची कल्पना येथें आल्यावर होतें. केवढे ते दाट, प्रचंड व उंच वृक्ष ! वृक्षांचीं खोडें वविच्या विळख्यापेक्षांहि मोठीं ! वृक्षावर पानाची काय दाटीच दाटी ! व पानावर इतका तजेला व तकतकीतपणा कीं जणूं कांहीं सर्व पानांनां सृष्टीदेवीनें तेलानें माखलें आहे. इतकी सतेज, इतकी चकचकीत, इतकी पल्लेदार, इतकी निरनिराळ्या आकाराची व निरनिराळ्या रंगाचीं पानें एकत्र क्वचि- तच पहावयास मिळतील. आम्हीं बारा वाजतां या जंगलांतून जात होतों पण येथें सायंकाळचे सहासात वाजल्याचा भास होत होता; इतकी घनदाट सावली सर्व सडकेभर होती. शेवटीं आम्हीं एकदांचे शरावती नदीच्या काठांला आलों. शिमोगापासून हें ठिकाण बरोबर साठ मैल आहे. या नदीचें पाणी हिरवट दिसतें. नदी शांतपणें वहात असते. केवळ दोन मैलावर ही इतकी शांतपणें

वाहणारी नदी धबधब्याच्या थैमानानें एकदम सह्याद्री-सारख्या प्रचंड पर्वतावरून उडी घेऊन खालीं खोल पाताळांत प्रवेश करते असें कोणी सांगितलें तर खरें सुद्धां वाटणार नाहीं. पण येथून दोन मैलावर धबधबा आहे.. नदी तरीनें उतरून पलीकडे जावें लागतें व मग दोन मैल रहदारी बंगल्यापर्यंत चालत जावें लागतें. ह्मणून सामानाकरितां आम्हीं दोन मजूर केले. त्यांच्या डोकीवर सामान देऊन आम्हीं वाट चालूं लागलों. वाट वळणावळणाची असून तलगुप्पीपासूनच्या वाटे-प्रमाणें घनदाट रानानें दोन्हीं बाजूस व्यापिलेली आहे. यामुळें एक अर्धापाव फर्लांगापलीकडे मागें व पुढें कांहींच दिसत नाहीं. आम्हीं बरेच चालत आलों. पण बंगल्याचा ठावठिकाण लागेना. इतक्यांत आमचे मजूरहि मागेंपुढें दिसेनात. दाट रानांतून पळून जाण्यास किती उशीर ! आह्मांला भीति वाटूं लागली. पण रानांत शिरण्याची सोय नाहीं. ह्मणून आमच्या-पैकीं दोघांनीं रस्त्यानें त्यांना पहात मागें जावें व आम्हीं दोघांनीं पुढें जावें असें ठरवून आम्हीं त्याप्रमाणें केलें व आम्हीं एकदोन वळणें टाकली नाहींत तो शुभ्र

वालुकामय स्वच्छ अशा प्रशस्त पटांगणांत दोन तीन तंबू व उजव्या बाजूस मोठा थोरला बंगला आमच्या दृष्टीस पडला व दोन्ही मजूर तंबूजवळ आमची वाट पहात उभे ! आह्मांला आश्चर्य व चमत्कार वाटला ! तेव्हां ते मजूर ह्मणाले आम्हीं मधल्याजवळच्या पाऊल वाटेनें आलों व तुमची कितीवेळ वाट पहात बसलों आहों. आतां आमच्यापैकी दोन मंडळी परत नदीपर्यंत जाते कीं काय अशी धास्ती पडली. शिवाय सायंकाळ होत चालला. तेव्हां रानांत श्वापदांची भीति ह्मणून मजूरांनां दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठवाजतां बोजे परत घेऊन जाण्यास या असें सांगून जलद जाऊन आमच्या मंडळीनां परत पाठवून द्या ह्मणून सांगितलें. व ते मजूर गेले पण आमच्यानें काय राहवतें ! आम्हींहि आमच्या मंडळीच्या शोधार्थ परत फिरलों व दोन अडीच फर्लांग जाऊन तेथें जवळ पाटीनें निदर्शित केलेल्या धबधब्याच्या एका धारेकडे गेलों तों तेथें आमची मंडळी आह्मांला भेटली. थोडक्यांत चुकामुक होऊन इतका घोटाळा झाल्यानंतर आम्हीं जो देखावा पाहण्याकरितां इतका दूरचा प्रवास केला त्या

देखाव्याशीं पुनः अचानक एकत्र आलों म्हणून आह्मांला अत्यंत आनंद झाला. आम्हीं आलों होतों तो गिरसप्पाच्या चार धबधब्याच्या पैकीं चवथा व सर्वांत लहान थबकत थबकत व ह्मणूनच झुळु झुळू वाहणारा 'डेमब्लांचें' हें इंग्रजी नांव दिलेला धबधबा होता. येथें बसण्याकरितां बांक ठेवलें आहे त्यावर आम्हीं चौघेजण बसून त्या छोट्या सर्वांत लहान शांत व संथपणें वाहणाऱ्या प्रवाहाकडे कितीवेळ तरी पहात होतों. नंतर सायंकाळ होऊं लागला म्हणून परत फिरलों व प्रथमतः तंबूंत सामान ठेवलें. निघतांना दोन अडीच वाजतां आम्हीं फराळ करून व कॉफी घेऊन निघालों होतों. तेव्हां अजून खाण्याची जरूरी नव्हती ह्मणून प्रथमतः बंगल्याच्या पुढेंच असलेल्या लेडीकर्झन प्लॅटफार्मकडे गेलों. तेथून दिसणारा देखावा खरोखरीं तोंडांत बोटें घालावयास लावील असा आहे. येथें सह्याद्रीची ओळ घोड्याच्या नालासारखी झाली आहे. त्या नालाचे एका टोकावर ब्रिटिश रहदारी बंगला आहे व दुसऱ्या टोकाच्यावर हैसूरचा बंगला आहे व मध्यें धबधब्याचे चार निरनिराळे प्रवाह प्रचंड वेगानें प्रचंड नाद करीत नऊशें फुट खोल

भींतीसारख्या सरळ खडकावरून एकदम उडी घेतात सभोंवार विलक्षण तऱ्हेचे खडक रान व जंगल. पहिल ह्मणजे ब्रिटिश रहदारीबंगल्याजवळचा धबधबा हाच सर्वांत मोठा धबधबा होय. त्याचें नांव 'राजा धबधबा.' या धबधब्याच्या प्रचंड स्रोतावर पाहाणाराची नजर ठरत नाहीं. इतक्या विलक्षण वेगानें पाण्याचा स्रोतचा स्रोत खोल दरींत पडत असतो. त्याचे तुषार ढगासारखे इतस्ततः सारखे पसरत जात असतात. दुसऱ्या धबधब्याचें नांव 'रोअरर' असें आहे. हा राजा धबधब्याच्या बराच खालीं दिसतो व पर्वताच्या गुहेंतून एकदम बाहेर पडल्यासारखा भासतो व कांहीं अंतरापर्यंत निराळा स्रोत राहून मग तो राजा धबधब्याशीं मिळून जातो. यामुळें तेथपासून धबधबा विराट रूप धारण करतोसा भासतो. तिसऱ्या धबधब्याचें नांव 'रॉकेट' असें आहे. हा पहिल्या दोहोंपेक्षां लहान असून खडकांच्या मजगी मजगीवर पडत पडत जातो. यामुळें पहिल्या दोहोइतका विलक्षण वेगवान् तो दिसत नाहीं. चवथा धबधबा तर या तीन धबधब्यांच्या मानानें फारच छोटा दिसतो यांत शंका नाहीं. पण या चारी

प्रवाहांकडे एक समयावच्छेदेंकरून पाहिलें ह्मणजे मन आश्चर्यानें थक्क होतें. निसर्गदेवीनें आपलें काय काय चमत्कार कोठें कोनाकोपऱ्यांत ठेऊन दिलें आहेत हें पाहून मन आनंद व आश्चर्य या मिश्रमनोवृत्तींनीं भरून जातें. हा गिरसप्प्याचा धबधबा हिंदुस्थानांतील सर्व धबधब्यामध्यें सर्वांत सुंदर व भव्य आहे हें निर्विवाद आहे. पण जगांतील सर्व धबधब्यामध्यें सुद्धां त्याला अग्रपूजेचा मान मिळेल यांत शंका नाहीं. कारण धबधब्याची उंची व प्रवाहाचा प्रचंडपणा हे दोन्ही गुण एकत्र सांपडणें कठीण आहे. उ. आल्पस् पर्वतांतील तीन धबधबे गिरसप्पापेक्षां जास्त उंचीवरून पडतात, पण त्यांचा पाण्याचा प्रवाह लहान आहे. अमेरिकेंतला नायगारा धबधबा प्रवाहाच्या प्रचंडतेंत गिरसप्प्याच्या वरचढ आहे; पण त्याची उंची कमी आहे. तेव्हां उंची व प्रचंडता अशा दोन्ही कसोट्या लावल्या ह्मणजे गिरसप्पाच्या धबधब्याच्या बरोबरीला कोणता धबधबा येत नाहीं व ह्मणून हा धबधबा जगांतील सर्व धबधब्यामध्यें वरचढ आहे असें ह्मणणें प्राप्त आहे. या धबधब्याची ती अद्वितीय शोभा व

भव्यता पहाण्यांत आह्मीं इतके गढून गेलों कीं वेळाचें भान राहिलें नाहीं. शेवटीं अगदीं काळोख पडला ह्मणून आह्मीं तंबूकडे परत आलों. रहदारी बंगल्याच्या एका शिपायाजवळून आह्मीं थोडेसें दूध मिळविलें व बक्षिशीच्या आशेनें त्यानें आह्मांला सकाळीं निघण्यापूर्वी चहा देण्याचें कबूल केलें. तेव्हां मिळालेल्या दुधावर व बरोबर आणलेल्या बिस्किटांवर व पुऱ्यावर आह्मीं रात्रीचा फराळ उरकून घेतला. नंतर तंबूंत असलेल्या चार खाटांवर चार अंथरुणें पसरलीं. इतकें होईतों बरीच रात्र झाली. पण चंद्रोदय होऊन चांगलें चांदणें पडलें. ह्मणून पुनः आम्हीं लेडी कर्झन बाकांवर जाऊन बसलों व अर्धा पाऊण तास धबधब्याची रात्रीच्या चांदण्यांतील शोभा अनुभवली व मोठ्या प्रफुल्लित मनानें झोपीं गेलों.

सकाळीं लवकर उठून चहा घेऊन रहदारी बंगल्यापुढें गेलेल्या डोंगराच्या पाऊलवाटेनें धबधब्याची निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळी दिसणारी शोभा पहाण्याकरितां निघालों. येथें सर्व उंच उंच निबिड रान होतें. पण डाव्या हाताला मधूनमधून धबधब्याची

प्रवाहांकडे एक समयावच्छेदें करून पाहिलें ह्मणजे मन आश्चर्यानें थक्क होतें. निसर्गदेवीनें आपलें काय काय चमत्कार कोठें कोनाकोपऱ्यांत ठेऊन दिलें आहेत हें पाहून मन आनंद व आश्चर्य या मिश्रमनोवृत्तींनीं भरून जातें. हा गिरसप्प्याचा धबधबा हिंदुस्थानांतील सर्व धबधब्यामध्यें सर्वांत सुंदर व भव्य आहे हें निर्विवाद आहे. पण जगांतील सर्व धबधब्यामध्यें सुद्धां त्याला अग्रपूजेचा मान मिळेल यांत शंका नाहीं. कारण धबधब्याची उंची व प्रवाहाचा प्रचंडपणा हे दोन्ही गुण एकत्र सांपडणें कठीण आहे. उ. आल्पस् पर्वतांतील तीन धबधबे गिरसप्पापेक्षां जास्त उंचीवरून पडतात, पण त्यांचा पाण्याचा प्रवाह लहान आहे. अमेरिकेंतला नायगारा धबधबा प्रवाहाच्या प्रचंडतेंत गिरसप्प्याच्या वरचढ आहे; पण त्याची उंची कमी आहे. तेव्हां उंची व प्रचंडता अशा दोन्ही कसोट्या लावल्या ह्मणजे गिरसप्पाच्या धबधब्याच्या बरोबरीला कोणता धबधबा येत नाहीं व ह्मणून हा धबधबा जगांतील सर्व धबधब्यामध्यें वरचढ आहे असें ह्मणणें प्राप्त आहे. या धबधब्याची ती अद्वितीय शोभा व

भव्यता पहाण्यांत आह्मीं इतके गढून गेलों कीं वेळाचें भान राहिलें नाहीं. शेवटीं अगदीं काळोख पडला ह्मणून आह्मीं तंबूकडे परत आलों. रहदारी बंगल्याच्या एका शिपायाजवळून आह्मीं थोडेसें दूध मिळविलें व बक्षिशीच्या आशेनें त्यानें आह्मांला सकाळीं निघण्या-पूर्वीं चहा देण्याचें कबूल केलें. तेव्हां मिळालेल्या दुधावर व बरोबर आणलेल्या बिस्किटांवर व पुऱ्यावर आह्मीं रात्रीचा फराळ उरकून घेतला. नंतर तंबूंत असलेल्या चार खाटांवर चार अंथरुणें पसरलीं. इतकें होईतों बरीच रात्र झाली. पण चंद्रोदय होऊन चांगलें चांदणें पडलें. ह्मणून पुनः आम्हीं लेडी कर्झन बाकांवर जाऊन बसलों व अर्धा पाऊण तास धबधब्याची रात्रीच्या चांदण्यांतील शोभा अनुभवली व मोठ्या प्रफुल्लित मनानें झोपीं गेलों.

सकाळीं लवकर उठून चहा घेऊन रहदारी बंगल्या-पुढें गेलेल्या डोंगराच्या पाऊलवाटेनें धबधब्याची निरनिराळ्या ठिकाणाहून निरनिराळी दिसणारी शोभा पाहण्याकरितां निघालों. येथें सर्व उंच उंच निबिड रान होतें. पण डाव्या हाताला मधूनमधून धबधब्याची

निरनिराळी रुपें दिसतील अशा जागा केलेल्या आहेत; त्यांनां प्लॅटफार्मस् ह्मणतात. प्रत्येक प्लॅटफार्मला कोणातरी प्रसिद्ध पुरुषाचें नांव दिलेलें, त्यांत एक महाराजा प्लॅटफार्म आहे व एक महाराजांच्या मातोश्रींच्या नांवाचा वाणीविलास प्लॅटफार्म आहे. या सर्व ठिकाणाहून धबधब्याची ठायींठायीं बदलणारी शोभा पहात आम्हीं उशीर होईल या भीतीनें आल्या वाटेनें परत फिरून बंगल्याशीं आलों तों आमचे आदल्या दिवशीचे मजूर हजर. सामान ताबडतोब बांधून आम्हीं तें मजूरांच्या डोक्यावर दिलें व शिपायास पोस्त देऊन फॉरेस्ट अंमलदारांचा निरोप घेऊन पुनः कधीं तरी असला अद्वीतीय देखावा पहायला मिळेल काय असा आशाळभूत प्रश्न करीत व इतक्या दूरचा प्रवास केल्याचें सार्थक झालें अशा समाधानी वृत्तीनें आम्हीं तें ठिकाण सोडलें व नदीशीं येऊन नदी उतरून पलीकडे मोटारची वाट पहात बसलों. आमची मोटारहि लवकरच आली व आम्हीं मार्गस्थ होऊन परत शिमोग्याला आलों व दुसरें दिवशीं मागें वर्णन केलेलीं प्रेक्षणीय स्थळें पहाण्यास निघालों.

झालें दोन खेपा मिळून जेवढी प्रेक्षणीय स्थळें मला पाहतां आली त्याचें यथामति वर्णन केलें. आतां या प्रांतांच्या पूर्व व अर्वाचीन कालच्या इतिहासांचे सिंहावलोकन पुढील लेखांत करून ही लेखमाला संपविण्याचा विचार आहे.

# म्हैसूर संस्थानची स्थापना व स्थित्यंतरें

भूगर्भशास्त्रानें शाबित केलेल्या म्हैसूर प्रांतांच्या अतिप्राचीनत्वानुरूप म्हैसूरची पूर्वपीठिका पौराणीक काळापासून चालत आली आहे. म्हैसूरप्रांत अगस्त्य, गौतम, कण्व, विभांडक व मार्कंडेय इत्यादि ऋषींच्या आश्रमांनीं पुनीत झालेला आहे, इतकेंच नव्हें तर रामायण महाभारतांतील वीर व अवतारी पुरुष यांचें पराक्रम या प्रांतांत घडून आलेले आहेत. परशुरामाचें मूळ ठिकाण या प्रांतांतच होतें. त्याचे वडील जमदग्नि ऋषि व त्यांची सुरभि गाय येथें रहात असत. कार्तवीर्यानें बळजबरीनें ती गाय जमदग्नीपासून नेण्याचा प्रयत्न केल्यावरून परशुरामानें रागानें कार्तवीर्याचे सहस्र हात कापले; त्याचा सूड घेण्याकरितां कार्तवीर्याच्या मुलांनीं जमदग्नीचा परशुरामाच्या गैर हजेरींत वध केला व परशुरामाची आई पतीबरोबर सती गेली, पण तिनें आपल्या पतीच्या वधाबद्दल कार्तवीर्याच्या

वंशाचा सूड घेण्यास परशुरामास सांगितलें. तदनुरूप परशुरामानें सर्व क्षत्रियांनां मारून निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा केली व एकवीस वेळ क्षत्रियांनां मारून ती पुरी केली आणि अश्वमेधानंतर पृथ्वी कश्यपाला दान दिली. त्यानें परशुरामास पश्चिम समुद्रास पाठविलें व तेथें त्यानें समुद्राकडून सात कोंकण प्रांत नवे निर्माण करवून मग हल्लींच्या परशुरामक्षेत्रीं ( चिपळुणाजवळ ) वास केला ! ही सर्व कथा म्हैसूर प्रांताशींच विशेष संलग्न आहे. रामचंद्रानें रावणाशीं युद्ध करण्याकरितां या प्रांतांतील कपिध्वज नांवाच्या मूळच्या रहिवाशांशीं स्नेह करून येथून पुढें लंकेवर स्वारी केली. पांच पांडवांपैकीं अर्जुन हा आपल्या बारावर्षांच्या वनवासांत या प्रांतीं आला असतां येथल्या मणिपूर राजाची कन्या चित्रांगदा हिचें त्याच्यावर प्रेम जडलें. अर्जुनानें तिच्याशीं विवाह करून तो येथें तीन वर्षें राहिला व याच कालांत त्याला बभ्रुवाहन नांवाचा मुलगा झाला. याच बभ्रुवाहनानें, धर्मराजानें पुढें पुष्कळ काळानंतर केलेल्या अश्वमेधातील घोड्याला धरून ठेवलें व ह्मणून अर्जुन व बभ्रु-

वाहन यांचें युद्ध झालें. धर्मराजानें राजसूय यज्ञ केल त्यावेळीं सहदेव या प्रांतीं आला होता व त्यानें माहिष्मतीच्या नल राजाचा पराभव केला. पांडवांच्या काळानंतर त्यांचा पणतु जनमेजय यानें मोठा सर्पयाग केला तो या प्रांतांतच. याप्रमाणें पौराणिक काळांतील कितीतरी प्रसंग या प्रांताशीं निगडीत आहेत असें पुराणांवरून दिसून येतें. पण हा अंधुक, मोठा पौराणिक काळ टाकून ऐतिहासिक काळाकडे वळलें तर पहिली खात्रीलायक माहिती मिळते ती चंद्रगुप्त मौर्य राजाचीच होय. जैनग्रंथावरून असें दिसतें कीं जैनधर्माचा एक पुरस्कर्ता भद्रबाहू यानें उज्जयनि प्रांतांत बारा वर्षांचा दुष्काळ पडेल असें भाकित केलें. तेव्हां त्याच्या सल्ल्यानें व त्याच्या प्रमुखत्वाखालीं जैनांची एक टोळी दक्षिणेंत म्हैसूर प्रांतांत आली. भद्रबाहू श्रवण बेलगोला ( हसन जिल्ह्यांतील एक गांव ) येथें आल्यावर आजारी पडला व आपला अंतसमय जवळ आला आहे हें जाणून त्यानें आपल्या अनुयायांस पुढें जाण्यास सांगितलें व एका शिष्यासह तो बेलगोला जवळच्या टेकडीवर राहिला. हा शिष्य

ह्मणजे असा तसा माणूस नव्हता तर प्रत्यक्ष चंद्रगुप्त मौर्य राजा होता. कारण जैन सांप्रदायाप्रमाणें चन्द्रगुप्त मौर्य जैनधर्माचा अनुयायी झाला होता व त्या धर्माच्या शासनानुरूप उतार वयांत चन्द्रगुप्तानें राज्यसंन्यास करून तप करण्याकरितां तो भद्रबाहूचा शिष्य ह्मणून म्हैसूर प्रांतीं आला व मरणापर्यंत त्यानें आपल्या गुरूची सेवा केली. भद्रबाहूच्या मरणानंतर चन्द्रगुप्त त्याच टेकडीवर बारा वर्षें राहिला व ह्मणून अद्यापपर्यंत त्या टेकडीला चन्द्रगिरी ह्मणतात. शिवाय या टेकडीच्या माथ्यावर चंद्रगुप्त वस्ति नांवाचें उत्तम देऊळ आहे. चन्द्रगुप्ताचा नातु ह्मणजे जगविख्यात अशोक मौर्य राजा होय. यानें बुद्धधर्म स्वीकारल्यावर त्याच्या प्रसारार्थ सर्व हिंदुस्थानभर धर्मोपदेशक पाठविले व धर्माच्या आज्ञा ठिकठिकाणीं प्रचंड स्तंभावर कोरून ठेवल्या व असे स्तंभ म्हैसूर प्रांतांत सांपडले आहेत. यावरून म्हैसूरप्रांत अशोकाच्या साम्राज्यांत सामील झाला होता यांत शंका नाहीं. कालेंकरून मौर्यसाम्राज्य नष्टप्राय झालें. त्यामुळें निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे राजवंश उदयास आले, त्याप्रमाणें म्हैसूर प्रांतांतहि

घडून आलें. या राजवंशामध्यें गंग राजवंश व होशल राजवंश हे मोठे वैभवशाली राजवंश झाले व त्यांच्या साम्राज्याचे अवशेष व खुणा अजून त्या प्रांतांत आहेत. पुढें विजयानगरास मोठें साम्राज्य स्थापन झालें व या साम्राज्याचे अंकित म्हणूनच प्रथमतः म्हैसूरचें वाडीयार राजघराणें सन १३९९ मध्यें स्थापन झालें. तेव्हांपासून मध्यें पुष्कळ स्थित्यंतरें झालीं तरीं आज तागाईत हें घराणें व त्यांतील पुरुष म्हैसूर संस्थानचे अधिपति आहेत. तरी आतां या संस्थानच्या स्थापनेच्या व त्याच्या उत्कर्षापकर्षाच्या हकीगतीकडे वळूंया.

हल्लींच्या म्हैसूरच्या वाडीयार राजघराण्याच्या मूळ पुरुषांची भाग्योदयकथा कुतूहलास्पद, दाक्षिण्यदर्शक व मोठी मनोरंजक आहे. यदु राजकुळांतील दोन तरुण राजकुमार विजय व कृष्ण हे आपलें नशीब काढण्याकरितां द्वारकेहून दक्षिणेंत म्हैसूर प्रांतीं आले व म्हैसूर गावांनजीक हाडिनाडु या गांवीं राहिले. तेथें त्यांनां समजलें कीं तेथला अधिपति वेड लागून देशोधडीस लागला व त्याच्या एकुलत्या एक मुलीशीं

शेजारच्या करुगहल्ली येथल्या खालच्या जातीच्या अधिपतीनें बळजबरीनें लग्न लावण्याचा बेत करून त्याची तयारी चालू केली आहे. हें ऐकून या राजकुमारांनां त्या राजकन्येची करुणा आली व त्यांनीं लग्नाच्या मिरवणूकींत गुप्तपणें आपल्या कांहीं निवडक अनुयायांसह प्रवेश करून घेतला व ऐन मेजवानीच्या वेळीं तो अधिपति व त्याचे अनुचर यांच्यावर एकाएकीं हल्ला करून त्यांची कत्तल केली व करुगहल्ली शहराकडे कूच करून त्या शहरावर छापा घालून तें शहर काबीज केलें व विजय-श्रीनें मंडित असे परत हाडिनाडू येथें आले. मुक्त झालेल्या राजकन्येनें खुषीनें व आनंदानें विजयाला वरलें. विजयानें वाडियार ( राजा ) हा किताब धारण केला व करुगहल्ली व हाडिनाडू या दोन्हीं भागांवर अंमल बसविला व या प्रांतांत जास्त प्रचलित असलेला लिंगायत धर्महि लागलाच स्वीकारला. या प्रमाणें वाडियार घराण्याच्या मूळपुरुषानें यदु-राजा असें नांव धारण करून संस्थानची स्थापना सन १३९९ मध्यें केली. तेव्हांपासून आज

तागाईत ह्मणजे सुमारें पाचशेंतीस वर्षं म्हैसूरचा राज्यकारभार एकराजवंशीय असा चालू आहे. हिंदुस्थानांतील संस्थानामध्यें इतक्या काळपर्यंत सारखी एकराज्यव्यवस्था चाललेली उदाहरणें क्वचितच सांपडतात. या सवापांचशें वर्षांच्या एकतंत्री राज्यव्यवस्थेंत फक्त दोन वेळच खळ पडला होता. पहिला खळ हैदर व टिपु यांनीं राज्य बळकावून चालविलेल्या सन १७६१ ते १७९९ पर्यंत अडतीस वर्षांच्या राज्यकारभाराचा काळ होय; व दुसरा खळ राजा कृष्णराज वाडीयार यांच्या राज्यव्यवस्थेंतील अंदाधुंदीमुळें इंग्रज सरकारनें सर्व राज्यकारभार हातीं घेतल्याचा सन १८३१ ते सन १८८१ पर्यंतचा पन्नास वर्षांचा काळ होय. म्हैसूर संस्थानच्या स्थापनेपासून आजतागाईतच्या सुमारें सवापांचशें वर्षांच्या काळांत एकंदर चोवीस राजांनीं राज्य केलें. त्या सर्वांच्या कारकीर्दींची सविस्तर हकीकत देणें येथें शक्य नाहीं. पण त्यांपैकीं जास्त कर्तबगार अशा राजांचा नामनिर्देश करून त्यांच्या कारकीर्दींतील विशेषांची माहिती देणें अयोग्य होणार नाहीं. असो.

म्हैसूरांतील वाडीयार घराण्याच्या राज्यस्थापनेपूर्वीं सुमारें पन्नास वर्षें आधीं विजयानगरच्या प्रख्यात साम्राज्याची स्थापना झाली होती व तेथील सम्राटांनीं आपला साम्राज्यविस्तार करतांना स्थानिक संस्थानिकांचा सर्वस्वी नायनाट न करतां त्यांनां मांडलिक करून त्यांच्याकडून वार्षिक खंडणी घेण्याची पद्धति ठेविली होती व आपल्या दूरवर पसरलेल्या साम्राज्यांतील निरनिराळ्या प्रांतांवर आपले सुभेदार नेमून त्यांच्या मार्फत खंडणी वसूल करण्याचा व मांडलिकांनां अंकित ठेवण्याचा परिपाठ ठेवला होता. तदनुरूप म्हैसूर प्रांतांत श्रीरंगपट्टण या निसर्गानें सुरक्षित व किल्ल्याच्या योगें जास्तच अजिंक्य गणल्या गेलेल्या बेटावर सुभेदाराचें ठाणें ठेविलें होतें. वाडीयार घराण्यांतल्या संस्थानिकांचें ठिकाण म्हैसूर शहर असून त्यांनीं विजयानगरचें मांडलिकत्व कबूल करून श्रीरंगपट्टण येथील सुभेदाराकडे ते सालोसाल खंडणी भरीत. पण सन १५६५ मध्यें तालीकोट येथील लढाईत मुसलमानांनीं विजयानगरच्या राज्याचा पूर्ण बीमोड करून विजयानगर शहर ज़मीनदोस्त केलें. अर्थात् विजया-

नगरच्या राजांनांच कोनाकोपऱ्यांत जाऊन कसा तरी जीव धरून राहणें भाग पडलें. याप्रमाणें मध्यवर्ति शक्तिमान् राजसत्ता नाहींशी झाल्याबरोबर प्रांतोप्रांतीच्या सुभेदारांचा पाठिंबा नाहींसा झाला व त्या त्या प्रांतांतील मांडलिक सुभेदारास खंडणी देईनात व ते स्वतंत्र राजे बनूं लागले. म्हैसूरच्या संस्थानचे या सुमारास चवथे चामराज ( टक्कले ) हे अधिपति होते. इतर मांडलिकांचें अनुकरण करून तेहि श्रीरंगपट्टणाच्या सुभेदारास खंडणीचा वसूल देण्याची टाळाटाळ करूं लागले. श्रीरंगपट्टणाच्या रंगनाथाच्या देवदर्शनास आले असतांना चामराजांनां धरण्याचा सुभेदारानें कट केला पण त्याचा आधींच सुगावा लागल्यामुळें चामराज तेथून निसटून गेले. सन १५७६ मध्यें बेटाचामराज हे गादीवर आले पण त्यांच्यामध्यें कर्तबगारी मुळींच नव्हती. म्हणून म्हैसूर संस्थानच्या वृद्ध व वजनदार अंमलदारांनीं चामराजाचा धाकटा भाऊ राजा वाडीयार यांनां गादीवर बसविलें.

म्हैसूर संस्थानच्या इतिहासांत राजा वाडीयार यांची कारकीर्द बहुतकाळची, चिरस्मरणीय व मोठी वैभव-

शाली झाली. कारण याच कारकीर्दींत म्हैसूर संस्थानचें मांडलिकत्व जाऊन त्याला स्वतंत्र संस्थानची पदवी आली. राजा वाडीयार यानें श्रीरंगपट्टणचा व विजंया-नगरचा नामधारी सुभेदार राजा तिरुमलराय याला तेथून हुसकावून लावलें व श्रीरंगपट्टणचें बेट व तेथला किल्ला आपल्या ताब्यांत घेऊन या मजबूत व अजिंक्य गणलेल्या ठिकाणीं आपली राजधानी नेली. हा राज-धानीचा बदल सन १६१० मध्यें घडून आला. व याच फरकाबरोबर राजा वाडीयार यानें वैष्णव धर्म-पंथाचा स्वीकार केला. तसेंच राजा वाडीयार यांनीं दक्षिण दिशेस व उत्तर दिशेस आपल्या राज्याचा पुष्कळ विस्तार केला. शिवाय राज्याची अंतर्व्यव-स्थाहि उत्तम करून आसपासच्या छोट्या छोट्या अधिपतींनां राज्यावरून काढून सर्वत्र एकसूत्री व एकतंत्री राज्यकारभार सुरू केला. याप्रमाणें सुव्य-वस्था, विस्तार व वैभव या बाबतींत संस्थानचीं अभूत पूर्व प्रगति करून व सुमारें साठ वर्षें राज्य करून वृद्धापकाळीं राजा वाडीयार वारले. त्यांचे मुलगे त्यांचे हयातींतच मरण पावल्यामुळें त्यांचे नातु चामराज

( सहावा ) वाडीयार हे सन १६१७ मध्यें राज्या-
वर बसले. यांनीं वीसच वर्षें राज्य केलें. पण चन-
पाटँणा येथील जगदेवराय याचा नायनाट करून सर्व
मुलुख आपल्या राज्यांत सामील केला व याप्रमाणें
थोडसा राज्याचा विस्तार केला.

सहांव्या चामराजानंतर राजा वाडीयार यांच्या
पश्चात् त्यास झालेला पुत्र इमाडी राजा राज्यावर
आला. पण लवकरच संस्थानचा दलवायी ( संस्थानचा
वंशपरंपरेचा सेनापति ) यानें राजाला विषप्रयोग करवून
कर्तृत्वहीन तिसरा चामराज याचा मुलगा कांतिरव
नरसराजा आपल्या बापासारखा निघेल या समजूती-
वर त्याला राज्यावर बसविलें. पण नरस राजाला
दलवायाचें कृष्णकृत्य कळतांच त्यानें दलवायाचा
मारेकऱ्याकडून वध करविला व आपण स्वतंत्रपणें
राज्य करूं लागला. याचे कारकीर्दींत विजापुरच्या
बादशाहानें रणदुल्लाखानास श्रीरंगपट्टणावर हल्ला
करण्यास पाठविलें. पण नरसराजानें रणदुल्लाखानचा
पराभव केला व त्याला फजित करून परत फिरविलें.
यानें दक्षिणेस नीलगिरीच्या खालचा मुलुख काबीज

केला व तसेंच मागडीच्या केंपीगौडाचा पराभव करून त्याला आपलें मांडलिक बनविलें. यानें प्रथमतः टांकसाळ काढून कांतिराय होन व इतर नाणीं पाडलीं. कांतराय नरसराजा सन १६५९ मध्यें निपुत्रिक वारला. यावेळीं राज्याला बरेच वारस होते. पण त्यांपैकीं दोन--टकल्या चामराजाचे नातु व पणतु जवळ जवळ बत्तीस वर्षांचे--हेच दोघे निकटचे वारस ह्मणून एका मागून एक गादीवर आले व त्यांनीं दोघांनीं मिळून सुमारें पंचेचाळीस वर्षें राज्य केलें. त्यांपैकीं पहिल्याला दोड ( थोरला ) देवराज, ह्मणत व दुसऱ्याला चिक ( धाकटा ) देवराज ह्मणत. थोरल्या देवराजाची कारकीर्द तेरा वर्षांचीच झाली. परंतु तेवढ्यांतच त्यानें म्हैसूर संस्थानच्या दक्षिणेस व उत्तरेस पुष्कळ विस्तार केला. सन १६७२ सालीं चिक देवराज राज्यावर आला. म्हैसूरच्या वाडीयार वंशामध्यें सर्वांत पराक्रमी, विख्यात व वैभवशाली असा हा राजा निपजला. त्यानें एकंदर बत्तीस वर्षें राज्य केलें व म्हैसूर संस्थानचा सध्याचा जो विस्तार आहे तेवढें राज्य चिक देवराज यानें संपादन करून त्याची सुव्यवस्था

करून त्याला स्थैर्य व कायमपणा आणला. हैदरच्या कारकीर्दींत तात्पुरता म्हैसूरचा पुष्कळसा विस्तार झाला खरा, पण तो उन्हाळ्यांतील गवताच्या वणव्याप्रमाणें भरभर पसरला पण लवकर वणवा जसा विझून जातो त्याप्रमाणें या क्षणिक-राज्य-विस्तारचा लागलाच संकोच झाला व टिपूनें तर आपली सत्ता व आपला प्राण एकदमच गमाविली. असो, चिकदेवराजाचें तरुण-पण येलंडूर या ठिकाणीं गेलें होतें, व तेथें असतांना एक विशालाक्ष नांवाच्या जैन पंडिताशीं त्याचा सलगीचा स्नेह जमला होता. दोड देवराज गादीवर आला तेव्हां चिक देवराज हाहि एक हक्कदार असल्यामुळें त्याला व त्याच्या बापाला हनगल येथें अटकेंत ठेविलें होतें. तेथें विशालाक्षपंडितहि आपण होऊन अटकेंत राहिला व त्यानें चिक देवराज यांच्याशीं प्रेमाचें व सलोख्याचें वर्तन ठेविलें; व राजा झाल्यावर आपल्याला प्रधान-कीची कामगिरी मिळावी असें चिक देवराज याजपासून त्यानें वचन घेतलें. दोड देवराज यांच्या मृत्यूनंतर विनहरकत चिकदेवराज गादीवर आला व वचना-प्रमाणें विशालाक्ष पडितास त्यानें आपल्या प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं.

याच्या कारकीर्दीतील पहिली अपूर्व गोष्ट ह्मणजे सर्व संस्थानभर पोस्टाची सुरुवात होय. पत्राची ने आण करण्याबरोबरच पोष्टांतील खात्याच्या लोकांनीं सर्व प्रांतभर घडणाऱ्या गोष्टींची हकीकत सरकारांत कळवावी अशी ताकीद होती. ह्मणजे चिकदेवराज याचें पोष्टखातें व गुप्त पोलीसखातें हीं एक होतीं. १६७५ते १६७८ च्या दरम्यान चिकदेवराज यानें उत्तरेकडील बराच मुलुख काबीज केल्यामुळें विजापूर बादशहाच्या कर्नाटकांतील प्रांतांची दक्षिण शींव व म्हैसूरची उत्तर शींव एकमेकांना भिडली. पुढल्या दहावर्षांत संस्थानच्या अन्तर्व्यवस्थेंत लक्ष घालून चिकदेवराज यानें जमीन सारा वाढविला. परंतु या कडक सारावसूलीनें प्रजेंत असंतोष उत्पन्न झाला व राजाचा प्रधान जैन धर्माचा असल्यामुळें लिंगायत धर्माच्या जंगमांनीं ( लिंगायत जातींचे उपाध्याय ) राजाविरुद्ध बराच असंतोष पसरविला व जमीन न करण्याचा बेत शेतकरी करूं लागले. जंगमांच्या प्रोत्साहनानें अशी बेदिली प्रजेंत उत्पन्न होत आहे असें पाहून राजानें जंगमांना नांजनगूड येथें वाटाघाट करण्याकरितां बोलाविलें व प्रत्येक जंगमाला

राजाच्या दरबारांतून पलीकडे नेल्यावर गुप्तपणें गाडून टाकण्याची मारेकऱ्याकडून व्यवस्था केली व हें काम इतकें शांतपणें व निर्वेध चाललें होतें कीं सर्व जंगमांच्या भेटीचा दरबार संपेपर्यंत कुणाला या क्रूर कृत्याचा सुगावा सुद्धां लागला नाहीं. त्याप्रमाणेंच प्रांतांतील सर्व लिंगायत मठांचा नायनाट करण्याचे हुकुम सोडण्यांत आले व जेथें जेथें लोकांकडून प्रतिरोध होईल तेथें तेथें लष्करी फौजेकडून लोकांचा प्रतिरोध नाहींसा करण्यांत आला. याप्रमाणें राजानें असंतोषाचा बींमोड करून नुवीन करवसूलीची व्यवस्था अमलांत आणिली. पण विशालाक्ष पंडिताच्या या क्रूर कृत्याबद्दल जैनधर्मी लोक दांतओठ खाऊं लागले व ह्मणून त्याचा खून करून त्यांनीं आपला सूड उगवून घेतला. राजाला प्रधानाच्या वधाबद्दल फार वाईट वाटलें. पण विशालाक्ष पंडिताच्या सल्ल्यावरून त्यानें तिरुमल आयंगार नांवाच्या ब्राह्मणास प्रधानपद दिलें. इकडे औरंगजेबानें विजापूरचें राज्य खालसा करून कर्नाटकांतील प्रांत काबीज करण्यास कासीमखानाला पाठविलें. दरम्यान बंगळूरप्रांत व्यंकोजीराजाकडून चिक देवराज

थानें तीन लाखाला विकत घेतला व त्यानें आपला अंमल त्या प्रांतांवर बसविला व कासिमखानाच्या मार्फत मोंगल-बादशहाशीं सलोख्याचा तह केला. पुढच्याच वर्षी कासीमखान वारला. तरीपण चिकदेवराज यानें औरं-गजेब बादशाहाकडे वकील पाठवून त्याच्याशीं सख्य राखण्याचें धोरण ठेवलें व बादशाहाकडून जगदेवराज ही पदवी व हस्तीदंती सिंहासनावर अधिष्टित होण्याची परवानगी मिळविली. राजानें आतां मोंग-लांच्या राज्यव्यवस्थेच्या धर्तीवर अठरा खातीं काढली व सरकारी वसुल नियमानें येण्याची तजवीज केली व राज्याच्या बळकटीकरितां खजिन्यांत गंगाजळी ठेवीची पद्धत शुरू केली व दररोज जो वसूल येईल, त्यांपैकीं दोन पिशव्या या गंगाजळींत ठेवण्याचा त्याचा परिपाठ होता. अशा प्रकारच्या व्यवस्थित व काटकसरीच्या कारभारानें व विजयी लढायांत मिळविलेल्या लुटीनें चिकदेवराज यानें इतका अपार संपत्तीचा सांठा करून ठेविला कीं त्याला लोकांत, ' नवकोट नारायण ' असें नांव मिळालें. याप्रमाणें संस्थानचा विलक्षण विस्तार करून, कारभाराला सुव्यवस्थितपणा आणून, मोठी

संपत्ति मागें ठेवून सारांश म्हैसूर संस्थानचें वैभव व सर्वांगीण प्रगति करून चिकदेवराज वयाच्या ७६ व्या वर्षीं म्हणजे सन १७०४ मध्यें निजधामास गेला.

म्हैसूर संस्थानच्या इतिहासांत दोघा देवराज राजांच्या कारकीर्दी फार महत्त्वाच्या आहेत. कारण या कारकीर्दींतच संस्थानचा पुष्कळ विस्तार होऊन त्याची स्वाभाविक मर्यादेपर्यंत वाढ झाली व त्याला स्थैर्य आलें, तसेंच संस्थान संपन्न व श्रीमंत म्हणून त्याची यथार्थ कीर्ति झाली व राज्यांतील अन्तर्व्यवस्था कायमची होऊन दलवाई, सर्वाधिकारी व प्रधान अशा तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची योजना सुकर होऊन राज्यकारभार सुयंत्रित चालू झाला. पण ह्या सर्व सुस्थितीनें म्हैसूर संस्थानच्या पुढील राजांना कांहीं एक कर्तव्य राहिलें नाहीं व दुर्दैवानें पुढले राजे कर्तबगारहि निघाले नाहींत. यामुळें राज्याचा सर्वभार वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सोंपवून ते राजे सुखांत व चैनींत कालक्रमण करूं लागले. पण यामुळें नकळत सत्ता अधिकाऱ्यांच्या हातांत व विशेषतः सैन्यावरील मुख्य सेनापतीच्या हातांत जाऊं लागली. म्हैसूर

संस्थानची अन्तःस्थिति याप्रमाणें बदलत असतानांच सभोवारची परिस्थितिहि बदलत चालली. औरंग-जेबाच्या पश्चात् दिल्लीची मोंगल सत्ता नामशेष झाली. दक्षिणचा सुभेदार स्वतंत्र झाला व त्याचा मुलुख म्हैसूर मुलखाला लागून आला. तसेंच मराठ्यांचें राज्य वाढून त्यांचाहि मुलुख म्हैसूर लगत आला. पूर्वेकडे, पश्चिमेकडे व दक्षिणेकडे इंग्रज, फ्रेंच वगैरे परकी कंपन्यांचा मुलुख आला व म्हैसूरच्या सांठलेल्या प्रचंड खजिन्याकडे व त्या संस्थानच्या एकंदर संपन्न स्थितिकडे या निरनिराळ्या सरकारची दृष्टि लागून त्यांनीं म्हैसूरवर स्वारी करून पैशाची लूट मिळविण्याचा व साधल्यास त्या संस्थानचे लचके तोडण्याचा सपाटा चालविला. स्वाऱ्या परतविण्याकरितां म्हैसूरच्या वरिष्ठ अंमलदारांनां मोठमोठ्या रकमा देऊन या शत्रूंची तोंडें बंद करावीं लागत. यामुळें खजिना रिता झाला. अशा परिस्थितींत हैदरासारखा अलौकिक योद्धा व धोरणी पुरुष संस्थानांत सामान्य शिपाई म्हणून आला. पण अंग-च्या गुणांनीं दरबारांत त्याचें वजन वाढत चाललें. त्याला सैन्यांत बढती मिळाली व त्यानें मिळविलेल्या लुटींतून

राजाच्या दरबारांतून पलीकडे नेल्यावर गुप्तपणें गाडून टाकण्याची मारेकऱ्याकडून व्यवस्था केली व हें काम इतकें शांतपणें व निर्वेध चाललें होतें कीं सर्व जंगमांच्या भेटीचा दरबार संपेपर्यंत कुणाला या क्रूर कृत्याचा सुगावा सुद्धां लागला नाहीं. त्याप्रमाणेंच प्रांतांतील सर्व लिंगायत मठांचा नायनाट करण्याचे हुकुम सोडण्यांत आले व जेथें जेथें लोकांकडून प्रतिरोध होईल तेथें तेथें लष्करी फौजेकडून लोकांचा प्रतिरोध नाहींसा करण्यांत आला. याप्रमाणें राजानें असंतोषाचा बीमोड करून नवीन करवसूलीची व्यवस्था अमलांत आणिली. पण विशालाक्ष पंडिताच्या या क्रूर कृत्याबद्दल जैनधर्मी लोक दांतओठ खाऊं लागले व ह्मणून त्याचा खून करून त्यांनीं आपला सूड उगवून घेतला. राजाला प्रधानाच्या वधाबद्दल फार वाईट वाटलें. पण विशालाक्ष पंडिताच्या सल्ल्यावरून त्यानें तिरुमल आयंगीर नांवाच्या ब्राह्मणास प्रधानपद दिलें. इकडे औरंगजेबानें विजापूरचें राज्य खालसा करून कर्नाटकांतील प्रांत काबीज करण्यास कासीमखानाला पाठविलें. दरम्यान बंगळूरप्रांत व्यंकोजीराजाकडून चिक देवराज

यानें तीन लाखाला विकत घेतला व त्यानें आपला अंमल त्या प्रातांवर बसविला व कासिमखानाच्या मार्फत मोंगल-बादशहाशीं सलोख्याचा तह केला. पुढच्याच वर्षी कासीमखान वारला. तरीपण चिकदेवराज यानें औरंगजेब बादशाहाकडे वकील पाठवून त्याच्याशीं सख्य राखण्याचें धोरण ठेवलें व बादशाहाकडून जगदेवराज ही पदवी व हस्तीदंती सिंहासनावर अधिष्ठित होण्याची परवानगी मिळविली. राजानें आतां मोंगलांच्या राज्यव्यवस्थेच्या धर्तीवर अठरा खातीं काढली व सरकारी वसुल नियमानें येण्याची तजवीज केली व राज्याच्या बळकटीकरितां खजिन्यांत गंगाजळी ठेवीची पद्धत सुरू केली व दररोज जो वसूल येईल त्यांपैकीं दोन पिशव्या या गंगाजळींत ठेवण्याचा त्याचा परिपाठ होता. अशा प्रकारच्या व्यवस्थित व काटकसरीच्या कारभारानें व विजयी लढायांत मिळविलेल्या लुटीनें चिकदेवराज यानें इतका अपार संपत्तीचा सांठा करून ठेविला कीं त्याला लोकांत 'नवकोट नारायण' असें नांव मिळालें. याप्रमाणें संस्थानचा विलक्षण विस्तार करून, कारभाराला सुव्यवस्थितपणा आणून, मोठी

संपत्ति मागें ठेवून सारांश म्हैसूर संस्थानचें वैभव व सर्वांगीण प्रगति करून चिक्कदेवराज वयाच्या ७६ व्या वर्षी म्हणजे सन १७०४ मध्यें निजधामास गेला.

म्हैसूर संस्थानच्या इतिहासांत दोघा देवराज राजांच्या कारकीर्दी फार महत्त्वाच्या आहेत. कारण या कारकीर्दींतच संस्थानचा पुष्कळ विस्तार होऊन त्याची स्वाभाविक मर्यादेपर्यंत् वाढ झाली व त्याला स्थैर्य आलें, तसेंच संस्थान संपन्न व श्रीमंत म्हणून त्याची यथार्थ कीर्ति झाली व राज्यांतील अन्तर्व्यवस्था कायमची होऊन् दलवाई, सर्वाधिकारी व प्रधान अशा तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची योजना मुक्रर होऊन राज्यकारभार सुयंत्रित चालू झाला. पण ह्या सर्व सुस्थितीनें म्हैसूर संस्थानच्या पुढील राजांनां कांहीं एक कर्तव्य राहिलें नाहीं व दुर्दैवानें पुढले राजे कर्तबगारहि निघाले नाहींत. यामुळें राज्याचा सर्वभार वरिष्ठ अधिकाऱ्यांवर सोंपवून ते राजे सुखांत व चैनींत कालक्रमण करूं लागले. पण यामुळें नकळत सत्ता अधिकाऱ्यांच्या हातांत व विशेषतः सैन्यावरील मुख्य सेनापतीच्या हातांत जाऊं लागली. म्हैसूर

संस्थानची अन्तःस्थिति याप्रमाणें बदलत असतानांच सभोवारची परिस्थितिहि बदलत चालली. औरंगजेबाच्या पश्चात् दिल्लीची मोंगल सत्ता नामशेष झाली. दक्षिणचा सुभेदार स्वतंत्र झाला व त्याचा मुलख म्हैसूर मुलखाला लागून आला. तसेंच मराठ्यांचें राज्य वाढून त्यांचाहि मुलख म्हैसूर लगत आला. पूर्वेकडे, पश्चिमेकडे व दक्षिणेकडे इंग्रज, फ्रेंच वगैरे परकी कंपन्यांचा मुलख आला व म्हैसूरच्या सांठलेल्या प्रचंड खजिन्याकडे व त्या संस्थानच्या एकंदर संपन्न स्थितिकडे या निरनिराळ्या सरकारची दृष्टि लागून त्यांनीं म्हैसूरवर स्वारी करून पैशाची लूट मिळविण्याचा व साधल्यास त्या संस्थानचे लचके तोडण्याचा सपाटा चालविला. स्वाऱ्या परतविण्याकरितां म्हैसूरच्या वरिष्ठ अंमलदारांनां मोठमोठ्या रकमा देऊन या शत्रूंची तोंडें बंद करावीं लागत. यामुळें खजिना रिता झाला. अशा परिस्थितींत हैदरासारखा अलौकिक योद्धा व धोरणी पुरुष संस्थानांत सामान्य शिपाई म्हणून आला. पण अंगच्या गुणांनीं दरबारांत त्याचें वजन वाढत चाललें. त्याला सैन्यांत बढती मिळाली व त्यानें मिळविलेल्या लुटींतून

स्वतः मोठें सैन्य तयार केलें व १७६१ पासून तों म्हैसूरचा खरा सत्ताधीश झाला. वाडीयार घराण्यांतील पुरुषाला बाहुलें म्हणून त्यानें गादीवर राहूं दिलें. पण सर्व सत्ता व अधिकार आपणच चालवूं लागला व त्यानें म्हैसूरचें राज्य सर्व दिशेला वाढविण्याचा सपाटा चालविला. व विशेषतः इंग्रजांनां हिंदुस्थानांतून हांकून लावण्याची महत्वाकांक्षा त्यानें धरली व म्हणून इंग्रजांनीं मराठे व निजाम यांच्याशीं संगनमत करून त्रिवर्गांनीं मिळून हैदरचा पूर्णपणें नायनाट करण्याचा, निदान त्याच्या वाढत्या सत्तेला व वैभवाला पायबंद घालण्याचा घाट घातला. याच सुमारास म्हैसूरच्या गादीवर असलेला नामधारी बाहुलेवजा असलेला आठवा चामराज राजा निपुत्रिक वारला. बाहेर इतके शत्रू असतांना एकदम म्हैसूरची गादी बंद करणें इष्ट नाहीं असें पाहून हैदरनें वाडियार घराण्याच्या निरनिराळ्या शाखेंतील बालराजकुमार एके ठिकाणीं जमविले व त्यांनां एका फळफळावळ मेवामिठाई व खेळखेळणी यांनीं भरलेल्या दरबार दिवाणखान्यांत सोडले व यांपैकीं पाहिजे त्या वस्तू तुह्मीं घ्या असें सांगितलें व

निरनिराळ्या वस्तूंकरितां सर्व राजकुमारांत झटापट चालू झाली. एका राजकुमारानें एका हातांत एक तरवार व दुसऱ्या हातांत एक लिंबू घेतलें. हें पाहतांक्षणीं हैदर उद्गारला " हाच खरा राजा ! याचें पहिल्यांदा लक्ष तरवारीकडे–स्वसंरक्षणाच्या साधनाकडे–गेलें व दुसऱ्यांदा त्याचें लक्ष आपल्या राज्यांतील वसूलाकडे–आंबट लिंबाकडे–गेलें. त्याला इकडे आणा म्हणजे मी त्याला आलिंगन देतों. " या गोष्टीवरून हैदराचें स्वभावचित्र चमत्कृतिजनक रीतीनें दृष्टीपुढें येतें. या प्रमाणें नवव्या चामराजानें राज्यपद मिळविलें व त्याची गादीवर स्थापना झाली. हैदर व टिपू यांची कारकीर्द १७६१ पासून १७९९ पर्यंत चालली. म्हैसूर संस्थानच्या इतिहासांतील हा काळ अत्यंत धामधुमीचा, मोठमोठ्या कारस्थानांचा व प्रचंड स्वाऱ्या व लढाया यांनीं गजबजलेला असा आहे. म्हैसूर हिंदुस्थानच्या एका कोपऱ्यांत असतांना याकाळीं हैदर व टिपू यांच्या महत्त्वाकांक्षी बेतांनीं म्हैसूरला इतकें महत्त्व आलें होतें कीं हिंदुस्थानच्या इतिहासांत म्हैसूरच्या या स्वाऱ्यांना व लढायांना अग्रस्थान दिलें गेलें व हिंदुस्थानच्या

ब्रिटेश रियासतीच्या इतिहासांत या काळच्या स्वाऱ्यांचें व लढायांचें सविस्तर वर्णन आलें आहे व प्रत्येक साधारण शिकलेल्या माणसास सुद्धां या काळच्या हकीकती ठाऊक असल्यामुळें त्या गृहीत धरूनच म्हैसूर संस्थानच्या इतिहासाचा पुढचा चित्रपट रेखाटणें उचित होईल.

म्हैसूरच्या शेवटल्या लढाईंत व श्रीरंगपट्टण किल्ल्याच्या हल्ल्यांत टिपू धारातीर्थी मरण पावला. पुढें म्हैसूर संस्थानची काय व्यवस्था करावयाची हा कंपनीसरकारला मोठा बिकट प्रश्न येऊन पडला. ही म्हैसूरची शेवटची लढाई निजाम, मराठे व कंपनीसरकार अशा त्रिवर्गांनीं संगनमतानें व परस्पर साहाय्यानें केली होती. तेव्हां सर्व मुलुख खालसा केल्यास सर्व प्रांताचे तीन तुकडे करणें भाग होतें. पण यायोगें पुढेंमागें ज्यांच्याशीं आपल्याला झगडावें लागणार त्यांनां जास्त सामर्थ्यवान केल्यासारखें होणार असें कंपनीसरकारच्या मनांत आलें असलें पाहिजे. त्यापेक्षां सर्वस्वीं उपकृत व आपल्या पूर्णपणें आधीन राहील अशा वाडीयार घराण्यांतल्या हिंदू राजाला हैदरच्या

पूर्वीचें ह्मणजे वाडीयार घराण्यानें स्वपराक्रमानें मिळविलेल्या आकाराचें राज्य द्यावें ह्मणजे तीन मोठमोठे वाटे करण्याचा प्रश्न येणार नाहीं व हैदरनें नवीन काबीज केलेल्या मुलुखाची मात्र वाटणी केली म्हणजे झालें; शिवाय हिंदू राज्याचें पुनरुज्जीवन हें न्यायाच्या बाजूनें व कंपनीसरकारबद्दल हिंदुस्थानच्या एकंदर प्रजेवर अनुकूल ग्रह करण्याच्या दृष्टीनें चांगलें आहे, असें त्यावेळच्या इंग्रजी मुत्सद्यांस वाटलें असावें. असा सर्व बाजूनें विचार करून कंपनीसरकारनें आपला मनोदय जाहीर केला व तदनुरूप वाडीयार राजघराण्यांतील कृष्णराज नांवाच्या पांच वर्षाच्या राजकुमारास गादीवर बसविण्याचें ठरविलें. टिपूच्या मुलांना त्यांच्या इतमामाप्रमाणें रोख तनखा ठरवून त्यांना वेलूरच्या किल्ल्यांत ठेविलें व पुढें कलकत्त्यास पाठविण्यांत आलें. पूर्वीच्या अमदानींतील लहान मोठ्या अंमलदारांस पेन्शनें दिलीं. मात्र पूर्णय्याला नव्या राजाची दिवाणगिरी दिली. पूर्णय्या हे कोइमतूरकडील माध्वपंथी ब्राह्मण होते. ते जुन्या चालीचे स्वामिनिष्ठ गृहस्थ होते. हैदरनें त्यांची बुद्धिमत्ता व व्यवहार-

ज्ञाने पाहून त्यांना आपले फडणीस केलें होतें. हैदरांच्या मृत्यूनंतर त्यांच्याच धोरणी व व्यवहारदक्ष वर्तनानें टिपूच्या हातीं बिनबोभाट व सुरक्षितपणें ह्मैसूरची सत्ता आली. यामुळें टिपूच्या कारकीर्दींत तेच फडणीस राहिले. टिपूवर सुद्धां त्यांचें वजन व वचक असे हें खालील गोष्टीवरून दिसून येतें. एकदां टिपूनें पूर्णय्यांस मुसल्मानी धर्म स्वीकारण्याबद्दल सुचविलें हें ऐकल्याबरोबर पूर्णय्या ' मी आपला सेवक आहे ' इतकें ह्मणून घाईघाईनें आपला अपमान झाला असें दर्शविणाऱ्या मुद्रेनें परत फिरले. ही गोष्ट टिपूच्या मांसाहेबास कळली. तेव्हां तिनें टिपूची पूर्णय्यांसारख्या स्वामिनिष्ठ व कर्तबगार अधिकाऱ्याची अशा रीतीनें अवहेलना करण्याबद्दल कानउघडणी केली. टिपूवर त्याच्या आईचें वजन होतें. ह्मणून आपली चूक टिपूच्या लक्षांत आली व पुढें पूर्णय्यांजवळ त्यानें तो प्रश्न काढलाच नाहीं. श्रीरंगपट्टण सर झाल्यावर व टिपूच्या मरणानंतर पूर्णय्यांस कंपनीच्या स्वाधीन होण्यास सांगण्यांत आलें, तेव्हां पूर्णय्या ह्मणाले, "काशीपासून रामेश्वरपर्यंत आमच्या लोकांचें व धर्माचें

रक्षण करणाऱ्या राष्ट्राच्या मी स्वाधीन कां होणार नाहीं ?" त्या काळच्या लोकांवर कंपनीसरकारच्या धर्माच्या बाबतींतील सहिष्णु धोरणाचा केवढा अनुकूल परिणाम झाला होता पहा! अशा जुन्या कारकीर्दीतील कर्तबगार माणसास दिवाण नेमल्यानें म्हैसूरच्या प्रजेस संतोष झाला. कर्नल क्लोज हे म्हैसूरचे रेसिडेंट नेमण्यांत आले व कर्नल आर्थर वेल्सले ( पुढें ड्युक ऑफ वेलिंग्टन ह्मणून प्रसिद्धीस आलेले ) यांनां म्हैसूर सैन्याचें आधिपत्य देण्यांत आलें. याप्रमाणें राज्य-व्यवस्था ठरून ता. ३० जून रोजीं कृष्णराज या बाल-राजास म्हैसूरच्या गादीवर मोठ्या समारंभानें व धार्मिक विधीनें बसविण्यांत आलें.

वर निर्दिष्ट केलेल्या तीन कर्तबगार व कर्मदक्ष कामगारांच्या हांतीं म्हैसूर संस्थानचा कारभार आल्या-मुळें सुयंत्रित राज्यव्यवस्थेची उत्तम घडी बसली यांत नवल नाहीं. दिवाण पूर्णय्या यांस संस्थानची खडान-खडा माहिती असल्यामुळें वसुलाचें काम उत्तम होऊं लागलें व संस्थानचें स्थैर्य शिल्लक संपत्तींत आहे अशी पूर्णय्याची दृढ समजूत असल्यामुळें त्यानें कारभार

काटकसरीनें करून बारा वर्षांत दोन कोट रुपयांची खजिन्यांत शिल्लक टाकिली.

सन १८११ च्या सुमारास कृष्णराज वाडीयार महाराजांनां राज्यकारभार हातीं घेण्याची इच्छा झाली व ती गोष्ट रेसिडेंटाजवळ त्यांनीं बोलून दाखविली. त्यावरोबर पूर्णय्यानें पेनशन् घेतलें व ते श्रीरंगपट्टण येथें राहण्यास गेले व तेथें सन् १८१२ मध्यें वारले. पूर्णय्या दिवाण हें म्हैसूरच्या प्रख्यात दिवाणांपैकीं पहिले दिवाण होत. त्यांनां हैदरअल्लीनें मुसहल्ली हें गांव इनाम दिलें होतें व त्यांनीं संस्थानाची सेवा इमानें इतबारें मोठ्या कुशलतेनें व संस्थानच्या हितदृष्टीनें केली, या त्यांच्या कामगिरीबद्दल सन १८०५ मध्यें येलंडूर–म्हैसूरच्या आग्नयेस ४२ मैलावर असलेलें तालुक्याचें ठिकाण व त्याच्या आसपासचीं पन्नास साठ खेडीं मिळून एक लहानसा तालुका करून--तालुक्याची जहागीर त्यांनां वंशपरंपरेनें देण्यांत आली. हा तालुका फार सुपीक म्हणून प्रसिद्ध आहे व सरकारनें सर्व सारा माफ केलेला आहे. येथें पूर्णय्याचें घराणें चालू असून तें म्हसूरच्या मोठ्या जहागीरदारांपैकीं

एक ( त्यांच्या बंगळूर शहरांतील राजवाड्याचेजा बंगल्याच्या एका भागांत आह्मांला राहावयास मिळालें होतें हें प्रास्ताविक लेखांत सांगितलें आहे ) असून मंडळी सुशिक्षित व सुस्थितींत आहेत. मुलें मुली अजून सज्ञान झाली नाहींत. असो.

सन १८११ पासून सन १८३१ पर्यंत ह्मणजे वीस वर्षें कृष्णराज वाडीयार महाराजांनीं स्वतः राज्य-कारभार केला. पण स्वार्थसाधु, हलकट, हांजी-खोर लोकांच्या तावडींत महाराज सांपडले. व्यंकट सुभय्या गांवाचा सतारवाला व शिमोगा जिल्ह्यांतील नगर तालुक्याचा फौजदार व पुढें लष्कर खात्यांत सरकारकून झालेला रामराव या दोघांचें महाराजांवर फार वजन वाढलें. रामराव तर वस्तुतः दिवाण होता ह्मणाना. या माणसानें आपले नातेवाईक जिकडेतिकडे भरले; लाखो रुपयांची अफरातफर केली; सरकारी वसुलांत हलगर्जीपणा होऊन लाखों रुपयांची बाकी राहिली; त्याची वासलात लावण्याकरितां याला नेमिलें, त्यांत त्यानें लोकांनां सूट देऊन आपण पैसे खाल्ले; सारांश सर्व राज्यांत व विशेषतः नगरच्या भागांत

प्रजेंत फार असंतोष वाढला. पूर्णय्यानें खजिन्यांत ठेवलेले दोन कोट रुपये केव्हांच सरले व खजिना रिता झाला व लष्करी लोकांचे पगारसुद्धां सहा सहा महिने मिळेनांसे झाले. रेसिडेंट साहेबांनीं महाराजांची वारं-वार कानउघडणी केली पण व्यर्थ. सन १८२५ मध्यें तर मद्रासचे लोकप्रिय गव्हर्नर मनरोसाहेब स्वतः म्हैसूरला येऊन त्यांनीं महाराजानां राज्यव्यवस्था सुधारण्याचा सल्ला दिला व राज्यांतील अंदाधुंदी अशीच चालू राहिल्यास ब्रिटिशसरकारास तहाच्या चवथ्या कलमाप्रमाणें राज्यव्यवस्था आपल्या हातीं घ्यावी लागेल असा इशारा दिला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं व राज्यव्यवस्थेची स्थिति अधिकच वाईट होत चालली. रामरावाच्या जागीं व त्यांच्या कारभारांतील बिंग बाहेर काढण्या-करितां वीरराजू अरसू नांवाच्या नातलगास महाराजांनीं नगरकडे पाठविलें. तेव्हां आपल्या लबाड्या लपविण्याकरितां रामरावानें नगर किंवा जुने गांव बेडनूर येथल्या जुन्या नायकाचा हक्क सांगणारा कोणी तोतया उभा करून त्या भागांत बंडावा सुरू केला व

वा बंडाव्याचा वणवा भडकत चालला. महाराजांनीं या बंडाचा वींमोड करतां येईना. तेव्हां हरिहरहून ब्रिटिश फौज आणवाची लागली. ही बंडाळी आगष्ट १८३० पासून जून १८३१ पर्यंत चालली होती. जूनमध्यें नगर—बंडखोरांचें मुख्य ठिकाण व तोतयाची राजधानी—काबीज करण्यांत आलें व पुढें महिना पंधरा दिवसांत सर्व स्थिरस्थावर झालें. पण हिंदुस्थान सरकारनें मागें इशारा दिल्याप्रमाणें म्हैसूर संस्थानचा राज्यकारभार आपल्या प्रत्यक्ष हातीं घेण्याचें ठरविलें व महाराजांस अधिकारत्याग करण्याची विनंति करण्यांत आली; व १९ आक्टोबर १८३१ या दिवशीं महाराजांनीं एक हिंदुस्थान सरकारनें व एक मद्रास सरकारनें नेमलेल्या कमिशनरच्या हातीं अधिकाराचीं सूत्रें दिलीं व ते म्हैसूरच्या आपल्या राजवाड्यांत राहूं लागले. त्यांच्या इतमामाला साजेसा दरमहा एक लाखाचा तनखा महाराजांच्या खर्चाकरितां ठरविण्यांत आला. यावेळीं म्हैसूर संस्थानचें उत्पन्न एक कोटीच्या आंत बाहेर असेल. ह्मणजे शेकडा बारा टक्के त्यांस खर्चाकरितां ठरविण्यांत आले.

हांजी खासगी खर्चाची बाब मर्यादित करण्याची पद्धति १८३१ मध्यें पाडण्यांत आली, ती म्हैसूरच्या महाराजांनीं व त्यांच्या वंशजांनीं सारखी ठेविली. म्हैसूर संस्थानच्या प्रगतीपर राज्यव्यवस्थेची एक गुरूकिल्ली या खासगी खर्चातील नियंत्रणांत आहे. दुसरीचा पुढें उल्लेख येईल.

पण दोन कमिशनर व एक रेसिडेंट अशा प्रकारची तिरस्थळींची अधिकारव्यवस्था गैरसोईची व एकमेकां- मध्यें कटकट वाढविणारी वाटूं लागली, तसेंच हिंदु- स्थानसरकार व मद्राससरकार यांच्या दुहेरी देखरेखी- पासूनहि बखेडे होऊं लागले म्हणून त्या सर्व तात्पुरत्या व्यवस्था मोडून १८३४ पासून एकच कमिशनर नेमण्यांत आला. मद्रासरकारची देखरेख काढून म्हैसूर संस्थान सर्वस्वीं हिंदुस्थानसरकारच्या देखरेखीखालीं आणण्यांत आलें. रेसिडेंटाची जागा काढून टाकली ही गोष्ट प्रथमतः महाराजांनां आवडली नाहीं. पण त्यांनांहि पुढें एकमुखी कमिशनरची राज्यव्यवस्था पसंत पडली व कमिशनरचा व महाराजांचा संबंध फार सलोख्याचा राहिला. पण या व्यवस्थेच्या चांगुल-

पणाचें श्रेय पहिल्या कमिशनरला आहे यांत शंका नाहीं. ज्याप्रमाणें पुनरुज्जीवित म्हैसूर संस्थानला पूर्णय्या-सारखे कर्तबगार दिवाण लाभले म्हणून संस्थानला स्थैर्य आलें, त्याप्रमाणें कमिशनरी अमलांत मार्क कवन-सारखा कर्तबगार, स्वाभिमानी, संस्थानाभिमानी व कर्तव्यदक्ष कमिशनर मिळाला म्हणून म्हैसूरची नवी राज्यव्यवस्था यशस्वी व प्रगतिपर झाली. कवनसाहेब सन १८०१ मध्यें सोळा वर्षांचे असतांना प्रथम हिंदुस्थानांत आले व मेजर विल्क्स ( यानेंच म्हैसूर प्रांताचा दोन भागांत फार विश्वसनीय व मनोरंजक इतिहास लिहिला आहे ) याचे हाताखालीं नोकरीस राहिले व निरनिराळ्या खात्यांत पण म्हैसूरांतच काम करून सन १८३४ मध्यें कमिशनर झाले व ते सन १८६१ पर्यंत जवळ जवळ मरण काळापर्यंत कमि-शनर राहिले. यांच्या कमिशनरीच्या कारकीर्दीत अर्वाचीन म्हैसूर संस्थानच्या सुधारलेल्या राज्य-पद्धतीला सुरुवात झाली. यांनां म्हैसूर संस्थानाबद्दल फार अभिमान असे. सन १८६० च्या सुमारास म्हैसूर संस्थान मद्रास सरकारच्या देखरेखीखालीं

देण्याचा बूट निघाला होता. महाराज याला अत्यंत विरुद्ध होते; पण सर कबनलाहि संस्थानच्या दर्जाचा अभिमान होता. तेव्हां त्यानें महाराजांच्या या संस्थानच्या दर्जेचीच बाजू घेऊन कमिशनरीचा राजिनामा दिला. संस्थानांत साठ वर्षे नोकरी केलेल्या कमिशनरच्या वर्तनाचा योग्य तो परिणाम होऊन सरकारनें आपली योजना मागें घेतली. सन १८६१ मध्यें कबन साहेब स्वदेशी जातांना सुएझ येथेंच वारले. बंगलुरास कबन साहेबांचें नांव अजरामर करणारीं कितीतरी स्मारकें आहेत. त्यांचा उल्लेख बंगळूर या लेखांत आलाच आहे.

महाराज कृष्णराज वाडीयार यांनीं मध्यंतरीं राज्यकारभार आपल्या हातीं द्यावा अशाबद्दल सरकारपाशीं मागणी केली. पण त्याचा जरीं उपयोग झाला नाहीं तरी शेवटीं ब्रिटिश सरकारनें, कृष्णराज वाडीयार यानीं सन १८६५ मध्यें चामराजेन्द्र नांव ठेवून आपल्या घराण्यांतील दोन वर्षांचा मुलगा दत्तक घेतला होता त्याचा वारस–हक्क कबूल करून तो सज्ञान झाल्यावर, शिक्षणानें व दानतीनें योग्य

ठरल्यास त्याच्या स्वाधीन राज्यकारभार करण्यांत येईल असें आश्वासन महाराजांनां दिलें. येवढ्यानें त्यांनां पुष्कळ समाधान वाटलें. सन १८६८ मध्यें ७४ व्या वर्षी जवळ जवळ सत्तर वर्षे राज्यपद भोगून कृष्णराज वाडीयार महाराज वारले. लागलाच चामराज महाराजांच्या नांवानें राज्यकारभार सुरू झाला व राज्यव्यवस्था तीच चालू राहिली व त्यांत दिवसेंदिवस सुधारणा होत चालली. सन १८७५ व ७६ या दोन वर्षी अवर्षण पडल्यामुळें म्हैसूर प्रांतांत मोठा दुष्काळ पडला. पण दुष्काळाचीं कामें काढून लोकांनां प्रत्यक्ष अन्न देऊन लोकांचे जीव वांचविण्यांत आले. तरी हजारो लोक मृत्युमुखीं पडले. तिजोरीची फार वाईट स्थिति झाली. ह्मणून निरनिराळ्या खात्यांतून खर्चाची छाटाछाट करावी लागली व हा दुष्काळ दोन तीन वर्षे संस्थानला भोगावा लागला. पण पुढलीं चार पांच वर्षे मुबलक पीक आल्यामुळें पुन्हा सुबत्ता झाली व दुष्काळप्रतिबंधाकरितां रेलवे व पाट-बंधारें अशीं दोन्हीं कामें संस्थाननें हातीं घेऊन कांहीं कर्ज काढून व कांहीं दर

वर्षांच्या उत्पन्नांतून, पण पार पाडली व त्यामुळेंहि संस्थानची भरभराट होऊं लागली. चामराजेंद्र महाराज अठरा वर्षांचे झाल्याबरोवर ता. २५ मार्च सन १८८१ मध्यें त्यांचा राज्यारोहण समारंभ मोठ्या थाटानें करण्यांत येऊन त्यांना पूर्ण अखत्यारी देण्यांत आली. अधिकारपरावर्तनाचा दस्तऐवज लॉर्ड रिपन यांचे सहीचा आहे. त्यांत ब्रिटिश सरकार व म्हैसूर संस्थान यांच्यामधल्या अंकित सलोख्याचीं कलमें आहेतच, पण एक कलम प्रजेबद्दल आहे तें असें.

संस्थानच्या जमाखर्चाची, करवसुलीची, कर बसविण्याची व न्यायदानाची व्यवस्था, म्हैसुर संस्थानच्या प्रजाजनांचें पालन व म्हैसूर प्रांतांतील ब्रिटिश नागरिकांचे हक्क व हित यांचें संरक्षण यांची योग्य तजवीज व शेतकी, उद्योगधंदे व व्यापारउदीम यांच्या वाढीची तरतूद या सर्व बाबतींत गव्हरनर जनरल व त्यांचें कौन्सिल हे जो सल्ला देतील तदनुरूप महाराजांनीं सदा सर्वकाळ आपला कारभार चालविला पाहिजे.

या कलमांतील निर्बंध व मागें उल्लेख केलेलें खासगी खर्चावरील नियंत्रण या दोन म्हैसूर संस्थानच्या प्रजाहितपर राज्यव्यवस्थेच्या गुरुकिल्ल्या होत यांत शंका नाहीं. महाराजांनीं असें पाहिलें कीं आपला अधिकार एवींतेवीं मर्यादित करून घ्यावयाचाच तर तो आपल्याच प्रजेकडून कां न करून घ्यावा. अशा बुद्धीनें त्यांनीं दिवाणाची जागा पुन्हां भरली व त्यांच्या मदतीस कौन्सिलर देऊन त्यांनां निरनिराळीं खातीं वांटून दिलीं. शिवाय दर दसऱ्याला आपल्या प्रजेच्या प्रतिनिधींची सभा बोलविण्याचा प्रघात पाडला. अशी पहिली सभा ७ आक्टोबर १८८१ मध्यें भरविली गेली व तिचे १४४ सभासद होते. तेव्हांपासून ही सभा सालोसाल भरत असून प्रतिनिधींच्या संख्येंत व त्यांचे अधिकारांत बरीच वाढ करण्यांत आली आहे. असो.

चामराजेंद्र महाराजांनीं आपले पहिले दिवाण रंगाचार्लु ह्मणून नेमिले. पण ते संस्थानला फार दिवस लाभले नाहींत. ते सन १८८३ मध्यें वारले व म्हैसूरच्या अर्वाचीन इतिहासांत फार प्रसिद्धि मिळ-

खेलेले शेषाद्रि ऐय्यर दिवाण झाले. यांनीं कारभार फारच यशस्वी रीतीनें केला. यांच्याच कारभारकाळीं कोलैार येथल्या सोन्याच्या खाणी सुरू झाल्या; शिवसमुद्र येथल्या धबधब्यावर वीज उत्पन्न करण्याचा कारखाना काढण्यांत आला. पाटबंधारे व रेलवे यांची पुष्कळच वाढ करण्यांत आली व म्हैसूर संस्थानची औद्योगिक बाबतींत प्रगति होऊं लागली.

याप्रमाणें म्हैसूर संस्थानची झपाट्यानें भरभराट होत असतां चामराजेन्द्र महाराज एकाएकीं कलकत्त्यास गेले असतांना घटसर्पाच्या व्याधीनें सन १८९४ मध्यें डिसेंबरच्या २८ तारखेस निधन पावले. या महाराजांच्या अकालीं व आकस्मिक मृत्यूनें म्हैसूरच्या सर्व प्रजेला नव्हे तर सर्व हिंदुस्थानवासीयांना हळहळ वाटली. पण होणारापुढें इलाज नाहीं.

चामराजेन्द्र महाराजांचे चिरंजीव कृष्णराज-सध्यांचे म्हैसूरचे महाराज-हे तेव्हां दहा वर्षांचे होते. त्यांना १ फेब्रुवारी १८९५ मध्यें मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करण्यांत आला व महाराजांची मातोश्री राणी वाणीविलास यांस रीजंट नेमण्यांत आलें व राज्य-

कारभार पूर्वीप्रमाणें चालू झाला. पण म्हैसूरच्या प्रगतींत या मृत्युमुळें व महाराजांच्या अज्ञान दशेमुळें खळ पडला हें स्वाभाविक आहे. पुढें हल्लींचे महाराज सज्ञान झाल्यावर त्यांनीं सर विश्वेश्वर यांना प्रथम मुख्य इंजिनीयर केलें व नंतर त्यांनां दिवाणगिरी दिली. शेषाद्रि-आय्यरनीं घातलेल्या सुदृढ पायावर विश्वेश्वर अय्यांनीं औद्योगिक बाबतींत आणखी पुढें पाऊल टाकलें. त्यांनीं कावेरी नदीवरील प्रचंड धरणाची योजना तयार करून ती पार पाडली; भद्रावती येथें लोखंडाचा कारखाना काढून म्हैसूरची गुप्त खनिज संपत्ति वर काढण्याची व्यवस्था केली; म्हैसूरमध्यें चंदनाच्या तेलाचे कारखाने काढले; सारांश म्हैसूरची आर्थिक व औद्योगिक प्रगति होण्याकरितां अहर्निश खटपट केली व म्हैसूरच्या वाढत्या आयात व निर्गत व्यापारास स्वतःचें बंदर असावें अशा इराद्यानें भटकळ बंदराची योजना व तेथपर्यंतच्या रेलवेची योजना तयार करून हिंदुस्थान सरकारशीं त्याबाबत वाटाघाट सुरू केली. पण हातांत घेतलेलीं कामें पुरी होण्यापूर्वींच त्यांनां आपल्या दिवाणगिरीचा राजीनामा द्यावा लागला. असो.

३७८२ .... २८८

याप्रमाणें म्हैसूर संस्थानचा पूर्व व अर्वाचीन इतिहास आहे. हल्लीं हिंदुस्थानांतील सर्व संस्थानांत म्हैसूर पहिल्या प्रतीच्या संस्थानांत गणलें जातें. शंभर दीडशें वर्षांपूर्वी ज्या संस्थानचें उत्पन्न जेमतेम एक कोट होतें त्याच संस्थानचें सध्यांचें वार्षिक उत्पन्न जवळजवळ साडेतीन कोट आहे व तितकाच राज्यव्यवस्थेचा खर्च आहे. यामध्यें महाराजांचा खासगत खर्च फक्त तेवीस लाखाचा आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. म्हैसूर संस्थानच्या प्रगतीपर राज्यव्यवस्थेचा अनुभव म्हैसूरप्रांतांत प्रवास करणाऱ्या प्रवाशास पदोपदीं येतो हें मागील लेखांतील जागोजागच्या उल्लेखांवरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. तेव्हां आतां अधिक पाल्हाळ न लावितां ज्या म्हैसूरच्या प्रवासानें व तदनंतरच्या तत्संबंधींच्या आठवणीनें, वाचनानें व लेखनानें माझ्या मनाला दोन वर्षेपर्यंत राहून राहून आनंद दिला तो प्रवास ज्या आश्रयदात्यांच्या मदतीनें घडला त्यांचे मनोमय आभार मानून लेखणीला तात्पुरती विश्रांति देतों.

REFBK 0003792
REFBK-0003792